ग्रं. सं. ठाणें

# नैवेद्य

काका कालेलकर

REFBK-0016605

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

७६५०८ ~~४२६०८~~

सं.

रिवां द्व

१७५७

२५।८।६८

# नैवेद्य

वि: निबंध

## आचार्य काका कालेलकर
## ह्यांचें साहित्य

रवीन्द्र–मनन १९५८

जीवनलीला १९५८

रवीन्द्र–वीणा १९६१

रवीन्द्र–झंकार १९६२

खेळकर पाने १९६४

# नैवेद्य

काका कालेलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. १६६०५
REFBK-0016605

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© काका कालेलकर

पहिली आवृत्ती १९६८/१८९०
प्रकाशक : ग० रा० भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ३४ डब्ल्यूबी
मुद्रक : वि० पु० भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४ बी आर

# रसायन

माझ्या मतें, 'नैवेद्य' ही काव्यकृति रवीन्द्रनाथांच्या उत्कृष्ट कृतींमध्यें मोडते. या कृतीचें भक्ति-माधुर्य 'गीतांजलि'हून यत्किंचितहि कमी नाहीं. रवीन्द्रनाथांनीं आपल्या इंग्रजी गीतांजलींत नैवेद्यामधूनहि अनेक गीतें घेतलीं आहेत.

आपण जेव्हां स्वादिष्ट, पौष्टिक आणि रोचक भोजन तयार करतों, तेव्हां प्रथम तें नैवेद्य म्हणून देवाला अर्पण करतों. आणि मग अशा अर्पणानें पवित्र झालेलें तें अन्न, ईश्वराचा प्रसाद म्हणून आपण स्वीकारतों आणि प्रसन्नपणें त्याचें सेवन करतों. अशा रीतीनें 'देणें' आणि 'घेणें' (ददाति प्रतिगृह्णाति) या दोन्ही क्रिया आह्लादक आणि उन्नतिकारक असतात.

रवीन्द्रनाथांनीं स्वतःच्या वडिलांच्या प्रेरणेनें जें काव्यमय चिंतन केलें, त्यांतूनच हें गीतशतक निर्माण झालें आहे. यांतील अधिकांश सुनीतेंच आहेत. ईशभक्ति आणि देशभक्ति यांनीं थबथबलेलीं हीं नैवेद्यगीतें खरोखर एक मेवा आहे. जीवन-चिंतन, प्रार्थना, साधना, उपासना, भक्ति आणि आत्मनिवेदन यांचा हा एक पौष्टिक, सुगंधी आणि स्वादिष्ट नैवेद्य आहे यांत शंका नाहीं. रवीन्द्रबाबूंच्या सर्वच कृतींमध्यें रमणीयता ओथंबलेली असते. त्यांतहि या नैवेद्याची रुचि कांहीं औरच आहे.

ज्या काळीं हीं गीतें लिहिलीं गेलीं, तो काळ भारतीय संस्कृतीच्या बाबतींत युगान्तराचा काळ होता. एकोणिसाव्या शतकाचा अस्त झाला आहे आणि विसाव्या शतकाचा नीटसा प्रारंभ झाला नाहीं, अशा संधिकाळीं या गीतांची निर्मिति झाली आहे.

जेव्हां पोर्तुगीज, फ्रेन्च आणि इंग्रज यांचे पांढरे पाय आपल्या देशाला लागले, त्या काळीं आपला समाज चांगलाच अधोगतीला पोहोंचला होता. जागतिक परिस्थितीचा कसलाच परिचय नाहीं, अखिल भारतीय परिस्थितीचें पुरेसें आणि अद्यतन आकलन नाहीं, राष्ट्रीय संगठन करण्याइतकी परस्पर आत्मीयता नाहीं आणि राजकीय सामर्थ्याचें दिवाळें वाजलेलें, अशी स्थिति होती. हें सर्व दुःखाचें कारण होतेंच पण त्याहूनहि अधिक म्हणजे राष्ट्रानें स्वतःचा आत्माच गमावला होता. उच्च वर्गीय लोक स्वतः पुरुषार्थहीन असून देखील, खालच्या थराच्या लोकांना आपल्या दाबांत ठेवीत असत. आणि असें करण्यांतच धर्माचें पालन होत आहे असें ते मानत होते आणि सांगतहि होते.

उलटपक्षीं पश्चिमेचे लोक आपल्या संगठन-चातुर्यानें आम्हा भारतीयांना आपल्या कह्यांत ठेवत होते आणि उंदराप्रमाणें फुकून फुकून देशाचें रक्त चोखीत होते. आणि इतकें असूनहि त्यांचा दिमाख असा कीं, तुमचेपेक्षा आमची नैतिक सद्गुणांतील श्रेष्ठता स्वयंसिद्ध आहे, म्हणून स्वतःचा उद्धार करून घ्यावयाचा असेल तर तुम्हांला आमचें शिष्यत्व पत्करलें पाहिजे.

आपल्या लोकांपैकीं एक वर्ग पाश्चात्यांचें हें म्हणणें आणि त्यांची टीका मान्य करीत असे. दुसरा एक वर्ग आंधळ्या अभिमानांत संतुष्ट होता आणि म्हणायचा कीं, "आमची संस्कृति श्रेष्ठ आहे. परदेशी लोकांची संस्कृति हीन आणि भ्रष्ट आहे." ही बढाई किती पोकळ आहे हें सिद्ध करायला आपली गुलामीच बस असल्यानें ती हास्यास्पद ठरत होती.

अशा परिस्थितींत देशांतील विचारशील नेत्यांनीं भारतीय संस्कृतीच्या वारशांत खरोखर श्रेष्ठ वस्तू कोणच्या आहेत याचें चिंतन केलें आणि धर्मसंस्करण, सामाजिक सुधारणा, राष्ट्रीय जनजागृति, शिक्षणाचा प्रचार आणि उद्योग-हुन्नराचें पुनरुज्जीवन इ० गोष्टींकडे खास ध्यान दिलें. जनतेमध्यें एका बाजूनें आत्मविश्वास वाढवला तर दुसऱ्या बाजूनें उग्रपणें आत्मनिरीक्षण चालवलें. आणि नम्रतेला श्रद्धेची जोड देऊन नवयुगाचा प्रारंभ केला. बंगालमध्यें आत्मशुद्धि आणि आत्मश्रद्धेच्या युगाला राजा राममोहन रायनीं प्रारंभ केला. धर्मसंस्करणार्थ त्यांनीं ब्राह्मसमाजाची स्थापना केली. सामाजिक सुधारणेचे अनेक कार्यक्रम त्यावेळच्या नेत्यांनीं उत्साहानें हातीं धरले. आणि लोकशिक्षणाच्या द्वारा लोकस्थिति सुधारण्याचें व्रत घेतलें. राजा राममोहन राय यांचेपासून महर्षि देवेन्द्रनाथ ठाकूरपर्यंत सामाजिक नेत्यांनीं जें राष्ट्रहितचिंतन केलें आणि देशांत जी

प्राणप्रतिष्ठा केली त्याचा वारसा रवीन्द्रनाथांना मिळाल्यामुळें, अगदीं लहानपणापासून शुद्ध दृष्टि आणि हृदयाची उदारता त्यांच्यांत दिसून येते. लहानपणींच मातेचा वियोग घडल्यामुळें रवीन्द्रनाथांचें पालनपोषण त्यांच्या पित्यांच्या हातूनच घडलें. वडिलांच्या-बरोबर हिमालयाची यात्रा केल्यामुळें प्रकृतिमातेच्या शुभ सौन्दर्याचें त्यांना भव्य दर्शन घडलें. वडिलांचीं धर्मप्रवचनें मन लावून ऐकल्यामुळें त्यांना आत्मचिंतनाची दीक्षा मिळाली आणि त्यांच्या ईश्वरदत्त काव्यप्रतिभेनें या साऱ्या संस्कारांचें एक अद्‌भुत आणि प्राणपोषण रसायण बनवलें !

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं पाश्चात्य राष्ट्रांत परस्पर ईर्षा, द्वेष आणि संघर्ष माजल्यामुळें तिकडचा सूर्य क्षीण होत चालला होता. आणि आपल्या देशांत 'रात्रि प्रभातिल उदिल रविच्छबि पूर्व उदयगिरि भाले' अशीं शुभस्वप्नें पडूं लागलीं होतीं. परम आस्तिक आणि भगवद्‌भक्त अशा ऋषितुल्य पित्याच्या सहवासांत रविबाबूंमध्ये पितृभक्तीचा उदय झाला होता. त्यांतच त्यांना पित्याकडून ईश्वराची 'पिता म्हणून' उपासना करण्याची दीक्षा मिळाली होती. पिता नोऽसि, पिता नो बोधि। हा मंत्र त्यांच्या नित्य प्रार्थनेंत होताच. अशा युगान्तरकालीं रचलेल्या काव्याचा हा संग्रह कवीनें पितृचरणीं अर्पण केला हें स्वाभाविकच झालें. कवींची ही अर्पणपत्रिका या संग्रहांतील ६९व्या कवितेमध्यें कृतार्थ झालेली दिसून येते. नैवेद्यांतील सर्वच कवितांतून आत्मशुद्धि, आत्मविश्वास आणि भक्तिरस यांची प्रधानता आहे. भक्तिरस स्वतःच इतका आकर्षक असतो कीं, भक्तिकाव्यांत काव्यगुण कमी असला तरी ती उणीव फारशी ध्यानांत येत नाहीं. पण रविबाबूंची भक्ति एका श्रेष्ठ काव्यहृदयाची भक्ति असल्यानें या संग्रहांत काव्य आणि भक्ति दोन्ही सारखींच थबथबलेलीं आहेत. या नैवेद्यांत शुद्ध देशभक्तीची, समाजसेवेची, आत्मोन्नतीची आणि आत्मविश्वासाचीं कितीतरी नितान्त सुंदर आणि प्रभावशाली गीतें आपल्याला वाचायला मिळतात. (आणि संगीताचें अंग ज्यांना आहे त्यांना तर हीं मूळ गीतें म्हणजे एक अत्यंत मधुर भजनी ठेवाच वाटेल.)

रवीबाबूंची धर्मश्रद्धा पुराणप्रिय किंवा रूढीजड नाहीं; ती कृत्रिमहि नाहीं आणि उथळहि नाहीं. रवीबाबूंच्या धर्मश्रद्धेंत उपनिषद्‌कालीन ऋषींची धर्मजिज्ञासा, शोध आणि निष्ठा आहे. आणि त्याबरोबर त्यांची प्राणोपासनाहि आहे. ऋषींची ब्रह्मोपासना आणि प्राणो-पासना, बौद्ध धर्मवीरांची जीवनसाधना आणि संतयुगीन भक्तांची ईश्वरनिष्ठा आणि आत्मनिवेदन—हें सर्व कांहीं रवीबाबूंच्या कवितेंत एकवटलेलें पाहायला मिळतें.

मध्यकालांतील कर्मकांड, सकाम उपासनेची षोडषोपचार पूजा आणि जपजाप्याची यांत्रिक कवायत इत्यादि दोषांमुळें सामाजिक जीवन कसें हतप्रभ, क्षीणवीर्य आणि विकृत झालें होतें याचें चित्र कवींच्या नजरेसमोर होतें म्हणूनच या संग्रहांतील क्रमांक ५२ सारखें गीत तयार होऊं शकलें. धर्माच्या नांवाखालीं आपल्या लोकांनीं जो सामाजिक अन्याय चालवला होता त्याच्या विरुद्ध जेव्हां कवींचा पुण्यप्रकोप पेट घेतो तेव्हां कवि क्रमांक ५० सारखें गीत गाऊं लागतात. पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, जेव्हां रवीबाबू ब्राह्मणवर्गाच्या पतित अवस्थेचें वर्णन करतात तेव्हां ते तिरस्कारबुद्धीनें नव्हे तर हृदयाच्या वेदनेनें आणि आत्मीय वृत्तीनें प्रेरित झालेले असतात. आणि म्हणूनच ब्राह्मणवर्गाविषयी निराश न होता, त्यांचेकडूनदेखील यापुढें उत्तम सेवेचीच ते अपेक्षा करतात.

पाश्चात्य सुधारणेंतील राष्ट्रपूजाधर्म (नॅशनॅलिझम) किती भयानक आणि नास्तिक आहे याचें चित्र, अगदीं निर्भयपणें त्यांनीं खेंचलें असलें तरी मानवजातिविषयीचा आणि मांगल्याविषयीचा त्यांचा विश्वास लेशमात्र कमी होत नाहीं.

रवीन्द्रनाथांचा पिंड जीवनोपासकाचा आहे. ईश्वराची उपासना त्यांनीं जीवनदेवता म्हणूनच केली आहे. त्यांच्या मतें जीवनद्रोह खरोखर प्रभुद्रोहच आहे. जीवन मुळांत प्रभूचीच कृति आहे, त्याची लीला आहे. प्रभु स्वतःला जीवनद्वारा अनंत रूपानं प्रगट करतात. या सृष्टीमध्यें रूप, रस, गंधाचा जो विस्तार आहे, प्रसाद सर्वत्र पसरलेला आहे आणि विविध कर्मांच्या द्वारा जीवनानुभूति मिळवण्याची संधि आहे, ती सर्व भगवंताची कृपाप्रेरित लीलाच आहे. ही मंगलमय लीला भक्तिपूर्ण नजरेनें न्याहाळून तींतून प्रगट होणाऱ्या जीवनस्वामीला ओळखणें — हीच खरी भक्ति आहे.

रवीबाबूंची जीवनसाधना त्यांच्या जीवनाचे विभाग होऊं देत नाहीं आणि आपल्याला जीवनाकडे विमुखहि होता येत नाहीं. भारतानें जीवनाचे आणि समाजाचे जे परस्पर अलिप्त विभाग केले, त्यामुळें जणु त्यानें भगवंताचेच तुकडे केले. अशा या प्रभुद्रोहामुळेंच भारताची अवनति झाली. जो जीवनविमुख झाला त्याची प्रभुभक्ति प्रभूच्या चरणापर्यंत पोहोंचूंच शकत नाहीं.

जो जीवननिष्ठ आहे तो केव्हां केव्हां एकांताची साधना करून प्रभूकडे अभिसार करील. पण त्यानें नेहमी एकांताची नव्हे परंतु लोकांताची साधना करूनच प्रभूचें दर्शन घेतलें पाहिजे. भगवंत जसे आपले मातपिता आहेत तसेच ते जीवनसंग्रामांतील आपले रणगुरुहि आहेत. परंतु भगवंताचा आनंद तेव्हांच परिपूर्ण होतो जेव्हां आपण त्यांना आपले मित्र किंवा बंधु बनबून त्यांचेबरोबर जीवनाचा खेळ खेळतो.

अनेकविध भक्तीमध्ये अर्जुनासारखी सख्यभक्तिच श्रेष्ठ आहे.

असा हा जीवननिष्ठ कवि भारतनिष्ठ आणि वंगनिष्ठ असणारच. कोणाच्याहि सन्निष्ठेचें त्याला वावडें काय म्हणून असावें? त्यांच्या विविध निष्ठेंत कोठेंहि संकुचित अल्पनिष्ठा दिसून येत नाहीं. बंगालची शस्यश्यामला भूमि, बंगालच्या प्रभूतसलिल नद्या, सफेत पक्ष्यांच्यामुळे उठावदार दिसणारें बंगालचें आकाश आणि नद्यांच्या प्रवाहांत उघडीं पडलेलीं वाळूचीं बेटें (चर), या सर्व गोष्टी कवीच्या भक्तीचे विषय आहेत. बंगालच्या जनतेशीं कवि एकरूप होतात. आणि त्यांत त्यांचा विशेष हा की, आपणा-सारख्या सर्व भारतीयांना देखील ते बंगालप्रेमी बनवून टाकतात.

'नैवेद्य'च्या उत्तरार्धांत रवीबाबूंचीं राष्ट्रभक्ति-प्रेरित अनेकानेक प्रख्यात गीतें आहेत. पण त्यांची राष्ट्रभक्ति राजनैतिक नाहीं. अभिमानमूलकहि नाहीं. त्यांची राष्ट्रभक्ति सांस्कृतिक आणि आध्यात्मिक आहे. मानवसंस्कृतीची सर्वोच्च सिद्धि त्यांना भारताच्या अध्यात्मांत सांपडली आणि म्हणूनच वंगप्रदेश, भारतभूमि, अखिल मानवता आणि विश्वाचा जीवनस्वामी या सर्वांमध्ये त्यांना अभेदाचा अनुभव येतो. आणि आपणालादेखील या अभेदाशीं एकरूप व्हायला ते शिकवतात.

स्वराज्याच्या आंदोलनाच्या दिवसांत स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं जेव्हां आमची कारावास-साधना चालू होती तेव्हां मी या "नैवेद्य"चा आस्वाद घेतला होता. तेवढ्यानें तृप्ति होईना. शास्त्रांचीदेखील आज्ञा आहे की, मिष्टान्न एकट्यानें खाऊं नये. स्वकीयांना बरोबर घेऊनच खावें (इष्टैः सह भुज्यताम्.) तेव्हां बसल्या बसल्या अधिकांश गीतांचें मराठी केलें आणि त्याबरोबर मला सुचलें तसें ह्या गीतांचें रसग्रहणहि लिहविलें. तुरुंगांतून बाहेर आल्यानंतर अनेक कामांत सापडलों आणि हें सर्व लिखाण बाजूला पडून राहिलें. पुढें जेव्हां रवीन्द्र जन्म-शताब्दिनिमित्त रवीन्द्रचिंतनाचा द्वादश मासिक महोत्सव राष्ट्रानें चालवला तेव्हां "नैवेद्य" पुन्हां हातांत घेतला. आणि वेळांत वेळ काढून तो पुरा केला. या गद्यानुवादांत रवीन्द्रांची असाधारण गीतमाधुरी कोठून येणार? रवीन्द्रांनीं स्वतः आपल्या गीतांचें इंग्रजींत भाषांतर करतांना लयबद्ध गद्य वापरलें आहे. त्यालादेखील भाषासिद्धि लागते.

पण एक मोठी सोय आपल्याजवळ आहे. आपल्या सर्व भारतीय भाषा संस्कृत कुटुंबाच्या. कोणत्याहि भाषेंतील मजकूर नागरी लिपींत लिहिला म्हणजे तो बऱ्याच अंशीं

सर्वांना सुबोध होतो. त्यांत पुन्हां सगळ्याच प्रांतांतील संतसाहित्याची परिभाषा एकसारखी. त्यामुळें लिप्यंतर होतांच सगळें भारतीय साहित्य अगदीं जवळ येतें. हा सर्व लाभ ओळखून या पुस्तकांत मूळ बंगाली गीतें नागरी लिपींत देण्याचें ठरवलें. अनुवाद आणि रसग्रहण वाचल्यानंतर, मूळ बंगाली वाचण्या-समजण्याचा प्रयत्न केल्यास तो आनंददायी ठरेल. आणि कविहृदयांना रविहृदयाला भिडल्याचा संतोष आणि आल्हाद मिळेल.

२३–१०–६५ काका कालेलकर
दिवाळी

ता. क.

गीतांना जीं शीर्षकें दिलीं आहेत तीं मुळांत नाहींत. रसग्रहण लिहवितांना जशीं सुचलीं तशीं, केवळ सोयीसाठीं, दिलीं आहेत.

का. का.

# अनुक्रमणिका


रसायण पाच

रवीन्द्रांचा 'नैवेद्य' १

१ जीवन-देवतेची उपासना ५

२ तुझाच दीप ९

३ शुभसंकल्पाची सांखळी १२

४ रागिणीचा प्रताप १६

५ देवा, परत मात्र जाऊं नका १९

६ क्षमापनाहि आणि आशाहि २३

७ जीवनव्यापी अखंड स्मरण २७

८ माझ्या प्राणांत तुला बसवीन ३१

९ साक्षात्काराचा क्रमविकास ३४

१० सर्वेश्वराशी अभंग-एकनिष्ठा ३८

११ वादळांतील अखंड शांति ४२

१२ तुझ्यातच माझें घर ४५

१३ तुझा गर्व कसा सोडू ? ४८

१४ पूर्णा घरीं निर्भयता ५१
१५ पहाटेनंतर दीप कशाला ? ५४
१६ दर्शन-दीक्षेचा अमृत-सिद्धियोग ५८
१७ "तबे" नाहि क्षय ६२
१८ मृत्यूच्या दूताचें स्वागत ६५
१९ तुझी गीत-गाथा ६९
२० अळणी जीवन नको; हवा आहे प्राण. ७२
२१ ऐकू दे जीवन सागराचें महागान ७६
२२ केवढी ही धन्यता ! ८०
२३ हेमंत गान ८३
२४ व्यर्थीं अधिकचि अर्थ निघे ८६
२५ गान-सृष्टींत नव-वसंत ८९
२६ जें येथें तेंच तिथें ९१
२७ अद्‌भूत विशाल मी ! ९४
२८ महान मुक्ति ९६
२९ मृत्यु यावा तर असा ! ९९
३० खरी जीवन-साधना १०१
३१ मी भोळा मूढ १०५
३२ "मुक्तद्वार" १०८
३३ तेच पदध्वनि ११०
३४ तू तेथें सर्व ११३
३५ निवृत्त होताच ११५
३६ जीवन यात्रेचा पथिक ११८

३७ एकान्त दर्शनाची भूक १२१
३८ माझी भूल झाली तें बरेंच झालें. १२४
३९ समयदरिद्री मनुष्य आणि कालेश्वर भगवान १२६
४० तुझें इंगित १३०
४१ देवाचा धीर १३२
४२ ईश्वराची जवळीक : भक्तीचा गौरव १३५
४३ गंगोत्री-सागर आकर्षण १३८
४४ देवाची पूजा १४१
४५ भक्ति म्हणजे उन्माद नव्हे १४४
४६ अवस्थान्तराचें स्वागत १४८
४७ पराक्रमी जीवन १५१
४८ एक राष्ट्रीय प्रार्थना १५३
४९ जहाजाचे तुकडे करून १५५
५० देवाचे तुकडे केल्यामुळें १५८
५१ थोरांचा कठिण मार्ग १६२
५२ प्रगतिविरोधी रूढिग्रस्त १६४
५३ मला भय कसलें? १६७
५४ दीक्षेचा गौरव १७१
५५ तूं दिलेला अधिकार १७३
५६ भ्याडांचा सत्यद्रोह १७६
५७ एकेश्वरी विश्वांत अनिरुद्ध संचार १७९
५८ आनंद-शासनाचा प्रभाव १८२
५९ काय ही आमची दुर्दशा!! १८५

६० पुनरुद्धारक अमृतवर्षा १८९
६१ दूर करा सर्व बाधा! १९२
६२ आशा सोडली नाहीं १९५
६३ कशी असेल ती प्रभात! १९८
६४ शताब्दीचा भयानक आढावा २०१
६५ विश्वाचें विराट विधान २०४
६६ प्रलयदीप्ति × अरुणप्रतीक्षा २०७
६७ आत्मनिष्ठेचा प्रसाद २०९
६८ ब्राह्मणी सात्त्विक तेज २१२
६९ केवळ त्याच्याच हातून २१५
७० हवी प्रखर न्यायनिष्ठा २१८
७१ तुझाच प्राण कां बोलत नाहीं हे शास्त्रजडा? २२०
७२ सर्वोच्च प्रार्थना २२३
७३ सर्व सोडून देता यावे २२७
७४ हृदयलक्ष्मीच्या पोषणार्थ २२९
७५ चतुर्विध उपासना २३२
७६ त्याचा गौरव, माझी नम्रता २३६
७७ बाह्यमत्तेची किंमत किती? २३८
७८ मनुष्या आड ईश्वर २४१
७९ त्याच्या चरणीं हृदय पाथरावें! २४३
८० चित्ताच्या खिडक्या २४६
८१ घरटे आणि आकाश २४८
८२ माधुर्य आणि ऐश्वर्य २५१

८३ कसेंही मान २५४
८४ अहंकारशून्य भक्तिबळानें २५७
८५ मिलनाची खुमारी, दुर्दिन एकांती २६०
८६ झंझावात पत्करला पण ही कोरड नको ! २६२
८७ केव्हां ? हे नाथ ! केव्हां ? २६५
८८ मला एवढेंच समजतें २६७
८९–९० जीवन मरण सारखेंच मंगल २६९
९१ वासना जळो आणि सर्वलभ्य सुख मिळो २७४
९२ संस्कृति नाश २७७
९३ निष्पाप साधेपणांतील गौरव २७९
९४ भारतीय संस्कृतीची मानवता २८२
९५ आज असा कोण आहे ? २८५
९६ दैन्य आणि लाज २८७
९७ हाच उपाय बरा २८९
९८ मिळमिळीत पूजा नको २९१
९९ ही शक्ति हवी २९३
१०० एक द्वार, एक सुख, एक विश्वास २९५

परिशिष्ट २९९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६६०५
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

# रवीन्द्रांचा 'नैवेद्य'

नैवेद्य हा रवीन्द्रनाथांच्या शंभर भक्ति-काव्यांचा संग्रह आहे. (यांत अधिकांश सुनीतेंच आहेत). एकोणिसावें शतक संपून विसाव्या शतकाला प्रारंभ झाला त्यावेळच्या संधिकालांत लिहिलेलीं हीं काव्यें आहेत. नैवेद्यांतील कांहीं पदें विश्वविख्यात इंग्रजी गीतांजलींत घेतलीं गेलीं आहेत आणि विशेष म्हणजे रवीन्द्रनाथांचीं कित्येक प्रोत्साहक देशभक्तीपर काव्येंदेखील ईशभक्ति काव्यांच्या जोडीने या नैवेद्यांत आलीं आहेत.

बंगालमध्यें शाक्तसंप्रदायाचा विशेष प्रचार असल्यामुळें तेथें ईश्वराचें मातृ-स्वरूप किंवा शक्तिस्वरूप समाजांत आणि साहित्यांत विशेष स्वरूपाने पुढें येतें. यांतूनच भारताच्या 'वंदेमातरम्' ह्या राष्ट्रगीताचा उदय झाला आहे. आणि ही वृत्ति कांहीं नवीन नाहीं. दीर्घकालापासून, अगदीं वेदकाळापासून आपण पृथ्वीला माता म्हणत आलों आहोंत आणि आपण तिचे पुत्र आहोंत असें मानण्यांत आपल्याला धन्यता वाटत असते. महाराष्ट्रांत आपण अंबाभवानीची उपासना करतोंच आणि राम-कृष्णांना खेळवणाऱ्या कौसल्या आणि यशोदा मातांचें वात्सल्य आठवून आपण कृतार्थ होतों. तुकारामासारखे आपले संतकवि पांडुरंग–विठोबाला-देखील विठाई म्हणून मातृरूपानें आळवतात. आपल्याला हें सर्व यथायोग्य वाटतें.

पण बंगालमध्यें देवीची उपासना विशेषेंकरून कालीच्या रूपाने होते आणि काली म्हटली म्हणजे रुण्डमाळा गळ्यांत घातलेली, राक्षसांचे हात तोडून त्यांचा परकर बनवून नेसणारी, शत्रूंच्या छातीवर पाय ठेवणारी आणि आश्चर्याने म्हणा वाटल्यास, ळळळळीत जीभ बाहेर काढणारी अशी रक्ताने माखलेली मूर्ति नजरेपुढें येते. बकरी मारून देवीला रक्ताचा अभिषेक करणें, मंदिरांत जिकडे-तिकडे बकऱ्यांच्या मुंडक्यांवर पणत्या पाजळून प्रकाश करणें हे तिकडील सर्व रूढप्रकार आपल्या शुद्ध धार्मिक भावनेला आघात पोहोंचवितात. बंगालमधील ब्राह्मसमाजाला या गोष्टींची शिसारी आल्यास नवल नाहीं. त्यांनीं आपल्या उपासनेंत ईश्वराची परमपिता म्हणून उपासना सुरू केली आणि हिंसेचा निषेध करून ईश्वराच्या कल्याणकारी स्वरूपाचें चिंतन चालविलें. **पिता नोऽसि; पिता नो बोधि; नमस्तेऽस्तु; मा मा हिंसीः। विश्वानि देव सवितुर्दुरितानि परासुव; यद्भद्रम् तन्न आसुव।** इत्यादि प्राचीन प्रार्थनेचा प्रचार वाढविला. जो परमात्मा अग्नीमध्यें, पाण्यामध्यें, औषधी आणि वनस्पतीमध्यें वसत आहे आणि ह्या सर्व विश्वात भरून उरला आहे त्या विश्वात्म्याला आम्ही नमस्कार करतों. अशा तऱ्हेची औपनिषदिक प्रार्थनाच ब्राह्मसमाजाच्या उपासकांमध्यें विशेष रूढ झाली.

हेंही खरें कीं रवीन्द्रनाथांना मातेच्या सहवासापेक्षां पित्याचा सहवास विशेष लाभला होता. पिता म्हणजे देवर्षि देवेन्द्रनाथ ठाकुर – ब्राह्मसमाजाचे एक प्रभावशाली पुढारी. त्यांची प्रवचनें रवीन्द्रनाथ अत्यंत आस्थेने ऐकत आणि त्यामुळेंच त्यांचा काव्यात्मा विशुद्ध भक्तीच्या भावनेकडे वळला.

आपल्या देशांत संतांनी काव्याचें आणि संगीताचें अंग मनापासून कमावलें होतें. काव्य-शक्ति दे दे राम, आलाप-गोडी दे दे राम, संगीताचें माधुर्य दे दे राम, अशासारखी प्रार्थना आपल्या संतांनीं केली आहे. ते मुळांत होते भक्तिमार्गी संत. ह्या भक्तीचा उदय, विकास आणि प्रसार व्हावा म्हणून त्यांनी काव्याची आणि संगीताची जोड मिळवली.

रवीन्द्रनाथांचें प्रस्थान याच्या उलट होतें. त्यांच्या घरांत प्रथमपासून काव्य, संगीत, चित्रकला आणि नाट्य ह्यांचें संस्कारी वातावरण दुमदुमलेलें असे. लहानपणापासून असें पोषण मिळाल्यामुळें रवीन्द्रनाथांचा बाळपणीं जो विकास

झाला तो प्रथमपासूनच काव्यात्म होता. निसर्गाचें निरीक्षण करावें, ऋतुपरिवर्तनाचा आनंद अनुभवावा, झाडांपानांबरोबर डोलावें, पशुपक्ष्यांबरोबर बागडावें आणि गावें हेंच त्यांना आवडे. निसर्गप्रेमाची स्वाभाविक परिणति प्रेमकाव्यामध्यें झाली. इतिहास-पुराण आणि दंतकथांमधून त्यांना प्रेमरसाची, वीररसाची आणि बलिदानाची जीवन-माधुरी चाखावयास मिळाली आणि मग अशा ह्या जीवन-समृद्धीवर वडिलांच्या धार्मिकतेची, अध्यात्माची आणि उपासनेची मोहर लागली. मूळचा समृद्ध काव्यात्मा आणि जीवननिष्ठ हृदयाचें वैभव जीवन-स्वामीची भक्ति करूं लागलीं. जीवन-समृद्धीमधूनच जीवनस्वामीची उपासना फुलूं लागली.

प्रेमळ गंभीर पित्यापासून ‘पिता नोऽसि’ची दीक्षा मिळाल्यानंतर रवीन्द्रांना जें भक्ति-काव्य स्फुरलें तेंच त्यांनीं या संग्रहाच्यारूपानें पित्यांनाच अर्पण केलें यांत आश्चर्य नाहीं. अर्पण-पत्रिकेंत ते म्हणतात : ‘एइ काव्यग्रंथ परमपूज्यपाद पितृदेवेर श्रीचरणकमले उत्सर्ग करिलाम।

ईशभक्ति आणि देशभक्ति ह्यांचा सुंदर संगम असलेला हा रुचिर नैवेद्य मराठी वाचकांपुढें प्रसाद म्हणून ठेवण्याची इच्छा आज पूर्ण होत आहे. जुन्या संतांचें भांडवल आपलेसें करून त्याला जिवंत आध्यात्माच्या आधुनिक अभिरुचीचा उजाळा देऊन आत्मसात् केलेली काव्यमय भक्तिभावना या गीतांमध्यें वाचकांना मिळणार आहे.

आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. तसें पाहिलें तर आपल्या पवित्र देववाणी संस्कृतची उपासना हिंदुस्थानांत सर्वच प्रदेशांत झालेली आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि सिंधूच्या किनाऱ्यापासून ब्रह्मपुत्रेच्या परिसरापर्यन्त भारताचा पिंड संस्कृतच्या अमर वाणीवरच पोसलेला आहे. तरीहि त्यांतल्या त्यांत ज्याप्रमाणें आपण जगन्नाथ पंडिताच्या श्रवण-कोमल-वर्ण-राजीवर प्रसन्न असतो, त्याचप्रमाणें बंगालच्या वाट्याला जयदेव कवीच्या कोमल-कान्त-पदावलीचा वारसा आलेला आहे. रवीन्द्रनाथांनीं अगदीं लहानपणापासून संस्कृत साहित्यांत आणि प्राचीन बंगाली वैष्णव-साहित्यांत आकंठ अवगाहन केलेलें. त्यांचे कान, त्यांचा कंठ आणि त्यांचें हृदय भारतीय संगीतांत मुरलेलें. त्यांच्या मूळ बंगाली काव्यांत आणि गीतांत जें नादमाधुर्य आहे तें कांहीं

औरच आहे. आणि युक्ताक्षरें स्वतःच्या पद्धतीने खणखणीत म्हणून बंगाली भाषेला, जो एक ठेका साधता येतो त्याचाहि उपयोग रवीन्द्रनाथांनीं मोठ्या कौशल्यानें केला आहे. रवीन्द्रनाथांनीं उस्तादी हिन्दुस्तानी संगीत उत्तम प्रकारें आपलें केलें होतेंच. पण त्या संस्काराचा फायदा घेऊन त्यांनीं आळवलें आहे मुख्यत्वें बंगाली संगीतच. वैष्णव आणि शाक्त संतांनीं आणि बाउलासारख्या भटक्या फक्कड भक्तांनीं बंगाली संगीताला एक विशेष माधुर्य दिलें आहे. त्यांतच आपल्या प्रतिभेची भर घालून रवीन्द्रनाथांनीं बंगाली संगीताला जें नवें वळण लावलें. त्याचें सविशेष अध्ययन झालें पाहिजे. रवीन्द्रनाथांचीं प्रेमगीतें आणि भक्तिगीतें बंगालच्या प्रदेशांत खेडोखेडीं पसरलेलीं आहेत आणि लोकांच्या कंठीं तीं विराजमान आहेत. ब्राह्मसमाजाने ब्रह्म-संगीत म्हणून जो एक भजन-संग्रह प्रकाशित केला आहे त्यांत विशेष भरणा रवीन्द्रांच्या गीतांचाच आहे.

गुजरातमधील कित्येक तरुणांनी शांतिनिकेतनमध्यें जाऊन बंगालीचा आणि रवीन्द्र-साहित्यांचा अभ्यास तर केलाच, पण रवीन्द्र-संगीतांतदेखील प्रवेश करून घेऊन त्या चालींचीं गुजराथी पदें लिहायलाहि सुरुवात केली आहे. जगांत जें जें कांहीं चांगलें, सुन्दर आणि उन्नतिकारक आहे तें आपलेंच आहे, तो ईश्वरदत्त असा आपलाच वारसा आहे अशा भावनेनें जगांत वावरण्याचें हें युग आहे.

महाराष्ट्रांतदेखील रवीन्द्रांचा परिचय आणि प्रभाव वाढत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. अशा वेळेला महाराष्ट्र-जनतेला 'नैवेद्या'चा आस्वाद मिळालाच पाहिजे.

प्रथम थोडें प्रास्ताविक वातावरण तयार करून मग एकेक काव्याचा मराठीत अनुवाद द्यावयाचा आणि नंतर मूळ कविता देऊन थोडक्याशा रसग्रहणाने समाप्ति करावयाची. अशी कल्पना आणि रचना येथें आहे.

१

# जीवन-देवतेची उपासना

ब्राह्ममुहूर्तीं उठून नामस्मरणाने दिवसाचा प्रारंभ केल्यानंतर स्नान करून सूर्यनारायण उगवण्याची वाट पहात पूर्वेकडे तोंड करून उभें राहावयाचें व तेजःपुंज सूर्यबिंब दिसतांच **'प्राणः प्रजानाम् उदयति एष सूर्यः।'** असें ललकारत त्याचें स्वागत करावयाचें ह्या काव्यमय व स्फूर्तिदायक विधीला सूर्योपस्थान असें म्हणतात.

उपस्थान म्हणजे स्वागत, स्तुति आणि सेवा-पूजा करण्यासाठीं उत्कंठेने जवळ जाऊन समोर उभें राहाणें ( उप+स्था ). प्रस्तुत काव्यांत महर्षि-पुत्र कवीने राजराजेश्वर, भुवनेश्वर जीवनस्वामीचें स्वात्मार्पणबुद्धीने उपस्थान केलें आहे. 'दाँडाब तोमारि सन्मुखे ।' मी तुझ्यासमोर उभा राहीन.

जीवनाच्या प्रभात-काळीं, एकटा असतांना, जीवनस्वामी म्हणून तुझा परिचय होतांच मी हात जोडून तुझ्यासमोर उभा राहीन. पुढें हें चराचर विश्व नजरेस पडतांच, ज्याला मी माझा जीवन-स्वामी म्हणत होतों तो खरोखर त्रिभुवनेश्वर आहे ह्याचा साक्षात्कार होईल. अनंतकोटी ताऱ्यांनी चकाकणाऱ्या तुझ्या आकाशाखालीं वि-जन एकान्तामधें, मी स्वतः कोणीच नाहीं असें ध्यानांत येतांच हृदय नम्र होऊन भक्तिपूर्ण नयनाचे अश्रु सारीत तुझ्यासमोर मी उभा राहीन.

विविधतेने नटलेल्या तुझ्या या विश्वामध्यें कर्माचेंच साम्राज्य आहे. पृथ्वी, चंद्र, सूर्य, ग्रह-नक्षत्र-तारे सर्वच आपापल्या वाट्याच्या कर्मकलापांत चूर आहेत असें दिसल्यानंतर, या कर्मसागराच्या किनाऱ्यावर नांदणाऱ्या मानवी जगांत जेव्हां मी आपलें स्थान घेईन आणि माझ्या वाट्याला आलेलीं सर्व कर्में करीत राहीन तेव्हांदेखील, माझ्या पुरुषार्थाचा कळस झाल्यावेळीं जनसंमर्दात आणि कर्मकलापांत गुरफटलों असतांदेखील जीवनाच्या मध्याह्नसंध्येचें उपस्थान म्हणून मी तुझ्यापुढें उभा राहीन.

आणि शेवटीं जीवन-संध्या प्राप्त झाली असतांना जीवनकार्य पूर्ण झाल्याचें जेव्हां समाधान मिळेल आणि निवृत्तीचा धन्य एकान्त मला लाधेल तेव्हां तर, हे राजराजेश्वरा, मी पुन्हा मुक्तपणें एकाकी होऊन कांहींहि न बोलतां भरल्या हृदयाने तुझ्यासमोर हजर होईन.

दिवसाच्या जशा त्रिकाल संध्या असतात तशा जीवनाच्याहि त्रिकाल संध्या असणारच. यापैकीं एकहि संध्येंत तुझा विसर मी पडूं देणार नाहीं.

कर्तव्यकर्मांची भगभग संपल्यानंतर आणि तुझ्या या जगांतील माझें सर्व कार्य संपल्यानंतर जगाच्या रहाटीप्रमाणें मला तमोगुणी झोपेंत बुडून जावयाचें नाहीं. निस्तब्ध एकान्तांत एकाकी होऊन जेव्हां तुझ्यापुढें उभा राहीन तेव्हां त्या धन्य दर्शनानेंच मला सर्व आराम आणि विश्राम मिळत राहणार हें ठाऊक असल्याने झोपेचें स्वागत न करतां मी तुझ्या उपस्थानांतच तल्लीन होईन.

ईश्वराचा प्रथम परिचय होतो तो तो आपला जीवनस्वामी आहे या रूपाने. हा अगदीं जवळचा परिचय. पुढें दिसून येतें कीं ह्या अखिल विश्वाचा स्वामी ही तोच आहे म्हणून आपण त्याला भुवनेश्वर म्हणतों आणि शेवटीं कर्ममय जीवनाची पराकाष्ठा झाल्यानंतर, सुख आणि दुःख, हार आणि जित, आशा आणि निराशा ह्यांचा मुबलक अनुभव आल्यानंतर खात्री पटते कीं ह्या द्वन्द्वांचा उपयोग करून ह्या विश्वाला जीवन-समृद्ध करण्यासाठीं हें सर्व विश्व चालविणारा तो जगन्नियन्ता राजराजेश्वर आहे. त्याचेंच राज्य चालू आहे आणि म्हणूनच सगळ्या जीवांची जीवन-यात्रा कृतार्थ होणार आहे. आपली साधना एवढीच कीं त्यानें नेमून दिलेल्या सेवेची पराकाष्ठा करीत असतांना देखील त्याची आठवण लुप्त होऊं द्यावयाची नाहीं. '**विपद् विस्मरणं विष्णोः; संपन् नारायण–स्मृतिः।**' ह्या विश्वांत व्यापून असलेल्या विश्वनियंत्याला विसरणें हीच हानि, हीच विपत्ति. नर-नारी–समुदायांत आपलें स्थान (अयन) करून राहणाऱ्या नारायणाची स्मृति अखंडपणे

प्रतिदिन आमि हे जीवनस्वामी
दाँड़ाब तोमारि सन्मुखे।
करि जोड़कर हे भुवनेश्वर,
दाँड़ाब तोमारि सन्मुखे।

तोमार अपार आकाशेर तले
विजने विरले हे,
नम्र हृदये नयनेर जले
दाँड़ाब तोमारि सन्मुखे।

तोमार विचित्र ए भवसंसारे
कर्मपारावार–पारे हे,
निखिल–जगत–जनेर माझार
दाँड़ाब तोमारि सन्मुखे।

तोमार ए भवे मोर काज जबे
समापन हबे हे,
ओगो राजराज, एकाकी नीरबे
दाँड़ाब तोमारि सन्मुखे।

"हे जीवनस्वामी ! मी प्रतिदिन तुझ्यासमोर येऊन उभा ठाकत राहीन. हे भुवनेश्वरा ! हात जोडून दास्यभावाने मी तुझ्यापुढें उभा राहीन.

तुझ्या अपार, अफाट आकाशाच्या खालीं विजन एकान्तांत नम्र–हृदय होऊन ओल्या डोळ्यांनी तुझ्याकडे पहात तुझ्या संमुख धन्यतेने मी उभा राहीन.

विविधतेने नटलेल्या ( विचित्र अशा ) ह्या तुझ्या भवसंसारांत कर्मसागराच्या किनारीं या सर्व विश्वांतील जनसंमर्दामध्यें, कर्मकलापांत गुरफटलों असलों तरी तुझें स्मरण कायम ठेवून तुझ्यासमोर मी उभा असेन.

आणि शेवटीं जीवन-संध्या अवतरली असतां, या जगांतील तूं सोंपवलेलें माझें काम जेव्हां संपेल, पूर्ण होईल तेव्हां, हे जगन्नियन्त्या, राजराजेश्वरा, वाणीला बाजूला सारून, सर्व मोहजाळांतून अलिप्त होऊन एकटा मौनपणें तुझ्यासमोर सादर होऊन धन्यता अनुभवीत राहीन."

[हेंच गीत इंग्रजी गीतांजलींत ७६ वें आहे.]

२

# तुझाच दीप

**का**र्डिनल न्यूमनच्या एका इंग्रजी भजनाचा गुजराथी अनुवाद महात्माजींना फार आवडत असे. त्यांतील अडीच ओळी येथें घेण्याजोग्या आहेत—

आज लगी रह्यो गर्वमां हुं, ने मागी मदद न लगार
आप-बळे मार्ग जोईने चालवा हाम धरी मूढ बाळ,
हवे मागुं तुज आधार।

ऐद्याप्रमाणें स्वस्थ बसून देवा, मला हें दे, तें दे, असें मागणाऱ्यांपैकीं मी नाहीं. स्वतः कसलाच प्रयत्न न करतां देवा, सर्व कांहीं तूंच कर असें म्हणणें ही कांहीं खरी साधना नव्हे, तो उठवळपणा होईल. स्वतःच्या अभिमानाने कां होईना, मनुष्य जेव्हां आपबळें धडपड करून थकतो, तेव्हांच त्याला आपली मर्यादा आणि अल्पता कळून येते. आणि मगच ईश्वरी कृपेची खरी भूक उत्पन्न होते. प्रारंभीं प्रारंभीं केलेला गर्वदेखिल पुढच्या साधनेच्या उपयोगींच पडतो. सर्व प्रयत्न करून थकल्यानंतरच ईश्वराच्या कृपाप्रसादाचें महत्त्व पटतें. एवढेंच नव्हे तर त्या प्रसादाचा पूर्ण उपयोग करून घेण्याची शक्ति आणि पात्रतादेखील नंतरच येते. वैदिक ऋषींनीं तर स्पष्ट सांगितलें आहे कीं: 'ऋते श्रान्तस्य सख्याय न देवाः' थकल्यावाचून देवदेखील मदतीला येत नसतात.

भक्तांचे म्हणे दोन प्रकार असतात—वांदरीचें पिल्लूं संकट दिसतांच स्वतः धावत जाऊन आईच्या पोटाला बिलगतें. त्याचप्रमाणें पुरुषार्थी भक्त स्वप्रयत्नांच्या द्वाराच दैवी मदत मिळवतात. ह्यांच्या उलट मांजरीचें पिल्लूं डोळे झाकून फक्त म्यॉंव म्यॉंव करतें पिल्लाचा धावा ऐकतांच त्याची आई धावून येते आणि दांतांनी त्याला कोमळपणें उचलून सुरक्षित जागीं घेऊन जाते. स्वतःचा सगळा भार आईवर टाकून निश्चित होणाऱ्या मांजरीच्या पिल्लांचा. मार्ग मला पसंत नव्हता. म्हणून मी स्वप्रयत्नाचे सगळे प्रकार करून पाहिले. स्वतःच्या मार्गातील अंधार दूर करण्यासाठीं मी पुष्कळदां तेलानें थबथबलेली. मशाल पेटवली, अशा प्रकारें सर्व पुरुषार्थ अजमावल्यानंतरच निवेदन करीत आहे कीं, देवा, मी जेवढे म्हणून दिवे पेटवले त्यांतून ज्वाळा निघाली थोडी, धुराचे लोळ मात्र यथेच्छ निघाले. घरांत हवा तसा प्रकाश पसरला नाहीं. घराच्या आणि मनाच्या कोन्याकोपऱ्यांत काळोखच भरून राहिला. तेव्हां आतां तुला प्रार्थना करतों कीं, भगवंता, माझ्या या निवास-स्थानांत येऊन स्वतःच्या हातानें एक गृहदीप पाजळ. तुझ्या त्या प्रकाशानेंच आजवरच्या सहन केलेल्या दुःखशोकाचें सार्थक होईल.

सर्वत्र प्रकाश झाला म्हणजेच पूर्वी कोठें, कसें आणि कां ठेंचाळलों हें ध्यानांत येतें. आणि मग सोसलेले कष्ट आणि भोगलेलें दुःख हीं कारणीं लागतात. माझ्या हृदयाच्या आणि घराच्या कोन्या-कोपऱ्यांत जो कांहीं अंधार लपून राहिला असेल तो तुझ्या प्रकाश-स्पर्शानें धन्य होऊन निर्वाण पावेल. त्यानंतरच तुझ्या त्या पुण्य-पवित्र प्रकाशांत बसून मी माझ्या प्रियजनांवर शुद्ध प्रेम करूं शकेन. जीवनांत ईश्वरी प्रकाश पसरला म्हणजे मोह आणि वासना ह्यांचा अंधकार दू होऊन हृदयांतील मलिन प्रेम नष्ट होतें. प्रियजनांवर शुद्ध प्रेम कसें करावें हें समजणें ही कांहीं लहानसान साधना नव्हे. म्हणूनच आतां माझ्या हृदयांत तुझ्या हातानें गृहदीपाची स्थापना हवी.

तुझा तो दीप पार्थिव स्नेहदीप नसून स्पर्शमण्याचा मणिदीप असणार. त्याची ज्योत चंचळ नसावयाचीच. स्पर्शमण्याची ज्योत स्थिर असते. एका क्षणांत माझ्या सर्व काळ्या कलंकाचें ती सोनें करील. काळ्या लोखंडाचें सोनें करावें आणि अंधकाराच्या ठिकाणीं प्रकाश करावा हीं दोन्ही कार्यें तुझ्या स्पर्शमण्याचीच होत. म्हणून हे दीपंकरा, माझ्या या निवासस्थानांत स्वतःच्या हातानें गृहदीप पेटव. माझ्या घरांत आणि बाहेर तुझ्या किरणांचा वर्षाव कर. मला माझा धुरकट प्रकाश पुरे झाला. आतां तुझा सर्वव्यापी कल्याणकारी पुण्यप्रकाश मला मिळूं दे.

आमार ए घर आपनार करे
गृहदीपखानि ज्वालो।
सब दुखशोक सार्थक होक्
लभिया तोमारि आलो।

कोणे कोणे जत लुकानो आँधार
मरुक् धन्य हये,
तोमारि पुण्य आलोके बसिया
प्रियजन बासि भालो।
आमार ए घरे आपनार करे
गृहदीपखानि ज्वालो।

परशमणिर प्रदीप तोमार
अचपल तार ज्योति,
सोना करे निक पलके आमार
सब कलंक कालो।
आमार ए घरे आपनार करे
गृहदीपखानि ज्वालो।

आमि जत दीप ज्वालि शुधु तार
ज्वाला आर शुधु कालि—
आमार घरेर दुयारे शियरे
तोमारि किरण ढालो।

आमार ए घरे आपनार करे
गृहदीपखानि ज्वालो।

३

# शुभसंकल्पाची सांखळी

रविबाबूंना कर्माचें महत्त्व पुरेंपुरें पटलें होतें. तसें नसतें तर त्यांनीं शांतिनिकेतन, श्रीनिकेतन आणि विश्वभारती या संस्थांची उत्तरोत्तर, स्थापना केलीच नसती. पण त्यांचा पिंड कवीचा, सृष्टि-पूजकाचा, ध्यानोपासकाचा आणि जीवनदेवतेच्या आराधकाचा होता. कर्माचा जेव्हां जेव्हां त्यांनीं विचार केला आहे तेव्हां तेव्हां ही कर्माची भगभग पुरी होताच शांतपणें निवृत्त होऊन ईश्वराचें ध्यान–चिंतन करण्याची गोडीही त्यांनीं अनंत प्रकारें गायिली आहे.

देवा, कर्म माझ्या मागें लागलेंच आहे. ते अंमळशानें हातीं घेतां येईल. अगोदर तुला डोळे भरून पाहूं दे. अशी याचनाही त्यांनीं केली आहे. कर्म करीत असतांना तुझी विस्मृति न व्हावी, आणि मी तुला विसरलों तरी आपलें कांहींतरी चुकत आहे एवढी तरी भावना जागृत असावी, असें त्यांनीं देवाजवळ मागितलें आहे. देवा, मी तुला विसरलों तरी तूं मला विसरत नाहींस. माझ्यासाठीं साधना तूंच करतोस आणि मला नकळत स्वतःजवळ खेचून घेतोस असें म्हणून त्यांनीं त्या परम कारुणिक पित्याच्या प्रेमाविषयीं श्रद्धा व संतोष बाळगला आहे. जीवन संध्या जवळ येतांच 'दिवसाचें काम संपवून मोकळा होऊन, सुटलों एकदाचा दिवसाच्या कामगिरींतून' असा निश्वास टाकीत तुझ्या चरणीं पोहोंचावें; जेव्हां कामहि संपेल आणि परमप्रिय गानहि संपेल, तेव्हां नीरव शांतीचें

समाधानच उरेल आणि अनिर्वचनीय भक्तीचा सोहळाच अनुभवावयास मिळेल, अशी कवीची श्रद्धा आहे. दर बुधवारच्या किंवा अन्य प्रसंगींच्या आपल्या प्रवचनांत कवि जे भाव व्यक्त करीत तेच त्यांच्या गीतांमध्यें ते गुंफत असत.

जीवनाच्या सबंध सप्तकाचा संकल्प क्रमाक्रमानें व्यक्त करीत कवींनीं प्रस्तुतचें गीत रचलें आहे.

स्वर्गांत किंवा वैकुंठ-लोकांत विराजमान असलेल्या प्रभूला आळवण्यापेक्षां स्वतःच्या हृदयांतच त्याचें दर्शन-चिंतन करून त्याच्याच साक्षीनें आपली संकल्प-परंपरा गुंफावी अशा उद्देशानें कवि म्हणतात—

निशीथ-शयने भेबे राखि मने
ओगो अन्तरयामी,
प्रभाते प्रथम नयन मेलिया
तोमारे हेरिब आमि,
ओगो अन्तरयामी।
जागिया बसिया शुभ्र आलोके
तोमार चरणे नमिया पुलके
मने भेबे राखि, दिनेर कर्म
तोमारे सँपिब स्वामी,
ओगो अन्तरयामी।

दिनेर कर्म साधिते साधिते
क्षणे क्षणे भाबि मने
कर्म-अन्ते संध्या बेलाय
बसिब तोमार सने।
संध्या-बेलाय भाबि बसे ' घरे,
तोमार निशीथ-विराम-सागरे

श्रान्त प्राणेर भावना वेदना
नीरबे जायिबे नामि,
ओगो अन्तरयामी ।

"हे अन्तर्यामी, तूं माझ्या हृदयांत अखंड आहेस, तर मग तुझ्या कृपेने माझ्या अन्तःकरणांत शुभसंकल्पाची अखंड शृंखला कां चालूं नये? रात्री निजतांना सकाळसाठीं असाच संकल्प करून मी निजेन कीं सकाळीं डोळे उघडतांच मी तुझें दर्शन घेईन.

चकचकीत उजाडल्यानंतर तुला नमस्कार करून मी कामाला लागेन आणि तेव्हांदेखील जें जें कर्म माझ्या वाट्याला येईल तें तें तुलाच अर्पण करावयाचें आहे हें मी विसरणार नाहीं.

दिवसभराचीं कामें करीत असतां माझ्या मनांत हीच उत्कंठा राहील कीं, संध्याकाळ होऊन दिवसाची मजूरी संपतांच तुझ्याजवळ मी येऊन बसूं शकेन. कोणच्याहि क्षणीं ही उत्कंठा शिथिल न होवो.

आणि जेव्हां खरोखर दिवस मावळून मी घरीं परत येईन तेव्हां सबंध दिवसाचा थकवा, त्यांतील[1] भावना (चिंता) आणि वेदना रात्रीच्या विरामसागरांत

---

१. संस्कृत कुटुंबांतील सर्व भाषा एकमेकीच्या अगदीं जवळ आहेत. केव्हां केव्हां केवळ सर्वनामें आणि प्रत्यय बदलले कीं भाषांतर झालें, अशी स्थिती असते. तरीहि जवळच्या भाषांतून भाषांतर करणें बऱ्याच वेळीं सर्वांत कठीण असतें. त्या त्या भाषेंतील शब्दाचा विशिष्ट अर्थ मूळ संस्कृत अर्थाहून पुष्कळदां अगदीं निराळा होत असतो. त्या त्या भाषेच्या गाढ परिचयावांचून हीं गोष्ट ध्यानांत येत नाहीं. त्यामुळें पुष्कळदां अर्थाचें स्वारस्य जातें व केव्हां केव्हां अनर्थहि होतो! संस्कृतमध्यें चेष्टा म्हणजे प्रयत्न! हा शब्द ह्याच अर्थाने हिंदींत आणि बंगालींत वापरला जातो. मराठींतदेखील हा अर्थ निश्चेष्ट शब्दांत उरलेला आहे. पण आपल्या भाषेंत चेष्टा म्हणजे कुचेष्टा, मर्कट चेष्टा किंवा हास्यविनोद. चेष्टेखोर या मराठी शब्दाचा अर्थ प्रयत्नशील असा करतां यावयाचा नाहीं.

मराठींत आणि बंगालींत राग म्हणजे क्रोध. संस्कृतमधें हा अर्थ नाहीं. गुजराथी-

विलीन करून मी नीरव शांतींत डुंबत राहीन.

हाच काय तो माझा संकल्प. कर्माच्या प्रारंभीं, कर्माच्या मध्यें आणि कर्माच्या अंतीं तुझेंच स्मरण रहावें आणि सर्व कर्में आणि त्यांच्या मुळाशी असलेल्या भावना तुलाच अर्पण कराव्या हाच माझा अखंड संकल्प असावा. हे हृदयस्थ नारायणा, ह्या संकल्पाचा तूं साक्षी हो व तो पार पाडण्याला मदत दे.

---

मध्यें डोळा हा शब्द वटारण्यापुरताच कामीं येतो. अशा कितीतरी गमती दाखवून देतां येतील.

बंगालींत जेव्हां कुणी दुसऱ्याला विचारतो तूं इतका 'विरक्त' कां झालास, तेव्हां त्याला म्हणावयाचे असतें कीं, तूं इतका रागावलास कां? कित्येक हिंदी भाषांतरकारांना हें ठाऊक नसल्यानें त्यांनीं विरक्त शब्द तसाच ठेवून दिला आहे!

प्रस्तुत ठिकाणीं 'भावना–वेदना' अशी जोडी आली आहे. गीतेंत ज्या अर्थानें भावना शब्द येतो तो अर्थ बंगालींत आहेच, पण त्याखेरीज भावना म्हणजे चिंता किंवा फिकीर असाही अर्थ आहे. भावना–वेदना ह्या जोडींत हा विशिष्ट अर्थच बसूं शकतो आणि म्हणून ह्या जोडीचा अर्थ करतांना चिंता आणि वेदना असाच केला पाहिजे. हुरहूर आणि हळहळ असे शब्दहि वापरतां येतील.

पण केव्हां केव्हां भावना शब्दाचा मूळ व्यापक अर्थ घेऊन देखील अर्थहानि होत नाहीं. आणि शब्दाची जोडी कायम ठेवल्याचें श्रेय मिळतें. तरीहि अशा गोळाबेरीज अर्थाने भाषेचा खरा परिचय होऊं शकत नाहीं.

बंगालींत घर म्हणजे खोली. आणि ज्याला आपण घर म्हणतों त्याच्यासाठीं शब्द आहे बाडी. मराठींतदेखील घर म्हणजे खोली हा अर्थ देवघर, माजघर, स्वयंपाकघर ह्या शब्दांत सांपडतो. भाषांतर करतांना केव्हां केव्हां घरच्या ठिकाणीं घर ठेवून भागते. पण मुळांतील अर्थ स्पष्ट ठाऊक असला पाहिजे. एकाच घरांत राहणाऱ्या व्यक्तीच्या संभाषणांत जेव्हां येते: 'आमार घरे एसो!' माझ्या खोलींत ये. तेथें घर शब्द ठेवून चालायचें नाहीं.

श्रान्त प्राणेर भावना वेदना
नीरबे जायिबे नामि,
ओगो अन्तरयामी ।

"हे अन्तर्यामी, तूं माझ्या हृदयांत अखंड आहेस, तर मग तुझ्या कृपेने माझ्या अन्तःकरणांत शुभसंकल्पाची अखंड शृंखला कां चालूं नये? रात्री निजतांना सकाळसाठीं असाच संकल्प करून मी निजेन कीं सकाळीं डोळे उघडतांच मी तुझें दर्शन घेईन.

चकचकीत उजाडल्यानंतर तुला नमस्कार करून मी कामाला लागेन आणि तेव्हांदेखील जें जें कर्म माझ्या वाट्याला येईल तें तें तुलाच अर्पण करावयाचें आहे हें मी विसरणार नाहीं.

दिवसभराचीं कामें करीत असतां माझ्या मनांत हीच उत्कंठा राहील कीं, संध्याकाळ होऊन दिवसाची मजूरी संपतांच तुझ्याजवळ मी येऊन बसूं शकेन. कोणच्याहि क्षणीं ही उत्कंठा शिथिल न होवो.

आणि जेव्हां खरोखर दिवस मावळून मी घरीं परत येईन तेव्हां सबंध दिवसाचा थकवा, त्यांतील[१] भावना (चिंता) आणि वेदना रात्रीच्या विरामसागरांत

---

१. संस्कृत कुटुंबांतील सर्व भाषा एकमेकींच्या अगदीं जवळ आहेत. केव्हां केव्हां केवळ सर्वनामें आणि प्रत्यय बदलले कीं भाषांतर झालें, अशी स्थिती असते. तरीहि जवळच्या भाषांतून भाषांतर करणें बऱ्याच वेळीं सर्वांत कठीण असतें. त्या त्या भाषेंतील शब्दाचा विशिष्ट अर्थ मूळ संस्कृत अर्थाहून पुष्कळदां अगदीं निराळा होत असतो. त्या त्या भाषेच्या गाढ परिचयावांचून हीं गोष्ट ध्यानांत येत नाहीं. त्यामुळें पुष्कळदां अर्थाचें स्वारस्य जातें व केव्हां केव्हां अनर्थहि होतो! संस्कृतमध्यें चेष्टा म्हणजे प्रयत्न! हा शब्द ह्याच अर्थाने हिंदींत आणि बंगालींत वापरला जातो. मराठींतदेखील हा अर्थ निश्चेष्ट शब्दांत उरलेला आहे. पण आपल्या भाषेंत चेष्टा म्हणजे कुचेष्टा, मर्कट चेष्टा किंवा हास्यविनोद. चेष्टेखोर या मराठी शब्दाचा अर्थ प्रयत्नशील असा करतां यावयाचा नाहीं.

मराठींत आणि बंगालींत राग म्हणजे क्रोध. संस्कृतमधें हा अर्थ नाहीं. गुजराथी-

विलीन करून मी नीरव शांतींत डुंबत राहीन.

हाच काय तो माझा संकल्प. कर्माच्या प्रारंभीं, कर्माच्या मध्यें आणि कर्माच्या अंतीं तुझेंच स्मरण रहावें आणि सर्व कर्में आणि त्यांच्या मुळाशी असलेल्या भावना तुलाच अर्पण कराव्या हाच माझा अखंड संकल्प असावा. हे हृदयस्थ नारायणा, ह्या संकल्पाचा तूं साक्षी हो व तो पार पाडण्याला मदत दे.

---

मध्यें डोळा हा शब्द वटारण्यापुरताच कामीं येतो. अशा कितीतरी गमती दाखवून देतां येतील.

बंगालींत जेव्हां कुणी दुसऱ्याला विचारतो तूं इतका 'विरक्त' कां झालास, तेव्हां त्याला म्हणावयाचे असतें कीं, तूं इतका रागावलास कां? कित्येक हिंदी भाषांतरकारांना हें ठाऊक नसल्यानें त्यांनीं विरक्त शब्द तसाच ठेवून दिला आहे!

प्रस्तुत ठिकाणीं 'भावना-वेदना' अशी जोडी आली आहे. गीतेंत ज्या अर्थानें भावना शब्द येतो तो अर्थ बंगालींत आहेच, पण त्याखेरीज भावना म्हणजे चिंता किंवा फिकीर असाही अर्थ आहे. भावना-वेदना ह्या जोडींत हा विशिष्ट अर्थच बसूं शकतो आणि म्हणून ह्या जोडीचा अर्थ करतांना चिंता आणि वेदना असाच केला पाहिजे. हुरहूर आणि हळहळ असे शब्दहि वापरतां येतील.

पण केव्हां केव्हां भावना शब्दाचा मूळ व्यापक अर्थ घेऊन देखील अर्थहानि होत नाहीं. आणि शब्दाची जोडी कायम ठेवल्याचें श्रेय मिळतें. तरीहि अशा गोळाबेरीज अर्थाने भाषेचा खरा परिचय होऊं शकत नाहीं.

बंगालींत घर म्हणजे खोली. आणि ज्याला आपण घर म्हणतों त्याच्यासाठीं शब्द आहे बाडी. मराठींतदेखील घर म्हणजे खोली हा अर्थ देवघर, माजघर, स्वयंपाकघर ह्या शब्दांत सांपडतो. भाषांतर करतांना केव्हां केव्हां घरच्या ठिकाणीं घर ठेवून भागते. पण मुळांतील अर्थ स्पष्ट ठाऊक असला पाहिजे. एकाच घरांत राहणाऱ्या व्यक्तीच्या संभाषणांत जेव्हां येते: 'आमार घरे एसो!' माझ्या खोलींत ये. तेथें घर शब्द ठेवून चालायचें नाहीं.

४

# रागिणीचा प्रताप

पदार्थ-विज्ञान शिकत असतांना एक सुंदर प्रयोग करून पाहिला होता. एक कांच मेजावर ठेऊन तिच्यावर किसलेल्या लोखंडाचे बारीक बारीक कण भुरभुरावले. हे बारीक बारीक लांबट तुकडे कसेबसे पडलेले होते.

पुढें एक भला मोठा लोहचुंबक घेऊन मेजाच्या खालीं धरला. चुंबकाचें आकर्षण जाणवतांच लोखंडाचे कण आपापल्या जागींच एका विशिष्ट दिशेनें रचले गेले आणि त्या सर्व कणांची एक प्रकारची रांगोळी बनली. कणांच्या रचनेमध्यें प्रथम कसलीच व्यवस्था नव्हती. आतां त्यांच्यांत व्यवस्था आली, इतकेंच नव्हे तर त्यांची एक सुंदर आकृति झाली; इतकी मोहक कीं कितीवेळ जरी पहात राहिलों तरी तृप्ति होईना. लहानमोठीं लंबवर्तुळें आणि त्यांच्या रेषांच्या रांगा अशा कशा बनल्या ह्याचेंच कौतुक वाटे. सगळ्या कणांनीं आपली जागा न सोडतां फक्त तोंडें फिरवलीं आणि कवायतींत जशी कतार केली जाते तशी त्यांनीं, नीरस सरळ रेषेंत नव्हे, पण लंबवर्तुळाच्या काव्यमय रांगा तयार केल्या. ही सुंदर रचना कायमची हस्तगत व्हावी म्हणून त्या लोखंडाच्या कणांवर डिंकाच्या पाण्याचे तुषार फुंकले आणि मग ती कांच वाळवली. अशा तऱ्हेच्या कितीतरी कांचा एकामागून एक तयार केल्याचें आठवतें.

आपल्या पामर जीवनांत रोजचीं कामें आपण नीरसपणें करीत असतोंच. पण असल्या

गद्य जीवनांत माधुरी कुठून असणार? पण जेव्हां आपल्याला ईश्वराचें स्मरण होतें, त्याचें सान्निध्य आपण अनुभवूं लागतों, जीवन-स्वामीची आपल्यासाठीं पसंत केलेली रागिणी आपल्या कानीं पडते तेव्हां लोहचुंबकाच्या प्रभावानें लोखंडाच्या कणाचें काव्य बनावें तसें आपल्या जीवनामध्यें एक अलौकिक माधुरी प्रगट होते. जीवनांतील सर्व कामें, सर्व प्रवृत्ति आणि सर्व अनुभव काव्यमय बनतात, सुगंधित होतात आणि आपल्या जीवनांत जें कधींच नव्हतें तें कसें दाखल झालें ह्याचा विचार करीत करीत आपण मंत्रमुग्ध होऊन जातों. सर्व विसंगति जाऊन सर्वतोभद्र सुसंगति उत्पन्न होते. जीवनाचें काव्य प्रसन्न-मंगल होतें आणि आपलें नीरस क्षुद्र व्यक्तित्व नष्ट होऊन परमात्म्याच्या जीवन-रागिणींत आपण मिसळून जातों. याला किमया म्हणावें का परमात्म्याच्या कृपेची धन्यता म्हणावी हेंच ठरवतां येत नाहीं. कवि म्हणतो—

तोमारि रागिणी जीवनकुंजे
बाजे जे सदा बाजे गो।
तोमारि आसन हृदयपद्मे
राजे जेन सदा राजे गो।
तव नन्दन-गंध-मोदित
फिरी सुन्दर भुवने।
तव पदरेणु माखि ल'ये तनु
साजे जेनो सदा साजे गो।

तोमारि रागिणी जीवनकुंजे
बाजे जेन सदा बाजे गो।

सब विद्वेष दूरे जाय जेन
तव मंगलमंत्रे,
विकाशे माधुरी हृदये बाहिरे
तव संगीत-छन्दे।

तव निर्मल नीरव हास्य
हेरि अंबर व्यापिया,
तव गौरवे सकल गर्व
लाजे जेन सदा लाजे गो।

तोमारि रागिणी जीवन-कुंजे
बाजे जेन सदा बाजे गो।

"माझ्या जीवन-कुंजामध्यें तुझी रागिणी वाजत राहो, सदा वाजत राहो. आणि माझ्या हृदय-कमलामध्यें तुझें आसन विराजमान होवो. नंदन-वनाच्या गंधाने सुगंधित असलेल्या तुझ्या सुंदर भुवनामध्यें मी विहार करीत असावें आणि तुझे चरणरेणु माझ्या शरीरावर माखून घेऊन माझें शरीर सुशोभित व्हावें. नेहमीं सुशोभित व्हावें.

तुझ्या मंगल मंत्राच्या प्रभावानें सर्व अमंगल विद्वेष दूर होवो. आणि तुझ्या संगीताच्या छंदानें माझ्या हृदयाच्या आंत आणि बाहेर माधुरीचा विकास होवो. आकाशाला व्यापून असणारें तुझें निर्मल, नीरव हास्य पाहतांक्षणीं तुझ्या गौरवापुढें माझा सर्व गर्व लज्जित होऊं दे. आणि माझ्या जीवन-कुंजामध्यें तुझी रागिणी नेहमीं वाजत असूं दे."

५

# देवा, परत मात्र जाऊं नका

‘माझीं संकटें दूर कर, मला सत्संगाचा लाभ मिळूं दे, मला ज्ञान दे,’ अशा तऱ्हेची प्रार्थना आपण देवाजवळ नेहमींच करतों. पण ‘देवा, तुझ्याविषयीं जर मला विसर पडला, तुझ्याविषयीं मला भक्ति वाटली नाहीं तर मला त्याची क्षमा कर, एवढेंच नव्हे तर माझें हृदय जागृत करून त्याचेकडूनच नवविधाभक्ति मागवून घे’ असेंहि देवाजवळ मागायला भक्त लाजत नाहींत. एका इस्लामी भक्तानें देवाच्या वतीनें मनुष्यजातीला सांगून टाकलें आहे कीं, ‘मनुष्याजवळ आपण वारंवार मागूं लागलों तर तो नाराज होतो. देवाचें याच्या उलट आहे. त्याचेजवळ न मागितल्यानेंच तो नाराज होतो.’

अद्वैतवादी वेदान्ती भक्त म्हणतो ‘खरें आहे, आपण देवाजवळ मागतों तें वस्तुतः हृदयस्थ आत्मारामाजवळच मागतों, आपल्यांतीलच उच्च तत्त्वाला जागृत करून त्याच्याकडे सर्व कांहीं मागणें अथवा पुरुषार्थी बनून स्वपराक्रमानें सर्व मिळविण्याचा संकल्प करणें यांत तत्त्वतः कांहींच फरक नाहीं. देवाची प्रार्थना म्हणजे आपल्याच पेढीवर आपण पाठविलेली हुंडी होय.’

इतिहासकार गिब्बननें आपल्या नोकराला सांगून ठेवलें कीं, ‘सकाळीं उठून मला पुष्कळ लिहावयाचें आहे. पण जुन्या संवयीमुळें माझ्यानें उठवत नाहीं. तेव्हां सकाळीं भल्या पहाटे येऊन मला जागा करीत जा. त्याबद्दल मी तुला बक्षिस देईन.’ दुसऱ्या दिवशीं

सकाळीं नोकर उठवायला गेला. स्वारी रागावली आणि नोकराला धमकाऊन म्हणाली, ‘माझी साखरझोंप बिघडवूं नकोस. चालता हो,’ नोकर बिचारा सांगूं लागला कीं ‘आपणच उठवायला सांगितलें होतें ना?’ पण ऐकतें कोण? नोकर बिचारा परत गेला आणि सकाळचें लिखाण राहून गेलें. दुपारीं गिब्बन नोकराला म्हणतो, ‘गड्या, तूं आपलें बक्षिस गमावलेंस. तूं मला हात धरून उठवायला पाहिजे होतेंस. झोपेच्या गुंगींत मी कांहींहि बोललों तरी तिकडे लक्ष देण्याचें तुझें काम नव्हे. मी आतां तुला जागेपणीं सांगतों हीच माझी खरी आज्ञा. झोपेंत मी तुला धमकावलें तरी तिकडे लक्ष देऊं नकोस.’

दुसऱ्या दिवसापासून नोकर शहाणा झाला. मालक रागावले, वसकन अंगावर आले, नोकरीवरून बडतर्फ करण्याची धमकी दिली तरी नोकर दबला न जातां मालकाला उठवूं लागला आणि गिब्बनदेखील सकाळचें लिखाण मनसोक्त झाल्यानंतर कृतज्ञतेनें नोकराला त्या त्या दिवसाचें बक्षिस देऊं लागला. झोपाळू मालकाचें ऐकूं नकोस असेंच जाग्या गिब्बननें आपल्या नोकराला सांगितलें ना!

भक्त जर ईश्वराचीच प्रार्थना करतो कीं ‘‘देवा, मी जर तुझ्या हाकेसरशी जागा झालों नाहीं तर वज्रप्रहार करून मला उठीव. ती तुझी कठोर कृपा असेल. पण ‘जाऊं द्या कीं, निजेना का बिचारा,’ असें म्हणून जर का तुम्ही दयाभावानें परत गेलात तर तो कृपाळू घातकीपणा होईल. तेव्हां देवा, वाटेल तें करा, पण पाठमोरे होऊन परत जाऊं नका.’’

येथवर भक्ताचें हृदय, त्याची संकल्प-दुर्बलता आणि चित्ताची तळमळ आपण समजूं शकतों पण भक्त याहून पुढें जाऊन म्हणतो कीं ‘‘देवा, जर माझ्या हातून निष्ठाद्रोह घडला आणि माझें मन व्यभिचारी बनून जर दुसऱ्याच कुणाची तरी भक्ति करूं लागलें आणि आपली चूक कबूल न करतां आग्रहपूर्वक जर दुसऱ्याचीच उपासना करूं लागलें तरीहि देवा, एवढें ध्यानांत ठेवा कीं तें माझें वेड आहे. खरोखर माझ्या हृदयानें सदाकाळ राजा म्हणून तुम्हांलाच पसंत केलें आहे. माझ्यावर दया करा आणि प्रभो, परतून जाऊं नका.’’

सर्व-सहिष्णु, परमदयाळू भगवानच अशी प्रार्थना समजूं शकतो आणि प्रभूचें तें करुणा-मय स्वरूप जाणणारा भक्तच प्रभूपुढें अगदीं उघडानागडा होऊन वरील प्रकारची प्रार्थना करूं शकतो.

ईश्वरनिष्ठेचा आग्रहानें बोध करणारा इस्लाम म्हणतो कीं तुम्हीं इतर कितीहि अपराध केले तरी रहीम, करीम भगवान तुमचा तोबा कबूल करतो आणि तुम्हांला क्षमा करूं

शकतो. परंतु सर्वांत मोठा गुन्हा म्हणजे आपल्या हृदयांत जेथें एकदां भगवंताची स्थापना केली त्या ठिकाणीं दुसऱ्या एखाद्याची स्थापना करणें, ईश्वराच्या स्थानीं जर आपण दुसऱ्या कुणाला शरीक केलें तर त्या गुन्ह्याला शिर्क किंवा शिरक्त म्हणतात. हा गुन्हा इतका मोठा आहे कीं त्याची क्षमा होऊंच शकत नाहीं.

गुन्हा मोठा आहे, अधःपाताकडे घेऊन जाणारा आहे हें सर्व कबूल, पण भगवंताच्या दयालुत्वाला मर्यादा घालणारे आम्ही कोण ? ईश्वराला बाजूला सारून त्याच्या ठिकाणीं धनदौलत, इंद्रियसुख, महत्त्वाकांक्षा, आत्मप्रौढी इत्यादि हीन तत्त्वांची स्थापना सर्वच करतात. शिर्कचा गुन्हा ज्याचे हातून कधीं घडला नाहीं आणि घडत नाहीं असा मनुष्य कधींकाळीं सांपडेल कां ? जगांतील सर्वच देशांतील आणि सर्व काळांतील भक्त एकमुखानें सांगतात कीं त्या अनंत क्षमासागराच्या दयेला, क्षमेला मर्यादा नाहीं.

म्हणूनच देवाच्या कारुण्यावर विश्वास ठेवून भक्त भगवंताला विनवतो कीं, जर माझें हृदयद्वार बंद दिसलें तर तें मोडून देवा, माझ्या प्राणांत प्रवेश कर. जर मी तुला विसरलों आणि तुझें नामसंकीर्तन न केलें तर माझी गफलत मला समजेतोंपर्यंत धीर धर. तुझी हांक ऐकूनदेखील जर माझी झोप मोडली नाहीं तर वज्रदयेच्या कठोर आघातानें मला जागृत कर आणि जर मी नास्तिक झालों आणि तुझ्यावरील माझा विश्वास उडाला तरी भगवंता, माझ्यावरील तुझा विश्वास कायम राहूं दे. आणि तूं परत जाऊं नकोस.

जदि ए आमार हृदय-दुयार
बन्ध रहे गो कभु
द्वार भेंगे तुमि एसो मोर प्राणे,
फिरिया जेयो ना प्रभु !

जदि कोनो दिन जे वीणार तारे
तव प्रियनाम नाहि झंकारे
दया करे तुमि क्षणेक दाँडायो,
फिरिया जेयो ना प्रभु !

तव आह्वाने जदि कभु मोर
नाहि भेंगे जाय सुप्तिर घोर

वज्र-वेदने जागायो आमाय,
फिरिया जेयो ना प्रभु !

जदि कोनो दिन तोमार आसने
आर–काहार ओ बसाई जतने,
चिर-दिवसेर हे राजा आमार,
फिरिया जेयो ना प्रभु !

"जर हें माझें हृदय-द्वार कधीं तुला बंद दिसलें तर हे प्रभु, त्याला तोडून माझ्या प्राणांत तूं प्रवेश करावास. पण परत जाऊं नयेस.

जर कधींकाळीं माझ्या वीणेच्या तारेवर तुझें प्रिय नाम झंकृत झालें नाहीं तर कृपा करून प्रभु, क्षणभर वाट पहावीस. पण निराश होऊन परत जाऊं नयेस.

जर तुझी हांक ऐकून माझी गाढ निद्रा मोडली नाहीं, मी जागा झालों नाहीं – तर प्रभु, वज्रवेदनेनें[1] मला तूं जागवावेंस. पण परत जाऊं नयेस.

आणि हें सर्व असो. दुर्दैवानें जर कधीं काळीं माझ्या हृदयांतील तुझ्या आसनावर मी प्रयत्नपूर्वक दुसऱ्या कुणाला बसवलें तर भगवंता, तो माझा प्रमाद आहे, चित्तभ्रम आहे हें ओळखून हे माझ्या सर्व काळच्या राजा, परत जाऊं नकोस.

---

१. इंग्रजी गीतांजलींत ३५ वें प्रार्थनागीत विश्वविख्यात आहे. where the mind is without fear इत्यादि. या गीताच्या शेवटीं कवि म्हणतो–into that heaven of Freedom, my Father, let my country awake. याच गीताचें मूळ 'नैवेद्यांत' ७२ वें आहे -- चित्त जेथा भयशून्य वगैरे. तेथें शेवटीं ते म्हणतात कीं–हे पितृदेव, आपल्या हातानें निर्दय आघात करून भारताला त्या स्वर्गांत जागृत कर. आपल्या हाताच्या निर्दय आघातानें प्रसुप्त भारताला जागव, या भावनेंतील आघाताचें तत्त्व इंग्रजी भाषान्तरांत आलेलें नाहीं. जगाला याचें कांहींहि वाटो. आपणा भारतीयांना मूळ बंगालींतील प्रार्थनाच अधिक इष्ट वाटणार. कारण आपल्याला ठाऊक आहे कीं त्याच्या कठोर आघातावांचून आपली काळझोप उतरणार नाहीं.

६

# क्षमापनाहि आणि आशाहि

महादेवाची आपल्या इकडील एक गोष्ट भगिनी निवेदितेनें मोठ्या कौतुकानें लिहून ठेवली आहे. देवाधिदेव महादेव एकदां पृथ्वीवर संचार करीत असतांना एकाच्या उपवनांत शिरले. विचारल्यावांचून हा कोण गोसावडा माझ्या बागेंत शिरला आहे असें म्हणून मालकानें हातांतील काठीनें गोसाव्याची पाठ शेकून काढली. आतां झालें असें कीं ती काठी होती बेलाच्या झाडाची आणि बेल महादेवाला प्रिय. भोलानाथ शंभूला वाटलें कीं हाहि भक्तीचाच प्रकार असावा. बेलाची काठी घेऊन यानें पुनःपुनः माझी पाठ रगडली आहे, तेव्हां इतकी सेवा घेतल्यानंतर त्याला कृतार्थ केलाच पाहिजे. महादेवानें त्याच्या सर्व कामना पूर्ण करून त्या उद्यानपतीला आपल्या शिवलोकांत स्थान दिलें. महादेवाला व्यावहारिक गोष्टींत कांहींच समजत नाहीं, त्याची मति चालते फक्त आध्यात्मिक बाबतींत, हे या गोष्टीचें तात्पर्य म्हणून सांगितलें जातें. खरी गोष्ट अशी आहे कीं ईश्वर मनुष्याच्या ऐहिक गोष्टींकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करतो आणि ईश्वराला प्रिय अशी गोष्ट त्याच्या हातून चुकून जरी घडली तरी त्याचें फळ देऊन त्याला उन्नतीच्या मार्गावर आणून सोडतो. सर्व-कल्याणकारी भगवंताला कसलेंहि निमित्त मिळालें तरी पुरें असतें.

आपण जर जमिनीची मशागत करून त्यांत धान्य पेरलें तर तें चांगलें फोफावून उगवणारच आणि पेरल्याच्या कितीतरी पट पीक आपल्या हातीं येणारच. पण थोडेसे दाणे

आपल्या हातून जमिनीवर चुकून जरी पडले तरी विश्वमाता वसुंधरा त्या दाण्यांचें बीज करून दसपट पीक दिल्यावांचून रहात नाहीं.

* * *

ईश्वराची भक्ति करावी, त्याचें नामसंकीर्तन करावें, त्याचें गुणगान गाऊन आपली वाणी पवित्र करावी, असा एक अस्पष्ट संकल्प भक्ताच्या हृदयांत उठला. पण संसाराचें आकर्षण कांहीं केल्या कमी होईना, प्राण जागृत होऊन ईश्वराभिमुख होईनात. तरीहि मूळ संकल्पामुळें अन्यमनस्क स्थितींतच तोंडांतून ईश्वराचें नांव येऊं लागलें. त्याचें गायन गळ्याला नकळत स्फुरूं लागलें आणि पुढें पुढें तो एक चाळाच होऊन बसला.

अशा वेळीं भक्त म्हणतो – जेव्हां भानावर येऊन मी माझ्या मनाला विचारूं लागलों कीं, ही पूजा समजावयाची काय? तेव्हां मन लाजलें. भगवंताच्या चरणीं जें शून्य मनानें वाहिलेलें असेल त्याला पूजाद्रव्य म्हणतां यावयाचें नाहीं. तो कांहीं उपहार नव्हे – नैवेद्य नव्हे. ईश्वराला सर्व कांहीं वाहिलें आणि त्यांत जर भक्तिसुमन नसलें तर ती पूजा कशी म्हणावी? तिला पूजा म्हणणें ही लाजिरवाणी गोष्ट. याबद्दल क्षमाच मागितली पाहिजे.

तरीपण मनामध्यें एक लपलेली आशा आहे कीं भगवान भोळा शंभू आहे. या माझ्या शून्य हृदयदानानें, भक्तिविहीन गायनानें, शून्य मनाच्या वृथा उपहारानें देखील त्याचें ध्यान माझ्याकडे वेधलें जावयाचें आणि मग, मी सेवा केली म्हणून नव्हे, तर भगवंताचा स्वभावच अकारण–करुण आहे म्हणून, त्याच्या कृपेचा वर्षाव मजवर व्हावयाचा, प्रेमसुधे-मध्यें मी न्हाऊन निघावयाचा, ईश्वराकडून एकाएकीं मुबलक अमृतदान व्हावयाचें. माझी योग्यता कांहींच नाहीं हें खरें पण भगवान जर योग्यतेकडे पाहील, तर कल्याण करण्या-लायक, एका कृपाकटाक्षाचीहि खैरात मिळविण्यालायक त्याला कितीसे भक्त सांपडतील? पण तो सहज–वत्सल आहे, थोडेसें निमित्त सांपडतांच त्याचें हृदय पाझरतें, या एका भरंवशानेंच त्याच्या चरणीं माझें हृदय मी अर्पण करतों. मग तें या क्षणीं अगदीं शुष्क आणि शून्य कां असेना.

असल्या कोऱ्या पूजेची मी क्षमाहि मागतों आणि त्याबरोबरच भरंवसाहि बाळगतों कीं असली ही कोरी पूजा देखील व्यर्थ जाणार नाहीं.

संसार जबे मन केडे लय
जागे ना जखन प्राण

तखनो हे नाथ प्रणमि तोमाय
गाहि बसे तब गान।
अन्तरयामी; क्षमो से आमार
शून्यमनेर वृथा उपहार—
पुष्पविहीन पूजा आयोजन,
भक्तिविहीन तान,
संसार जबे मन केडे लय
जागे ना! जखन प्राण।

डाकि तब नाम शुष्क कंठे,
आशा करि प्राणपणे,
निबिड प्रेमेर सरस बरषा
जदि नेमे आसे मने।

सहसा एकदा आपना हइते
भरि दिबे तुमि तोमार अमृते
एई भरसाय करि पदतले,
शून्य हृदय दान,
संसार जबे मन केडे लय
जागे ना जखन प्राण।

'हे अंतर्यामी प्रभो, जेव्हां माझा प्राण जागृत नसेल आणि हा बाह्य संसारच माझें सर्व चित्त खेंचून घेत असेल तेव्हां देखील मी संवयीमुळें किंवा फक्त उपचार म्हणून तुला नमस्कार करीन, आणि वेळ होतांच बसून तुझें गाणेंहि गाईन. हें मी शुष्कपणें काय करतों इकडे लक्ष गेलें म्हणजे मला लाज वाटूं लागते. म्हणून म्हणतों कीं हे प्रभो, माझ्या शून्य मनाच्या वृथा उपहाराबद्दल

सुमनशून्य पूजेच्या तयारीबद्दल आणि भक्तिविहीन तानगानाबद्दल मी क्षमा मागतों.

भगवंता, असें जरी आहे तरी असली ही अर्धवट पूजा सोडून देण्याचें मन होत नाहीं. शुष्ककंठानें कां होईना तुझें नांव मी घेतच राहातों आणि मनापासून आशा करतों कीं कदाचित तुझ्या निबिड प्रेमाची सरस वर्षा एकाएकीं माझ्यावर उतरेल, कदाचित वेळ जुळून आली तर तूं आपण होऊनच आपल्या अमृतरसानें मला भरून टाकशील.

याच एका भरंवशामुळें, जर माझा प्राण जागृत नसला, संसारानें जरी माझें मन चोरलें असलें तरी, तुझ्याचरणीं माझ्या शून्य हृदयाचें मी दान करीत आहें.'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
४५५०८ वि: निबंध
१७५५८ नों दि: २५/८/६८

७

# जीवनव्यापी अखंड स्मरण

दुःखाच्या वेळीं देवाची आठवण होणें अगदीं स्वाभाविक आहे दुःखानें गांजून आपली आठवण करणाऱ्याला देखील भगवंतांनीं भक्ताची योग्यता दिली आहे आणि प्रथम त्याचीच आठवण केली आहे (आर्तो, जिज्ञासुर्, अर्थार्थी, ज्ञानी च भरतर्षभ ।) पण ती एका अर्थानें मतलबी भक्ति झाली. रोग झाला असतां जे लोक वैद्याची आठवण करतात, त्या सगळ्यांना वैद्य आपले स्नेही मानत नसतो. गरज सरल्यानंतर देखील वैद्याची आठवण करणारे लोकच त्याचे स्नेही होत.

दुःखाच्यामुळें देवाची आठवण होते हें ओळखून भगवंताची आठवण कायम राहण्यासाठीं कुन्तीनें 'नेहमीं संकटें आमच्या वाट्याला असोत' आशी प्रार्थना केली. तिची भक्ति कांहीं मतलबी नव्हती. अथवा भक्ति हाच तिचा मतलब होता.

पण संकटाच्या वेळीं मनुष्याला ईश्वराची आठवण होतेच असें कुठें आहे? जो लढवैया असतो, तो संकट दिसतांच आपली तलवार उपसतो अथवा मारामारीच्या पवित्र्यांत उभा राहतो. कज्जेखोर मनुष्य वकिलाकडे धाव घेतो, सावकार बहुधा, लांच देऊन काम भागविण्यासाठीं आपली थैली उघडतो. दुर्बळ असतात ते समर्थाची कांस धरतात. मंत्रतंत्रांवर विश्वास असणारा, दक्षिणा देऊन ब्राम्हणाला जप करायला बसावितो. ज्याची जशी श्रद्धा तसा उपाय त्याला सुचणार. भक्त म्हणतो : 'कांहीं पडता जड भारी, दासे आठवावा हरि ।'

माता कुंतीचें म्हणणें खरें आहे. दुःखामुळेंच जीवनाचा खराखुरा साक्षात्कार होतो. सुख पाण्यावर पोहायला शिकवते. दुःख आपल्याला जीवन-सागराचा पाणबुड्या बनवतें. सुख माणसाला भुरळ पाडतें. दुःख जीवनरहस्याचा साक्षात्कार करवतें. दुःखं सत्यं, सुखं माया; दुःखं जन्तोः परं धनम् ।

सुखदुःखाविषयींचा हा सर्व विवेक जमेस धरून साधक म्हणतो कीं ज्याप्रमाणें दुःखाला जीवनसाधना बनवतां येते, त्याप्रमाणें सुखाच्या बाबतींत आपल्याला कां करतां येऊं नये ? आपल्या वाट्याला सुख आलें असतां, हुरळून न जातां मनुष्याला ईश्वराचें स्मरण कां करतां येऊं नये ? उलट आपण असें म्हणूं कीं दुःखाच्या प्रसंगीं माणसाला ज्याप्रमाणें देव आठवतो, त्याचप्रमाणें सुखाच्या वेळीं देखील, तितक्याच उत्कटतेनें देवाची आठवण झाली तर त्याची सर्व साधना सिद्ध झाली. खऱ्या भक्तीची कसोटी तीच आहे. तसें पाहिलें तर सुखदुःख हा भेदच भ्रममूलक आहे.

सुख आणि दुःख या दोन्ही शब्दांत, मुख्य शब्द आहे ख. ख म्हणजे इंद्रिय. इंद्रियांना आवडतें तें सुख आणि त्यांना आवडत नाहीं तें दुःख. याचा अर्थ असा झाला कीं सुख कशाला म्हणावें आणि दुःख कशाला म्हणावें हें ठरवणार हीं इंद्रियें. आणि तीं तर बोलूनचालून प्रमाथी, बुद्धीला भ्रष्ट करून वेडेचार करायला लावणारीं. त्यांच्या निर्णयाला मान तो काय द्यावयाचा ? म्हणून तर गीतेनें सांगितलें 'दुःखेषु अनुद्विग्नमनाः; सुखेषु विगतस्पृहः ।' जो जीवनवीर आहे तो सुख आणि दुःख दोहोंविषयीं सारखाच उदासीन असणार. यालाच गीतेनें तितिक्षा म्हटलें आहे. भक्त म्हणतो कीं मी दोहोंना ईश्वराकडे लावून मोकळा होणार. या गतिमान, अस्थिर जगांत जें कांहीं आहे, तें सर्व ईश्वरमय दृष्टीनें पहावें—ईशावास्यम् इदम् सर्वम् यत् किंच जगत्यां जगत् । सुखदुःखाच्या भावनांचा त्याग करून, ईश्वरभावनेनें सुखदुःखाचें सेवन करा. म्हणजे जीवन निर्लेप होईल, ही आहे उपनिषत्कारांची शिकवणूक. ही शिकवणूक काव्यवृत्तीनें आपलीशी करून रवीन्द्र म्हणतात—

जीवने आमार जत आनन्द
पेयेछि दिवसरात
सबार माझारे तोमारे आजिके
स्मरिब जीवननाथ !

जे दिन तोमार जगत निरखि
हरषे परान उठे छे पुलकि
से दिन आमार नयने हये छे
तोमारि नयनपात ।
सब आनन्द–माझारे तोमारे
स्मरिब जीवननाथ !

बार बार तुमि आपनार हाते
स्वादे गंधे ओ गाने
बाहिर हअिते परश करे छ
अन्तर–माझखाने ।

पिता माता भ्राता प्रियपरिवार,
मित्र आमार, पुत्र आमार,
सकलेर साथे हृदये प्रवेशि
तुमि आछ मोर साथ !
सब आनन्द–माझारे तोमारे
स्मरिब जीवननाथ ।

हे जीवननाथ ! माझ्या या जीवनांत दिवसा आणि रात्रीं जो कांहीं आनंद मला मिळाला आहे त्या सर्वांमध्यें मी आज तुझेंच स्मरण करणार. तूं आनंद-स्वरूप आहेस. आनंद मिळाला असतां त्यांतून तुझें दर्शन करणें आणि तुझें स्मरण करणें हें स्वाभाविक असलें पाहिजे.

ज्या दिवशीं तुझ्या या जगाला पाहून माझ्या हृदयांत माझे प्राण हर्षपुलकित झाले त्याच दिवशीं माझ्या नयनांत तुझी दृष्टि येऊन बसली. माझ्या नयनांत तुझा दृष्टिपात झाला हें ओळखून, हे जीवननाथ ! सर्व आनंदामध्यें तुझेंच स्मरण करीत राहीन.

तुझी केवढी असीम कृपा ! तूं आपल्या वरद हस्तानें स्वाद, गंध, गान यांच्या द्वारें माझ्या हृदयाच्या गाभ्याला बाहेरून स्पर्श करतोस. पिता, माता, भ्राता, प्रिय परिवार, माझे मित्र आणि माझे पुत्र या सर्वांच्या बरोबर माझ्या हृदयांत प्रवेश करून, त्यांच्या रूपानें तूंच मला साथ देत असतोस, हें आतां मला कळून चुकलें आहे. म्हणून हे जीवननाथ ! सर्व प्रकारचे आनंद अनुभवीत असतां मी तुझेंच स्मरण कायम ठेवीन. आनंदाच्या द्वारा तूं स्वतःचें दर्शन देत आहेस, या गोष्टीची जागृति आतां मला कायमची राहणार.

८

# माझ्या प्राणांत तुला बसवीन

एखाद्या लहानशा सुंदर फुलांत कितीतरी सुगंध, सौंदर्य आणि लावण्य भरलेलें असतें. एखाद्या रत्नामध्यें कितीतरी कांति व मूल्य सांठवलेलीं असतात. दार्शनिकांच्या एखाद्या आटपशीर सूत्रामध्यें कितीतरी जीवनानुभव कोंबलेला असतो. त्याचप्रमाणें एखाद्या लहानशा कवितेमध्यें कितीतरी विशाल, गभीर, अनंतभाव आपल्याला सांठवलेला सांपडतो. परिमितामध्यें अनंत सामावलें जावें ही विश्वाची एक लीलाच आहे.

दूध जर आपण तापवून आटवलें तर दुधाचें परिमाण कमी होतें, पण त्या मानानें गोडी कमी न होतां उलट ती वाढतेच. त्याचप्रमाणें गद्याला जेव्हां आपण आटवून छंदोबद्ध करतों तेव्हां कितीतरी शब्द अनावश्यक ठरून आपोआप गळून पडतात आणि म्हणूनच काव्यमय वाणी अधिकाधिक आटपशीर आणि प्रभावी बनत असते. छंदांचें असें हें बंधन हितकारकच ठरतें. कारण छंदाच्या बंधनामुळें वाणीची भाव-वाहिता अनंतपट वाढत वाणली असते. यंत्रांत वाफेला कोंडली म्हणजेच तिची शक्ति वाढते, तशांतलाच हा प्रकार आहे.

भावगीतांना जर संगीताची जोड मिळाली तर कमींत कमी शब्दांत व दोनचार आलापांत रसाची आणि भावनेची अशी कांहीं खोली येते कीं कमींत कमी साधनांनीं एक संबंध सृष्टीच निर्माण केल्याचा चमत्कार दाखवितां येतो.

आपल्या काव्य-साधनेचीच उपमा वापरून कवि आपली भक्ति-साधना येथें समजावून देत आहेत.

काव्येर कथा बाँधा पडे जथा
छन्देर बाँधने
पराने तोमाय धरिया राखिब
सेइमतो साधने ।

काँपाये आमार हृदयेर सीमा
बाजिबे तोमार असीम महिमा,
चिर-विचित्र आनन्दरूपे
धरा दिबे जीवने,
काव्येर कथा बाँधा पडे जथा
छन्देर बाँधने ।

आमार तुच्छ दिनेर कर्मे
तुमि दिबे गरिमा,
आमार तनुर अणुते अणुते
रबे तव प्रतिमा
सकल प्रेमेर स्नेहेर माझारे
आसन सँपिये हृदयबाजारे.
असीम तोमारे भुवने रहिया
रबे मम जीवने
काव्येर कथा बाँधा रहे जेथा
छन्देर बाँधने ।

'भगवंता, काव्याची कथावस्तु ज्याप्रमाणें छंदाच्या बंधनांत सापडल्यामुळेंच अधिक रोचक आणि प्रभावशाली बनते, त्याचप्रमाणें माझ्या जीवन. साधनेच्या द्वारा मी तुला माझ्या प्राणांत बांधून ठेवीन. तुझी असीम महिमा माझ्या हृदयाच्या सीमेला तंत्रीप्रमाणें छेडून त्याच्या कंपनामधून संगीताप्रमाणें वाजूं लागेल. आणि विविधता हाच ज्याचा स्थायी स्वभाव आहे, अशा आनंदरूपाने माझ्या जीवनांत ती अवतीर्ण होईल.

माझ्या नित्याच्या अंगवळणी पडलेल्या तुच्छ कर्मांना तूं गौरवपूर्ण करशील आणि माझ्या शरीराच्या अणुअणूमध्यें तुझीच प्रतिमा वसलेली दिसूं लागेल. समस्त प्रेमाच्या आणि स्नेहाच्या मध्यें मी माझ्या हृदयेश्वराला आसन अर्पण करीन. आणि मग तुझ्या अनंत भुवनांच्या असीम सृष्टींत वास करीत असतांना देखील तूं माझ्या भवनांत विराजमान होशील. काव्याची कथा ज्याप्रमाणें छंदाच्या बंधनामध्यें बांधली जाऊन कृतार्थ होते त्याचप्रमाणें माझ्या साधनेच्या द्वारा हे हृदयेश्वरा, माझ्या प्राणांत तुला मी सामावून ठेवीन.'

'ईशावास्यम् इदं सर्वम्' ही वैदिक ऋषींची शिकवणूक स्वीकारून कवीनें विश्वांत वसणाऱ्या ईशाला आपल्या हृदयाच्या ताब्यांत आणण्याची साधना येथें व्यक्त केलेली दिसते. येथें ताबा मिळविणें आणि ताबा स्वीकारणें यांत भेदच उरत नाहीं.

४३५०८ वि. निबंध
१७५५७ नों. दि. २५/८/६८

९

# साक्षात्काराचा क्रमविकास

कोणी म्हणतात सहा महिने उत्कट साधना केली तर हटकून साक्षात्कार होतो. ईश्वराचें दर्शन होतें. कोणी म्हणतात सहा महिन्यांत साक्षात्कार होण्याचे दिवस बालक ध्रुवाच्या काळीं होते. आतां बारा वर्षांच्या साधनेच्या अंतींच साक्षात्कार होणें शक्य आहे. कोणी म्हणतात साधना चाळीस वर्षें करावी लागते तेव्हां कुठें साक्षात्कार झाला तर होतो.

खरी गोष्ट अशी आहे कीं साक्षात्कार साधनेच्या प्रारंभापासूनच हळूहळू सुरू होत असतो. आणि पूर्ण साक्षात्कार केव्हां होईल हें कोणीच सांगूं शकत नाहीं.

मूल जन्मल्याबरोबर आईला ओळखतें आणि अल्पशा प्रयत्नानें आईचें दूध पिऊं लागतें. हळूहळू आईचा आवाजहि ओळखूं लागतें. पण आईचें खरें प्रेम मुलाला आईचा स्वर्गवास झाल्यावर मगच पूर्णपणें कळून येतें. सहा महिन्यांनीं किंवा बारा वर्षांनीं आईचा परिचय होतो असें जर कुणी म्हटलें तर आपण त्याला हसूं.

मोटरगाडी दुरून येत असतांनाच ती मोटार आहे असें आपण ओळखतों. ती जसजशी जवळ येते तसतसा तिचा तो साक्षात्कार वाढतो. आणि अगदीं जवळ आल्यानंतर ती कोणत्या मॉडेलची आहे, तिचा नंबर काय आहे आणि आंत कोण कोण बसलें आहे हें आपल्याला समजतें. हा अनुभव सगळ्यांना आहे. पण या उदाहरणांत स्वतःला पटवून देण्याचा

प्रयत्न मोटर कुठेंच करीत नसते. तें तुमचें तुम्ही पहायचें असतें. ईश्वराचा साक्षात्कार व्हावा म्हणून जेव्हां आपण साधना करतों तेव्हां – अनुभवी भक्त म्हणतात – ईश्वरदेखील स्वतःचें स्वरूप प्रगट करण्याची, स्वतःचा साक्षात्कार करून देण्याची साधना आस्थेवाइकपणें करीत असतो. ईश्वर म्हणतो कीं मला ओळखण्याची साधना देखील मींच माझ्या भक्ताला शिकवली पाहिजे. दोन्हींकडून नेटाचा प्रयत्न होत असल्यामुळें साधना सुरू होतांच भक्ताला अत्यल्प का होईना, ईश्वराचा प्रत्यय होतोच. म्हणूनच या परिचयाला आईच्या आणि अर्भकाच्या परिचयाची उपमा देण्याचें सुचलें. अर्भकाला आईचा साक्षात्कार अत्यल्प का असेना, पण तो भास नसून ठोस किंवा भरीव अनुभव असतो. आणि तो झपाट्यानें मुलाबरोबरच वाढीला लागतो. ईश्वरा, मी तुला परिपूर्ण ओळखलें नाहीं तरी तुला मी ओळखतों असें म्हणण्याइतका मला तुझा अनुभव झाला आहे. तो कसा झाला हें मी सांगूं शकत नाहीं. परंतु अनुभव झाला, होत आहे, उत्तरोत्तर वाढत आहे याविषयीं मात्र खऱ्या साधकाला शंका नसते.

उन्हाळ्याच्या शेवटीं एकाएकीं थंडगार वाऱ्याची झुळुक लागतांच आपल्या शरीराच्या रोमारोमाला आनंद होतो आणि आपण म्हणतों कीं जवळ कुठेंतरी पाउस झाला असला पाहिजे. त्याशिवाय ही असली थंड ओलसर झुळुक येथवर पोंचली नसती. ईश्वरसाक्षात्काराचें असेंच आहे. त्याचा कृपाप्रसाद आपल्यापर्यन्त पोंचण्यापूर्वींच चेतना, वेदना आणि भावना यांना त्याच्या स्पर्शाची बातमी लागते. प्रत्येक श्वासामध्यें आणि डोळ्याच्या पात्याच्या लवण्यामध्यें आपल्या शरीराला आणि मनाला कळून येते कीं ईश्वराची कृपा आपल्याकडे वेगानें धावत येत आहे.

ज्यांना एकमेकाची भाषा कळत नाहीं असे लोक देखील डोळ्यांतील चमक पाहून एकमेकांचें प्रेम ओळखतात. निरक्षर पत्नीला पतीचें पत्र आलें तर आंत काय लिहिलें आहे हें कुणी वाचवून दाखवीतोंपर्यंत तिला न समजो, पण पत्र पाहूनच तिला आपल्या प्रियकराचें प्रेम समजतें, आणि त्याचा संदेश देखील तिच्या हृदयांत प्रकट होतो.

ईश्वर आपल्या हृदयांत आहे याचा साक्षात्कार झाल्यानंतर आपला हृदयेश्वर स्वतःच लोकेश्वर आहे, त्रैलोक्यनाथ आहे हें समजायला वेळ लागत नाहीं. पण समजून आलेली ती गोष्ट व्यक्त करायला भाषा मात्र समर्थ नसते आणि म्हणूनच ईश्वराचें दर्शन होतांच वाणी कुंठून आपण मौनाचे सेवन करूं लागतो.

ना बुझेओ आमि बुझेछि तोमारे
केमने किछु ना जानि ।
अर्थेर शेष पाअि ना, तबुओ
बुझेछि तोमार वाणी ।

निश्वासे मोर निमेषेर पाते
चेतना–वेदना–भावना–आघाते
के देय सर्व शरीरे ओ मने
तव संवाद आनि

ना बुझेओ आमि बुझेछि तोमार
केमने किछु ना जानि ।

तव राजत्व लोक हते लोक,
से बारता आमि पेयेछि पलके
हृदि-माझे जबे हेरेछि तोमार
विश्वेर राजधानी

ना बुझेओ आमि बुझेछि तोमारे
केमने किछु ना जानि ।

आपनार चिते निबिड निभृते
जेथाय तोमारे पेयेछि जानिते
सेथाय सकलि स्थिर निर्वाक्
भाषा परास्त मानि ।

ना बुझेओ आमि बुझेछि तोमारे
केमने किछु ना जानि ।

'न जाणून देखील, भगवंता, मीं तुला जाणलें आहे. पण तें कसें हें मात्र मला ठाऊक नाहीं. हे स्वामी, तुझी आज्ञा ऐकतांच त्या आज्ञेतील सगळा अर्थ न समजला तरी तुझा आदेश काय आहे हें मला समजलें आहे.

श्वासोच्छ्वास चालू असतांना आणि डोळ्यांचीं पातीं लवत असतांना चेतना, वेदना आणि भावना यांचा आघात करून माझ्या मनापर्यंत आणि माझ्या शरीरापर्यंत तुझा शुभसंदेश कोणीतरी पोहोचविते. न जाणून देखील तुला मी जाणलें आहे पण ते कसें हें मात्र मला ठावूक नाहीं. माझ्या हृदयांत ज्या क्षणीं सकल विश्वाची राजधानी मी पाहिली, तेव्हां एका पलकभरांत मला कळून आलें कीं लोकलोकान्तरामध्यें तुझेंच राज्य विराजत आहे. तुला न ओळखून देखील तुला मी ओळखतों. पण तें कसें घडतें हें मात्र समजत नाहीं.

माझ्या चित्ताच्या निबिड एकान्तात जिथें तुझा मला परिचय होतो तेथें आनंदातिशयानें माझें सर्वस्व स्थिर आणि निर्वाक होऊन जातें आणि भाषा म्हणते–आनंद व्यक्त करण्याचें काम माझ्या शक्तीबाहेरचें आहे. भाषा आपली हार कबूल करून समाधीसारख्या मौनाचा आश्रय घेते. तुला जरी ओळखलें नाहीं तरी मीं तुला ओळखलें आहे. फक्त हें कसें होऊं शकलें तें माझ्या ध्यानांत येत नाहीं.

१०

# सर्वेश्वराशी अभंग-एकनिष्ठा

पुष्कळ दिवसांनीं नवरा घरीं परत आला म्हणजे बायकोला ठाऊक असतें कीं त्याची सगळी चुटपुट तिलाच भेटण्याची आहे. पण नवरा शिष्टाचार सोडणार नाहीं. आल्याबरोबर घरच्या वडील मंडळींना भेटलें पाहिजे, इष्टमित्रांची विचारपूस केली पाहिजे, शेजाऱ्यापाजाऱ्यांना कुशलवर्तमान विचारलें पाहिजे. सगळ्यांना वाटतें कीं हा आपला सर्वांचा आहे. हा कांहीं बाईलवेडा नाहीं कीं सर्ववेळ बायकोचें ध्यान करीत बसेल. पण बायकोला ठाऊक असतें कीं नवरा सर्वांवर जरी प्रेम करीत असला, त्याच्या स्नेहाच्या वर्तुळांत इष्टमित्र, सगेसोयरे, आडोशीपडोशी सगळे येत असले तरी त्याचें सर्वांत अधिक प्रेम आपल्यावरच आहे. तिला धीर असतो कीं 'सर्वांचा हक्क संपल्यानंतर मगच शेवटचे क्षण आपणाला मिळणार' हें जरी खरें असलें, तरी प्रेमाचा मुख्य उमाळा आपल्यासाठींच राखून ठेविलेला आहे, आणि म्हणूनच इतरांनीं बराचसा वेळ घेतला आणि तो प्रथम घेतला तरी त्याचें तिला वैषम्य वाटत नाहीं. आणि नवराहि एकांतांत जेव्हां तिला भेटतो तेव्हां त्याला विश्वास असतो कीं आपलें वागणें पत्नीला समजल्यावांचून रहाणार नाहीं तरीहि तो सहज बोलून जातो, 'इतर लोक माझ्याजवळ आले तर येऊं देत बिचारे! त्यांचा विरस कां करा. त्यांच्या हें ध्यानींहि यावयाचें नाहीं कीं जरी ते जवळ असले आणि तूं जवळ नसलीस तरीहि त्यांच्यापेक्षां तूंच माझ्या हृदयाला अत्यंत जवळची आहेस.'

पुष्कळदां एखाद्या मंडळांत आपण जाऊन बसलों म्हणजे सर्वच लोक आपल्याशीं बोलत असतात. त्या मंडळांत ज्याच्याशीं आपले विशेष रहस्य असतें तोच केव्हां केव्हां संकोचानें आपल्याशीं बोलत नसतो. यामुळें आपल्याला ऐकावें लागतें इतरांचें, पण आपलें ध्यान व आकर्षण त्या प्रेमळ मित्राच्या न बोललेल्या वाणीकडेच असतें. त्याचें मौनच आपल्याला कितीतरी वक्तृत्वपूर्ण वाटत असतें. आणि कान जरी इतरांच्या वाणीकडे लागले असले तरी आपलें हृदय आपल्या मित्राच्या मूक वक्तृत्वानें बोलणाऱ्या डोळ्यांकडेच असतें. आपलें मूक हृदय त्या नीरव वाणीलाच चिकटून राहिलेलें असतें.

वडील भाऊ घरीं आला म्हणजे घरची सर्व मंडळी त्याच्याभोंवतीं जमतात. धाकटीं भावंडें त्याला नाना तऱ्हेचे प्रश्न विचारून अगदीं भंडावून सोडतात. त्या सर्वांची आई तेथें असूनदेखील कांहींच बोलत नाहीं आणि भाऊहि आपल्या भावंडांचा विरस करून असें नाहीं म्हणत कीं 'थांबा तुम्ही सगळे. मला प्रथम आईशीं बोलावयाचें आहे.' कारण त्याला ठाऊक असतें कीं भावंडांशीं गोडपणे बोलण्यांत आणि वागण्यांत तो आईशींच बोलत असतो आणि आईशींच वागत असतो. आणि आईलाहि आपल्या वडील मुलाच्या वागण्यांत जें कुटुंबप्रेम दिसून येतें त्यांतच स्वतःची धन्यता आणि कृतार्थता अनुभवण्यास मिळते.

एखाद्या कुटुंबांतील कर्त्या पुरुषाला वश करावयाचें असलें तर त्याची प्रत्यक्ष सेवा न करतां त्याच्या कुटुंबियांची जर मनापासून सेवा केली तर तो थोड्या श्रमानें आणि लवकर संतुष्ट होतो. गुरुभक्तीपेक्षां गुरुबंधुप्रेम हेंच पुष्कळदा गुरुप्रसादाला आणि हृदयाच्या उन्नतीला अधिक कारणीभूत होतें. हृदयतंत्र ज्यांना समजतें त्यांना या गोष्टी पटावयास वेळ लागत नाहीं. ज्यांना हृदयाची पारख नाहीं, त्यांना या गोष्टी सांगूनहि पटावयाच्या नाहींत. यासाठींच मुख्य साधना म्हणजे प्रथम हृदयशुद्धि आणि नंतर हृदयसिद्धि हीच असते. केव्हां केव्हां हृदयशुद्धि साधण्यासाठींच प्रथम हृदयसिद्धीची साधना करावी लागते. आणि सिद्धिद्वाराच शुद्धि साधून जाते. म्हणूनच उपनिषदकारांनीं म्हटलें आहे—'हृदय हाच अंतर्यामी आहे. तोच विश्वात्मा आणि परमात्मा होय. सत्य देखील हृदयाच्या द्वाराच प्राप्त करून घेतां येतें. (हृदयेन हि सत्यं जानाति।) जें कांहीं आहे तें हृदयच आहे.'

जारा काछे आछे तारा काछे थाक्,
तारा तो पारे ना जानिते
ताहादेर चेये तुमि काछे आछ
आमार हृदयखानिते ।

जारा कथा बले ताहारा बलुक,
आमि काहारे ओ करिना विमुख
तारा नाहि जाने – भरा आछे प्राण
तव अकथित बाणी तें ।
नीरवे नियत रयेछ आमार
नीरव हृदयखानिते ।

तोमार लागिया कारे ओ हे प्रभु,
पथ छेडे दिते बलिब ना कभु,
जत प्रेम आछे सब प्रेम मोरे
तोमा–पाने रबे टानिते ।
सकलेर प्रेम रबे तब प्रेम
आमार हृदयखानिते ।

सबार सहिते तोमार बाँधन
हेरि जेन सदा ए मोर साधन,
सबार संगे पारे जेन मने
तब आराधना आनिते ।
सबार मिलने तोमार मिलन
जागिबे हृदयखानिते ।

"जे कोणी माझ्याजवळ येतात त्यांना माझ्याजवळ येऊं द्या, राहूं द्या. त्यांना ओळखता येत नाहीं कीं माझ्या हृदयामध्यें त्यांच्यापेक्षां तूंच जवळ आहेस. माझी निष्ठा अभंगपणे तुलाच वाहिलेली आहे.

जे लोक पुढें पुढें होऊन माझ्याशीं बोलूं लागतात त्यांना बोलूं द्या. मी कुणालाच विमुख करीत नाहीं. त्यांना कुठें ठाऊक आहे कीं माझें हृदय आणि प्राण तुझ्या अकथित अव्यक्त वाणीनेच भरलेले आहेत. माझ्या नीरव हृदयांत निश्चितपणें तूंच कांहीं न बोलतां स्थान मिळविलें आहेस.

हे प्रभो, तुझ्यासाठीं मी कधींहि कोणाला म्हणणार नाहीं कीं जरा बाजूला होऊन वाट दे. तुला वाट कशास हवी आहे? जगांत जेथें कुठें प्रेम दिसतें, प्रेम वसतें तें सर्व प्रेम मला खेचून अचूक तुझ्याकडेच घेऊन येतें. सर्वांच्या प्रेमामध्यें शिरून तुझेंच प्रेम माझ्या हृदयांत पोंचतें आणि तेथें आपला अधिकार जमवितें.

तूं सर्वांशीं बांधला गेला आहेस. सर्वच तुझे आत्मीय आहेत; यामुळें जे कोणी मला बांधू इच्छितात ते आपल्या प्रयत्नानें मला तुझ्याशींच बांधतात. मी त्यांच्याशीं जो बांधला जातो, तो देखील तुझ्याशींच बांधला जातो हें मला दिसावें, पटावें, हीच माझी साधना आहे. लोकांशीं जो कांहीं संबंध येतो त्या संबंधांत आणि त्या संबंधाच्या द्वारा मला तुझीच आराधना करावयाची आहे हें माझ्या मनांत दृढपणे जागृत रहावें आणि सर्वांच्या मीलनामध्यें तुझें मीलनच माझ्या हृदयांत जागृत व्हावें हीच माझी अखंड साधना आहे."

११

# वादळांतील अखंड शांति

स्वामी विवेकानंदांनी एकदा श्रीकृष्णाचें चित्र कसें काढावें याची कल्पना दिली होती. अर्जुनाच्या रथाचे घोडे प्रचंड तुफान करूं पहात आहेत, हवे तसे नाचताहेत. त्यांना ताब्यांत आणण्यासाठीं चारी घोड्यांचे लगाम श्रीकृष्णाने डाव्या हातांत धरले आहेत. आणि आपल्या मांसल बाहूचे सर्व सामर्थ्य वापरुन घोड्यांना हवे तसे ते काबूत आणीत आहेत. पीतांबर आणि उत्तरीय यांच्यामधून हातपाय आणि शरीराचा जो इतर भाग उघडा दिसतो त्यावर प्रचंड शक्तीचा आविर्भाव दिसून येत आहे आणि चेहऱ्यावर मात्र त्या सर्व प्रयत्नाचा मागमूसहि नाहीं. चेहरा शांत, प्रसन्न आणि प्रसादयुक्त आहे. जणु काय घोडे, रथ, युद्ध आणि त्यांतील शक्तीचा संचार हें सर्व मुळी नाहीच. योगेश्वर श्रीकृष्णाचें सगळ्यांत चांगलें चित्र हेंच होईल यांत शंका नाहीं.

श्रीकृष्णाविषयाची महाभारतकाराची ही कल्पना उपनिषदांतून घेतली गेलेली आहे असें दिसतें. 'आत्मानं रथिनं विद्धि, शरीरं रथमेव तु । बुद्धिं तु सारथिं विद्धि, मन प्रग्रहमेवच । इंद्रियाणि हयान् आहुः, विषयाँस्तेषु गोचरान्……यस्तु विज्ञानवान् भवति युक्तेन मनसा सदा । तस्येन्द्रियाणि वश्याणि सदश्वा इव सारथेः ॥ (कठोप.)'

जी गोष्ट मनुष्याच्या जीवनांत आहे तीच गोष्ट या विश्वांतहि आहे. या विश्वामध्यें जीवनकलह चालू आहे. तुफान, वारे, जलप्रलय, भूकंप, मृत्यु, विनाश हीं सर्व प्रलय-तत्त्वें चालू असून देखील याच विश्वांत सर्वत्र एकप्रकारची चिरशांति, सामंजस्य आणि

मांगल्य अबाधितपणें नांदत असतात. आणि खुबी ही कीं या मांगल्याला प्रलय आणि विनाश यांच्यावर विजय मिळवावा लागत नाहीं तर प्रलय विनाशाचे अखंड तांडव जरी चाललें तरी तें या मांगल्याच्या सार्वभौम शान्तीला स्पर्शहि करूं शकत नाहीं. आकाशांतील ढगांनी कितीहि गडगडाट केला, पर्जन्यवृष्टि केली आणि आकाशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यन्त धुमाकूळ घातला आणि विजेच्या धोव्यानें जरी प्रकाशाचें जाळें विणून काढलें तरी आकाश आहे तसेंच शान्त, सुरक्षित, निर्लिप्त आणि सर्वसमर्थ राहतें आणि सूर्यनारायणाची प्रसन्नता यत्किंचितहि कमी होत नाहीं. त्याप्रमाणेंच या सर्व अशान्तिमध्यें सर्वसमर्थ सार्वभौम, शान्ति अबाधित राहत असते.

या गोष्टींचा ज्याला प्रत्यय आला त्यालाच जीवनरहस्य समजलें; एवढेंच नव्हे तर जीवनसिद्धिहि साधली.

आँधारे आवृत घन संशय
विश्व करिछे ग्रास,
तारि माझखाने संशयातीत
प्रत्यय करे बास ।

बाक्येर झड़, तर्केर धूलि,
अन्ध बुद्धि फिरेछे आकुलि,
प्रत्यय आछे आपनार माझे—
नाहि तार कोनो त्रास ।

संसारपथे शत संकट
घुरिछे घूर्णबाये,
तारि माझखाने अचला शान्ति
अमरतरुच्छाये ।

निन्दा ओ क्षति, मृत्यु विरह,
कत विषबाण उड़े अहरह—
स्थिर योगासने चिर-आनन्द,
ताहार नाहिको नाश ।

निबिड अंधःकारानें घेरलेला असा घन-संशय या विश्वाचा ग्रास करीत आहे आणि (इतकें असूनहि कालियाच्या डोक्यावर श्रीकृष्णानें उभें राहावें त्याप्रमाणें) या सर्वांमध्यें संशयातीत असा एक प्रत्यय वास करीत आहे.

या प्रत्ययाचा घात करण्यासाठीं वाचाळ वाक्यांच्या वक्तृतेची झड लागली आहे, तर्क सर्वत्र आपली धूळ उडवीत आहे आणि अंधबुद्धि व्याकुल होऊन वेड्यासारखी सर्वत्र धांवपळ करीत आहे. आणि तरीही या सर्व घोटाळ्यामध्यें आत्मविश्वासाचा प्रत्यय स्वतःच्या ठायीं शान्तपणें विराजमान आहे. त्याला कसलाच त्रास किंवा विक्षेप होत नाहीं !

या विश्वामध्यें संसाराच्या मार्गावर शंभर शंभर संकटें भयंकर वावटळींचें रूप धारण करून गिरक्या घेत आहेत आणि तेथेंच अमर तरूंच्या छायेमध्यें शांति, आपलें छत्र अबाधितपणें पसरून राहिली आहे. तिला कसलीच बाधा पोहोंचत नाहीं.

(मारानें बुद्ध भगवानावर आपल्या प्रचंड सेनेचीं दाही दळें घेऊन हल्ला करावा आणि त्या जिनेश्वरानें आपली शांति यत्किंचितहि ढळूं न देतां मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा यांचेंच वातावरण सर्वत्र पसरवावें त्याप्रमाणे निंदा, आळस, क्षति, मृत्यु आणि विरह यांचे कितीहि विषबाण एकसारखे उडत असले तरी चिर आनंद आत्मानंदाच्या योगासनावर अढळपणें विराजमान राहतो. त्याचा नाश होऊं शकतच नाहीं."

म्हणूनच आत्म्याला - ब्रह्माला सत्य म्हटलें आहे. आणि एवढी प्रचंड शक्ति प्रकट होते असून देखील जगाला आणि त्यांतील अद्भुत शक्ति-समुच्चयाला मिथ्या म्हटलें आहे. सच्चिदानंदत्वापुढें त्याचें कांहींच चालत नाहीं.

तत्र को मोहः कः शोकः पूर्णत्वम् अनुपश्यतः ।

क्रमांक ... नों० दि० ...

# १२

## तुझ्यातच माझें घर

प्रेमानें उचंबळणारा प्रभु सर्वव्यापी आहे हें केवळ बुद्धीला नव्हे तर सगळ्या शरीराला आणि इंद्रियांना पटल्यानंतर माझा वास त्याच्यांतच आहे हें निराळें पटायला नको. त्याचा अखंड आणि सतत साक्षात्कार होतच असणार. जगांत कुठेंहि असलों, वाटेल त्या दिशेनें गेलों तरी ईश्वराच्या बाहेर नसणारच, याची प्रतीति झाल्यानंतर सर्वत्र आनंदीआनंदच असणार.

वाट चुकलेला मनुष्य घराचा रस्ता शोधतो. अनेक रीतीनें तपास करतो. ज्याला त्याला विचारतो. पण जो घरांतच आहे, त्याला असली चिंता कुठून असणार ? आणि जेव्हां जगभर घरच असतें, घर नाहीं असा ठावच उरत नाहीं तेव्हां तर कधींही अस्वस्थ होण्याचें कारणच नाहीं. ईश्वराचें विभुत्व अनुभवत रहावयाचें आणि त्या आनंदांत मग्न किंवा तल्लीन रहावयाचें एवढेंच काम उरतें.

अशा अनुभवाची कल्पना करून भक्तकवि म्हणतो :- स्वच्छ ताजें टवटवीत कमळ आपल्या आन्तरिक आनंदानें सरोवराच्या प्रसन्न जलाच्या मांडीवर जसें फुलतें आणि त्याला मातीमध्यें लोळण घेऊन विचारावें लागत नाहीं कीं माझें घर कोठें आहे. त्याचप्रमाणें सहज आनंदानें हर्षित होऊन मी तुझ्यामध्यें निमग्नचित्त राहीन. आणि जेव्हां माझ्यामध्यें स्वात्मार्पण वृत्ति जागृत होईल तेव्हां माझें हृदय-कमल कसलीच शंका मनांत

न आणतां तुझ्या पूजेसाठीं आपोआप विकसित होत राहील.

मग "तूं कुठें आहेस ?" असें म्हणून तुझ्याकडे येण्याचा मार्ग मला शोधावा लागणार नाहीं. कुणा पथिकालाहि मी कांहीं विचारणार नाहीं. मी कुठेंहि चाललों, भटकत राहिलों आणि कोणच्याहि दिशेनें मी प्रयाण केलें तरी मी असणार तुझ्यांतच.

हें विशाल अनंत आकाश हेंच तुझें घर आहे. यांत जेव्हां मी स्वच्छंद विहार करूं लागेन तेव्हां तुझा आनंद-प्रवाह माझ्या शरीराला स्पर्श करील आणि सर्वत्र संचार करणारा वायुदेखील जीवश्च कंठश्च मित्राप्रमाणें माझ्या छातीला भिडून मला आलिंगन-सुख देईल.

सर्वकल्याणकारी सदाशिव भगवान सर्वत्र आहे, आपण त्याचे अंश आहोंत, आणि उत्कट अखंड भक्तिभावना स्थिर झाल्यामुळें आपल्या सर्व जीवन-व्यापारांनीं पूजेचें रूप धारण केलें आहे असा अनुभव आल्यानंतर शंकराचार्य म्हणतात, मी जें कांहीं चालतों, ती तुझी प्रदक्षिणाच आहे. जें कांहीं बोलतों तें तुझें स्तोत्र बनतें आणि जें म्हणून कांहीं कर्म करावें तें सर्व, हे परममंगल भगवंता, तुझी आराधनाच होते.

संचारः पादयोः प्रदक्षण-विधिः, स्तोत्राणि सर्वा गिरो; ।
यद्‌यत् कर्म करोमि तत्तद् अखिलं शंभो ! तवाराधनम् ।।

शिवमानसपूजेंतील या दोन ओळींची आठवण येथें झाल्यावांचून राह्यची नाहीं. आणि मग एकच भावना दोन महान् व्यक्ति निरनिराळ्या रीतीनें कशा व्यक्त करतात हें ध्यानांत आल्यावांचून कसें राहणार ?

अमल कमल सहजे जलेर कोले
आनन्द रहे फुटिया;
फिरिते ना हय 'आलय कोथाय' ब'ले
धुलाय धुलाय लुटिया ।

तेमनि सहजे आनन्दे हरषित
तोमार माझारे रब निमग्न-चित,
पूजाशतदल आपनि से बिकशित
सब संशय टुटिया ।

कोथा आछे तुमि पथ ना खुँजिब कभु,
शुधाब ना कोनो पथिके।
तोमारि माझारे भ्रमिब फिरिब प्रभु,
जखन फिरिब जे दिके।

चलिब जखन तोमार आकाश-गेहे
तब आनन्द-प्रवाह लागिबे देहे,
तोमार पवन सखार मतन स्नेहे
वक्षे आसिबे छुटिया।

१३

# तुझा गर्व कसा सोडूं ?

भारतांतील दरेक भाषेंत कित्येक संस्कृत शब्दांचा अर्थ पार बदलून जातो. (याचीं उदाहरणें आपण वेळोवेळीं टिपून ठेविलीं पाहिजेत.) संस्कृतमध्यें लोभ ही अनिष्ट प्रवृत्ति आहे. लोभाला षड्रिपूंपैकीं एक म्हटलें आहे. नरकाचें एक दार म्हटलें आहे. पण मराठींत प्रेम किंवा आत्मीयतेलाहि केव्हां केव्हां लोभ म्हणतात. 'लोभ असावा हे विनंति' असें पत्राच्या शेवटीं आपण लिहितों. 'महात्माजींचा माझ्यावर लोभ होता' असेंहि आपण म्हणतों.

चेष्टा म्हणजे प्रयत्न. संस्कृत, हिंदी, बंगाली ह्या तिन्ही भाषांत हाच अर्थ रूढ आहे. मराठींत मात्र चेष्टेचा अर्थ विनोद किंवा मस्करी असा होतो. मर्कटचेष्टेचा तो संक्षेप असावा.

मराठींत किंवा हिंदींत मगरूर शब्द चांगल्या अर्थानें येत नाहीं. आपण घमेंडखोराला मगरूर म्हणतों. गुजरातीमध्यें केव्हां केव्हां म्हणतात, "या कामीं थोर थोर व्यक्तींचा सहकार मला आहे याबद्दल मी मगरूर आहे." म्हणजे मला या गोष्टीचा अभिमान वाटतो.

राग म्हणजे क्रोध हा अर्थ मराठींत आणि बंगालींतच आहे. 'मला त्याचा राग आला,' 'तो मला रागें भरला,' हा अर्थ हिंदींत किंवा संस्कृतमध्यें नाहीं.

गर्व शब्दाचें असेंच आहे. आपण म्हणतों, 'गर्वाचें घर खालीं.' 'गर्विष्ठ मनुष्य कुणालाच आवडत नाहीं.' असें असलें तरी आपण कित्येक चांगल्या गोष्टींचा गर्व वहातों किंवा बाळगतो. गर्व म्हणजे अभिमान किंवा धन्यता.

या गीतांत रविबाबू म्हणतात, 'इतर सर्व गोष्टींचा गर्व मी सोडून देईन, पण तुझा गर्व मी सोडणार नाहीं.' येथें तुझा गर्व म्हणजे काय ? तूं मला आपला म्हटलेंस, तुझा कृपाकटाक्ष मला मिळाला, तुझ्याकडून प्रसाद मिळविण्याइतका मी भाग्यशाली झालों याचा अभिमान किंवा याची धन्यता मी कशी सोडावी ?

त्याच्यापुढें जाऊन कवि म्हणतो – तूं मला धन्य केल्यानंतर ती गोष्ट मी लपवून तरी कशी ठेवणार ? परीसाने लोखंडाला स्पर्श केला तर लोखंडाला ती गोष्ट लपवून ठेवतां येईल काय ? लोखंडाचें सोनें झाल्यानंतर त्यानें आपला सुवर्ण-वर्ष कसा आणि काय म्हणून लपवावा ?

बाह्य वस्तु सोडून देता येतात, लपविता येतात, त्यांची उपेक्षा करता येते, पण आंतरिक परिवर्तनाची धन्यता कशी लपणार ? पति प्रवासाला गेला म्हणून मळूल झालेल्या एकवेणीधरा पतिव्रतेला बारा वर्षांनीं पतीची भेट झाली. आतां तिचा उल्हास तिला लपवून ठेवतां येईल का ? कालपर्यंत जिचे गाल पांढरे फटफटीत होते त्यांच्यावर आतां गुलाबाची छटा चमकूं लागली. ती तिला धुवून काढता येईल का ? रविबाबू म्हणतात – तुझ्याकडून जेव्हां आमंत्रण येईल तेव्हां ती गोष्ट मी लपवूं कशी शकेन ? माझ्या प्रत्येक वाक्यांत, माझ्या सर्व कर्मांमध्यें माझ्या हातून घडणारी तुझी आराधना प्रगट झाल्यावांचून रहाणार नाहीं.

निरनिराळ्या कामांमुळे, सेवेमुळे, जे कांहीं मानपान मला मिळाले असतील ते सर्व त्या दिवशीं आपोआप गळून पडतील. मला त्यांची उपेक्षाहि करता येईल. पण जेव्हां माझ्या भक्तीनें प्रसन्न होऊन तूं मला जवळ करशील तेव्हां ती धन्यता मला सोडूनहि देतां यायची नाहीं, आणि लपवताहि यावयाची नाहीं. त्या धन्यतेला जर मी दटावून म्हटलें – 'चूप बस', तर ती थोडेच माझें ऐकणार ? माझ्या देहांतून आणि मनांतून गोड आवाजानें ती झंकार करूं लागेल आणि मग या भवसंसाराच्या खिडकींत मी अन्यमना होऊन आपल्याच तंद्रींत बसलों असलों तरीहि माझ्या चेहऱ्यावर उमटलेल्या भावामध्ये रस्त्यावरचा अनोळखी वाटसरू देखील तुझ्या कृपाप्रसादाची गोष्ट पाहूं शकेल, ओळखूं शकेल. इतर सर्व गर्व आणि अभिमान मला दूर करतां येतील. तुझ्या कृपाप्रसादाने जी धन्यता माझ्या जीवनांत उमटेल ती मला सोडतां किंवा लपवतां येणार नाहीं.

आणि तशी इच्छाहि काय म्हणून व्हावी? जेव्हां तुझ्या पायाच्या धुळीचा एखादा कण देखील मला प्राप्त होईल, त्या दिवशी सगळ्या लोकांना बोलावून मी सांगत सुटेन कीं मी धन्य झालों, मी धन्य झालों. त्रिवार मी धन्य झालों. तो गर्व मी कधी सोडणार नाही.

सकल गर्व दूर करि दिब,
तोमार गर्व छांडिब ना।
सबारे डाकिया कहिब, जे दिन
पाब तब पद-रेणु-कणा।

तब आह्वान आसिबे जखन
से कथा केमने करिब गोपन।
सकल वाक्ये सकल कर्मे
प्रकाशिबे तब आराधना।

सकल गर्व दूर करि दिब,
तोमारा गर्व छाड़िब ना।

जत मान आमि पेयेछि जे काजे
से दिन सकलि जाबे दूरे।
शुधु तब मान देहे मने मोर
बाजिया उठिबे एक सुरे।

पथेर पथिक सेओ देख जाबे
तोमार वारता मोर मुखभावे
भव-संसार-वातायन-तले
बसे रब जबे आनमना।

सकल गर्व दूर करि दिब,
तोमार गर्ब छाडिब ना।

१४

# पूर्णा घरीं निर्भयता

ईश्वर असीम, अनन्त, सर्वव्यापी आहे. त्यामुळें त्याच्या जगांत आपले प्राण आणि मन घेऊन कोठेंहि जा, कितीहि दूर जा, ईश्वरापासून आपण दूर जात नाहीं. आपण त्याच्या अगदीं जवळच असतों. ही साधना जर जागृत राहिली तर वियोग, दुःख, मृत्यु आपल्याला दिसणार देखील नाहींत.

जेव्हां तुला विसरून, तुझ्यापासून दूर होऊन, अलग नि स्वतंत्र होऊन मी स्वतःकडे पाहूं लागतों तेव्हांच मृत्यु मृत्यूचें रूप धारण करतो आणि दुःख, दुःखाचा कूप किंवा गर्त बनतें. ईश्वराला विसरणें हेंच सर्व दुःखाचें मूळ आहे. विपद् विस्मरणं विष्णोः।

जर आपण आपलें व्यक्तित्व सोडून विराट पुरुषाकडे पाहूं लागलो तर आपणाला भूमाचें दर्शन होईल. विश्वरूपाची संपूर्णता ध्यानीं येईल. मग दुःख, शोक, हानि, मृत्यु हीं सर्व आपोआप अन्तर्धान पावतील.

आपण जेव्हां मरून नवीन जन्म धारण करतों तेव्हां जुन्या जन्मांतील सोयरेधायरे आपल्या वियोगामुळें रडून आकान्त करतात आणि नव्या जन्मांतील आईबाप, बहीणभाऊ आनंदानें उत्सव करतात कीं आपल्या पोटीं, आपल्या घरीं कसें गोंडस, बाळसेदार बालक अवतरलें आहे! जर दोन्ही जन्माचा एकाच वेळीं आपल्याला साक्षात्कार होईल तर त्या घडलेल्या मरणाचा आपण आकान्तहि करणार नाहीं आणि नव्या जन्माचा उत्सवहि करणार



मराठी
ग्रा. क्र.

नाहीं. एका खिशांतील पैसे काढून आपण दुसऱ्या खिशांत ठेवले तर त्यांत लाभहानि कांहींच नाहीं हें आपल्याला ठाऊक असतें व त्यामुळे आपण हर्षशोकाच्या पर असतों. पूर्णेश्वराचें दर्शन आणि सान्निध्य लाभल्यानंतर सुखदुःख, लाभहानि कांहींच उरत नाहींत.

आणि भयाला तर अवकाशच नसतो. तें तर आपण आपल्या संकुचित, एकांगी अदूर दृष्टीनेच उत्पन्न केलेलें असतें. आपल्या जीवनांत भगवंताचें स्वरूप जर आपण जागृत ठेवूं शकलों तर हृदयांतील ग्लानि आणि संसाराचा भार ही एका क्षणांत दूर होणारच.

वरील उदाहरणांत एका खिशांतील पैसे दुसऱ्या खिशांत गेल्याबद्दल एका खिशानें शोक करणें आणि दुसऱ्या खिशानें आनंद मानणें योग्य आहे असें म्हणता येईल. पण दोन्ही खिसे बाळगणाऱ्या डगल्याला व डगल्यांतील पैशाच्या मालकाला त्याचें काय होय? विश्वेश्वराच्या दृष्टीनें जर आपल्याला विचार करता आला तर लाभहानि, जन्ममृत्यू, विरहविच्छेद हे सर्व अर्थविहीन होतात. त्या परिपूर्णाच्या चरणीं सर्व कांहीं आहे, सदोदित आहे, अखंड आहे; तेथें नाहीं फक्त कसलेंच भय. त्या परिपूर्णाला विसरून जेव्हां आपण एकांगी बनून एकाच बाजूचा, तीच कायती आपली समजून विचार करतों तेव्हांच लाभहानीची कल्पना आपल्याला बाधते आणि मग आपणच निर्माण केलेलें भय आपल्यामागें लागतें. जर आपल्याला आपल्या जीवनांत सर्वेश्वराच्या, परिपूर्णाच्या स्वरूपाचें स्मरण ठेवतां आलें तर हृदयांत कधीं ग्लानि शिरावयाची नाहीं. आणि डोक्याला कधीं संसाराचा भारही वाटावयाचा नाहीं. भेद मिटून एका क्षणांत सर्व कांहीं एकाकार होऊन जाईल.

सर्व तोच आहे, आपण त्याचेच अंश किंवा कुटुंबी आहोंत, अर्थात् आपण विश्व-कुटुंबी आहोंत एवढें जर ध्यानांत राहील तर दुःख, मृत्यु, विरहविच्छेद कांहींच उरणार नाहीं.

तोमार असीमे प्राणमन लये
जत दूर आमि जाअि
कोथाओ दुःख, कोथाओ मृत्यु,
कोथा विच्छेद नाअि।

मृत्यु से धरे मृत्युर रूप,
दुःख से हय दुःखेर कूप,
तोमा हते जबे स्वतंत्र हये
आपना पाने चाअि ।

हे पूर्ण, तव चरणेर काछे
जाहा-किछु सब आछे आछे आछे
नाअि नाअि भय, से शुधु आमारि,
निशिदिन कादि ताअि ।

अंतरग्लानि संसारभार
पलक फेलिते कोथा अेकाकार
तोमार स्वरूप जीवनेर माझे
राखिबारे जदि पाअि ।

१५

# पहाटेनंतर दीप कशाला ?

ब्रह्मसाक्षात्कार झालेल्या मनुष्याचें वर्णन करीत असतां गीतेंत म्हटलें आहे 'यावान् अर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके । तावान् सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥' (२-४६) मुसळधार पाऊस होऊन सर्वत्र पाणीच पाणी होऊन गेल्यानंतर मनुष्याला हौदाची, विहिरीची किंवा तळ्याची आवश्यकताच उरत नाहीं. कोरडा दुष्काळ असेल तेव्हांच भयंकर तहान लागते आणि लहानसान जलाशय असले तरी त्यांची मोठी महती वाटते. सर्वत्र पाणीच पाणी झाल्यानंतर पाणी कुठें मिळेल असा शोधहि करावा लागत नाहीं आणि तहानच न उरल्यामुळें पाण्यासाठीं धडपडावेंही लागत नाहीं. अन्तर्बाह्य तृप्ति झाल्यानंतर कसलाहि प्रयत्न करण्याचें कारण उरत नाहीं.

कवि म्हणतो, 'कोण जाणे कुठून आणि केव्हांपासून रवीच्या किरणांनीं माझ्या खोलींत घुसून प्रभात करून टाकली आहे. माझें दार मीं उघडलें नव्हतें म्हणून मला त्याची बातमी नव्हती. रात्रीं घरांत अंधार पसरला होता म्हणून मीं जिकडे तिकडे पणत्या पेठवल्या होत्या. पण त्या आतां कशाला हव्या आहेत? दरवाजा उघडा आणि पणत्यांचे दिवे सगळे मालवून टाका. आतां या पणत्यांतील दिव्यांची कांहीं आवश्यकता राहिली नाहीं. मातीच्या पणत्या जाईनात का मातींत मिसळून. सगळे जग सूर्यप्रकाशानें प्रकाशित झाल्यानंतर पणत्या पाजळण्याचा खटाटोप कोण करील?

त्याचप्रमाणें जेव्हां कोठूनहि संगीत ऐकूं येत नव्हतें तेव्हां बऱ्याचशा तारा तुटलेली वीणा घेऊन मनाचा विरंगुळा म्हणून तींतूनच कांहीं आलाप काढीत होतो. आतां त्याची आवश्यकता उरली नाहीं. आता वीणा बाजूला ठेवून घराच्या बाहेर पहांटेच्या नीरव शांतीमधें मी उभा राहीन. कारण ऐका, बाहेरचें सर्व आकाश, सर्व प्रकाश आणि सर्व वारे तुझ्या सेवेस हजर राहून आपल्या विराट कंठानें संगीताचा प्रवाह सोडूं लागले आहेत. ते ऐकण्याचें सोडून छिन्न वीणेंतून सूर काढण्याचा प्रयत्न कोण करील ? आतां अंधकाराशीं झुंजत राहणारा तो पणतीचा प्रकाशहि नको आणि एकतारा बनलेल्या वीणेचें संगीतहि नको. कारण सूर्याचा विश्वव्यापी प्रकाश आणि पंचमहाभूतांचें विराट संगीत यांचा लाभ मला आतां झाला आहे.

जोवर विराट जीवनाचा साक्षात्कार झाला नव्हता आणि ईश्वराच्या विश्वरूपाचें दर्शन घडलें नव्हतें तोंवर परमकारुणिक ऋषिमुनींनीं आणि संतमहतांनीं धर्मकार बनून आपापल्या परी आसपासच्या लोकांना पटेल असा धर्मोपदेश केला आणि त्यांच्यांत धर्मजागृति आणली. या निरनिराळ्या धर्मांनीं आपापल्या पणतींतून प्रकाशहि दिला आणि काजळहि ओकलें.

* * *

आतां आपल्याला सर्वच धर्मांची माहिती झाली आहे. त्यांनीं केलेली उत्तम सेवा आपण आज समजूं शकतो. हे धर्म आपापसांत निष्कारण भांडले, याची आपल्याला ग्लानीहि वाटते. आतां आपण निरनिराळ्या धर्मांतून प्रकट होणारी खरीखुरी धार्मिकता ओळखूं शकतों. आतां धर्मसंस्थापकांचें काम संपलें. आतां सर्व धर्मांचें अंतिम ध्येय आणि प्रासव्य असा जो परमात्मा तो स्वतःच सर्वांच्या हृदयांत शिरून धार्मिकतेची प्रेरणा देऊं लागला आहे. आतां माणसानें प्रचार करण्याचें सोडून देऊन नम्रपणें, पण व्यापकपणें आपला आचारच सुधारावयाचा आहे. विश्वप्रकाश आणि विश्वसंगीत हीच आतां आपली प्रेरणा आहे. आतां आपण विश्वधर्माचा जयजयकार सर्वत्र दुमदुमलेला ऐकूं.

आंधार आसिते रजनीर दीप
ज्वेलेछिनु जतगुलि—
निबाओ रे मन, आजि से निबाओ
सकल दुयार खुलि।

आजि मोर घरे जानि ना कखन
प्रभात करेछे रबिर किरण,
माटिर प्रदीपे नाअि प्रयोजन.
धुलाय होक से धुलि।
निबाओ रे मन, रजनीर दीप
सकल दुयार खुलि।

राखो राखो, आज तुलियो ना सुर
छिन्न बीणार तारे।
नीरबे रे मन, दाँड़ाओ आसिया
आपन बाहिर-द्वारे

शुन आजि प्राते सकल आकाश,
सकल आलोक, सकल बातास
तोमार हअिया गाहे संगीत
विराट कण्ठ तुलि।
निबाओ निबाओ रजनीर दीप
सकल दुयार खुलि।

"अंधार पडला असतां मी जे रजनीचे दीप पेटविले होते ते आतां माझ्या मना, सगळे दरवाजे खोलून विझवून टाक. कारण कोण जाणे रविकिरणांनीं केव्हां माझ्या खोलींत शिरून पहाट करून टाकली आहे. आतां मला पणतीच्या दिव्याची आवश्यकता उरली नाहीं. मातीची पणती मातींत मिळून जाऊं दे. हे माझ्या मना, सर्व दरवाजे उघडून रात्रीचे हे दिवे विझवून टाक.

राहूं दे, राहूं दे! छिन्न वीणेच्या उरलेल्या तारांतून आतां स्वर काढूं नको. हे माझ्या मना, आपल्या उजदारीं येऊन स्तब्धपणें उभा रहा आणि ऐक. आज सकाळीं सगळें आकाश, सर्व प्रकाश, आणि इतस्ततः धावणारे सर्व वारे तुझे बनून आपल्या विराट कंठानें संगीत छेडूं लागले आहेत.

विझवून टाक. मालवून टाक. हे माझ्या मना, सर्व दरवाजे उघडून रात्रीचे दिवे मालवून टाक."

१६

# दर्शन - दीक्षेचा अमृत - सिद्धियोग

शौर्याची केवळ कल्पना किंवा वल्गना केल्यानें शौर्य अंगीं येत नसतें. दानाची कल्पना केल्यानें दातृत्व स्फुरत नसतें. कल्पनेचें केवळ ध्यान केल्यानें नव्यानव्या कल्पना फवारत नसतात. या उत्तम गोष्टी ज्यानें जीवनांत सिद्ध केल्या आहेत अशा एखाद्या समर्थ पुरुषाला पाहिल्यानेंच त्या त्या गुणाची प्रथम शक्यता पटूं लागते, पुढें त्याची गोडी उत्पन्न होते आणि शेवटीं दीक्षा मिळते. व्यक्तीसाठीं असो किंवा समाजासाठीं असो, आदर्श तयार करण्याचें काम समर्थ लोकांचेंच असतें. एकानें असाधारण प्रताप साधून एखादें अचाट कृत्य करून दाखविलें म्हणजे दुसऱ्यालाहि हुरूप येतो. 'त्याला साधलें तें मला कां साधूं नये, ?'अशा विचारानें, आस्तिक विश्वासानें दुसराहि हिंमत बांधतो आणि प्रयत्न करून पाहतो. यासाठीं केव्हां तरी एखाद्या शौर्य-पराक्रमाचें दर्शन घडलें पाहिजे. एक मनुष्य सर्वस्व अर्पण करून अर्पणानंदांत मस्त होत असला तर तो प्रसंग प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहून ज्यानें दर्शनानंद मिळविला तो कधीं ना कधीं दानशूर व्हावयाचाच. उत्कट विभूतीचें दर्शन आजवर कधींहि व्यर्थ गेलें नाही. प्रत्यक्ष दर्शनाची दीक्षा अमोघ असते. संतसंकीर्तन पावन खरें, पण संतदर्शन त्याहून अधिक सामर्थ्यशाली असतें. म्हणूनच दर्शनाला दीक्षा-समर्थ म्हटलें पाहिजे.

पर्वतामधून आणि कांतारामधून, रणांतून आणि दलदलींतून वाट काढत शेकडो मैलांचा प्रवास करून आणि पावलोपावलीं पुष्टि आणि समृद्धि मिळवीत मिळवीत नदी जेव्हां शेवटीं समुद्राला मिळते, तेव्हां तिचा स्वात्मार्पणाचा, 'नामरूपे विहाय' समुद्रांत विलीन होण्याचा, उन्माद पाहून घ्यावा! त्या नदीला मागें राखून असें कांहींच ठेवावयाचें नसतें. उगमापासून मुखापर्यंतची चिरसाधना आज संपूर्ण झाली. सागराचें दर्शन घडलें. अंतराय कोणताच उरला नाहीं. आतां आपण होऊन आपल्याच आंतरिक वेगानें सागराशीं सायुज्य-मुक्ति मिळवावयाची आहे. समुद्र नको नको म्हणेल. लाटांनी दूर सारण्याचा, रेटून परतावण्याचा थोडासा प्रयत्नहि करील. पण तें सर्व मीलनाची मधुरता वाढविण्यासाठींच असते. येथें समुद्र सायुज्यमुक्ति देत नसतो, नदी आपण होऊन घेत असते. सर्वस्व अर्पण करून सायुज्यमुक्तीचें हें निर्वाण मिळवायचें असतें.

समुद्रकांठीं उभें राहून किंवा जवळच्या एका टेकडीवर आरोहण करून ज्यानें सरिता-सागर-संगम पाहिला आहे, हें धन्य भाग्य ज्याला लाभलें आहे त्याच्या हृदयांत जर हृदय असलें तर त्या क्षणापासून तो नवीनच मनुष्य व्हावयाचा.

भक्तीहि आपल्या जीवन-साधनेच्या द्वारा आपली जीवनसमृद्धि वाढवीत असतो आणि ती जशी वाढेल तसा त्याचा जीवनवेगहि वाढत असतो. पुढें जसजसें त्याला विराट जीवनाचें दर्शन घडतें तसतसें त्याला वेगळें राहणें आवडत नाहीं, असह्य होतें आणि मग तो आपल्या सर्व जीवनसमृद्धिनिशी स्वतःला जीवनसागरांत लोटून देतो. प्रभूच्या चरणीं भक्त जेव्हां आपलें जीवन-सर्वस्व अर्पण करतो तेव्हां तो धन्य प्रसंग पाहून कृतार्थ होण्यासाठीं ग्रहनक्षत्र तारेहि धावून येतात. असल्या या पूर्णोदयाची संधि साधून प्रत्येक साधकाने अशा प्रसंगाचें दर्शन घेतलें पाहिजे. आणि संगमाच्या तीर्थावर स्नान करून आपल्या हृदयांतील सर्व दीनता, सर्व हीनता आणि सर्व अल्पता धुवून काढली पाहिजे. ज्याप्रमाणें तीर्थस्थानीं जाऊन तेथील सत्पुरुषांना नमस्कार करून त्यांचा वरदहस्त आपण आपल्या डोक्यावर घेतों त्याप्रमाणें ह्या मीलनाचा प्रकाश-किरण आपल्या कपाळावर पडूं दिला पाहिजे. आणि चिर-शांति-सागर परमात्म्याची ती विशालता आणि साधना-वीर भक्ताची ती विश्वजित् वृत्ति या दोहोंच्या संगमस्थानीं उभें राहून मनुष्यानें आपल्या सर्व वासना शांत करून टाकल्या पाहिजेत. असें हें पुण्यपर्व महत् भाग्यानेंच मिळत असतें. त्याचा पुरा पुरा उपयोग करून कृतार्थ झालें पाहिजे.

भक्त करिछे प्रभुर चरणे
जीवन-समर्पण—
ओरे दीन, तुइ जोडकर करि
कर् ताहा दरशन।

मिलनेर धारा पडितेछे झरि,
बहिया जेतेछे अमृतलहरी
भूतले माथाटि राखिया लहो रे
शुभाशिस्—बरिषन।
भक्त करिले प्रभुर चरणे
जीवन सर्मपण।

ओइ—जे आलोके पडे छे ताँहार
उदार ललाट देशे,
सेथा हते तारि एकटि रश्मि
पडुक माथाय एसे।

चारि दिके ताँर शांतिसागर
स्थिर हये आछे भरि चराचर,
क्षणकाल—तरे दाँड़ाओ रे तीरे,
शान्त करो रे मन।
भक्त करिछे प्रभुर चरणे
जीवन समर्पण।

"भक्त प्रभुचरणीं आपलें जीवन समर्पण करीत आहे. अरे पामरा, आपले दोन्ही हात जोडून त्या दिव्य प्रसंगाचें दर्शन कर.

दानोदक सुटावें त्याप्रमाणें मीलनाची धारा अमृतलहरींनीं वाहू लागली आहे. जमिनीवर डोकें टेकवून शुभ आशीर्वादाचा वर्षाव ग्रहण करण्याची ही संधी आहे. येथें नम्र हो.

भक्ताच्या विशाल भालप्रदेशीं धन्यतेचा तो प्रकाश पडत आहे. त्यांतून परावृत्त होऊन एखादा किरण तुझ्या डोक्यावर पडो. या आत्मार्पण प्रसंगीं त्याच्या सर्व बाजूनें शांतिसागर सर्व चराचर भरून स्थिर झाला आहे. त्या शांतिसागराच्या किनाऱ्यावर क्षणभर उभा राहून आपलें चित्त शांत कर. वासनांची भगभग नष्ट कर. तुझें कल्याण होईल.

पहा तो भक्त प्रभुचरणीं आपलें जीवन समर्पण करीत आहे."

१७

# "तबे" नाहि क्षय

'अनंत हस्तें कमलावरानें देतां किती घेशिल दो करानें' या शब्दांत कवीनें एक नित्याचा अनुभव आणि त्याबरोबर वाटणारी तळमळ व्यक्त केली आहे. देणारा सर्वस्व द्यायला तयार आहे. तो अनंत करांनीं देतो, पण आपल्याजवळ घ्यायला दोनच कर आहेत, आणि तेहि फाटके. तेव्हां आपणच दुर्भागी असा अनुभव आल्यानंतर काय करावें हें सुचत नाहीं. एक उर्दू भक्त म्हणतो – 'मेरी ही झोली तंग है, तेरे यहाँ कमी नहीं.' माझी झोळीच लहानशी तींत मावणार किती? तूं तर यथेच्छ ओतलेंस. तुझ्या घरीं कसलीच कमतरता नाहीं. झोळींत जें न मावलें तें फुकट गेलें याचीच चुटपुट राहिली. याला उपाय काय?

नदीच्या तीरांनीं लोभ करून नदीचें पाणी अडवून ठेवण्याचा प्रयत्न केला. पण नदी थोडीच अडकून राहाणार? दोन तीरांनीं पाणी बांधण्याचा, अडवून धरण्याचा प्रयत्न केला म्हणूनच नदीच्या पाण्याचा वाहण्याचा वेग वाढला आणि तें मोठ्या उत्साहानें समुद्राकडे धावूं लागलें. पाणी आडवतां आलें नाहीं.

याला इलाज काय? इलाज एकच. नदीचें सगळें पाणी सांठवून ठेवण्याची शक्ति तीरामध्यें नसून नदीपति समुद्राची आहे. समुद्रांत, त्या महासागरांत नदीचें सगळें पाणी, थेंबन् थेंब सगळें पाणी सुरक्षित असणार. तेव्हां आपण लहानसें कोठार सोडून तें सर्वांत

मोठें कोठारच आपलें कां करूं नये? देवाने दिलें ते दोन हातांत घ्याच कां? जेथें आहे तेथें तें आपलेंच आहे, सुरक्षित आहे एवढें समजलें तर चिंता उरणार नाहीं. खांद्यावर लहानशी झोळी घेऊन फिरलों म्हणूनच आपण भिकारी ठरलों. जेवढें हातांत मावलें तेवढेंच आपलें असें मानलें म्हणूनच बाकीचें घालवल्याची हाय हाय वाटूं लागली. झोळीच्या बाहेर पडलें तें सांडलें असें मानून आपण हळहळलों. नदीच्या प्रवाहाला अडवायला गेलो तेव्हां त्यानें छातीवर आघात करून धूम ठोकली. याच्या ऐवजी देवा जर सर्व कांहीं संभाळण्यासाठीं, तुझ्याकडे सोपवून दिलें तर कोणत्याच गोष्टीला गळती लागणार नाहीं. कशाचाहि क्षय होणार नाहीं. उलट तुझ्या हातीं सर्व कांहीं जिवंत जागतें राहील.

तुझ्या या अनंत विश्वांत असंख्य रविशशी व नक्षत्रतारे आहेत. त्यांतील एक परमाणुदेखील नष्ट होत नाहीं, सांडला जात नाहीं. जें माझें क्षुद्र धन मीं सांडलें असे मानलें तें तुझ्या चरणीं सुरक्षितच आहे. जें थोडेसें हातीं घेऊं शकलों तेवढेंच माझें म्हटलें हीच चूक झाली.

अल्प लइया थाकि, ताइ मोर
जाहा जाय ताहा जाय!
कणाटुकु जदि हाराय ता लये
प्राण करे हाय-हाय।

नदीतटसम केवलि वृथाइ
प्रवाह आँकडि राखिबार चाइ,
एके एके बुके आघात करिया
ढेउगुलि कोथा धाय।
अल्प लइया थाकि, ताइ मोर
जाहा जाय ताहा जाय।

जाहा जाय आर जाहा-किछु थाके
सब जदि दिइ सँपिया तोमाके
तबे नाहि क्षय, सबइ जेगे रय
तव महा महिमाय।

तोमाते रयेछे कत शशी भानु,
कभु ना हाराय अणु परमाणु,
आमार क्षुद्र हाराधनगुलि
रबे ना कि तब पाय !
अल्प लइया थाकि, ताइ मोर
जाहा जाय ताहा जाय !

"जें थोडेंसें घेऊं शकलों तेवढेंच माझें, बाकीचें जें गेलें तें गेलें, असें मीं मानलें. त्यामुळें एक कणदेखील जर सांडला तर त्याच्यासाठीं प्राण हायहाय करून तळमळतो.

नदीच्या तीराप्रमाणें प्रवाहाला रोखून धरण्याचा मीं व्यर्थ प्रयत्न चालविला, परंतु वरून येणारा प्रत्येक तरंग छातीवर आघात करून निसटून जातो आणि माझी फजिती होते.

याऐवजीं जर जें कांहीं निसटून जातें आणि जें राहातें तें सगळेंच जर मी तुला सोंपवून दिलें तर त्याचा क्षय होणार नाहीं. सगळेंच तुझ्या महामहिम्याच्या आंत जिवंतपणें सुरक्षित राहील.

तुझ्यामध्यें न जाणो कितीतरी चंद्रसूर्य विद्यमान आहेत. त्यांतील एक परमाणुदेखील सांडला जात नाहीं. तर मग माझें जें क्षुद्र धन मीं सांडलें तें तुझ्या चरणीं सुरक्षित नसणार का ? मला थोडेंसेंच धरून ठेवतां येतें तेवढेंच मी माझें समजतों. म्हणून जें निसटलें तें गेलें असें समजून मी हळहळतों."

१८

# मृत्यूच्या दूताचें स्वागत

काव्यामधें विलापिकेला महत्त्वाचें स्थान आहे. सर्व रसांमधें हृदयाला पिरगळून सोडणारा करुण रसच श्रेष्ठ आहे. कारण कारुण्यानें मार्दव उत्पन्न झालेल्या हृदयांत सर्व प्रकारच्या उच्च भावनांचें बीजारोपण होत असते. महाभारतात याचसाठीं युद्धान्तीं एक स्वतंत्र स्त्रीपर्व या करुण रसाला अर्पण केलें आहे. रघुवशांतील अजविलाप आणि भामिनीविलासांतील करुण विलाप यांनीं रसिकाला नेहमींच चटका लावला आहे. भवभूतीच्या उत्तररामचरित्रांतील करुण रस इतका कांहीं उत्कट आहे कीं आपल्यालाहि वाटू लागते—अपि ग्रावा रोदित्यपि दलति वज्रस्य हृदयम् ।

विलापिकेमध्यें केव्हां केव्हां असे विचित्र भाव व्यक्त केले जातात कीं जे आजच्या अभिरुचीला कसेसेच वाटतात. शोक करणारा मनुष्य मृत व्यक्तीला उद्देशून म्हणतो, ‘आजवर तूं कधींच कठोरता दाखाविली नव्हतीस. माझ्यापासून दूर होणे तुला क्षणभराहि सहन होत नव्हतें मग आतांच हा कठोरपणा कां केला ? माझ्या हातून कोणता अपराध घडला होता ? कां तुझ्यामधेंच हें एकाएकीं परिवर्तन झालें आहे ? पुष्कळ अंत पाहिलास. इतकी कठोरता तुला शोभत नाहीं’ वैगेरे वैगेरे. मृत व्यक्तीनें जाणून बुजून मरण पसंत केलें असेल अथवा आत्महत्या केली असेल तर वरील म्हणणें शोभेल; पण ज्या व्यक्तीचा एकाएकी खून झाला आहे किंवा जी व्यक्ति अपघातानें पाण्यांत पडून किंवा अन्य रीतीनें

मृत्यु पावली आहे तिला उद्देशून असा विलाप चालला असतांना कसेसेंच वाटणें स्वाभाविक आहे. अशा ठिकाणीं औचित्याचा भंग आणि रसाची हानि स्पष्टपणें दिसत असतात.

याहून दुसरा एक प्रकार दृष्टीस पडतो तो असतो अत्यंत स्वाभाविक. त्या शोकांतील वृत्ति ही सार्वत्रिक दिसून येते. पण त्या वृत्तीचें अभिनंदन करणें कठीण असतें.

प्रिय व्यक्तीचें मरण पाहून किंवा ऐकून दुःख करीत असतांना दैवाला किंवा देवाला कठोर, निर्घृण किंवा घातकी म्हणणें हे अगदीं स्वाभाविक आहे. कांहीं प्रेमीजन याच्यापुढें जाऊन म्हणूं लागतात. "या जगांत ईश्वर खरोखर असेल काय आणि असला तर तो असा निष्ठुर कसा? असें जें म्हटलें जातें कि 'या विश्वांत नीतिनियम आहे, मांगल्याचें साम्राज्य आहे' ती गोष्ट खरी असेल काय? कां मनुष्यानें स्वतःच्या आश्वासनासाठीं हें एक थोतांडच उभें केलें आहे?" अशी अश्रद्धा दुःखावेगामध्यें उत्पन्न झाली आणि तिनें विवेकबुद्धि घेरून टाकली तर मुळींच आश्चर्य नाहीं. पण जेव्हां मनुष्य दुःखावेग ओसरल्यानंतर शांतपणें दुःखाचा रवंथ करूं लागतो तेव्हांच त्याला काव्य सुचतें आणि म्हणून करुण काव्यांतून आस्तिकता जर विशुद्ध होऊन उद्दीपित झाली तरच तें करुण काव्य शोभतें. टनिसनचें In Memorium (इन मेमोरियम) यामुळेंच रसिकांमध्यें आदराला प्राप्त झालें आहे. नरसिंहराव दिवेटिया यांची 'स्मरण संहिता' टेनिसनच्या प्रेरणेनेंच उत्पन्न झालेली सुभग कृति आहे. पण ह्या दोन्ही काव्यांमधें विलापामधून चिंतन परिणत होतें आणि त्यांतून तत्त्वज्ञानाचे झरे फुटूं लागतात. या गोष्टीचा अतिरेक कवि खबरदारच्या दर्शनिकेमधें झाला आहे. पण तेथें आपल्या काव्याला करुण काव्याचें रूप न देतां केवळ प्रारंभींच त्यानें आपल्या प्रिय पुत्राच्या विरहाची विलापिका आटपून घेतली आहे. यामुळें कोठेंहि विरस होत नाहीं.

या सर्व काव्यांचें स्मरण होण्याला कारणीभूत रविबाबूंचें हें लहानसें नितान्त कषायमधुर गीत आहे. येथें दुःखावेग, नम्रता, आस्तिकता, या सर्वांचें उत्तम रसायन साधलें आहे. आणि त्यामुळें हें अगदीं लहानसें गीत दीर्घकालपर्यंत मनुष्याच्या हृदयाला चटका लावतें, चित्ताला आणि आस्तिक बुद्धीला अंतर्मुख करतें आणि आत्मौपम्य बुद्धीला असाधारण पोषण देतें.

जीवनसंगिनी सहधर्मिणी रुग्णशय्येवर पडली आहे. अंतिम क्षण जवळ येऊन ठेपला आहे. अशावेळीं आतां ही हातची जाणार, कायमचा वियोग आतां अखंड सहन करावा

लागणार या भावनेमुळें हृदय कातर झालें आहे. पण दुःखाचा आवेग आस्तिक्तेला विचलित न करतां तिला अधिक खोल आणि पुण्य–पावन बनवीत आहे. यामुळें हें गीत अत्यंत कारुण्य–मधुर आणि ललित—गंभीर झालें आहे. रोग निवारण्यासाठीं चिरफाड करणाऱ्या डॉक्टरचे हात आणि त्याचें तें चकाकणारें शस्त्र किती जरी भीषण दिसलें तरी हा आपल्या बऱ्यासाठींच आला आहे हें ओळखून ज्याप्रमाणें आपण डॉक्टराचें स्वागत करतो त्या प्रमाणें मंगलमय प्रभूचा चिरशांति देणारा दूत दारीं आला असतां दुःखित अंतःकरणानें का होईना, पण परिपूर्ण आस्तिक्तेनें आपण त्याचें स्वागत केलें पाहिजे, दार उघडून त्याला आंत घेतलें पाहिजे आणि ज्या श्रद्धेनें वृद्ध दशरथानें आपले कोंवळे सुकुमार दोन पुत्र विश्वामित्राच्या हातीं अर्पण केले त्याच श्रद्धेने दूताची मागणी, भगवंताची हुंडी स्वीकारली पाहिजे. आणि जर असें करतांना आपलें जीवन शून्य होत असेल तर तक्रार न करतां दुसरी हुंडी लवकर येवो आणि त्यावेळीं आपण स्वतःलाच अर्पण करून मोकळे होऊं अशीच इच्छा बाळगली पाहिजे. देवाच्या घरचें आमंत्रण आलें असतां विरहभयानें प्रियजनांना रोखण्याची व्यर्थ इच्छा मनांत बाळगण्यापेक्षां प्रियजनांच्या मागोमाग आपणहि यथाकाळीं देवाच्या घरीं पोचण्याची उमेद मनांत बाळगली पाहिजे, हा सर्व पुनीत आर्यभाव या गीतामधें थबथबलेला आहे.

पाठइले आजि मृत्युर दूत
आमर घरेर द्वारे,
तव आह्वान करि से वहन
पार हये एल पारे।

आजि ए रजनी तिमिर-आँधार
भयभारातुर हृदय आमार
तबु दीप हाते खुलि दिया द्वार
नमिया लइबो तारे।
पाठइले आजि मृत्युर दूत
आमार घरेर द्वारे।

पूजिब ताहारे जोड़–कर करि
व्याकुल नयनजले;
पूजिब ताहारे परानेर धन
सँपिया चरणतले ।

आदेश पालन करिया तोमारि
जाबे से आमार प्रभात आंधारि,
शून्य भवने बसि तव पाये
अर्पिब आपनारे ।
पाठाइले आजि मृत्युर दूत
आमार घरेर द्वारे

"हे जीवनस्वामी, आज माझ्या दारीं तूं आपला मृत्युदूत पाठविला आहेस. तुझें आमंत्रण पोचविण्यासाठीं जीवन–सागराच्या पैलतीराहून तो येथें पातला आहे. आजची ही रात्र तिमिर अंधारानें घेरली आहे. आणि माझें हृदय भय-भारानें व्याकुळ झालें आहे. तरीहि मी हातांत दिवा घेऊन माझ्या घराचें द्वार उघडीन आणि मस्तक वांकवून, नमस्कार करून तुझ्या दूताला आंत घेईन. माझ्या द्वारीं तूंच नाहीं का स्वतः तुझा हा दूत पाठविलास ! हात जोडून मी त्याचें स्वागत करीन. त्याला अर्घ्यप्रदान करीन. मी त्याची पूजा करीन. व्याकुळ नयनजलानें त्याला अर्घ्य देईन आणि त्याच्या चरणीं माझें प्राणधन, जणुं जीवनसर्वस्व अर्पण करून मी त्याची पूजा सांग करीन. तुझा तो दूत अशा रीतीनें तुझ्या आज्ञेचें पालन करील. आणि जातांना माझी पहांट अंधारून जाईल. तो गेला म्हणजे मी माझ्या शून्य भवना (घरा) मधें एकाकी बसेन आणि माझें हें व्यर्थ झालेलें उर्वरित जीवन तुझ्या चरणीं अर्पण करण्याची वाट पाहीन, एकदां तूं माझ्या दारीं तुझा मृत्युदूत पाठविलास तो यथाकाळीं माझ्यासाठीं देखील पुन्हा येईलच अशी मला श्रद्धा आहे. आणि ह्याच आशेवर मी माझे बाकीचे दिवस कंठणार आहे.

[इंग्रजी गीतांजलींत हें गीत ८६ वें आहे.]

१९

# तुझी गीत-गाथा

जर एखाद्या सैनिकानें म्हटलें, कीं 'मला घोड्यावर बसवा आणि माझ्या हातांत भरलेली बंदूक द्या, म्हणजे मग मी चाप ओढीन आणि शत्रूवर गोळी चालवीन', तर आपण त्याची अशी मागणी ऐकून प्रसन्न होणार नाहीं. आपण त्याला आयतोबा म्हणून त्याची हेटाळणीच करूं.

पण भक्त जेव्हां भगवंताजवळ मागतो कीं देवा मला या संसाराविषयीं वीट येऊं दे, मला तुझी एकाग्र भक्ति दे, उत्कट भक्ति दे, तेव्हां आपण त्या भक्ताशीं समरस होतों आणि जणुं काय त्याच्याकडून दीक्षा मिळवून आपणहि ईश्वराला त्याच्याप्रमाणेंच आळवूं लागतों.

ईश्वराकडे दीन हीन असहाय होऊन जाण्याचेंच आपल्याला कसें सुचतें? आपण आपल्या पुरुषार्थावर कां विसंबून राहात नाहीं? याचें एक कारण असें आहे कीं ईश्वर सर्वसमर्थ आहे आणि भक्त म्हणतात कीं त्याला सर्वांच्या वतीनें स्वतःच साधना करण्याचें आवडतें. आणि वेदान्ती म्हणतात कीं जेव्हां आपण ईश्वराला आळवतों तेव्हां खरोखर आपण आपल्या अंतरात्म्यालाच आळवतों. आपल्यामध्यें अनेक जन्मांची कमजोरी सांठवलेली असते. आणि अमर्याद आत्मशक्तीचा स्रोतहि आपल्यांतच असतो. तेव्हां आपण हृदयस्थ नारायणाला आळवणें म्हणजे आत्मशक्ति प्रकट करण्यासारखेंच आहे.

देवा, तूं मला प्रेरणा दे, अनुकूल वाणी दे आणि गायनाचे सूरहि दे. मी रोज तुझ्यासाठीं मधुर स्तोत्रें गाईन. माझ्या हृदयरूपी प्रफुल्ल कमलासनावर जर तूं विराजमान झालास आणि जर माझ्या प्राणांत तुझ्या प्रेमाचा, तुझ्या करुणेचा पूर लोटला तर मी कितीतरी सुमधुर गाणीं तुला गाईन. माझ्यासमोर बसून जर तू माझें गान ऐकलेंस, जर आपल्या दृष्टीची उदार सुधा मला दिलीस, जर आपल्या स्नेहयुक्त हातानें माझ्या दुःखाला गोंजारलेस आणि माझ्या सुखांतून दंभाचा कांटा दूर केलास, तर मी तुझ्यासाठीं नित्य प्रतिदिन मधुर मधुर गाणीं गाईन.

दुःखाच्या वेळीं मनुष्य होरपळून निघतो. त्याला स्नेहाचें उटणें हवें असतें. सुखाच्या वेळीं मनुष्य हुरळून जातो याचा अनुभव सर्वांना आहे. सुखानें अभिमान वाढूं शकतो, पण सुखाच्या वेळीं मनुष्यांत दंभ शिरतो असा सार्वत्रिक अनुभव नाहीं पण प्रत्येक मनुष्याच्या जीवनाची घडण विशिष्ट प्रकारची असते. साधक जेव्हां साधनेची वाणी बोलतो तेव्हां त्याला स्वतःच्या उणीवांचें, दोषांचें भान उत्कटपणें होत असतें. रविबाबू कांहीं ठराविक साच्यांचीं गीतें बनवत नसत. साधक दशेंत जशी उर्मि उठेल तसेंच गाणें भक्ताला शक्य असतें. हृदयाशीं, भावनेशीं खरेपणा असणें यांतच खरें काव्य खुलून निघतें.

प्रतिदिन तव गाथा
गाब आमि सुमधुर—
तुमि मोरे दाओ कथा,
तुमि मोरे दाओ सुर।

तुमि जदि थाक मने
विकच कमलासने,
तुमि जदि कर प्राण
तव प्रेमे परिपूर—
प्रतिदिन तव गाथा
गाब आमि सुमधुर।

तुमि जदि शोन गान
आमार संमुखे थाकि,
सुधा जदि करे दान
तोमार उदार आँखि—

तुमि जदि दुख—' परे
राख हात स्नेहभरे,
तुम जदि सुख हते
दंभ करह दूर—
प्रतिदिन तव गाथा
गाब आमि सुमधुर ॥

[ गीताचा अर्थ विवेचनांत येऊन गेला आहे.]

## २०

# अळणी जीवन नको; हवा आहे प्राण.

जीवन अगदीं कष्ट-रहित सोपें सरळ व्हावें अशी मागणी कोण करील ? ज्या जीवनांत कसलीच गुंतागुंत नाहीं, संकटांवर विजय मिळविण्याची संधि नाहीं, बुद्धिकौशल्य, पराक्रम आणि चारित्र्यतेज प्रकट करण्याची संधि नाहीं असें अळणी जीवन सुखकर असलें, आणि त्यांत फुकटची बढतीहि मिळत राहत असली, तरी अशा जीवनाची गोडी कुणाला वाटेल ? आपण जेव्हां कादंबऱ्या वाचतों तेव्हांदेखील अडचणींशीं, संकटांशीं, प्रतिकूल परिस्थितीशीं झगडून विजय मिळाल्याच्या कथाच आपण वाचूं इच्छितो. विजय न का मिळेना, चारित्र्यतेज प्रकट करण्यांत नायकानें हार खाल्ली नाहीं एवढें समाधान तर आपल्याला हेंच असतें.

मग ईश्वराशीं आपण केवळ संकट निवारण करण्याची प्रार्थना काय म्हणून करावी ? रविबाबूंनीं आणि इतर कवींनीं देखील केवळ 'आर्तिनाशन' न मागतां, दुःख निवारण्याची याचना न करतां, कांहींतरी तेजस्वी मागितलें आहे. या सर्व लोकांना पांडवमाता कुंतीचे अनुयायी म्हटलें पाहिजे. तिनें मागितलें कीं, आमच्या वांट्याला नेहमीं आपत्तीच येवोत. कारण तसें झालें तरच भगवंताचें स्मरण कायम असणार.

भक्ताचा आणखी एक विश्वास असतो. ईश्वराचा ज्याच्यावर अनुग्रह होतो त्याची ईश्वर चांगली कसून कसोटी करतो. पण त्याबरोबर त्या कसोटींतून पार उतरण्याची शक्तीहि

देतो. वेदकालीन एक ऋषि-महिला वागांभृणी ईश्वराच्या वतीनें बोलते, कीं 'मी ईश्वराची चित्‌शक्ति आहे. मी ज्याला पसंत करतें, ज्याच्यावर अनुग्रह करतें, त्याला मी उग्र आणि तेजस्वी बनवतें. त्याला बुद्धिशक्ति देतें, नेतृत्वशक्ति देतें.' हीच भावना पुढें करून रविबाबूंनीं ईश्वराची प्रार्थना केली आहे.

'देवा, तुझी पताका उचलण्याचा मान ज्याला देतोस त्याला ती पताका उचलून धरण्याची शक्तिही देतोस. तुझें कार्य करण्याचें, तुझ्या सेवेचा महत्प्रयास करण्याचें भाग्य ज्याला देतोस त्याला तें कार्य पार पाडण्यासाठीं शिदोरी म्हणून तुझी अनुपम भक्ति देखील देतोस'.

हा विश्वास असल्यानें, भक्तांचा हा विश्वजनीन अनुभव ठाऊक असल्यानें आम्ही दुःखापासून मुक्ति व्हावी अशी इच्छा करीत नाहीं. उलट आम्ही मागतों, कीं देवा, दुःखाबरोबर दुःखावर विजय मिळविण्याचें त्राणदेखील आम्हांला आमचा प्राण भरून दे. तुझ्या हातून, प्रत्यक्ष तुझ्या हातून जर आम्हांला वेदनेचें दान मिळणार असेल तर तें टळावें, त्यांतून आम्ही मुक्त व्हावें असें आम्ही कधींहि मागणार नाहीं. तूं दिलेल्या दुःखा-बरोबर जर तुझी भक्तीहि आम्हांला मिळणार असेल तर त्या दुःखाला शिरोभणी समजून मी त्याला मुकुटावरील माणिक्याप्रमाणें डोक्यावर धारण करीन.

देवा, कामाच्या रगड्याला मी कंटाळणार नाहीं. माझी शर्त एवढीच, कीं त्या कामाच्या पायीं मीं तुला विसरूं नये. कामामुळेंच जर तुझें स्मरण अखंड ताजें राहणार असेल तर यथेच्छ कामें मला खुशाल दे. कामाच्या जाळजंजाळामध्यें माझें अंतःकरण गुरफटून जाऊं नये, त्याला चिकटलें जाऊं नये एवढें दिलेंस म्हणजे बस.

एका हुशार तरण्याबांड इंग्रजाला इंग्रज गव्हर्नरनें देशी लोकांच्या हाताखालीं राहून काम करण्याचें सोपविलें. स्वराज्याची पहांट होण्याचे ते दिवस होते. तेव्हां असें केल्या-वांचून गत्यंतर नव्हतें. त्या तरण्या, उत्साही इंग्रजानें गव्हर्नरला सांगितलें, की मला कुठेंहि नेमा, वाटेल तसल्या लोकांच्या हाताखालीं काम करावयास सांगा, माझी तयारी आहे. फक्त मला एकच मोकळीक ठेवा, कीं वाटेल तेव्हां सरळ आपल्या भेटीला येण्याची मला मोकळीक असावी. आपल्याशीं विचारविनिमय करतां आला, माझी परिस्थिति आपल्याला समजून सांगतां आली आणि आपलें वळण काय आहे हें मला आपल्या तोंडून समजलें म्हणजे मग मी सगळ्या अडचणी सोसून, सगळीं व्यवधानें संभाळून सरकारची सेवा करूं शकेन.

अगदीं याच पद्धतीते भक्त म्हणतो, 'देवा, आपली इच्छा असेल त्याप्रमाणें मला

दोऱ्यांनीं बांधून ठेवा. मला जखडून टाका. फक्त तुमच्या बाजूला मी मोकळें असावे. जगाचीं बंधनें कितीहि असोत तुमचा माझा संबंध सरळ सीधा आणि मोकळा असला म्हणजे बस.

मला धुळीमध्यें पडून राहावें लागलें, तर मला हरकत नाहीं. तुझ्या चरणधुळीनें मला पवित्र कर म्हणजे झालें. या संसाराच्या ओझ्याखालीं मला उपेक्षित ठेवलेंस, माझी आबाळ झाली तरी माझी हरकत नाहीं. मी तुला विसरूं नये एवढें वरदान दिलेंस तर बस आहे.

या जगाच्या राहाटींत मला किती का भटकावें लागेना, मी भटकत राहीन. मला एवढाच विश्वास असला तर पुरें कीं भटकतां भटकतां तुझ्या चरणाच्या जवळच मी जात आहे. या अशेष विश्वाचा सगळा थकवा दूर करणाऱ्या तुझ्या चरणांकडे मी जात आहें अशी खात्री झाली तर सर्व प्रकारचे श्रम सहन करण्याची माझी तयारी आहे.

शेवटीं कवि आपली श्रद्धा व्यक्त करीत आहे. या भवारण्यांतील मार्ग दुर्गम आहे. विषम आहे. येथें त्याग, शोक, विरहाग्नि कितीतरी भरले आहेत. येथें जगायचें म्हणजे क्षणोक्षणीं मरायचें असतें. मृत्यूचें ओझें वाहायचें म्हणजे जीवन आणि मरणांतून येथें प्राण मिळवावयाचा असतो. येथील कर्मयोगाच्या शेवटीं सर्व जगाला जेथें विश्रांति मिळते अशा तुझ्या चरणयुगुलाच्या ठायीं मला संध्याकाळच्या विसाव्याचें घरटें मिळावें. मी संसाराच्या तापाला कंटाळत नाहीं, कारण तुझी कृपा असली तर तो तापच माझी साधना होणार. आणि त्यांतून तावूनसुलाखून निघून तुझ्या चरणीं आराम भोगण्याची योग्यता मला प्राप्त होणार.

तोमार पताका जारे दाओ तारे
बहिबारे दाओ शकति ।
तोमार सेवार महत्प्रयास
सहिबारे दाओ भकति ।

आमि ताअि चाअि भरिया परान
दुखेरअि साथे दुखेर त्राण,
तोमार हातेर वेदनार दान
अेडाये चाहि ना मुकति ।
दुख हबे मोर माथार माणिक
साथे यदि दाओं भकति ।

जत दिते चाओ काज दियो, जदि
तोमारे ना दाओ भुलिते—
अन्तर जदि जडाते ना दाओ
जालजंजाल गुलिते।

बांधियो आमाय जत खुशि डोरे,
मुक्त राखियो तोमा-पाने मोरे,
धुलाय राखियो पवित्र क'रे
तोमार चरणधुलिते।
भुलाये राखियो संसारतले
तोमारे दियो न भुलिते।

जे पथे घुरिते दियेछ घुरिब,
जाइ जेन तव चरणे।
सब श्रम जेन बहि लय मोरे
सकल-श्रान्ति-हरणे।

दुर्गमपथ ए भव-गहन,
कत त्याग शोक विरह-दहन,
जीवने मरण करिया वहन
प्राण पाइ जेन मरणे।
संध्या बेलाय लभि गो कुलाय
निखिलशरण चरणे।

**टीप :** ईश्वराची पताका खांद्यावर घेऊन जीवनयात्रा पुरी करणें आणि ख्रिस्ताप्रमाणें ईश्वरनिर्मित क्रूसाचा भार उचलून वधस्तंभाकडे जाणें हें सारखेंच आहे. दोन्ही चरणयात्रा आहेत आणि साधनेच्या भाषेंत बोलायचें तर नव्या अर्थानें स्मरणयात्रा आहेत. स्मरण कायम ठेवून चरणाचा विसावा मिळवण्यासाठीं यात्रेची साधना साधावयाची हेंच खरें जीवन, हीच त्याची कृतार्थता.

२१

# ऐकू दे जीवन सागराचें महागान

कंद, मूळें आणि फळें यावर जगणारे आपण मानवी भूमिपुत्र आहोंत. जमीन नांगरून शेती करण्याच्या कलेचा विकास करून आपण अधिकच स्थावर झालों. तरीहि आपल्याला पंचमहाभूतांपैकीं पाण्याचें आकर्षण अधिक. नदी पाहिली कीं तिच्या प्रवाहांत झोकून द्यावें, ती नेईल तिकडे वहात जावें अशी इच्छा प्रबळ होते. पण त्याबरोबर समोरच्या कांठाचें, तिकडील जमिनीचें आकर्षणहि असतेंच. एक जमीन सोडून दुसऱ्या जमिनीकडे जातां आलें तर किती उत्तम अशी ओढ लागते. पाण्याच्या मदतीनेंच पैलतीर गांठायचा असतो. नुसत्या पोहण्यानें हें कसें साधणार? हातांनीं पोहण्यापेक्षां नावेंत बसून वल्ह्यांच्या जोरावर पाणी कापतां आलें तर पैलतीराला सहज पोंचूं असा विश्वास वाटूं लागला.

पुढें पाहिलें कीं जर पंचमहाभूतांपैकीं जलतत्त्वाला समीराची, जोराने वहाणाऱ्या वाऱ्याची जोड मिळाली तर किती बहार! कसलेच श्रम करायला नकोत. होडीच्या डोलकाठीला शीड बांधलें आणि त्याची रचना अनुकूल करण्याची कला साधली म्हणजे आपोआप पैलतीराला किंवा समुद्रांतून जायचें असेल तर इष्ट बंदराला पोहोंचतां येतें.

मनुष्यानें नौकेची उपासना केली. वाऱ्याचें तंत्र समजून घेतलें. दिशेची साधना साधावी म्हणून ध्रुवताऱ्याशीं परिचय करून घेतला आणि कांठाशीं बांधून ठेवलेली होडी हिम्मतपूर्वक पाण्यांत लोटून दिली. विश्वासानें शीड पसरलें आणि होडी हाकारली.

पण हवा पुष्कळदा स्वच्छ निरभ्र नसते. आकाश घेरलेलें असतें. संध्याकाळीं तारे दिसण्याच्या ऐवजीं धुळीच्या लोटानें आकाश धूसर झालेलें असतें. अनेक जलयात्रा केल्या. शंभर वेळा बुडतां बुडतां वाचलों. आतां किनाऱ्यावर बसून वाट पहात आहें. मंगल घडी फुकट जात आहे. मनाला कांहीं सुचत नाहीं. पण जोंवर भगवंता, वाहणारा वारा तुझ्या दिशेनेंच वाहील अशी खात्री होणार नाहीं, तोंवर आतां मी माझी नाव मोकळी सोडणार नाहीं. मन म्हणतें कीं गेलें पाहिजे. बसून काय होणार ? पण जोंवर इष्ट स्थानाची खात्री झाली नाहीं, मुक्कामाचा निश्चय झाला नाहीं, तोंवर जाऊन काय करणार ? उद्देश-रहित अनिश्चित दिशेनें शेकडों वार यात्रा करून पाहिली, आतां त्या मार्गाचा भरंवसा राहिला नाहीं आणि म्हणून अनेक दोऱ्यांनीं नाव किनाऱ्याशीं बांधून ठेवली आहे. भगवंता, आतां या दोऱ्या सोडण्याची हिंमत माझी नाहीं. तूंच या दोऱ्या सोडून दे. तुझ्या प्रेरणेनें जेव्हां होडी चालूं लागेल तेव्हांच जिवांत जीव येईल. ऐलतीरीं किनाऱ्यावर पडून राहणें यांत जीवनाची विफलता आहे. आणि आपल्या मतें नौका चालवण्याची, जुन्या अनुभवामुळें, हिम्मत होत नाहीं. तेव्हां भगवंता, माझ्या हृदयाला भरून टाकणारा आणि विश्वास देणारा कोठें आहे तुझा मोकळा वारा? सागराला ओळखणारा मोकळा वारा कोणता ? माझ्या कानाला भरून टाकणारें श्रद्धेचें, विश्वासाचें, प्रेरणेचें महागान कुठें आहे? कुठें आहे तुझें जीवनसागराचें महागान ?

हें महागान ऐकतांच सर्व अश्रद्धा दूर होईल. तुझा तो मुक्त समीर हृदयांत भरतांच मला नवा जोम येईल आणि मग पूर्ण विश्वासानें माझी जीवननौका तुझ्या विशाल जीवन-सागरांची यात्रा सुरु करील.

घाटे बसे आछि आनमना,
जेतेछे बहिया सुसमय,
ए बातासे तरी भासाब ना
तोमा-पाने जदि नाहि बय।
दिन जाय ओगो दिन जाय,
दिनमणि जाय अस्ते।
नाहि हेरि बाट, दूरतीरे माठ
धूसर गोधूलि धूलिमय।

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
वि: ......
नों: दि: ......

घरेर ठिकाना हल ना गो,
मन करे तबु जाइ–जाइ ।
ध्रुवतारा तुमि जेथा जाग’
से दिकेर पथ चिनि नाइ ।
एत दिन तरी बाहिलाम,
बाहिलाम तरी जे पथे,
शतबार तरी डुबुडुबु करि
से पथे भरसा नाहि पाइ ।

तीर–साथे हेरो शत डोरे
बाँधा आछे मोर तरीखान ।
रशि खुले देबे कबे मोरे–
भासिते पारिले बाँचे प्राण ।
कोथा बुक-जोडा खोला हावा,
सागरेर खोला हावा कइ ?
कोथा महागान भरि दिबे कान,
कोथा सागरेर महागान ?

अन्यमनस्क होऊन मी घाटावर बसलों आहें. शुभ वेळा निघून जात आहे, तरीहि वारा जर तुझ्या दिशेनें वाहणार नसेल तर त्या वाऱ्यांत मी माझी होडी सोडणार नाहीं.

दिवस चालला, अरेरे दिवस ढळला! दिनमणी सूर्य अस्ताला जात आहे. वाट दिसत नाहीं. संध्याकाळच्या धुळीनें धूसर झालेला परतीर दूर दूर आहे.

मनाला हुरहुर लागली आहे कीं गेलें पाहिजे, गेलेंच पाहिजे. पण मुक्काम कुठें आहे याची अजून खात्री झाली नाहीं. ध्रुव ताऱ्याच्या रूपानें भगवंता, जिथें तूं उगवतोस त्या दिशेचा परिचय मला अजून झाला नाहीं.

इतके दिवस झाले, मी होडी चालवीत राहिलों. पण ज्या ज्या रस्त्यानें मी होडी चालवली त्या त्या रस्त्यानें शेकडों वार ती बुडण्याच्या बेताला आली होती. त्या रस्त्याचा आता विश्वास राहिला नाहीं.

पहा, शेकडों दोऱ्यांनीं माझी होडी तीराशीं बांधून ठेवली आहे. भगवंता, माझ्या या दोऱ्या, माझें हें बंधन तूं केव्हां सोडून देशील? मला वाटतें कीं माझी होडी जेव्हां पाण्यांत चालू लागेल तेव्हांच माझे प्राण वाचतील.

हृदयाला भरून टाकणारी तुझी मोकळी हवा कुठें आहे? सागराचा मुक्त समीर कोणता? माझें कान भरून देणारें तुझें महागान कुठे आहे? जीवन-सागराचें महागान कुठें आहे?

२२

# केवढी ही धन्यता !

ध्यानाची शक्ति अद्भुत असते. केवळ ध्यानाच्या जोरावर आणि अर्थात हृदयसिद्धीच्या जोरावर आपण जगांतील कोणत्याहि वस्तूशी कोणत्याहि व्यक्तीशीं एक प्रकारचें तादात्म्य अनुभवूं शकतो. चराचर सृष्टीच्या सुखदुःखाशीं, हर्ष-शोकाशीं, संवेदना आणि वेदनांशीं एकरूप होऊं शकतो. हिलाच म्हणतात सहानुभूति. ही जितकी नाजुक आणि सूक्ष्म असते, तितकीच व्यापक आणि गंभीर होऊ शकते. सुखदुःखाची एवढी व्यापक, विशाल आणि खोल सह-अनुभूति झेलण्याची शक्ति आत्मीयतेमुळेंच आपल्यामध्यें प्रगट होते.

हृदय जर समर्थ नसलें, लेचेंपेचें असलें तर त्याला एवढी सहानुभूति पेलत नाहीं. तें गांपरून जातें. बधिर होते किंवा हिंमत हारून अन्यमनस्क आणि संकुचित होते.

पण जेथें विश्वात्मैक्य भावना व्यापक झाली, बुलंद झाली, तेथें साधकाला एवढी हृदयासिद्धि अवश्य प्राप्त होते. एखाद्या विशाल समाजाशी, महत्त्वाकांक्षी राष्ट्राच्या असंख्य प्रवृत्तींशीं आणि मानवी पुरुषार्थाच्या उत्कर्ष-अपकर्षाशी समरस झालेल्या ावती आपण पहातो. केवढी त्यांची हृदयसिद्धि. कीं त्यांना असल्या चैतन्यमय जीवनसागरांशीं एकरूप होता येते. एवढेंच नव्हे तर त्याचें नेतृत्वहि धारण करतां येतें !

हें ज्या साधनेंने साधते तेंच खरें ध्यान होय.

एवढें ध्यान साधल्यानंतर मनुष्य अंतर्मुख होऊन तपासूं लागतो कीं खरोखर हें सामर्थ्य कोणाचें ? कोणाच्या अनुग्रहानें, कृपाप्रसादानें, ही एवढी अनुभूति आपल्या हृदयांत प्रगट होऊं शकली ? असा शोध सुरू होतांच साधकाला साक्षात्कार होतो कीं या विश्वाच्या अणूअणूमध्यें असा सर्वसमर्थ जीवनस्वामी विराजमान आहे कीं ज्याच्या लीलेनें हें सर्व चालत असूनदेखील, तो स्वतः अलिप्त, निःसंग, शान्त आणि प्रसन्नमंगल आहे. त्याला ही लीला कशी साधते, अणुअणूशी सर्वत्र, सर्वकाळ एकरूप असूनदेखील तो अलिप्त कसा राहूं शकतो ? कान आणि हृदय फाटून जावेत अशा कोलाहलांत सर्व कांहीं ऐकूनदेखील जो बहिऱ्यासारखा निस्वन राहू शकतो त्याची ही अलिप्तता, त्याचें हें अद्‌भुत ताटस्थ्य समजल्यानंतर साधकाच्या हृदयावर त्याचाच प्रभाव सर्वोपरी होतो. आणि मग तोही—विश्वसेवक असूनहीं निःसंग, एकाकी बनूं शकतो.

तादात्म्यानंतर जें ताटस्थ्य उगवतें, कर्मयोगांतून जो ज्ञानयोग आणि ध्यानयोग परिपुष्ट होतो, त्याची शान्ति अचल, अटळ असते. आणि त्या शांतीतूनच एक प्रकारचें ऐश्वर्यही स्फुरूं लागतें. त्याचेसाठीं निराळी साधना करावी लागत नाहीं. उष्णतेची पराकाष्ठा झाली म्हणजे ज्याप्रमाणें ज्वाला फाकते, फूल फुललें म्हणजे ज्याप्रमाणें त्यांतून आपोआप सुगंध दरवळूं लागतो, त्याचप्रमाणें कर्मयोगाच्या मागोमाग येणारा ध्यानयोग परिपुष्ट झाला म्हणजे त्याचेबरोबर ऐश्वर्ययोग डोकावूं लागतोच.

या अनुभवाची ज्याला कल्पना आहे त्याला खालील गीत विशेष रोचक वाटलें पाहिजे.

मध्याह्ने नगर-माझे पथ हते पथे
कर्मबन्या छाय जबे उच्छलित स्रोते
शत शाखा-प्रशाखाय—नगरेर नाड़ी
उठे स्फीत तप्त हये, नाचे से आछाड़ि
पाषाणभित्तिर' परे—चौदिक आकुलि
धाय पांथ, छुटे रथ, उडे शुष्क धुलि—

तखन सहसा हेरि मुदिया नयन
महाजनारण्य-माझे अनन्त निर्जन
तोमार आसनखानि--कोलाहल-माझे
तोमार निःशब्द सभा निस्तब्धे बिराजे ।
सब दुःखे, सब सुखे सब घरे घरे,
सब चित्ते सब चिन्ता-सब चेष्टा-' परे
जत दूर दृष्टि जाय शुधु जाय देखा
हे संगविहीन देव, तुमि बसि एका ।

मध्याह्नकाळीं, भरदुपारच्या उनांत, लोकसमुदायानें गजबजलेल्या नगरामध्यें लोकप्रवृत्तीचा पूर जेव्हां उसळणाऱ्या प्रवाहानें शेंकडो शाखाप्रशाखांच्या रूपांत, एका मार्गावरून दुसऱ्या मार्गावर लोटूं लागतो; नगराची नाडी जेव्हां तापून फुलते आणि दगडी भिंतीवर पछाडली जाऊन नाचूं लागते—आणि प्रवाश्याची गर्दी जेव्हां चारी दिशांना त्राहि त्राहि करते; जेव्हां रथ एकामागून एक सुटतात आणि कोरी तापलेली धूळ उडूं लागतेः

तेव्हां डोळे मिटून एकाएकी अंतर्मुख होतांच मला मानवतेच्या त्या महाअरण्यामध्यें तुझें अनंत, निर्जन आसन दिसूं लागते ! त्या सगळ्या कोलहलामध्यें तुझी स्वतःची एक निःशब्द सभा शान्तपणें विराजमान आहे ! सर्व दुःखामध्यें आणि सर्व सुखांमध्यें सर्व ठिकाणच्या प्रत्येक घरामध्यें; सर्व चित्तांमध्यें चालणाऱ्या सर्व विचारांमध्यें आणि सर्वांच्या सर्व कार्यकलापामध्यें, जेथवर नजर पोहोंचते, तेथें सर्वत्र, हे संगविहीन परमेश्वरा ! तूंच एकुलता एक बसलेला दिसतोस !

२३

# हेमंत गान

प्राचीन असोत किंवा आधुनिक, खरे कवि केवळ शब्दविहार करीत नाहींत. निसर्गाची षड्ऋतूंतील निरनिराळीं रूपें पाहून, अनुभवून त्यांना जें सौख्य मिळतें, निसर्गाच्या निरनिराळ्या लीलांशीं तदाकार होण्यांत जी जीवनसमृद्धि लाधते, तीच जेव्हां पोटांत मावेनाशी होते, तेव्हां ते ती शब्दरूपानें, गाण्यांच्या रूपानें प्रवाहित करून देतात. आणि आपल्या कवींना तर स्वतःच्या वडिलांची प्रार्थनाप्रवचनें ऐकून चिंतन करण्याची संवय लागलेली.

वडिलांनीं घरच्या इस्टेटीची व्यवस्था पाहण्यासाठीं रवीबाबूंना खेड्यांवर पाठविलें होतें. तेंथ सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं किंवा तारकांकित रात्रीच्या वेळीं, लहर लागेल तेव्हां कवि होडींत बसून जलविहार करीत. निसर्गाशीं एकरूप व्हावें, पशुपक्ष्यांची राहणी तपासावी, नदीप्रवाहाचे ऋतुऋतूंतील खेळ निहाळावेत आणि जीवनचिंतन करीत करीत जीवन-स्वामीच्या चरणाचा आपल्या कवितापंखांनी स्पर्श करावा; अशा या काव्यमय प्रवृत्तींतून स्फुरलेलीं गीतें त्यांनीं आपल्याला दिलीं आहेत.

उष्ण प्रदेशांत राहाणाऱ्या आपल्याला खरोखर दोन उन्हाळे अनुभवायला मिळतात. हिवाळ्याच्या शेवटीं, वसंताच्या मागोमाग येणारा, त्राहि त्राहि करणारा उन्हाळा तो पहिला. आणि पावसाळ्याच्या शेवटी सुगीचे दिवस संपल्यानंतर जमिनीला भाजून

काढणारा आणि थकलेल्या माणसाला आळसाची झोप काढण्याला प्रेरणा देणारा सौम्य पण त्रास देणारा हेमंती उन्हाळा निराळा. या विचित्र उन्हाळ्यामुळेंच आपल्याला त्यानंतर येणारा खरा हिवाळा इतका गोड वाटतो.

असल्या या सौम्यमंथर द्वितीय उन्हाळ्याचें एक सुंदर चित्र देऊन तशा काळीं घडणाऱ्या ध्यानाचें सुख या गीतांत कोंदून ठेवलें आहे.

आजि हेमन्तेर शान्ति व्याप्त चराचरे।

जनशून्य क्षेत्र-माझे दीप्त द्विप्रहरे
शब्दहीन गतिहीन स्तब्धता उदार
रयेछे पडिया श्रान्त दिगन्तप्रसार
स्वर्णश्याम डाना मेलि। क्षीण नदीरेखा
नाहि करे गान आजि, नाहि लेखे लेखा
वालुकार तटे। दूरे दूरे पल्ली जत
मुद्रितनयने रौद्र पोहाइते रत
निद्राय अलस क्लान्त।

एइ स्तब्धताय
शुनितेछि तृणे तृणे धुलाय धुलाय
मोर अंगे रोमे रोमे, लोके लोकान्तरे
ग्रहे सूर्ये तारकाय नित्यकाल ध'रे
अणुपरमाणुदेर नृत्यकलरोल—
तोमार आसन घेरि अनन्त कल्लोल।

शेतीची सर्व कामें संपलीं आहेत. धान्याच्या राशी घरीं पोहोचल्या आहेत. आतां शिवारांत कोणीहि माणूस फिरकावयाचा नाही. चिटपाखरूंहि दिसावयाचें नाहीं! फार काय पातळ प्रवाहाची नदीदेखील निपचित पडलेली असावयाची.

आणि आसपासचीं खेडीं दुपारच्या थकव्यांत ऊन खात पेंगत असायचीं ! असें चित्र पाहून कवि गातात—

आज हेमंताच्या शांतीनें चराचर व्यापून टाकलें आहे.

जनशून्य शेतांमध्यें भगभगणाऱ्या दुपारीं, शब्दहीन, गतिहीन, विशाल शान्ति आपली दिगन्तव्यापी, सुवर्णश्याम पंखें पसरून श्रान्तपणें पडून आहे.

पाणी बरेंच आटल्यामुळें क्षीण झालेली नदीची रेखा आज गीत गात नाहीं. आणि रेतीच्या तटावर वांकड्यातिकड्या रेघाहि पाडीत नाहीं.

उघड्या पडलेल्या पुलिनाच्या किनारीं वसणारीं दूरदूरचीं खेडींगांवें दुपारच्या थकव्यानें आळशीं होऊन, डोळे मिटून ऊन खात पडलीं आहेत.

अशा निस्वन, निस्तब्ध शान्त वेळीं गवताच्या प्रत्येक पात्यांत, धुळीच्या प्रत्येक कणांत माझ्या अंगाच्या प्रत्येक रोमांत आणि लोकलोकांतरांत, ग्रह-सूर्य व नक्षत्र-ताऱ्यामध्यें, अणुपरमाणूच्या नित्यकालचा जो नृत्यकलरव चालू असतो तो मला ऐकूं येत आहे. आणि तुझ्या आसनाच्या आसपास गायनाचा जो अनंत कल्लोळ चालू असतो, तोही मीं तल्लीन होऊन ऐकत आहे.

# २४

## व्यर्थी अधिकचि अर्थ निघे

गीतेंत म्हटलें आहे, 'कर्मांत ज्याला अकर्म दिसतें आणि अकर्मात कर्म तोच बुद्धिमान होय; तोच कर्मप्रवीण होय, त्यालाच कर्मरहस्य समजलें.ः' या वचनाचा दार्शनिक अर्थ जो होत असेल तो असो पण नित्यजीवनांत याचा अनुभव कांहीं कमी येत नाहीं. आगगाडींत आपण चालत नसलों तरी ज्याप्रमाणें आपला प्रवास चालू असतो, रात्रीं झोपेंत आपण कांहींहि चलनवलन केलें नाहीं तरी ज्याप्रमाणें शरीर वाढत असतें, व्यवहारांत आपण कांहींहि उद्योगधंदा न केला तरी ज्याप्रमाणें व्याजी लावलेलें धन वृद्धिंगत होत असतें त्याप्रमाणें जीवनांत पुष्कळ वेळां बाह्यतः आपण कांहीं जरी कर्म करीत नसलों तरी जीवनाचा विकास होतच असतो. मानसशास्त्र म्हणेल, कीं आपलें मन जरी झोंपा काढीत असलें किंवा आळसानें बेजबाबदार झालें असलें तरीही सुप्तमन गुप्तपणें आपलें काम करीतच असतें.

श्रद्धाधन कवि म्हणतो : 'माझें जीवन कांहीं उकिरड्यावर पडलें नाहीं. भगवंतानें तें आपल्या हातांत घेतलें आहे. माझ्या जीवनांतील प्रत्येक क्षण भगवंताच्या काळजीचा विषय असल्यामुळें माझें जीवन व्यर्थ जाऊंच शकत नाहीं. मी जरी पडून असलों तरी अंतर्यामीं गुप्तपणें कळी फुलवून त्याचें फूल बनवितो. फुलांमधून फळाची निर्मिति करतो. फळांतील गर्भ सुमधुर परिपक्व झाला म्हणजे त्याच्याच पोटांत भविष्याच्या नवनिर्मितीसाठीं

तो एक नवीन बीज पोसत असतो अशी त्याची लीला अखंड चालूच असते.

सर्व काम संपले आतां कांहींच करावयाचें, पहावयाचें किंवा उपभोगावयाचें उरलें नाहीं असें समजून दिनांतीं निद्रेच्या विस्मृतींत बुडून जावें आणि सर्व संपलें असें समजून विराम घ्यावा तर सकाळ होतांच डोळे ताजेतवाने होऊन भुकेनें उठतात. नव्या कुतूहलानें जगाकडे पाहूं लागतात.

ही उत्कंठा व्यर्थ आहे, केवळ फसगत आहे असें मनाला समजावून घराबाहेर यावें तों तेथें बगीच्यांत नवींनवीं फुलें नव्या सृष्टीचें सौन्दर्य खुलवीत दृष्टीस पडतात. मग मन म्हणते. डोळ्यांत संचरलेला नवा प्राण ही फसगत नसून हें नव्या सृष्टीचें आवाहनच आहे. आतां या नव्या फुलांच्या भेटीला गेलें पाहिजे. त्यांचा नवा परिचय मिळवला पाहिजे. उत्फुल्ल हृदयानें या फुलाशीं तादात्म्य साधलें पाहिजे. आणि शुभ कर्मांच्या द्वारां स्वतःचें जीवनकुसुम या फुलाप्रमाणेंच सुगंधित केलें पाहिजे. झोंपेंत जो वेळ गेला तो वायां गेला नाहीं. कर्मांपासून निवृत्त झालों तेवढा काळ जीवन क्षीण झालें नाहीं पण ती सर्व देवाच्या घरची मोठी जोराची पूर्वतयारीच होती त्यांतूनच ही सर्व लीला—न संपणारी सृष्टि उत्पन्न झाली आहे. धन्य आहे तुझी लीला, आणि धन्य आहे माझें भाग्य कीं माझ्या जीवनाला कधीं विरामच नाहीं. सर्व सृष्टींत एक, अखंड, अनंत उन्मेष आहे.

माझे माझे कत बार भावि, कर्महीन
आज नष्ट हल बेला, नष्ट हल दिन ।
नष्ट हय नाइ प्रभु, से-सकल क्षण,
आपनि तादेर तुमि करेछ ग्रहण
ओगो अंतर्यामी देब। अन्तरे अन्तरे
गोपने प्रच्छन्न रहि कोन अबसरे
बीजेरे अंकुररूपे तुलेछ जागाये;
मुकुले प्रस्फुटवर्णे दियेछ रांगाये;
फुलेरे करेछ फल रसे सुमधुर,
बीजे परिणत गर्भ । आमि निद्रातुर

आलस्यशज्यार' परे श्रान्तिते भरिया
भेबेछिनु, सब कर्म रहिल पडिया।

प्रभाते जागिया उठि मेलिनु नयन;
देखिनु भरिया आछे आमार कानन।

"मधून मधून मला वाटते कीं मी असा रिकामा कसा! सगळा माझा वेळ फुकट गेला. एक दिवस आपण गुमावला. पण प्रभो, तो काळ नष्ट झालेला नाहीं, फुकट गेले असे ज्यांचेविषयीं मला वाटतें ते सर्व क्षण हे आत्मारामा, तूं स्वतः आपलेसे केलेस आणि त्यांना विशेषपणें कृतार्थ केलेस. प्रत्येक वस्तूच्या अंतरामध्यें लपून गुप्त राहून कोण्या वेळीं तूं बीजांना जागवून अंकुरित करतोस, कळ्यांना प्रस्फुरित करून दिव्य वर्णांनीं रंगवून सोडतोस, कसलीही धडपड दिसूं न देतां फुलांना तूं सुमधुर फळें बनवून टाकतोस आणि त्यांच्या पोटांत परिपक्व बीजें गुपचुप ठेवून देतोस.

मी झोपेनें घेरला जाऊन आळशासारखा अंथरुणावर पडून राहतो. थकल्या-भागल्यामुळें शवासारखी गाढ निद्रा मला लागते आणि वाटतें कीं संपलें आतां कांहीं करावयाचें उरलें नाहीं. सर्व ग्रंथ संपूर्ण झाला. आणि समाप्ति आली.

पण सकाळ होतांच मी पुनः जागृत होतों आणि डोळे उघडून पाहावें तर माझे सर्व उद्यान आणि कानन नव्या अद्भुत पुष्पसृष्टीनें भरून उतूं जाऊं लागलें आहे.

माझे क्षण मी वापरले नाहीं म्हणून काय झालें तें तुझ्या हातांत असल्यानें त्यांचे सार्थक व्हावयाचें तें झालेंच. आणि वायां गेले असें ज्या क्षणाविषयीं मी मानत होतों ते तर विशेष रूपानें पदरीं पडले. आणि शेवटीं त्यांनींच मला कृतार्थ केलें.

[हें गीत इंग्रजी गीतांजलीत ८१ वें आहे.]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

२५

# गान-सृष्टींत नव-वसंत

दिवसभर काम केल्यानंतर आपण थकून गळांठून जातो ! पण रात्रीची झोप मिळतांच पुन्हां ताजेतवाने होतो ! सापाच्या अंगावर कात आली कीं तो म्हातारा निस्तेज दिसूं लागतो ! पण कांत उतरतांच तो पुन्हां तकाकीत तरणाबांड होतो ! याचप्रमाणें शिशिराची कडाक्याची थंडी संपली म्हणजे वसंताला नवपल्लवी फुटते ! पानगळ ऋतूच्या कोरडीनें कंटाळून गेलेले पक्षी नवीन पल्लवीच्या स्वागतार्थ आपआपली गीतें घेऊन परत येतात ! त्याचप्रमाणें माझ्या थकलेल्या काव्यप्रतिभेला पुन्हां एकदा वसंत लाभो ! माझीं सांडलेलीं गीतें परत येवोत ! आणि नव्या दम्यानें नवीन गाणीं गाण्यासाठीं भगवंता ! तुझेकडून माझ्या हातीं, माझी वीणा पुन्हा मिळो ! मग मीं पुन्हां एकदा समुद्राच्या दुसऱ्या तीरावरून ऐकू येणारी नवी गीतें गाईन ! परीराज्यांतील अज्ञात राजांच्या राज्यातील अद्भुत गोष्टी सांगू लागेन आणि सीमाहीन प्रदेशांतील अद्भुत-रम्य समाचार जगाला ऐकॅयला लावीन ! माझा शिशिर संपून नववसंत पुन्हां प्रगट होवो !

आबार आमार हाते वीणा दाओ तुलि,
आबार आसुक फिरे हारा गानगुलि।

सहसा कठिण शीते मानसेर जले
पद्मवन मरे जाय, हंस दले दले
सारि बेंधे उड़े जाय सुदूरे दक्षिणे
जनहीन काशफुल्ल नदीर पुलिने;
आबार बसन्ते तारा फिरे आसे जथा
बहि लये आनन्देर कल-मुखरता—

तेमनि आमा जत उड़े-जावा गान
आबार आसुक फिर मौन अे परान
भरि उतरोले; तारा शुनाक एबार
समुद्र-तीरेर तान, अज्ञात राजार
अगम्य राज्येर जत अपरूप कथा,
सीमाशून्य निर्जनेर अपूर्व वारता।

पुन्हां एकदा वीणा उचलून माझ्या हाती दे. माझी सांडलेलीं गीतें पुन्हां परत येवोत. एकाएकीं भयानक गारठा पडल्याने मानससरोवरांतील पद्मवन कसे वठून जात आहे. आणि सरोवरांतील हंसाचे थवे ओळीने उडत उडत दक्षिणेकडे काश गवताच्या किनाऱ्याने शोभणाऱ्या निर्जन नदीकडे जात आहेत. हेच हंस वसंतऋतु येतांच ज्याप्रमाणे आनंदाचा कलरव घेऊन परत येतील, त्याप्रमाणे.

त्याप्रमाणे माझी जितकी गीतें उडून गेली होतीं, तीं सर्व माझ्या मौनाला आणि माझ्या प्राणाला आपल्या झंकाराने भरून देऊन परत येवोत. आणि मग त्यांनी पुन्हां एकदा समुद्रतीरावरचें गान ऐकवावे. अज्ञात राजाच्या अगम्य राज्यांतील सर्व अपरूप कहाण्या ऐकवाव्यात आणि अमर्याद निर्जन प्रदेशांतील अद्‌भुत समाचार सादर करावेत.

नव-वसंताच्या नवजीवनाची यौवनपूर्णसृष्टि माझ्या गानांच्या द्वारा पांगरो.

२६

# जें येथें तेंच तिथे

उपनिषदकालीन ऋषींना विश्व-व्यापी सिद्धान्त अगदी साध्या घरगुती शब्दांत मांडता येत असत. 'तोच तूं आहेस' हें एक अशा प्रकारचें महावाक्य आहे. 'जें इथें आहे तेच तिथें आहे, जें तिथें आहे तेच इथें आहे' हें दुसरे महावाक्य होय. 'जो सर्वत्र 'एका 'ला पहातो तो जीवन जिंकला, जो जिथें तिथें 'अनेक' पहातो तो मरणाच्या जाळ्यांतून कधींच बाहेर निघत नाहीं, हें ही एक असेंच विश्वरहस्य उकलून देणारे महावाक्य आहे. जे आंत आहे तेच बाहेर आहे, जें बाहेर दिसतें तें आंत देखील सांपडलेंच पाहिजे या अगदीं साध्या शब्दांत सार्वभौम पिंडब्रह्मांड न्याय सांगितला गेला आहे. तार्किक किंवा नैयायिक पद्धतीनें नव्हे, पण जीवनरहस्य समजून घेण्याच्या अनुभव-प्रेरक हार्दिक पद्धतीनें हीं महावाक्यें जर आपण आपलीशी केली तर जीवनांतील अत्यंत जटिल कोडीही आपल्याला अनायासे सुटूं लागतील. आणि शिक्षणशास्त्रांत अत्यंत महत्त्वाची अशी जी अनुबंध कला आहे ती तर आपल्याला अगदीं स्वभावसिद्धच होऊन बसेल.

अनुबंध कला म्हणजे या विश्वांत पसरून असलेल्या गुप्त जाळ्याचे अगोचर धागेदोरे प्रत्यक्ष करण्याची शक्ति. ही शक्ति एकदां विकास पावली म्हणजे कोठलेंच नानात्व आपल्याला बाधत नाहीं. कसलेही सांकडे पडत नाहीं आणि दूर किंवा अगम्य असें कांहींच रहात

नाहीं, सर्वच सर्वांशी संलग्न आणि सर्वच सर्वांना प्रकाशित करण्याला समर्थ अशी स्थिति होऊन जाते.

या विश्वांत सर्वत्र एकरूपताच आहे यामुळें आंत आणि बाहेर असा भेद नाहीं. मनुष्यहृदय आणि विश्वहृदय हीं देखील एकाच वस्तूच्या दोन बाजू आहेत. एकाच रत्नाचे हे निरनिराळे पैलू आहेत. जगणें आणि मरणें हीं एकाच जीवनाची दोन अंगें आहेत. श्वास आणि प्रश्वास या जशा एकाच प्राणाच्या दोन गति आहेत त्याचप्रमाणें उद्भव आणि विनाश ही देखील विश्वनृत्यांतील दोन पावलेंच आहेत. जीवन हे एक अखंड नृत्य आहे. ही एक अनंत सृष्टि आहे. नाडीचे जसे आंकुचन आणि प्रसरणरूपी ठोके चालत असतात त्याचप्रमाणें या विश्वांत देखील तऱ्हेतऱ्हेच्या भरती आणि ओहोटी चालू असतात, आणि जें विश्वांत असते तेंच आपल्या शरीरांत, मनांत, चित्तवृत्तींत आणि सामाजिक जीवनांत अखंड चालू असलेले अनुभवास येते. वर्ष जसें सहा ऋतूंनीं नटलेलें असते त्याचप्रमाणे मानवी जीवनांतही सहा ऋतु आलटूनपालटून येत असतात. आणि समाजांत देखील जी भिन्नभिन्न युगें, विचारांच्या प्रेरणा, कल्पनांचे नाच, आदर्शांची परिवर्तनें उत्पन्न होतात त्यांतही तेंच अनुचक्र दिसून येत असतें. या विश्वविकासांत अखंड एकताही आहे. अनंत विविधताही आहे. आणि नवीन नवीन रूपें धारण करणारी तालबद्धताही आहे.

हे सर्व विश्वरहस्य ज्यानें ओळखलें त्याचें सामर्थ्य अमर्याद वाटतें आणि त्याची शान्ति सर्व परिस्थितींत अभंग रहाते. आणि असा मनुष्य नित्यनूतन अद्भुतें पहात असल्यामुळें त्याचें आश्चर्य कधींही शिळे किंवा म्हातारें होत नाहीं आणि इतकें असूनही त्याचें ज्ञान सर्वांत खोल असते. आणि विश्वाचें रहस्य त्यालाच सर्वांत अधिक स्पष्ट झालें असतें.

अशा विश्वरहस्याचें यत्किंचित ओझरतें दर्शन होतांच कवि गर्जू लागतो.

ए आमार शरीरेर शिराय शिराय
जे प्राण-तरंग-माला रात्रिदिन धाय
सेअि प्राण छुटियाछे विश्वदिग्विजये,
सेअि प्राण अपरूप छन्दे ताले लये
नाचिछे भुवने—सेअि प्राण चुपे चुपे
वसुधार मृत्तिकार प्रति रोमकूपे

लक्ष लक्ष तृणे तृणे संचारे हरषे,
विकाशे पल्लवे पुष्पे, बरषे बरषे
विश्वव्यापी जन्ममृत्यु-समुद्र-दोलाय
दुलितेछे अन्तहीन जोयार-भाँटाय।
करितेछि अनुभव, से अनन्त प्राण
अंगे अंगे अमारे करेछे महीयान।

सेअि जुगजुगान्तेर विराट स्पन्दन
अमार नाड़ीते आजि करि छे नर्तन।

"जी प्राण-तरंगमाला दिवसरात्र माझ्या शरीराच्या नसांनसांतून उसळत आहे तीच या चौदाही भुवनांमध्यें विश्व-दिग्विजय करायला निघाली आहे आणि तोच महाप्राण अद्‌भुत छंदानें निरनिराळे ताल आणि लय धरून नाचत आहे. आणि तोच प्राण गुप्तपणें या वसुंधरेच्या कलेवरावरील प्रत्येक रोमकूपामधून लक्षावधि हंसणाऱ्या तृणांच्या रूपानें संचार करीत आहे. फुटून निघत आहे. आणि वृक्षवल्लीच्या पालवींतून आणि पुष्पांतून विकसित हंसूं लागला आहे.

आणि तोच प्राण जन्ममृत्यूच्या समुद्रलहरींमधून भरती-ओहोटीचे अंतहीन झोके घेत आहे.

आणि तोच अनंत प्राण माझ्या अंगाअंगांतून संचार करून मला महीयान बनवीत आहे याचा मला प्रत्यक्ष अनुभव होत आहे. युगयुगान्तरामधून जो विराट प्राण स्पंदन पावत आहे तोच आज माझ्या नाडीमधून नर्तन करीत आहे. यामुळेंच माझें जीवन गौरवशाली आहे असें मला कळून येतें. आणि या अभेदामुळें माझें जीवन धन्य होतें.

(हें गीत अिंग्रजी गीतांजलींत ६९ वें आहे)

२७

# अद्भूत विशाल मी !

प्रत्येकाला स्वतःचा अनुभव नेहमी असतोच. आणि ज्या जगांत आपण नांदतो तें जग देखील चिरपरिचयामुळें खेळीमेळीचें वाटतें. केव्हां केव्हां उगीचच आपल्या क्षुद्र व्यक्तित्वाचें महत्त्व वाटून आपण अहंकारांत गुरफटून जातों. पण त्यामुळें स्वतःचा किंवा जगाचा परिचय मात्र आपण घालवून बसतों.

उलट, जेव्हां अहंकाराला मूठमाती देऊन आपण आपल्यामधील आणि जगांतील ईश्वरी लीला शुद्ध, आध्यात्मिक, काव्यमय दृष्टीनें पाहातों तेव्हांमात्र आपल्या आनंदाला आणि आश्चर्याला सीमा राहत नाहीं.

जेव्हां आपण आपला देह, आपलें मन आणि त्यांत संचार करणारा प्राण—यांचें खरें स्वरूप समजूं शकतों; आणि हीं तत्त्वें एकाकार होऊन आपल्या शरीरांत चैतन्याची जी अपरूप लीला चालवतात, ती पाहतों; तेव्हांच खरोखर आपण किती अद्भुत आहोंत याचा साक्षात्कार होऊन आपण चकित होतों.

या विश्वांत केवढें मोठें हे प्रकाशाचें प्रदर्शन! आकाशांत दीप्त-दीप-ज्वालेची ही जी दिवसरात्र अखंड नाट्यशाला चालू आहे, तीदेखील किती अद्भुत! ही हरित-श्याम वसुंधरा, समुद्रांची ही चंचलता, पर्वतांचें काठिण्य, तरुपल्लवांची कोमलता आणि घोर अरण्यांतील अंधकाराची गूढता !

आणि माझ्या इन्द्रिय-यंत्रामध्यें इन्द्रजालासारखे हे किती विचित्र, विशाल सृजनाचें जाळे अविश्रान्तपणें रचलें जात आहे ! या विशाल जगांतील प्रत्येक प्राणी पहावा तर त्याच्याहि आंत एक प्रकांड जग साठवलेलें आहे !

हे माझ्या हृदयाच्या राजा ! माझ्या या क्षुद्र जीवनांत तुझें अनंत असीम, विचित्र कान्त आसन पसरलें आहे. आणि तीच तुझी मिलन-शय्या आहे ! हे विश्वभूपा ! माझ्या देह-मन-प्राणामध्यें मी कसा किती अद्‌भुत अपरूप आहे !

देहे आर मने प्राणे हये एकाकार
ए की अपरूप लीला ए अंगे आमार ।

ए की ज्योति, ए की व्योम दीप्तदीप-ज्वाला
दिवा आर रजनीर चिरनाट्यशाला ।
ए की श्याम वसुंधरा, समुद्रे चंचल,
पर्वते कठिन, तरु-पल्लवे कोमल,
अरण्ये आँधार । ए की विचित्र विशाल
अविश्राम रचितेछे सृजनेर जाल
आमार इन्द्रिय-यंत्रे इन्द्रजालवत् ।
प्रत्येक प्राणीर माझे प्रकाण्ड जगत् ।

तोमारि मिलनशय्या, हे मोर राजन,
क्षुद्र ए आमार माझे अनन्त आसन
असीम विचित्रकान्त । ओगो विश्वभूप,
देहे मने प्राणे आमि ए की अपरूप ।

२८

# महान मुक्ति

साधनेचे दोन प्रकार असतात. पहिल्या प्रकारांत चित्तशुद्धि साधावयाची असते. आसक्ति तोडण्यासाठीं चित्तांत विरक्ति स्थिर करावयाची असते. अशा वेळीं भक्त म्हणतो, 'भगवंता! तूच काय तो माझा आहेस. बाकी सर्व मला खेचण्यासाठीं, खाली पाडण्यासाठीं टपून बसलेले आहेत. यांचा संग नको. हे सर्व स्वतः पडणार आण मला पाडणार त्यांच्या मार्गाने जाण्यांत अर्थ नाहीं.'

या मार्गानें मनुष्याला उपरति झाली, चित्तशुद्धि झाली, आसक्ति तुटली, म्हणजे साधक म्हणू लागतो—

अरे मी बाह्य जगाची निष्कारण निंदा केली, सर्वत्र दोषच पाहिले! दोष तर माझ्यांतच होते. माझ्यांतील आसक्ति, एकांगिता, मोह आणि अभिमान गळून गेल्याबरोबर सगळें विश्व कसें सुंदर, मंगल आणि प्रभुमय दिसूं लागलें आहे. हीच खरी ईश्वराची कृपा. माझी आसक्ति आणि माझा अहंकारच मला सर्वकाळ नडत होते. देवा! तुझ्या कृपेनें हें सर्व विश्व प्रभुमय झालें आहे. आतां कोणताहि कोपरा रिकामा न ठेवण्याची जबाबदारी तुझी आहे. दुःख किंवा दुःखाची स्मृतिदेखील आतां शान्तिदायकच होणार. प्रेयसीचें प्रेम जें पूर्वी उन्मादक होतें, तें आतां तसें न राहतां, तुझ्या सान्निध्यानें मधुरमंगल

झालें आहे. जुनी सर्व बंधनें आतां बंधनरूप न राहता, मुक्ति मिळवण्याचीं साधनें झालीं आहेत.

हे सर्व ज्याच्या कृपेनें प्राप्त झालें त्याचीच अहर्निश प्रार्थना केली पाहिजे.

तुमि तबे एसो नाथ, बोसो शुभक्षणे
देहे मने गाँथा एइ महासिंहासने।

मोर दु नयने व्याप्त एइ नीलाम्बरे
कोनो शून्य राखियो ना आर कारो तरे,
आमार सागरे शैले कान्तारे कानने,
आमार हृदये देहे, सजने निर्जने।

ज्योत्स्ना-सुप्त निशीथेर निस्तब्ध प्रहरे
आनन्दे विषादे गाँथा छायालोक–' परे
बोसो तुमि माझखाने। शान्तिरस दाओ
आमर अश्रुर जले, श्रीहस्त बुलाओ
सकल स्मृतिर' परे, प्रेयसीर प्रेमे
मधुर मंगलरूपे तुमि एसो नेमे।
सकल संसारबंधे बंधनविहीन
तोमार महान मुक्ति थाक् रात्रिदिन।

तर मग आतां हे प्रभो! माझा देह आणि मन गुंफून तयार केलेल्या या महासिंहासनावर, शुभ मुहूर्त पाहून येऊन बस. तुझें हें विशाल नीलाकाश माझ्या दोन डोळ्यांत सामावलेले आहे त्या दोन नयनांतच तू येऊन बस. दुसराच कोणी येऊन बसेल असें कोणतेंहि स्थान रिकामें राहूं देऊ नकोस. माझ्या या सागरांत, पर्वतांत, अरण्यांत आणि गहन कांतारांत, माझ्या हृदयांत आणि देहांत; एकांतीं आणि लोकांतीं, तूंच येऊन बस आणि सर्वकांहीं भरून टाक.

रात्रीच्या निःस्तब्ध प्रहरीं, रजनीकांताच्या निद्रित चांदण्यांत, आनंद आणि विषादानें गुंफलेल्या छाया-प्रकाशांत राजासारखा येऊन श्रेष्ठस्थानीं विराजमान हो. माझे अश्रू—ते आनंदाचे असोत किंवा दुःखाचे—त्यांतून शांतिरसच झिरपेल असें कर. माझ्या सर्व भावनावासनात्मक स्मृतींवरून तुझा वरद हात फिरव. प्रेयसीच्या प्रेमांतदेखील मधुरमंगल रूपानें तूंच उतरून ये.

अशा रीतीनें, संसाराच्या समस्त बंधनामध्यें, बंधनविहीन अशा तुझी महान मुक्ति आम्हांला दिवसरात्र लाभो!

# २९

## मृत्यु यावा तर असा !

राजाच्या क्रीडाभुवनामध्ये गान-तान, रागरंग यांची गर्दी उसळली आहे. सर्व गुणीजन आपापल्या कौशल्याची परमावधि करून राजाचें लक्ष वेधू पाहत आहेत. अशा वेळीं जर राजाला झोप येऊ लागली तर हे बाहेरचे गान, तें नृत्य, ते हावभाव आणि विनोद सर्वकांहीं जणू हवेंत विरून जातात सगळीं आकर्षणें, एकामागून एक, जणु लुप्त होतात आणि मग फक्त डोळ्यांत भरणारी झोपच काय ती खरी आणि बरी, असें वाटू लागते. विलासाचें सारें विश्व संपुष्टांत येते आणि केवळ सुगभीर, भरगच्च निद्रानंदच काय तो उरतो.

हा झाला अज्ञानरूपिणी निद्रावस्थेचा प्रकार. आपण जेव्हां जगाच्या राहटींत गुरफटलेले असतो, तेव्हां जर ईश्वरचिंतनाची गोडी लागली आणि ध्यान – भरघोस ध्यान – जर फळाला आले तर हें विश्व जणु ध्यानावस्थेंत वितळून जातें आणि सर्वत्र ही योगमाया चालवणारा योगेश्वर एकलाच उरतो. त्यावेळीं त्याचेखेरीज दुसरें कांहींच उरत नाहीं, दिसत नाहीं, असत नाहीं. एकला आणि अद्वितीय तोच तो तेथें विराजमान असतो.

क्रमे म्लान हये आसे नयनेर ज्योति
नयनताराय; विपुला ए वसुमती
धीरे मिलाइया आसे छायार मतन
लये तार सिन्धू शैल कान्तार कानन;

विचित्र ए विश्वगान क्षीण हये बाजे
इन्द्रियवीणार सूक्ष्म शततंत्री – माझे;
वर्णे वर्णे सुरंजित विश्वचित्रखानि
धीरे धीरे मृदु हस्ते लओ तुमि टानि
सर्वांग हृदय हते; दीप्त दीपावली
इन्द्रियेर द्वारे द्वारे छिल जा उज्ज्वलि
दाओ निबाइया; तार परे अर्धराते
जे निर्मल मृत्युशय्या पातो निजहाते—
से विश्वभुवनहीन निःशब्द आसने
एका तुमि बोसो आसि परम निर्जने।

ध्यान परिपुष्ट होताच डोळ्यांतील बाहुल्यांचे तेज हळूहळू म्लान होत चालले आहे. ही विपुल वसुंधरा आपले सागर, पर्वत, वन, उपवन आदि सर्व घेऊन छायेप्रमाणें लुप्त होत आली आहे. हें अद्‌भुत विश्वसंगीत हळूहळू शांत पडत चाललें आहे आणि इंद्रियवीणेच्या सूक्ष्म शततारांवर क्षीण स्वरानें वाजत असलेलें थोडें थोडें ऐकूं येऊं लागलें आहे. विविध रंगांनीं रंगवलेलें हें तुझें विश्वचित्र तूं आतां आपल्या मृदु हातांनीं हळूहळू माझ्या सर्वांग हृदयांतून खेंचून घेत आहेस. इंद्रियांच्या प्रत्येक द्वारीं जी दीप्त दीपावली चमकत होती, ती तूं आतां हळूहळू विझवत आहेस. त्यानंतर, मध्यरात्रीं जी निर्मळ मृत्युशैय्या तूं आपल्या हातानें पसरवली होतीस तिलाच विश्वभुवनहीन, निःशब्द आसन बनवून, त्या परम एकांत स्थानीं, भगवंता! तूं एकटाच येऊन विराजमान हो.

मृत्यु यावा तर असा यावा. शरीरांतून ज्याप्रमाणें सर्व नाड्या खेंचल्या जातात, त्याप्रमाणें जन्मभर वाढवलेल्या पसाऱ्यांतून, या आपल्या विश्वांतून आपलें आकर्षण मोकळें व्हावें, हीं सर्व बाह्य बंधनें सुटावींत. सृष्टि विलीन होऊन जावी. आपले प्राणहि उरूं नयेत आणि जी कांहीं शेवटची संवेदना उरेल तेथें तूच एकट्यानें विराजमान होऊन बसावेस—असावेस. मी आणि माझें विश्व नाहींसे व्हावे आणि मग फक्त तूंच उरावेस. हाच माझा मोक्ष.

३०
१६६०५

# खरी जीवन-साधना

जे लोक म्हणतात कीं 'रविबाबूंची गीतांजलि म्हणजे जुन्या संतवाणीचे एक सुंदर अनुकरणच आहे' त्यांनीं संतवाणींतील तत्त्वज्ञान आणि रविबाबूंचें तत्त्वज्ञान दोन्ही समजून घेऊन तुलना करून पहावी. प्राचीन संतांच्या वाणींतील प्रधान सूर म्हणजे वैराग्य, त्याग, संसारविमुखता, एकांतसेवन, आणि इन्द्रियांच्या विषयांपासून निवृत्त होणें हाच आहे. हें जग म्हणजे मायेचा पसारा आहे, एक चक्रव्यूह आहे यांत जो शिरेल तो मारलाच जाईल अशी भीति दाखवून मनुष्याला संसारपाशांतून मुक्त करण्याचाच त्यांचा प्रयत्न असतो.

संत अनेक होऊन गेले. दरेकाची श्रद्धा व अनुभूति निरनिराळी असल्यामुळें दरेकाची भूमिकादेखील भिन्न भिन्न असणार. आणि प्रत्येक संत नेहमींच एका सुरांत गात नसतो. ज्यावेळीं जी वृत्ति प्रबळ असेल तीच तो पुढें करणार. यामुळें संतवाणींत आणि संतदृष्टींत पुष्कळशी विविधता आहे. बऱ्याच संतांनीं गृहस्थाश्रम चालविला होता. पुष्कळशा संतांनीं लोकसेवेची कांहींना कांहीं कामें केलींच आहेत. दुःख निवारण्यासाठीं चंदनाप्रमाणें झिजणें हा तर कोमल मनाच्या संतांचा स्वभावच. कांहीं वैष्णव संतांनीं जीवन सुकवून टाकूं नका जीवनावर भक्तिरसाचीं पुटें चढवून ते आनंदमय करा असाही उपदेश केला आहे. हे सर्व जरी खरें असलें तरी संतलोकांना संसारिक जीवनाविषयीं कमी अधिक शिसारीच

होती हें कबूल केलें पाहिजे. जगाच्या रहाटींतून अलिप्त रहावें. सर्वकाळ ईश्वराचे चिंतन करावें, भजन करावे. लोकांना याच मार्गाकडे खेंचावें आणि ऐहिकजीवनाचा भरिभार ईश्वरावर किंवा यदृच्छेवर सोंपवून संतुष्ट असावें अशीच त्यांची शिकवणूक होती.

रविबाबू आधुनिक विचाराचे भक्त आहेत. त्यांना सामाजिकजीवन, राष्ट्रीयजीवन, मानवतेचा विकास या गोष्टींचेंच अधिक ध्यान होतें आणि या व्यापक सेवेच्या द्वारचा भगवंताचें दर्शन आणि पूजन करावें असा त्यांचा उपदेश होता. इन्द्रियांना इन्द्रियांच्या अर्थापासून परावृत्त करणें त्यांना आवश्यक वाटत नव्हतें, उलट वर्ण, गंध, सूर यांच्या विशाल जगाचा शुद्ध आस्वाद अखंड ध्यावा आणि त्यांतूनच ईश्वराचा साक्षात्कार करावा हें त्यांना अधिक पसंत होतें. 'स्वकर्मणा तमभ्यर्च्य' या गीतेच्या व्यापक वचनांत त्यांचें धार्मिक तत्त्वज्ञान बऱ्याच अंशीं येऊन जातें.

एका महाराष्ट्रीय कवीनें या चराचर विश्वाला, या परिस्थित सृष्टीला भगवंताचा 'आद्य अवतार' म्हटलें आहे. रविबाबू म्हणतील तर मग या आद्य अवताराची अवगणना करून मनुष्याचा विकास कसा होईल? या विशाल अवताराचा—सनातन विभूतीचा स्वीकार करूनच याची उपासना करतां येईल. उपनिषत्‌कालीन ऋषींनीं या साऱ्या विश्वालाच एक विराट यज्ञ मानलें आहे. अन्य ठिकाणीं त्यांनीं याला विराट पुरुष म्हटलें आहे. यांतील सर्व व्यापार सूक्ष्मपणें समजून घेणें हेंच ईश्वराचें ध्यान होय. या विश्वव्यापाराचें रहस्य सर्वांना समजावून सांगणें हेंच त्या भगवंताचें कीर्तन होय. या विश्वांतील सर्व सत्त्वांची सेवा करणें हीच भगवंताची खरीखुरी पूजा होय. या विश्वसेवेंतून निसटून जाणें ाहिला काय मुक्ति म्हणतां येईल? चुकारतट्टूपणा कधींच मोक्ष होऊं शकत नाहीं.

जगांत सर्वच आपापला स्वार्थ पहातात. सगळेच मतलबी आहेत असें म्हणणें म्हणजे ईश्वराची सृष्टि पापमय आहे आणि ईश्वर ही सर्व प्रवृत्ति व्यर्थच चालवून राहिला आहे असें म्हणण्यासारखें आहे.

ईश्वर नाहीं असे म्हणणारे लोक अज्ञानी असतील, आंधळे असतील; परन्तु जोपर्यंत ते सत्योपासक आहेत, मानवतानिष्ठ आहेत, सेवापरायण आहेत तोपर्यंत त्यांना नास्तिक कसे म्हणावे? पण जे लोक सृष्टींत सर्वत्र पापच पाप पहातात. सृष्टिक्रमांत ज्यांना कांहींच शुभ दिसत नाहीं त्यांनीं देवाचें नांव कितीही घेतलें तरी त्यांना नास्तिकच म्हणावें लागेल!

खऱ्या-अर्थानें वैराग्य म्हणजे आंधळा स्वार्थ सोडून देणें, इन्द्रियलोलुपतेनें सर्व शक्ति

क्षीण करण्याची आणि उच्चजीवन मलिन करण्याची भूल सुधारणें होय्. कांहीं खादाड लोक भुकेपेक्षां कितीतरी अधिक खातात आणि आजारी पडतात. अशा लोकांना रसनानंद किंवा स्वादानंदही पुरा मिळत नाहीं आणि ते अल्पायु होतात. त्याप्रमाणें कांहीं व्यक्ति, कांहीं जाती आणि कित्येक राष्ट्रं सामाजिक आरोग्याचा विचार न करतां बेसुमार धन गोळा करतात आणि स्वतःच्या जीवनांत आणि जगाच्या जीवनांत विलासिता, युद्ध, अन्याय, वर्गविग्रह, साम्राज्यवाद अशासारखी रोगराई पसरवितात. अशांना निरोगी कसें रहावें हें शिकविण्यासाठीं जें शुद्ध जीवन-तत्त्वज्ञान शिकविलें पाहिजे त्याला वैराग्य हे नांव दिलें तर तें बरोबर होईल. पण जगाला कंटाळणें, सर्व प्रकारची प्रवृत्ति सोडून आळशीपणांत दिवस घालविणें, जीवन शुष्क करून त्याला शून्यरूप करणें याला जर वैराग्यसाधना म्हणावयाची, आणि त्यांतून जो जीवनाचा ऱ्हास उत्पन्न होतो त्याला जर मुक्ति म्हणावयाचे तर ती मुक्ति आम्हांला नको, ती साधना आमच्या कामाची नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. रविबाबूंनीं या गीतांत हीच गोष्ट अगदीं जोरानें मांडली आहे.

उपासनेच्या, सेवेच्या आणि भक्तीच्या वृत्तीनें जगाची सर्व बंधनें स्वीकारणें यांतील आनंद मुक्तिस्वादाचा विरोधक नाहीं. जीवनांत जर मोह डोकावत असेल तर ज्ञानाग्नि पेटवून त्याला मुक्तिरूप करणें शक्य आहे. हृदयांत प्रेम म्हणून जी वृत्ति उठते तिला आर्ततेची दीक्षा देऊन तिला भक्तीचें रूप देणें शक्य आहे. योगाच्या नांवावर हातपाय जोडून किंवा मोडून स्वस्थ बसणें आणि इन्द्रियाची द्वारेंच कोंडून टाकणें ही कांहीं साधना नव्हे. याच्या उलट डोळ्यांना जें कांहीं सृष्टीचें वैभव दिसतें त्याच्या आनंदांतच भगवंताचें दर्शन करणें, पुष्पाच्या सुगंधामध्यें ईश्वराचें प्रेम ओळखणें, आणि रूप, रस, गंध आणि गायन यांच्या आस्वादांत ईश्वराचा प्रसाद मिळविणें हीच खरी साधना आहे. ईश्वराच्या ज्योती-समीप जाऊन अनंत लोकांनीं आपापल्या पणत्या पेटवून घेतल्या आणि विश्वमंदिरांत या सर्व लहानमोठ्या दीपांची दीपावलि साजरी केली तर मुक्तिसाधनेंत कोणतें विघ्न येणार आहे ?

मनुष्याला या विश्वामध्यें पाठवून ईश्वरानें त्याला प्रत्येक क्षणीं सुधेचे प्याले पाजण्याची योजना केली आहे. त्या आमंत्रणाचा अव्हेर करून आपण कोणती साधना साधणार आहोंत ? जीवनांत जें कांहीं क्षुद्र असेल, संकुचित असेल, मलिन असेल तें सर्व दूर करावें. ज्यामध्यें हीनता आहे, द्रोह आहे, विकृति आहे तें सर्व सोडून द्यावें, शुद्ध करावें. आंधळेपणा सोडून दृष्टि विकसित करावी. स्वार्थ सोडून सेवेची दीक्षा घ्यावी. धान्य

ज्याप्रमाणें कोठारांत ठेवून कुजवावयाचें नसतें पण तें भुकेल्यांना खाऊं घालावयाचें असतें किंवा पेरून वाढवावयाचें असतें त्याचप्रमाणें सर्व प्रकारची संपत्ति आणि समृद्धि कारणीं लावावयाची असते. हें जीवनशास्त्र पटवून घेतलें पाहिजे. या सर्व गोष्टींना साधना म्हणतां येईल. यांच्या योगानें जीवन कृतार्थ होईल, सुगंधित होईल. आणि सर्वत्र आनंद पसरील, हाच खरा जीवन-योग होय.

वैराग्यसाधने मुक्ति, से आमार नय।
असंख्य बंधन-माझे महानन्दमय
लभिब मुक्तिर स्वाद। एई वसुधार
मृत्तिकार पात्रखानि भरि बारम्बार
तोमार अमृत ढालि दिबे अविरत
नाना-वर्ण-गंध-मय। प्रदीपेर मत
समस्त संसार मोर लक्ष वर्तिकाय
ज्वालाये तुलिबे आलो तोमारि शिखाय
तोमार मन्दिर-माझे।
इन्द्रियेर द्वार
रुद्ध करि जोगासन, से नहे आमार!
जेकिछु आनन्द आछे दृश्य गंधे गाने
तोमार आनन्द रबे तार माझखाने।
मोह मोर मुक्तिरूपे उठिबे ज्वलिया,
प्रेम मोर भक्तिरूपे बहिबे फलिया।

[हें गीत इंग्रजी गीतांजली मध्यें ७३ वें आहे.]

३१

# मी भोळा मूढ

शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध इत्यादि विषयांकडून हटाग्रहानें स्वतःचें मन मागें खेचणारी वैराग्यसाधना कवीनें कधींच स्वीकारलेली नाहीं. सर्वसामान्य निरोगी, निर्दोष आणि समृद्ध जीवन जगत असतांना, ईश्वराचें स्मरण कायम ठेवावें. सृष्टीच्या लीलेमध्यें भगवंताची लीला आणि प्रेरणा पाहावी, आणि अशा रीतीनें चराचर विश्वाला प्रभुमय समजून त्याची उपासना करावी, ही आहे कवीची सहज साधना. जीवनामध्यें ओतप्रोत असलेल्या जीवनदेवतेला ओळखून, तिच्या हातीं आपलें जीवन अर्पण करावें आणि त्यांतूनच प्रगतीचा रस्ता मिळवावा, अशी आहे रवीबाबूंची जीवनसाधना.

अशा साधनेंत पदोपदीं प्रलोभनें आड येणारच; जगाचे निरनिराळे प्रसंग भुरळ घालणारच; कधीं हंसवतील तर कधीं रडवतील. जगांतील माणसें अनेक वेदनांच्या बंधनानें आणि वासनांच्या आकर्षणानें निरनिराळ्या दिशेने खेचण्याचा प्रयत्न करणार. आसपासची सृष्टि कधीं साधनेच्या बाजूनें मदत करील, कधीं साधना-विमुख करील. अशा वेळी सहज-साधकानें काय करावें ? त्याला ठाऊक असतें कीं भोळा भाव सिद्धीस पावणारच. जणु आपली वीणा प्रभूच्या हातीं द्यावी अशा सहजपणें तो आपलें भोळें मन, आपली जीवन-वीणा प्रभूच्या मांडीवर ठेवून म्हणतो : "हे प्रभु, मोहतंत्रावर आपल्या अंगुलीचा आघात करून, तुला मान्य असलेलें तऱ्हतऱ्हेचें कल्याणमय संगीत यांतून छेडूं लाग.

हे नाथ ! सर्व संवादी जीवनसंगीतच मला शुद्ध वाटेवर ठेवील आणि माझ्या जीवनांत विश्री, कर्णकठोर—असें कांहीं येऊं देणार नाहीं. माझ्या जीवनवीणेंतून तूं जें संगीत छेडशील, तें विश्वसंवादीच असणार. या तुझ्या रहस्यमय विश्वभुवनांत, हे विश्वमोहना ! मी भोळ्यासारखाच भटकत आहे. स्वतःला तुझ्या मांडीवर ठेऊन देऊन मी मोकळा होतों. आतां माझ्या जीवनाचें सार्थक करणें तुझ्या हातीं आहे.

असली सहजसाधन दिसायला सोपी असते. पण सर्वार्पणाची भावना हृदयांत जागवणें आणि टिकवणें सोपें नसतें. तेवढें साधलें तर बेडा पार.

तोमार भुवन-माझे फिरि मुग्धसम
हे विश्व मोहन नाथ। चक्षे लागे मम
प्रशान्त आनन्द-घन अनन्त आकाश;
शरत्-मध्याह्ने पूर्ण सुवर्ण-उच्छ्वास
आमार शिरार माझे करिया प्रवेश
मिशाय रक्तेर साथे आतप्त आवेश।
भुलाय आमारे सबे। विचित्र भाषाय
तोमार संसार मोरे काँदाय हासाय;
तव नरनारी सबे दिग्विदिके मोरे
टेने निये जाय कत वेदनार डोरे,
वासनार टाने। सेइ मोर मुग्ध मन
वीणासम तव अंके करिनु अर्पण–
तार शत मोह-तंत्रे करिया आघात
विचित्र संगीत तव जागाओ हे नाथ।

हे विश्वमोहन नाथ ! तुझ्या या विश्वामध्यें मी अजाण बावळटासारखा फिरत आहे. (बंगालमध्यें 'बाउल' म्हणून एक संत-संप्रदाय आहे. बाउलचा अर्थ बावळट. या संप्रदायाची रवीन्द्रनाथांना मोठी कदर होती.) येथें तुझें प्रशान्त, आनंदघन, अनंत आकाश माझ्या दृष्टीला स्पर्श करतें. शरद्‌कालीन

मध्याह्नसमयीचा पूर्ण स्वर्ण उच्छ्‌वास माझ्या शिराशिरांमध्यें शिरून, माझ्या रक्तांत आतप्त आवेश कालवून देत आहे. (शरदृतूंतील सोनेरी पिकांचा सुगंध दोनप्रहरीच्या गरम गरम हवेंतून नाकांत आणि रक्तांत शिरला म्हणजे चित्तवृत्ति आकूळव्याकूळ आणि उत्तेजित होतात हा अनुभव कोणाला नाहीं?)

सर्वच मला भुलवतात. तुझ्या या विश्वांत तऱ्हेतऱ्हेची भाषा बोलून ते मला रडवतात आणि हंसवतात. तुझ्या जगांतील नरनारी तऱ्हेतऱ्हेच्या वेदनांच्या रज्जूंनीं आणि वासनांनीं मला खेंचून निरनिराळ्या दिशेनें ओढून नेतात.

अशा वेळी, भगवंता! आपली वीणा तुझ्या मांडीवर ठेवावी त्याप्रमाणे मी माझें भोळें मन तुला अर्पण करतों. आतां या जीवनवीणेच्या मोहतंत्रावर (हिच्या तारांवर) तुझ्या अंगुलींचा आघात करून हिच्यांतून अवनवें अद्भुत संगीत जागवून दे. नवे नवे सूर हिच्यांतून उठूं देत म्हणजे आपोआप सर्व मोहांचा विलोप होईल आणि केवळ तुझेंच संगीत उरेल.

हाच भाव निराळ्या संदर्भानें पुढच्या गीतांत (नं. ३२) मध्यें व्यक्त झाला आहे.

अनुक्रम ४६५०८ वि: निबंध
क्रमांक १५५८ नों: दि: २५।८।६८

३२

# "मुक्तद्वार"

घरचा गोऱ्हा जर फार मस्ती करूं लागला तर त्याची मस्ती जिरविण्याचा एक अंतिम उपाय त्याला मारून टाकणें हा आहे. मेलेला बैल कसलीच मस्ती करीत नाहीं, पण तो शेतीचा नांगरही खेंचीत नाहीं किंवा गाडीही ओढीत नाहीं. मस्तीहि गेली आणि बैलहि गेला. असला इलाज काय कामाचा? रोग दूर करण्यासाठीं रोग्यालाच मारून टाकण्याची जो सूचना करतो त्या वैद्याला वैद्य कोण म्हणेल? रूप यौवन पाहून डोळे विकारी होतात या भयानें ज्यानें डोळे फोडून घेतले त्याला भगवंताचे दर्शन घेणेंहि अशक्य झालें. आंधळ्या डोळ्यानीं हिमालयांतील पवित्र स्थानें, समुद्रकांठची तीर्थक्षेत्रें, प्रयाग येथील संगम, क्षीर भवानीची पुष्करिणी, वसुधारेचा प्रपात यांपैकीं एकहि पुण्यपावन स्थान पाहून त्याला आपलें जीवन पुनीत करतां यावयाचे नाहीं. अशा मार्गाला साधना कसें म्हणावें? रस्त्यावरची धूळ उडून घरांत येते एवढ्यासाठीं ज्यानें दरवाजे आणि खिडक्या कायमच्या बंद केल्या त्यानें शुद्ध हवा आणि पावक प्रकाश दोन्हीहि घराच्या बाहेर काढली आणि आंत अंधार आणि दुर्गंधी सांठवून ठेविली याविषयीं कांहीं शंका आहे का?

मनुष्य जेव्हां अंतर्मुख होऊन आपल्या जीवनांत सुधारणा करण्याचा संकल्प करतो तेव्हां कधीं कधीं एक चूक सुधारूं जाता दुसरी घोडचूक करून बसतो. आणि मग पुनः अंतर्मुख झाल्यावेळीं दुसऱ्या चुकीबद्दल पश्चात्ताप करण्याची पाळी येते.

कवि एकदां रात्रीं एकांतात आंथरुणावर बसून गतजीवनाचा आढावा घेत होता आणि आपण उन्नतीसाठीं काय केलें आणि त्यांत काय-काय चुकले याचे चिंतन करीत होता

तेव्हां जणुं कां प्रत्यक्ष भगवंतानेंच त्याची एक चूक दाखवून द्यावी अशा रीतीनें एक गोष्ट त्याच्या हृदयांत स्फुरली. त्याच्या हृदयांत शिरून अंतर्यामीनें त्याला संबोधून म्हटले—

अरे वेड्या, स्वतःलाच विसरणाऱ्या विसरभोळ्या, आणि अहंकारानें माजलेल्या उन्मत्ता, जोपर्यन्त तू आपली सर्व द्वारें उघडी ठेविली होतीस तोपर्यंत या चंचल जगांतील प्रकाश, अंधार, सर्व प्रकारच्या चुका, धूळ, माती, दुःख शोक, बरें-वाईट, गायन-आक्रोश, सुगंध-दुर्गन्ध सर्व घेऊन तुझ्या या मुक्त द्वारांतून हे विश्व तुझ्या घरांत प्रवेश करीत असे. त्याचेबरोबर तुझ्या उघड्या दरवाजाखिडक्यांतून मीहि अज्ञातरूपानें खाली उतरून असंख्य वेळां येत असे. आतां दरवाजे बंद करून जर तूं हातांत माळा घेऊन माझ्या नांवानें हांका मारल्यास (माझ्या नामाचा जप केलास) तर तुझ्या चित्तामध्यें मी कोणच्या रस्त्यानें शिरावे ?

दरवाजे बंद करून विश्वाला बाहेर ठेवलेस तर बरोबर विश्वपति मी देखील बाहेरच राहिलो ना ? तसें करूं नकोस. सगळीं द्वारें श्रद्धापूर्वक उघडी ठेव. विश्वाला तुझ्या घरीं मुक्त द्वार असू दे.

निर्जन शयन-माझे कालि रात्रिवेला
भाबितेछिलाम आमि बसिया एकेला
गतजीवनेर कत कथा; हेन क्षणे
शुनिलाम, तुमि कहितेछ मोर मने—
'ओरे मत्त, ओरे मुग्ध, ओरे आत्मभोला,
रेखेछिलि आपनार सब द्वार खोला--
चंचल ए संसारेर जत छायालोक,
जत भूल, जत धूलि, जत दुःखशोक,
जत भालोमन्द, जत गीतगंध लये
विश्व पशेछिल तोर अबाध आलये ।
सेइ साथे तोर मुक्त वातायने आमि
अज्ञाते असंख्य बार एसेछिनु नामि ।
'द्वार रुधि जपितिस जदि मोर नाम
कोन् पथ दिये तोर चित्ते पशिताम' ।

३३

# तेच पदध्वनि

एखाद्या फुलाचा विकास आणि राष्ट्राचा विकास देवाच्या दृष्टीनें दोन्ही सारख्याच महत्वाच्या गोष्टी आहेत. लहान मुलें खेळतांना चिडली म्हणजे एकमेकांच्या बाहुल्या व खेळणीं मोडून टाकतात. राष्ट्रें आपापसांत भांडू लागली म्हणजे एकमेकांच्या फौजेतील तरुणांची कत्तल करतात. आपल्याला वाटते कीं मुलांचा खेळ म्हणजे पोरखेळ आहे; आणि राष्ट्रांराष्ट्रांतील युद्धें मात्र संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेलें बलिदान आहे. देवाच्या दृष्टीनें दोन्ही सारखेच पोरखेळ आहेत किंवा दोन्ही सारख्याच महत्त्वाच्या प्रवृत्ति आहेत. मुलांना आपल्या खेळाचें महत्त्व कमी वाटत नसते.

आधुनिक ज्योतिषशास्त्र अनंत कोटी ब्रह्मांडाचे नियमन कसे होते हे शोधून काढते आणि आधुनिक पदार्थ-विज्ञान विद्युत-अणूंच्या रचनेचे आणि व्यापाराचे शास्त्र बनविते. शेवटीं दोघांना असे दिसून आलें कीं एकच नियम येथून तेथून एकसारखा लागू आहे. रक्तांतील सूक्ष्म कीटांना, जंतूंना आपण सूक्ष्म म्हणतो आणि ताऱ्यांना परम महान म्हणतो पण हे तारे देखील ज्याच्या शरीरांतील सूक्ष्मातिसूक्ष्म जंतू आहेत असा विराट पुरुष असणें अशक्य नाहीं. आणि हे सूक्ष्म कीटाणु देखील ज्यांना विराट पुरुषासारखे भासतात अशी, मनुष्य कल्पनेंत प्रवेशहि न करणारी, सूक्ष्म सृष्टि असणेहि अशक्य नाहीं. तेव्हां दोन्ही टोंकांनीं अनंत असलेल्या विश्वाचा जो स्वामी त्याच्या दृष्टीनें सर्वच महत्वाचे किंवा सर्वच पोरखेळ असे म्हटले पाहिजे.

ही झाली तात्विक विचारणा. मनुष्याला आपल्या नित्याच्या शतवर्षीय जीवनांत देखील असाच अनुभव येतो.

लहानपणीं जेव्हां ईश्वराची कसलीच कल्पना नव्हती आणि तुच्छ खेळांतच आपण गर्क होतो तेव्हां ईश्वर आपला संवगडी होऊन आपल्या खेळांत मिसळला. आपल्या बरोबर हासला, खिदळला आणि जोराजोरानं भांडून त्या खेळांत गोडी आणण्याचे कामही त्याने कमी केले नाहीं. मोठेपणीं जेव्हां ईश्वराची कांहींशी कल्पना झाली आणि साधना साधल्यानंतर जीवनामध्यें त्याच्या अस्तित्वाचा भास होऊ लागला तेव्हां या नव्या दृष्टीने लहानपण तपासतां दिसून आले कीं त्या काळच्या तुच्छ हर्षशोकांमध्यें देखील ईश्वराच्या अमर खुणा उमटल्या आहेत. लहानपणीं जे खडे घेऊन खेळलो ते देखील ईश्वराच्या स्पर्शानें बहुमूल्य रत्नें झाले आहेत. लहानपणी लपंडाव खेळत असतांना ज्या लबाड पायांची चाहूल आपण ऐकत होतो त्याच पायांचा गंभीर पदध्वनि आज आपल्याला सूर्य-चंद्राच्या आणि असंख्य ताऱ्यांच्या या विशाल आणि अनंत रासामध्यें—दिव्यरासांमध्यें—ऐकू येत आहे. मी जेव्हां अबुद्ध होतों, गफलतीत होतो तेव्हां देखील भगवंता, न बोलावतां माझ्या हृदयांत आला आहेस. न बोलावलेल्या भिकाऱ्यांनी मेजवानीच्या द्वारी गर्दी करावी त्याप्रमाणें या तुच्छ वस्तूंनी माझ्या जीवनद्वारीं गर्दी केली असे. त्या तुच्छ वस्तूंत देखील, या भिकाऱ्यांत देखील अज्ञातपणें तू येऊन उभा राहिला आहेस. तुला काय म्हणावें हेच समजत नाहीं. तू थोर असूनहि पोर आहेस. पोर होऊनहि तुझे थोरपण नष्ट होत नाहीं. तुला ओळखणें अजून बाकीच आहे. तू माझ्या पोरपणाची उपेक्षा केली नाहींस. माझे बालपणाच्या खेळाकडे पाठमोरा झाला नाहींस. आजहि या विराट जीवन-लीलेमध्यें तू त्याच तुझ्या सनातन पारमार्थिकतेनें भाग घेत आहेस.

तखन करि नि नाथ, कोनो आयोजन;  
विश्वेर सबार साथे हे विश्वराजन्,  
अज्ञाते आसिते हासि आमार अन्तरे  
कत शुभदिने; कत मुहूर्तेर' परे  
असीमेर चिन्ह लिखे गेछ। लइ तुलि  
तोमार स्वाक्षर-आँका सेइ क्षणगुलि—

देखि तारा स्मृति-माझे आछिल छड़ाये
कत-ना धूलिर साथे, अछिल जड़ाये
क्षणिकेर कत तुच्छ सुखदुःख घिरे।

हे नाथ, अवज्ञा करि जाओ नाइ फिरे
आमार से धुलास्तूप खेलाघर देखे;
खेला-माझे शुनिते पेयेछि थेके थेके
जे चरणध्वनि, आज शुनि ताइ बाजे
जगत्-संगीत-साथे चन्द्रसूर्य-माझे।

हे नाथ, त्यावेळीं मी कसलीच तयारी केली नव्हती, कसलीच साधना हातून घडली नव्हती. हे विश्वराजन्, जेव्हां तुला मी ओळखतहि नव्हतों अशा वेळीं अज्ञातपणें कितीतरी शुभ दिवशीं विश्वांतील सर्वांबरोबर माझ्या हृदयामध्यें तू हंसत प्रवेश केला आहेस. आणि किती तरी मुहूर्तांवर तू आपल्या आनंत्याची मोहर मारली आहेस.

त्यावेळीं आपल्या स्वाक्षराची मुद्रा ज्या क्षणांवर उमटविलीस ते क्षण आज जेव्हां स्मरणाच्या हातीं घेऊन पहातो तेव्हां धुळींत मिसळलेले आणि क्षणिक तुच्छ सुखदुःखानें माखलेले आणि इतस्ततः विखरलेले दिसतात.

हे नाथ, त्यावेळीं मला खेळघरांत खेळतांना आणि कचऱ्याचा ढीग करतांना पाहून तू माझी अवज्ञा केली नाहींस आणि माझेशीं पाठमोरा झाला नाहींस. त्यावेळीं माझ्या खेळामध्यें जी तुझी पावलें मला राहून राहून ऐकूं येत त्याच पावलांचा चरणध्वनि मला या विश्वसंगीतांत नृत्य करणाऱ्या चंद्रसूर्यताऱ्यांमध्यें ऐकूं येत आहे.

[हें गीत इंग्रजी गीतांजलींत ४३ वें आहे.]

३४

# तू तेथें सर्व

देवाच्या राज्यांत कोणीच कुणाचा बहिष्कार करूं शकत नाहीं. जेथें सर्वच देवाचीं लेकरें आहेत, तेथें कोण कुणाला दूर ठेवणार? अहंकार, विद्वेष आणि ईर्ष्या यानांच असली पापबुद्धि सुचते. तुच्छ म्हणून, क्षुद्र म्हणून, जेथून कोणाचा बहिष्कार होतो, तें ठिकाण समस्तांचे पिता देवबाप्पा स्वतःच सोडून जातात. क्षुद्रवृत्तीच्या अभिमानी लोकांनांच सामान्य मानवाचा सहवास असह्य होतो. जे महात्मे असतात ते सर्वांचाच स्वीकार करतात. सर्वांचेच प्रतिनिधि बनतात आणि सर्वांचीच सेवा करून कृतार्थ होतात.

प्रस्तुत सुनीतामध्यें कवींनीं ईश्वराचे दीनजनांविषयीचें वात्सल्य फारच सुंदर आणि तेजस्वी शब्दांत व्यक्त केलें आहे.

कारे दूर नाहि कर। जत करि दान
तोमारे हृदय मम तत हय स्थान
सबारे लइते प्राणे। विद्वेष जेखाने
द्वार हते कारेओ ताड़ाय अपमाने
तुमि सेइ-साथे जाओ; जेथा अहंकार
घृणाभरे क्षुद्रजने रुद्ध करे द्वार

सेथा हते फ़िर तुमि; ईर्षा चित्तकोणे
बसि बसि छिद्र करे तोमारि आसने
तप्त शूले। तुमि थाक जेथाय सबाइ
सहजे खूँजिया पाय निज निज ठाँइ।

क्षुद्र राजा आसे जबे भृत्य उच्चरबे
हाँकि कहे, 'स'रे जाओं, दूरे जाओ सबे'।
महाराज, तुमि जबे एस, सेई-साथे
निखिल जगत् आसे तोमारि पश्चाते।

करुणासागरा! तू कधींच कोणाला दूर करीत नाहींस। (आणि म्हणूनच आम्हींहि कुणालाहि दूर करता कामा नये।) भगवंता! मीं ज्या मानाने माझें हृदय समस्त तुला अर्पण करतों त्याच मानानें सर्वांना माझ्या प्राणात साठवण्याचें स्थान होत जातें। द्वेषबुद्धि जेव्हां एखाद्याचा अपमान करून आपल्या दरवाजा समोरून त्याला हाकून लावते, तेव्हां, भगवंता! तूहि त्या गरिबाबरोबर चालता होतोस. अहंकार जिथे तिरस्कारानें क्षुद्र मानल्या जाणाऱ्या लोकांना—गरिबांना दार बंद करतो, तेथून भगवंता तूहि परत फिरतोस. ईर्ष्या चित्ताच्या कोपऱ्यात बसल्या बसल्या तप्त शूलाने तुझ्याच आसनाला छिद्रे पाडीत असते. भगवंता! तू जेथें असतोस तेथें सर्वांनाच आपापले स्थान सहज शोधताच सांपडतें.

एखादा क्षुद्र राजा जेव्हां येतो तेव्हां त्याचे भालदार, चोपदार लोकांना हाकण्यासाठीं उच्च स्वरानें ललकारतात : 'सरा : बाजूला व्हा! दूर व्हा सगळे.' हे देवाधिदेव महाराज! तुम्हीं जेव्हां येता तेव्हां तुमच्या आगमनाबरोबर सगळेच्या सगळे जग तुमच्या मागोमाग येऊ लागतें.

३५

# निवृत्त होताच

नैवेद्यांतील इतर गीतांहून हें गीत निराळें पडतें. येथें नाहीं एखादे चिंतन, नाहीं विशेष जीवनबोध आणि नाहीं कसलीच जीवनचर्चा. एक वेळचा एक मार्मिक अनुभव चित्तांत ठसून गेला त्याचें शब्दचित्र काढल्यावाचून कविच्यानें राहावे ना. कारण या चित्रांत बोधाहून अधिक महत्त्वाचा असा, मनाला गुदगुल्या करणारा अनुभव आहे.

अनुभव भरीव आणि वेधक (significant) असला, म्हणजे त्याचे जोरावर वाटेल तेवढे दार्शनिक सिद्धान्त काढता येतात, बांधता येतात. किंवा जुने एकांगी सिद्धान्त उलगडून त्याची नव्याने, संतोषकारक दृढ रचना करता येते. अनुभव हाच सर्व दर्शनांचा भक्कम पाया आहे. उपनिषदांची एवढी महती मानली जाते, त्याचें कारण हेंच कीं जीवनाचा ठाव पहायला निघालेल्या, परम तत्त्वाचा शोध घेऊं पाहणाऱ्या ऋषींनी आपापले अनुभव विश्वासाच्या भाषेंत त्यांत नमूद केलेले आहेत. जें जसें सुचलें आणि वाटलें तें तसें प्रांजळपणें त्यांनीं बोलून टाकलें. जणू ते म्हणाले. हा आहे आमचा भरीव अनुभव आणि या आहेत आमच्या सार्वभौम कल्पना. आतां यावर जी कांहीं इमारत रचावयाची असेल ती आपण रचूं या. बांधकाम वाढवू किंवा उतारू, एका रीतीनें न जुळलें तर दुसऱ्या रीतीनें रचना करून पाहूं. पण पाया मात्र हलणार नाहीं. कारण तो भक्कम अनुभवच आहे.

कवी म्हणतात :

कालि हास्ये परिहासे गाने आलोचने
अर्धरात्रि केटे गेल बंधुजन-सने;
आनन्देर निद्राहारा श्रान्ति बहे लये
फिरि आसिलाम जबे निभृत आलये
दाँड़ाइनु आँधार अंगने। शीतवाय
बुलालो स्नेहेर हस्त तप्त क्लान्त गाय
मुहूर्ते चंचल रक्ते शान्ति आनि दिया।

मुहूर्तेइ मौन हल स्तब्ध हल हिया
निर्वाण-प्रदीप रिक्त नाट्यशाला-सम।
चाहिया देखिनु ऊर्ध्व-पाने; चित्त मम
मुहूर्तेइ पार हये असीम रजनी
दाँड़ालो नक्षत्रलोके।
हेरिनु तखनि—
खेलितेछिलाम मोरा अकुण्ठित मने
तव स्तब्ध प्रासादेर अनन्त प्रांगणे।

काल संध्याकाळपासून मध्यरात्रीपर्यंत मित्रांसमवेत हास्यपरिहासांत, गानांत आणि आलोचनेंत वेळ कसा गेला तें समजलें नाहीं. आनंदामुळें झोप पळून गेली आणि शेवटीं पदरी पडला थकवा. तो सुखमय थकवा घेऊन माझ्या घरीं एकांतांत आलों आणि अंगणांतील अंधारांत उभे राहिलों. आमोदप्रमोदाच्या उत्तेजनेमुळें रक्त जोरानें वाहत होतें. शरीर तप्त क्लान्त झाले होते. इतक्यांत थंड वाऱ्याची झुळूक येऊन तिने तापलेल्या आणि थकलेल्या शरीराला प्रेमानें गोंजारलें आणि पाहतांपाहता चंचळ रक्तांत शान्ति आली. नाडी शांतपणें वाहूं लागली.

थोड्याच वेळांत, ज्याप्रमाणें नाटकगृह रिकामें होऊन दीपशून्य व्हावें, त्याप्रमाणें माझें हृदय मौन झालें, स्तब्ध झालें. वर पाहिलें तर माझें चित्त असीम रजनीच्या पार निघून जाऊन नक्षत्रलोकांत उभें आहे.

आणि तेथें मला काय दिसलें ! भगवंता ! मनांत कसलाच संकोच न बाळगता, तुझ्या शांत प्रासादाच्या अनंत आंगणांत आपण खेळू लागलो आहोत.

स्नेह्यासोबत्यांच्या गानतानांतून आणि हासपरिहासांतून थकून एकांतात यावें म्हणजे तेथें श्रमपरिहार होतो, उत्तेजना ओसरते. पण अशी पोकळ शांति थोडीच टिकणार ? चित्त पाहतांपाहतां आपल्या, अर्थात् भगवंताच्या स्वानंद-साम्राज्यांत पोहोंचते आणि तेथे असा कांहीं खेळ खेळते की त्या खेळांत परमानंद असूनहि उत्तेजना नसते. आणि खेळ संपल्यानंतर येणारा थकवाहि नसतो. खेळ हीच विश्रांति आणि विश्रांति हाच खेळ.

संसार आणि परमार्थ यांतील भेद तो हाच.

[हें गीत इंग्रजी Crossing मध्यें ५७ वे आहे.]

३६

# जीवन यात्रेचा पथिक

कितीहि दीर्घ आणि समृद्ध असलें तरी एका जीवनांत मनुष्य अनुभव मिळवून मिळवून किती मिळवणार ? गर्भश्रीमंतींत वाढलेल्या कवीला भिकाऱ्याचें दैन्य, अजाण्या प्रदेशांत भटकणाऱ्या पांथस्थाचे जीवनानुभव आणि त्यांची विटंबना, स्त्रियांच्या भिन्नभिन्न प्रसंगींच्या अनुभवांचें काहूर–इत्यादि सर्व त्याच्या अनुभवांत शिरावे कसे ? पण कवीजवळ सूक्ष्म आणि तीक्ष्ण सहानुभूति असते. त्याला परकायाप्रवेश करण्याची सिद्धि मिळाली नसली तरी परचित्त-परिचय मिळवण्याची आणि हेरण्याची त्याची शक्ति असाधारणपणे वाढलेली असते आणि म्हणून त्याला सुजन–दुर्जन, सरळ आणि कुटिल, भोळे आणि धूर्त, विसराळू आणि दीर्घद्वेशी—अशा सर्व प्रकारच्या माणसांशीं आणि त्यांच्या मानसांशीं एकरूप होता येते. आणि मनुष्याला केव्हां कशी उपरति होऊं शकते याचाहि कयास त्याला असतो. आणि म्हणून कवी बहुरूपी आणि बहु-अनुभूति असतो.

प्रस्तुत काव्यांत कवी पांथस्थाशीं एकरूप झालेला आहे.

यात्रेकरू म्हणजे कांहीं एका कुटुंबाचे कुटुंबीजन नव्हेत. एका संस्थेचे सदस्य नव्हेत. ते एका सेनेचे सैनिकहि नव्हेत. ते एकमेकांना भेटतात, एकमेकांत मिसळतात. प्रसंग-विशेषीं एकमेकांना मददहि करतात. पण दरेकाचा जीवनक्रम निराळा. प्रत्येकाचे पूर्वजीवन दुसऱ्याला थोडेंच ठाऊक असणार. आणि पुढें कोण कोठें जाईल याची कल्पना तरी कशी

होईल. पण हे असे अलिप्त पान्थस्थ मिळून वाट चालतात. दुपारी एकाच धर्मशाळेंत आपापला स्वयंपाक करून जेवतात. थोडी विश्रांति घेत असतांना आपापसांत वार्तालाप करतात आणि संध्याकाळीं, आपापल्या श्रद्धेप्रमाणे देवदर्शनाला जातात. तेथें प्रत्येकाचें भगवंताशीं रहस्य निरनिराळें ! आणि रात्र संपली म्हणजे दुसरे दिवशीं प्रत्येकाची वाट निराळी.

अनेक जन्मांच्या परंपरेने बनणारी प्रत्येक मानवांची जीवनयात्रा देखील अशीच नसते कां ?

कोथा हते आसियाछि, नाहि पड़े मने,
अगण्य जात्रीर साथे तीर्थदरशने
एइ वसुंधरातले ! लागियाछे तरी
नीलाकाश-समुद्रेर घाटेर उपरि।

शुना जाय चारि दिके दिवसरजनी
बाजितेछे विराट संसार-शंखध्वनि
लक्ष लक्ष जीवनफुत्कारे। एत बेला
जात्री नरनारी–साथे करियाछि मेला
पुरीप्रांते पांथशाला–' परे। स्नाने पाने
अपराह्ण हये एल गल्पे हासिगाने।

एखन मंदिरे तव एसेछि हे नाथ,
निर्जने चरणतले करि प्रणिपात
ए जन्मेर पूजा समापिब। तार पर
नवतीर्थे जेते हबे हे वसुधेश्वर।

असंख्य यात्राळूंच्या बरोबर तीर्थदर्शनासाठीं या वसुधातलावर मी कोठून आलों आहें, हें ध्यानांत येत नाहीं. आकाशरूपी समुद्राच्या घाटावर माझी जीवननौका येऊन लागली आहे.

लक्षावधि जीवनांच्या फुत्काराचा विराट शंखध्वनि वाजत असलेला, दिवसरात्र चारी दिशांनीं ऐकूं येत आहे. नगराच्या एका बाजूला पांथशालेमध्यें (धर्मशाळेंत) यात्रेकरू नरनारींच्या बरोबर मीं मेळा जमवला आहे. स्नान, पान, गप्पागोष्टी आणि हास्यगान करतां करतां दिवस मावळला.

आता अलिप्त होऊन, हे नाथ! तुझ्या मंदिरांत आलों आहें. एकांतांत तुझ्या चरणीं मी प्रणिपात करीत आहे. या जन्माची पूजा अशा रीतीने समर्पण करून समाप्त करीत आहे. यानंतर, हे वसुधेश्वर! मला पुढल्या जन्मीं एखाद्या नव्याच तीर्थाच्या यात्रेला निघावें लागेल.

३७

# एकान्त दर्शनाची भूक

प्रवृत्ति आणि निवृत्ति मनुष्य जीवनांचीं दोन अंगें आहेत. मानवी मनाच्या या दोन सार्वभौम वृत्ती आहेत. एकानेंच भागणार नाहीं. दोन्ही वृत्तींना जीवनांत यथाकाळी स्थान असणारच.

जेव्हां साधक अवस्था असते तेव्हां जनसंमर्दापासून निवृत्त होऊन आत्मशुद्धि करण्यासाठीं आणि शक्तीचा संचय करण्यासाठीं निवृत्त होणें आवश्यक असतें. ही निवृत्ति म्हणजे प्रवृत्तीची पूर्वतयारी होय. या निवृत्तीमध्यें शास्त्राध्ययनाच्या द्वारें आणि सज्जनसंगतींच्या साहाय्यानें भगवंताचा जगाबरोबर परिचय करून घ्यावयाचा असतो.

अशा तऱ्हेनें मिळवलेल्या ज्ञानाचे सामर्थ्य बरोबर घेऊन नंतर मनुष्यानें जीवनव्यापी प्रवृत्तीत शिरावयाचें असतें. हा आहे सर्व प्रकारच्या पुरुषार्थाचा काळ. याकाळीं मनुष्य ईश्वराला साऱ्या विश्वांत पाहतो. हें विश्वरूप दर्शन नव्हे तर विश्वीं विश्वंभराचें दर्शन होय. या प्रवृत्तीमध्यें मनुष्य जगाला ओळखतो. स्वतःला ओळखतो आणि दोन्हीं ठिकाणीं आधाराचे वास्तव्य आहे याचा साक्षात्कार करून घेतो. या प्रवृत्तिकाळीं जर समाजांत सत्ययुग प्रवर्तलें असेल तर साराच समाज ईश्वरपरायण होऊन विश्वमंदिरांतील आरतीचा सोहळा अनुभवीत असतो. येथें विश्वात्मैक्यभाव प्रगट झाला तर तो मोठा साक्षात्कारच होय. याची धन्यता कमी नाहीं. पण मनुष्याला एवढ्यानें संतोष होत नाहीं. विश्वात्मैक्याचा

अनुभव करूनहि जगाची उपाधि सुटलेली नसते. अद्वैतानंदाची पूर्ण गोडी लाभलेली नसते. सर्व शंका दूर झाल्या असल्या, ब्रह्मांडांत एकच परमात्मतत्त्व भरलेले आहे याची प्रचीति आली असली, तरी सर्व प्राक्तन संपलेलें नसतें. प्रारब्ध भोगून संपलेलें नसतें यामुळे सुखदुःखाच्या ऊर्मि निमालेल्या नसतात. संगाची बाधकता जरी उरली नसली तरी त्याचें अस्तित्व जाणवत असतेंच. आणि त्या स्थितींत जरी कर्मबंधन मोक्षाच्या आड येत नसलें तरी वेळ हा घेतेच.

या स्थितींत हुरहुर अशी उरत नाहीं. सर्व प्रकारचा संतोषहि असतो. पण परिपूर्ण तृप्ति होत नाहीं म्हणून भक्त भगवंताजवळ एका खासगी मुलाखातीची याचना करतो. ही एकांतदर्शनाची भूक जेव्हां तृप्त होते तेव्हां भक्ताला कोणतेंही कार्य न उरल्यामुळें आणि सर्व कर्तव्यकर्में पार पडलेलीं असल्यामुळें तो दर्शनानंदांत विलीन होऊन सायुज्य मुक्ति प्राप्त करून घेतो. मनुष्यजीवनाला जर यज्ञ म्हटलें तर हे अंतिम आत्मार्पण अवभृथ-स्नान आहे. किंवा स्वतःचीच अंतिम आहुति देऊन हा आत्मजित् यज्ञ पुरा करावयाचा असतो. सर्वस्व दिल्याने विश्वजित यज्ञ घडतो, तर हे अंतिम आत्मार्पण केल्यानें आत्माजित् अथवा ब्रह्मजित् यज्ञ पूर्ण होत असतो. यासाठींच सर्व जगाला विसरून जीवन-प्रदीपाच्या प्रकाशांत अंतिम दर्शन करण्याची भूक असते.

हें दर्शन जरी डोळाभर हवें असलें तरी दीर्घकाल घ्यावयाचें नसतें. क्षणभरांतच दर्शनाची तृप्ति होऊन आत्मविसर्जन होऊन जातें. याला मोक्ष न म्हणतां निर्वाणप्राप्ति म्हणणें हेंच अधिक योग्य होईल.

महाराज, क्षणेक दर्शन दिते हबे
तोमार निर्जन धामे। सेथा डेके लबे
समस्त आलोक हते तोमार आलोते
आमारे एकाकी –– सर्व सुखदुःख हते,
सर्व संग हते, समस्त ए वसुधार
कर्मबंध हते। देव, मन्दिरे तोमार
पशियाछि पृथिवीर सर्व जात्री–सने
द्वार मुक्त छिल जबे आरतिर क्षणे।

दीपावली निबाइया चले जाबे जबे
नाना पथे नाना घरे पूजाकेरा सबे,
द्वार रुद्ध हये जाबे, शान्त अंधकार
आमारे मिलाये दिबे चरणे तोमार।

एकखानि जीवनेर प्रदीप तुलिया
तोमारे हेरिब एका भुवन भुलिया।

हे महाराज, क्षणभर तुमच्या निर्जन धामामध्यें–एकान्तामध्यें मला आपलें दर्शन द्या. हे देव, जेव्हां आरतीचा वेळ होता आणि मंदिराचीं द्वारें सगळ्यांना उघडीं होतीं त्यावेळीं पृथ्वीतील सर्व दर्शनोत्सुक भक्त-यात्री लोकांबरोबर मीहि तुमच्या मंदिरांत शिरलों. पण त्यावेळीं मनाजोगें दर्शन घडलें नाहीं. तुम्हीहि त्यावेळीं मला पाहिलें किंवा नाहीं कोण जाणे. आता मला बोलावून अगदीं एकांतांमध्यें दर्शन द्या. सर्व सुखदुःखापासून मला निवृत्त करून जगाच्या या सर्व कर्मबंधांतून मला सोडवून जगांतील प्रकाशाच्या बाहेर काढून भगवंता तुमच्या प्रकाशांत मला बोलावून घ्या.

रात्रीं जेव्हां सगळे सर्व पूजक मंदिरांतील दीपावलीचें विसर्जन करून आपापले दिवे घेऊन निरनिराळ्या रस्त्यांनी आपापल्या घरीं परततील आणि मंदिराची कपाटें बंद होतील तेव्हां त्या एकांताच्या शांत अंधकारी मला तुमच्या चरणांची भेट होऊ द्या. म्हणजे सर्व जगाला विसरून, मी माझा स्वतःचा जीवनप्रदीप करून एकटा तुमचें पोटभर दर्शन घेईन.

३८

# माझी भूल झाली तें बरेंच झालें.

गुजरातीमध्यें एक आळशी म्हण आहे कीं 'सकाळीं लवकर उठण्यांत फायदा आहे कीं उशीरानीं उठण्यांत, हें कोणी नक्की केलें आहे?' ही म्हण आपण सोडून देऊं पण ईश्वरभक्तीचा छंद लहानपणींच लागलेला बरा कीं मोठेपणीं लागलेला बरा, याविषयीं दुमत होऊं शकेल खरें.

भक्तीमध्यें आपण आपलें जीवनकुसुम ईश्वराला अर्पण करतों. लहानपणींच जर तें अर्पण केलें तर ईश्वराच्या वाट्याला पूरी न उमललेली आणि सुगंधहि नसलेली कळीच येणार.

पण जर आपण लहानपणीं ईश्वराला आठवण्याचें विसरलो आणि जीवनाला सहजभावे प्रस्फुटित, विकसित होऊं दिलें. आणि मग आपल्यामध्यें अर्पण बुद्धि जागृत झाली तर बिघडलें कोठें? अगदीं लहानपणींच भक्त बनल्याचा संतोष आपल्याला मिळणार नाहीं खरा. पण जीवनसंध्येच्या वैभवांत एक प्रफुल्ल, टवटवीत, सुंदर पुष्प ईश्वराच्या चरणीं अर्पण केल्याचा संतोष काय कमी आहे? आपल्याला उशीरानें जाग आला याचें आपण काय म्हणून वाईट वाटून घ्यावें? 'भूल झाली, भली झाली' असा संतोष आपण कां मानूं नये? अशाच संतोषाने कवीने हें गीत रचलें आहे.

प्रभाते जखन शंख उठेछिल बाजि
तोमार प्रांगणतले, भरि लये साजि
चलेछिल नरनारी तेयागिया घर
नवीन शिशिर-सिक्त गुंजन-मुखर
स्निग्ध वनपथ दिये। आमि अन्यमने
सघनपल्लवपुंज छायाकुंजवने
छिनु शुये तृणास्तीर्ण तरंगिणीतीरे
विहंगेर कलगीते सुमन्द समीरे।

आमि जाइ नाइ देव, तोमार पूजाय;
चेये देखि नाइ पथे कारा चले जाय।
आज भावि, भालो हयेछिल मोर भुल,
तखन कुसुमगुलि आछिल मुकुल—

हेरो, तारा सारा दिने फुटितेछे आजि।
अपराह्णे भरिलाम ए पूजार साजि।

प्रभातकाळीं लोकांना उठवण्यासाठीं जेव्हां तुझ्या प्रांगणांतून शंखांचा आवाज सुरू झाला, तेव्हां नरनारीगण घर सोडून आपापल्या परड्या भरून, नव्या दवबिन्दूने ओलसर झालेल्या आणि गुंजनानें मुखर झालेल्या स्निग्ध वनमार्गानें, चालू लागला. मी मात्र पिसाटासारखा अन्यमनस्क होऊन, सघनपल्लव पुंजयुक्त छायाकुंजवनामध्यें पसरलेल्या गवताच्या शोभेंतून वाहणाऱ्या नदीच्या तीरीं, विहंगाच्या कलगीतानें मुखर झालेल्या मंद समीरणांमध्यें पडून राहिलों होतों.

भगवंता! मीं तुझ्या पूजेला गेलों नाहीं. रस्त्यानें पुजेसाठीं कोण कोण चालले आहेत हेंहि मी नजर करून पाहिले नव्हतें. आज मला वाटतें ती चूक झाली हें चांगलेंच झालें! तो प्रमाद घडला तो फायद्यावरच पडला. कारण त्यावेळची पूजेची फुलें केवळ कळ्याच होत्या.

आतां पहा! आज सगळा दिवस तीं फुलें फुलतच राहिलीं आहेत. दिवस मावळूं लागला आणि मीं माझी पूजेची परडी या टवटवीत उत्फुल्ल फुलांनीं आतां भरून घेतली आहे.

# समयदरिद्री मनुष्य आणि कालेश्वर भगवान

नारदाची एक गोष्ट लोकविश्रुत आहे. एकदां तीर्थ क्षेत्रीं आंघोळ करतांना पाण्यांत बुडी मारून तो वर आला. इतक्या अवधींत स्वप्न पडल्याप्रमाणें त्याचे दोन किंवा तीन जन्महि होऊन गेले. एका जन्मांत राजा होऊन त्यानें कांहीं अनाचार केला असेल. अशा राजाच्या यज्ञांत भाग घेण्याचे पाप धुऊन काढावे म्हणून जे ब्राह्मण प्रायोपवेशन करावयास नदी कांठीं एकत्र जमले होते त्यांना नारदानें नदीच्या बाहेर येतांक्षणींच पाहिलें आणि त्यांचे तोंडून त्या राजाच्या (आपल्याच एका जन्मांतील) अनाचाराची गोष्ट त्यानें ऐकिली. तेव्हां राजाचा तो जन्म हें स्वप्न होतें असेंहि म्हणतां येईना. [गोष्ट नीटशी स्मरणांत नाहीं. पण गोष्टीचा सारांश आणि बोध वर दिल्याप्रमाणेंच आहे] या गोष्टीवरून एवढेंच सिद्ध होतें कीं काळ म्हणून जसा जगांतील एक पदार्थ आहे तसाच तो केवळ एक मनोगत भावहि आहे. आणि अशामुळें कालगणना हें एक गूढ प्रकरण होऊन बसतें. तत्त्वज्ञानांतील सबजेक्टिव्हिटी आणि ऑब्जेक्टिव्हिटी या दोन तत्त्वांची येथें सांगड आहे हेंहि खरें. आणि ती सांगड स्पष्टपणें उमगत नाहीं, हेंहि खरें. अशा स्थितींत 'आयुष्य म्हणजे काय आहे' याची कल्पनाच होऊं शकत नाहीं. ही झाली मानवी अनुभूतीची कथा. पण देवाच्या घरीं याहून कितीतरी अद्भुतें भरलीं आहेत. पंचभूतांचें पदार्थविज्ञान विस्मयकारी आहेच.

सर्व प्रकारच्या भूताटकीनें भरलेल्या मानवी मनाच्या लीला आहेतच आणि या दोहोंमध्यें बहुरूपानें खेळ करणारा काळ आकाशासारखाच अनंत आहे. काळाचा सूक्ष्म आणि विराट विचार करतां मन असें कांहीं गोंधळून जातें कीं काळ आहे किंवा नाहीं याचीच शंका येऊं लागते. मनुष्याचें आयुष्य आणि सृष्टींतील घटना यांची व्यवस्था लावण्यासाठीं काळाचें मापन स्वीकारावें तर त्याची स्वतःचीच निश्चिती नाहीं. त्याचें दर्शन तरी किती विचित्र! एका बाजूनें पहावें तर तोच जन्म, उत्पत्ति आणि विकासाचें रूप धारण करतो. जन्म आणि मृत्यु हीं दोन निरनिराळीं तत्वें नसून एकाच वस्तूचीं दोन दर्शनें आहेत, असाहि साक्षात्कार होतो. या साक्षात्कारामुळें गोंधळलेलीं मनें शांत होतात आणि शान्त, स्थिर मनें अस्वस्थ होतात!

हें सर्व पाहिल्यानंतर भक्त भगवंताला म्हणतो कीं देवा, तूं आहेस कालाध्यक्ष आणि आम्ही आहोंत कालाधीन–तुच्छ प्राणी. यामुळें तुझी लीला आम्हांला समजत नाहीं आणि आमची अधीर धावपळ तुझ्या ध्यानांत येत नाहीं.

तुझ्या कालाला सीमा नाहीं. एका फुलाला पूर्णपणें विकसित करतां करतां युगें गेलीत तरी तुला त्याचें कांहींच वाटत नाहीं. आणि मोठीं मोठीं युगें तुझ्या वाऱ्याला तुझ्या दृष्टीनें फुलाप्रमाणेंच उमलतात आणि कोमेजतात. आमचें तसें नाहीं. आम्ही समय-दारिद्र्यानें ग्रस्त आहोंत. यामुळें आमची धांवपळ कधींच संपत नाहीं–आणि याहून दुःखाची गोष्ट म्हणजे वेळ वाचविण्याच्या धडपडींत आम्ही क्षुद्र कामें, तुच्छ कामें आधीं करीत बसतों आणि ती इतकी कांही माजतात कीं मुख्य कामें बाजूला राहून जातात. पहांटे उठल्यापासून तुझ्या पूजेचा संकल्प आम्ही करतों पण इतर कामांत पूजेला वेळच मिळत नाहीं. सगळा दिवस अशा रीतीनें बिघडविल्यानंतर संध्याकाळीं एका बाजूनें पूजेची तयारी करतों आणि दुसऱ्या बाजूनें पूजेचा वेळ होऊन गेला असेल आतां आपलें जाणें वरातीमागून घोड्यासारखें होणार अशी धागधूगहि वाटत असते अशा मनःस्थितींत तुझ्या मंदिरांत यावें आणि पहावें तो पूजेचा वेळ मुळींच होऊन गेला नाहीं, अजूनही यथेच्छ वेळ आहे असें पाहून समाधानाबरोबर आश्चर्यहि वाटते. कारण कालाच्या बाबतींत आम्हीं हातावरच्या पोटाची माणसें! इतर बाबतींत माणसा-माणसांत श्रीमंत आणि गरीब असा भेद असेल पण कालाच्या बाबतींत सगळेच अगदीं एकसारखें दरिद्री.—

हे राजेन्द्र, तव हाते काल अन्तहीन ।
गणना केह ना करे, रात्रि आर दिन ।
आसे जाय, फुटे झरे जुगजुगान्तरा ।
विलम्ब नाहि‌ को तब, नाहि तब त्वरा—
प्रतीक्षा करिते जान । शत वर्ष ध'रे
एकटि पुष्पेर कलि फुटाबार तरे
चले तव धीर आयोजन । काल नाइ
आमादेर हाते; काड़ाकाड़ि करे ताइ
सबे मिले, देरि कारो नाहि सहे कभु ।
आगे ताइ सकलेर सब सेवा प्रभु,
शेष करे दिते दिते केटे जाय काल–
शून्य पड़े थाके हाय तव पूजाथाल ।
असमये छुटे आसि, मने बासि भय–
एसे देखि, जाय नाइ तोमार समय !

हे राजेन्द्रा, तूं कालेश्वर आहेस. तुझ्या हातीं काल अंतहीन आहे. तो संपण्याची भीतिच नाहीं. रात्र आणि दिवस, क्षण आणि पळ, वर्षें आणि युगें येतात आणि जातात. त्यांची गणना कोण करूं शकतो. ज्याप्रमाणें फुलें उमलावीं आणि कोमेजून गळून पडावीं त्याप्रमाणें युगयुगान्तरांचे होतें. उशीर झाला असें तुझ्या घरीं कधीं नसतेच. तुला कसलीच घाई नसते. कितीही वाट पहावी लागली तरी तुझी तयारी असते. एका कळीचें फूल करण्यांत तू शंभर वर्षें देखील सुखानें घालवूं शकतोस.

आमची स्थिति तशी नाहीं आमच्या हातीं कालाचा सांठा कुठून असणार ? यासाठीं समय हातीं लागावा म्हणून आम्ही सर्व मिळून अनेक प्रकारे धडपड करतों, लटपटपंची करतों. आणि उशीर करण्याची तर आम्हांला सोयच नसते. आणि याचमुळें आम्ही इतर सर्वांची सर्व प्रकारची सेवा अगोदर करून घेतों

आणि ती आटपतां आटपतां सगळाच वेळ संपून जातो आणि जेव्हां वेळेचें दिवाळें वाजतें तेव्हां ध्यानांत येतें कीं तुझ्या पूजेची तयारीहि अजून आम्ही सुरू केली नाहीं.

मुहूर्त गेला, आतां वरातीमागून घोडे होण्यांत काय अर्थ आहे. अशी निराशा आणि हताशा झाली असली, तरी. जाऊन पाहूं या तरी अशा लोभानें तुझ्या मंदिराकडे धांव घेऊन पाहावें तर तुझा समय होऊन गेलाच नाहीं. अजूनहि मुबलक यथेच्छ वेळ आहे असे दिसून येते. धन्य आहे तुझी. तू कालेश्वर खरा.

# तुझें इंगित

जोपर्यंत एखाद्या लिपीचा आपल्याला परिचय झालेला नसतो, तोपर्यंत त्या लिपींत लिहिलेलें एखादें प्रेमपत्र किंवा महाकाव्य आपल्या वाट्याला केवळ रेघोट्याच असणार. धुळींत पडलेलें एखादें बीज जोपर्यंत जीवनस्पर्शानें अंकुरित झालें नाहीं, तोपर्यंत तें एखाद्या खड्याहून, गोट्याहून किंवा वाळूकणांहून निराळें दिसणार नाहीं.

लिपि अवगत झाली किंवा बीज अंकुरित झालें म्हणजे मग सगळा अर्थ लागतो. काव्याचें अथवा प्रेमाचें सौन्दर्य प्रगट होतें. बीज अंकुरलें म्हणजे यथाकाळीं फुलांफळांनी बहरलेला वृक्ष आपल्याला आनंदित करतो.

त्याचप्रमाणे या विश्वांत विधात्याचे काय इंगित भरलेलें आहे हें जोंवर आपण समजून घेत नाहीं तोंवर हें सर्व आपल्या वाट्याला व्यर्थ आणि निरसच असणार. एखादें पत्र आपण उलटें वाचू लागलों तर त्याचा अर्थ आपल्याला कसा लागणार? आपण जर आडमार्गानें गेलो तर त्याला कोण काय करणार? नुकसान आपलेंच व्हायचें. प्रथमपासून आपला प्रयत्न या जगाच्या मुळाशीं असलेलें ईश्वराचें इंगित ओळखण्याचाच असला पाहिजे. या एका महत्वाच्या बाबतींत आपण प्रारंभीं गफलत कशी केली कोण जाणे.

तोमार इंगितखानि देखि नि जखन
धूलिमुष्टि छिल तारे करिया गोपन।
जखनि देखेछि आज तखनि पुलके
निरखि भुवनमय आँधारे आलोके
ज्वले से इंगित; शाखे शाखे फुले फुले
फुटे से इंगित; समुद्रेर कूले कूले
धरित्रीर तटे तटे चिन्ह आँकि धाय
फेनांकित तरंगेर चूड़ाय चूड़ाय
द्रुत से इंगित; शुभ्रशीर्ष हिमाद्रिर
शृंगे शृंगे ऊर्ध्वमुखे जागि रहे स्थिर
स्तब्ध से इंगित।
तखन तोमार पाने
विमुख हइया छिनु की लये के जाने।
विपरीत मुखे तारे पड़ेछिनु, ताइ
विश्वजोड़ा से लिपिर अर्थ बुझि नाइ।

तुझें इंगित जेव्हां मी पाहिलें नव्हतें, जोंवर मला तें समजलें नव्हतें, तोंवर एका धुळीच्या मुठीने त्याला लपवून ठेवलें होतें. आज जेव्हां पाहतों तेव्हां विश्वव्यापी अंधारांत आणि प्रकाशांत तुझें तें इंगित माझ्या पुलकित नजरेला पुंजाळलेलें दिसत आहे. शाखेशाखेवर आणि फुलाफुलांतून तें इंगित फुटून निघत आहे. समुद्राच्या प्रत्येक किनाऱ्यावर, धरित्रीच्या तटातटावर आणि सफेद फेसानें अंकित झालेल्या तरंगाच्या शिखराशिखरावर तें इंगित स्वतःचें चिन्ह अंकित करून द्रुत वेगानें धावत आहे. आणि तुझें तें स्थिर स्तब्ध इंगित शुभ्रशीर्ष हिमाद्रीच्या शृंगाशृंगावर ऊर्ध्वमुखानें, स्थिरपणें पहाटू लागलें आहे.

कोण जाणे कशामुळें त्यावेळीं मीं तुझेविषयीं उदासीन होतों. मीं उलट्याबाजूनें वाचला होता म्हणून तुझ्या त्या विश्वव्यापी लेखाचा अर्थ मी समजलो नव्हतों.

४१

# देवाचा धीर

दार्शनिकांनी ओश्वराला सर्वव्यापी, सर्वज्ञ आणि सर्वसमर्थ म्हटलें आहे. ही तिन्ही विशेषणें ओश्वराला योग्य आहेत. पण अेवढ्यानें ओश्वर पूर्णपणें व्यक्त होत नाहीं. ओश्वर सर्वव्यापी आहे म्हणूनच गुप्त आहे. ओश्वर सर्वज्ञ आहे म्हणूनच दयाळू क्षमावान आहे. आणि ओश्वर सर्व-समर्थ आहे म्हणूनच तो 'सर्व-सह' आहे.

सर्वसमर्थाला विजयाची गोडी काय असणार ! प्रत्येक क्षणीं आणि प्रत्येक स्थानीं जरी त्याचा पराजय होत आहेसे दिसत असले तरी तो गडबडत नाहीं. त्याचे काहींच जात नाहीं. सर्वांनीं सर्वप्रकारें त्याला लुटलें तरी तो अकिंचन दरिद्री होत नाहीं. सर्वांनी त्याचा अिनकार केला तरी त्याचें राज्य नष्ट होत नाहीं. अस्थिर होत नाहीं. त्याला कसलीच घाओ नाहीं. तो स्वतःच्या महिम्याने सर्वत्र सनातन आहे, कृतार्थ आहे.

जो अपूर्ण आहे तो भितो, आणि भितो म्हणूनच भीति दाखवितो. ज्यांनी ब्रह्याला ओळखलें आहे, त्यांनी घोषणा करून सांगितलें आहे—अभय वै ब्रह्म. येथें अभयाचा द्विविध अर्थ घ्यावयाचा आहे. ते कोणाला भीत नाहीं आणि कोणालाहि भेडसावीत नाहीं.

कोणच्याहि रूपांत भीति त्याचेकडे येवूंच शकत नाहीं. "आनंद ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन।"

त्याच्या राज्यांत नरक कुठून असणार. आणि जर नरक नाहीं तर स्वर्गहि कोठून असणार.

स्वर्ग आणि नरक हे मनुष्याच्या कल्पनेचे खेळ आहेत. जोंवर कल्पना आहे तोंवर ते खरे आहेत. ईश्वराला ओळखले म्हणजे कल्पना आपोआप मावळते, विलीन होते. मग फक्त एक भक्तिच उरते. अद्वैताचा आनंद उरतो. आणि या खेरीज कांहींच राहात नाहीं.

देवाला स्वतःची ओळख करून देण्याची कसलीच घाई नाहीं. म्हणूनच तर मनुष्याला त्याला ओळखण्याची घाई असावी लागते. मनुष्य समय-दरिद्री आहे. त्यानें जर वेळींच प्रयत्न न केला आणि ईश्वराला ओळखून घेतले नाहीं तर त्याचे भयंकर नुकसान होणार आहे. कारण त्याचें आयुष्य अल्प आहे. या आयुष्यांत साधलें तर साधलें नाहींतर घात झाला. ज्या मानववीरानें, अध्यात्मवीरानें घोषणा केली—अभयं वै ब्रह्म "खरोखरच ब्रह्म निर्भय आहे", त्यानेंच मनुष्याला धांवाधांव करण्याचा संदेशहि दिला आहे—

**"इह चेत् अवेदीत्, अथ सत्यमस्ति ।**
**न चेत् इहावेदीत् महती विनष्टिः"**

बाबारे, याच जन्मीं त्याला ओळखून घेतलेंस तर तुझ्या जगण्याचें सार्थक झालें, तू वाचलास. उलट जर या जन्मीं तेवढें न साधलें तर मोठा नाश झाला असें समज.

अर्थात् देवाला भिऊन त्याची ओळख होणार नाहीं. भिऊन त्याला आपण दूरच लोटतो. त्याला जवळून यथार्थपणे ओळखले पाहिजे. त्याला ओळखल्यानंतर त्याच्यावर प्रेम न करणे अशक्य आहे. त्याला ओळखणें म्हणजे स्वतःलाच ओळखणें आहे. जेथें दोन असतील तेथें भय आहे. 'द्वितीयात् वै भयं भवति । अभयं वै ब्रह्म ।'

तव पूजा ना आनिले दण्ड दिबे तारे,
जमदूत लये जाबे नरकेर द्वारे,
भक्तिहीने इ बलि एजे देखाय भय
तोमार निन्दुक से जे, भक्त कभु नय ।

हे विश्वभुवनराज, अे विश्वभुवने
आपनारे सब चेये रेखेछ गोपने
आपन महिमा-माझे । तोमार सृष्टिर
क्षुद्र वालुकणाटुकु, क्षणिक शिशिर,

ताराओ तोमार चेये प्रत्यक्ष आकारे
दिके दिके घोषणा करिछे आपनारे ।

जा-किछु तोमारि ताअि आपनार बलि
चिरदिन अे संसारे चलियाछे छलि–
तबु से चोरेर चौर्य पड़े ना तो धरा ।

आपनारे जानाअिते नाअि तव त्वरा ।

जे लोक भक्तिहीन मनुष्याला सांगतात, "जर तुझी भक्तीची भेट घेऊन पूजेला पोहोचला नाहींस तर तुला दंड दिला जाईल, यमदूत तुला धरून नरकाच्या द्वाराकडे खेचून नेतील." ते लोक तुझे भक्त नसून हे भगवंता, ते तुझे निंदक आहेत, तुझे वैरी आहेत.

हे विश्वभुवनराज, तू तर आपल्या महिम्यामध्यें स्वयंपूर्ण आणि संतुष्ट असल्यामुळें या विश्वभुवनांत स्वतःला सर्वांपेक्षां लहान करून गुप्त ठेवीत आहेस. तुझ्या सृष्टीतील क्षुद्र वाळूचा कण आणि क्षणिक दंवबिंदु देखील तुझेपेक्षा स्वतःला अधिक प्रत्यक्ष करून दिगदिगंतरीं स्वतःची घोषणा करतात, स्वतःची स्थापना करतात.

जें खरोखर तुझें आहे तें स्वतःचेंच आहे—आपलेंच आहे असें म्हणून या जगांत ते नेहमींची फसवाफसवी करीत आहेत. इतका दीर्घकाल झाला तरी त्यांची ही लबाडी उघडकीस येत नाहीं.

स्वतःला प्रगट करण्याची, स्वतःची ओळख करून देण्याची तुला कसलीच घाई नाहीं.

आणि तरीहि हे लोक पामरांना तुझी भीति घालूं पाहतात.

४२

# ईश्वराची जवळीक :
# भक्तीचा गौरव.

कोठें अनंतकोटी ब्रह्मांडाचा नायक भगवान आणि कोठे स्वतःच्या जीवनरूपी भातकुलीचा नायक भक्त ! अेक बाजूला अनंत आणि दुसऱ्या बाजूला शून्याहूनहि कमी ! यांचा मेळ व्हावा कसा ? पण भक्तीचा गौरवच असा आहे कीं तिला हा मेळ मिळवता येतो. ज्याची आपण भक्ति करतो त्याला आपलेपासून दूर राहताच येत नाहीं. सलोकता, समीपता, सरूपता अशा पायऱ्यांनी जवळ येऊं दिल्यावांचून भगवंताला राहताच येत नाहीं. आणि शेवटी कसलाच दुरावा सहन न झाल्याने भगवंत भक्ताला आपल्यांत सामावून घेतो. त्याला सायुज्याची पदवी देतो. यांतच भक्तीचा गौरव आहे।

ईश्वराला — नित्यतृप्त ईश्वराला पूजा नको असते. पण भक्त आपल्याच हौसेने भक्ति अर्पण करूं लागला म्हणेज भगवंताला "नाहीं" म्हणवत नाहीं. त्याची कदर करावीशी वाटते आणि मग भक्त जें देऊं पाहतो, तें उत्कंठेने जणू भुकेनें ग्रहण करण्यासाठीं भगवान प्रयत्नपूर्वक उत्कंठित होऊन पुढें येतात.

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तद्अहम् भक्तिउपहृतं अश्नामि प्रयतात्मनः ॥

भक्त जेव्हां भगवंताला आपल्या हृदयांत शोधतो तेव्हां त्याला दिसून येतें कीं तेथें

तो प्रसन्नतेनें आपलें हृदय भरून उरला आहे.

हृदयांतील हा शोध संपवून जेव्हां भक्त बाहेर पाहूं लागतो, तेव्हां त्याला दिसून येतें कीं अेवढें अफाट विश्वदेखील त्याला आपल्या हृदयांत सामावूं शकत नाहीं. शेवटीं भक्त आपलें जीवनसर्वस्व ईश्वराच्या चरणीं वाहतो आणि आपल्या नयनाच्या अश्रूजलाने दानाचें पाणी सोडून कृतार्थ होतो. देवानें थोडेंच म्हटलें होतें कीं "माझी पूजा कर. मला शोधून काढ." पण प्रेमाला कसें राहवेल? भक्तीचाच हा गौरव आहे कीं तिला ईश्वराच्या चरणापर्यंत भक्ताला पोहोंचवल्यावांचून राहवत नाहीं.

सेअि तो प्रेमेर गर्व, भक्तिर गौरव।
से तव अगमरुद्ध अनन्त नीरव
निस्तब्ध निर्जन-माझे जाय अभिसारे
पूजार सुवर्णथालि भरि उपहारे।

तुमि चाओ नाइ पूजा, से चाहे पूजिते;
एकटि प्रदीप हाते रहे से खूँजिते
अन्तरेर अन्तराले। देखे से चाहिया,
एकाकी बसिया आछ भरि तार हिया।

चमकि निबाये दीप देखे से तखन,
तोमारे धरिते नारे अनन्त गगन।
चिरजीवनेर पूजा चरणेर तले
समर्पण करि देय नयनेर जले।

बिना आदेशेर पूजा, हे गोपनचारी,
बिना आह्वानेर खोंज, सेअि गर्व तारि।

हा प्रेमाचाच गर्व—अभिमान आहे, भक्तीचा गौरव आहे, कीं भक्त पुजेचे सुवर्णतबक, उपहारानें भरून, एखाद्या प्रेमिकेप्रमाणें तुझ्या अगमरुद्ध, अनंत,

नीरव, निस्तब्ध एकांतांत अभिसारासाठीं जात असतो.

भगवंता ! तू कांहीं पूजा मागत नाहींस ! पण भक्तालाच तुझी पूजा करण्याची हौस असते. म्हणून तुला शोधण्यासाठीं, हातांत एक लहानसा दिवा घेऊन, अनंताच्या अंतराळांत तो निघाला आहे. निरखून पाहतां त्याला दिसलें कीं त्वां एकट्यानें त्याचें समस्त हृदय भरून काढलें आहे.

असा साक्षात्कार होतांच तो चमकला, आपला दिवा मालवून तो बाहेर पाहूं लागला, त्याला तेव्हां दिसून आलें कीं एवढें हें अफाट विश्व, अनंत गगन तुला आपल्या पोटांत सामावूं शकत नाहीं. तेव्हां भक्ताने आपल्या चिरजीवनाची समस्त साधना तुझ्या चरणीं पूजेच्या रूपानें अर्पण केली आणि त्या समर्पणावर आपल्या डोळ्याचें अश्रूजल सोडलें.

हे लपून राहणाऱ्या भगवंता ! स्वतःला गुप्त ठेवण्यांत आनंद मानणाऱ्या भगवंता ! मागितल्यावाचूनची तुझी पूजा आणि सुचवल्यावाचूनचा तुझा शोध —यांतच भक्ताचा गर्व आणि भक्तीचा गौरव आहे.

ठाणे. स्थळप्रत
दिः
नोंद दिः

४३

# गंगोत्री - सागर आकर्षण

उत्तरेला उत्तुंग हिमालय, दोन्ही बाजूनीं पसरलेले त्याचे बाहू आणि बाकीच्या सर्व बाजूंनीं अखंड गर्जना करणारा गंभीर हिंदी महासागर. यांच्यामधील विशाल भारत–देश हेंच आपलें साधनाक्षेत्र आहे. त्यामुळें आपल्या कविकुलगुरूला समुद्र आणि हिमवान यांच्याच उपमा सुचावयाच्या. हिमालयाच्या प्रचंड पहाडामध्यें थिजून पडलेलें पाणी. त्याला महासागराची हाक थोडीच ऐकूं येणार? "हे चंचल सलिला! येथें काय गोठून पडला आहेस! चल तुला महासागर बोलावीत आहे. महासागराशीं एकरूप होणें यांतच तुझ्या जीवनाचें सार्थक्य आहे. सागराशीं एकरूप होऊन प्रचंड लाटांनीं नाचावे आणि आपल्या गंभीर घोषणेनें आकाशाला निनादित करावे, हें तुझें जीवनकार्य आहे. जीवा! तुला शिवरूप व्हावयाचें आहे" असा संदेश त्या पाण्याला कोण ऐकवणार?

पण पहाटेचे कोमळ सूर्यकिरण गंगोत्रीच्या शिखरावर पोहोचले. त्यांनीं चकाकणाऱ्या गुदगुल्या करून गळाठलेल्या जलबिंदूंना जागें केलें आणि हळूच सरकून कसें वाहूं लागावें हें शिकवलें. त्या जलबिंदूंत जोम आला. त्यांना वाहण्याची गंमत वाटली. खेळ म्हणून ते बिन्दू वाट काढूं लागले. त्यांना त्यांचेसारखेच खेळकर दुसरे जलबिन्दू मिळाले. त्यांचा ल्हानसा प्रवाह झाला. मग काय! दुसरे प्रवाहहि येऊन त्यांना विचारूं लागले. "कोठें चालला?" "तें नाहीं आम्हांला माहीत. जायचें एवढेंच आम्हांला ठाऊक. गेल्यावांचून

राहवत नाहीं म्हणून आम्हीं चाललों."

"आमचीहि तीच गत आहे. आम्हीं होतों तुमच्याबरोबर. मिळूनच जाऊं. जातां येईल तेथें जाऊं. शेवटीं जें असेल तें दिसेलच."

हिमालयांतील जलराशीनें रविकिरणांकडून मिळालेली दीक्षा स्वीकारली आणि त्याचे अनेक प्रवाह, अनेक रीतीने पण एकाच हेतूनें वाहूं लागले.

सागर तर वाटच पाहत होता. माझेंच जलकण–माझेपासून वेगळे झालेले जलकण–आंतरिक ओढीनें, अज्ञात प्रेरणेनें मजकडे येऊं लागले आहेत. त्यांना रस्ता मिळणारच. त्यांच्या मार्गांतील सर्व अडचणी दूर होणारच. आड पहाड असतील ते मार्ग करून देतील. खड्डे असतील ते भरून निघतील. रणे असतील त्यांच्या दलदली होतील. पण हे सर्व जलकण प्रचंड स्रोत होऊन प्रचंड वेगाने, मजकडे येणारच. माझें आह्वान त्यांच्या कानीं पडलें नाहीं म्हणून काय झालें. त्यांच्या हृदयांत तें पोहोंचणारच. आमची ही अज्ञात पण अखंड परस्पर ओढ विजयी होणारच. प्रेमाची ओढ, आत्मीयतेची ओढ असतेच अमोघ. ती विजयी होणारच.

ही ओढ आपलें काम कसें करतें तें तिलाच ठाऊक.

हा प्रेमसृष्टीचा अद्भुत व्यापार पाहून त्यालाच आपल्या गानांतून कवी प्रवाहित करीत आहे.

कतना- तुषार-पुंज आछे सुप्त हये
अभ्रभेदी हिमाद्रिर सुदूर आलये
पाषाण-प्राचीर–माझे। हे सिंधु महान्,
तुमि तो तादेर कारे कर ना आह्वान
आपन अतल हते। आपनार माझे
आछे तारा अवरुद्ध, काने नाहि बाजे
विश्वेर संगीत।

प्रभातेर रौद्रकरे
जे तुषार बये जाय, नदी हये झरे,
बंध टुटि छुटि चले—हे सिन्धु महान्,

सेओ तो शोने नि कभु तोमार आह्वान।
से सुदूर गंगोत्रीर शिखरचूडाय
तोमार गंभीर गान के शुनिते पाय।

आपन स्रोतेर वेगे की गभीर टाने
तोमारे से खूँजे पाय सेअि ताहा जाने।

अभ्रभेदी हिमालयाच्या त्या दूरदूरच्या आलयामध्यें, पाषाणांच्या प्राकृतिक भिंतीमध्यें अवरुद्ध असे कितीतरी हिमपुंज सुप्तपणे पडून आहेत!

हे महान सिंधू! वारि-सागरा! तूं तर आपल्या अतल हृदयांतून या हिमराशी-जवळ तुझें आह्वान पाठवलें नाहींस! तें हिमपुंज आपल्या ठायीं अवरुद्ध होऊन पडलें आहेत! त्याच्या कानीं विश्वाचें संगीत गुंजत नाहीं, गरजत नाहीं!

प्रभातकाळच्या उन्हाच्या किरणांनीं जे तुषार वितळले; ते वाहूं लागले! बंध तुटून, मोकळे होऊन ते नदीरूपानें वाहूं लागले! हे महान सिंधू! जलसागरा! त्यांनीहि तुझें आह्वान कधीं ऐकलें नव्हतें! त्या सुदूर गंगोत्रीच्या चूडामणी शिखरावर तुझें गंभीर गान कोण ऐकूं शकणार?

कोणच्या गंभीर ओढीनें, आकर्षणानें, स्वतःच्या प्रवाहाच्या वेगानें तुला ते शोधूं जातात ते त्यांनाच ठाऊक!

असंख्य जीव परमात्म्याची भक्ति करून त्याच्या चरणीं विलीन होण्याची अखंड साधना करीत असतात! त्यांना नसते कल्पना परमात्म्याच्या स्वरूपाची आणि नसते भावना त्या सर्वेश्वराच्या आकर्षणाची. तरीहि सर्व जीव ईश्वर आराधना, प्राप्तीची साधना कां करतात, कशी करतात तें त्यांनाच ठाऊक! त्यांना राहवत नाहीं हेंच खरें!

## ४४

# देवाची पूजा

जगांतील वस्तु वापरून संपतात. एक वस्तु एकाला दिली तर ती दुसऱ्याला देतां येत नाहीं. यासाठीं ज्यांना आपण श्रेष्ठ मानतों त्यांना द्यायच्या वस्तु अगोदर देऊन टाकतो. त्यांना देऊन जर कांहीं उरलें तर तें (उत्‌शिष्ट) इतरांना देतो. त्याला आपण प्रसाद म्हणतों. शेतकरी आपल्या मळ्यांतील उत्तम नवधान्य, भाजीपाला, नवी फुलें प्रथम राजाला किंवा मालकाला देतो. त्यानंतर मग आपल्या बायकांमुलांसाठीं आणि स्वतः-साठीं ठेऊन घेतो. मालकांनीं जास्ती घेतलें तर बायकामुलांना तेवढें कमी मिळणार आणि त्यांची तृप्ति न झाली तर स्वतः उपाशीहि राहणार. जे आहे त्याचें माप परिमितच आहे आणि एक घेईल तेवढें दुसऱ्यांच्या वाट्याला कमी पडणार. मनुष्याच्या व्यवहाराचें हें असेंच आहे. याच अनुभवाप्रमाणें मनुष्य देवपूजेंत देखील वागतो. जें कांहीं शिजविलें असेल ते सर्व प्रथम नैवेद्य म्हणून देवाला अर्पण करावयाचें. स्वतःसाठीं कांहींच ठेवावयाचें नाहीं. मनुष्यानें ठरविलें आहे कीं देवाला कांहीं खावयाचें नसतें. देव फक्त भावाचा भुकेला आहे. म्हणूनच मनुष्य शिजविलेलें सर्व कांहीं नैवेद्य म्हणून देवाला अर्पण करतो. आणि मग तेंच अन्न ईश्वराचा प्रसाद म्हणून आपल्या कुटुम्बियांबरोबर अतिथिअभ्यागतांसहित सेवन करण्यासाठीं घेतो. देवपूजा प्रथम नैवद्यानें व्हावयाची आणि नंतर आत्मतृप्ति प्रसादानें व्हावयाची.

याच क्रमाने मनुष्याच्या हृदयाला संतोष होतो. पण ईश्वराला हा क्रम मान्य आहे काय ? ईश्वराला याची जरूर आहे काय ?

ईश्वर म्हणत असेल मला निराळा नैवेद्य कशाला दाखवितां. शिजविलेलें अन्न अतिथि-अभ्यागतांना देऊन घरच्या नोकरचाकरांसहित तुम्ही सर्व खा. जें सर्वांना दिलें जातें तें तसें देतांनाच मला पोहोचतें. तुमचे अतिथिअभ्यागत मीच आहें. तुमचे नोकरचाकर मीच आहें. बायकामुलें सोयरेधायरे मीच आहें. आणि तुमच्या पोटांतील भूक ही मीच आहें. या सर्व ठिकाणीं अन्न जसजसें दिलें जातें, वापरलें जातें तसतसें तें मलाच पोहचत असतें. सर्वांना दिल्यानें मला मिळावयाचें कमी होत नाहीं. आणि मी घेतल्यानें जगाला कमी पडत नाहीं.

पूजकांनो ईश्वर म्हणतो, 'खरें सांगू तुम्ही केलेली पूजा पाहून मला हसूं येतें. वस्तुस्थिती अशी आहे कीं हें सर्व तयार करून मीच तुमची पूजा करीत असतों. जगांत जें जें कांहीं तुमचेसाठीं उपभोग्य आहे ते सर्व मी तुमच्यापुढें ठेविलेला नैवेद्य आहे असें समजा. आणि तुम्ही त्याच्या आस्वाद घेत असतां त्याच माझ्या वस्तु मला तुमचा प्रसाद म्हणून मिळत असतात. तशा घेण्यांतच मला खरा आनंद वाटत असतो. ल्हान मुलें आपल्या ताटांतील एखादा गोड पदार्थ केव्हां केव्हां हौसेनें आईच्या तोंडांत घालतात आणि आईहि हसून अगदीं मुलासारखी बनून मुलाच्या हातचा गोड घांस घेते, आणि मिटक्या मारून दाखविते. तुमच्या पूजेंचा स्वीकार अशाच वृत्तीनें मी करीत असतों.

ही सर्व वस्तुस्थिति ज्याला योग्य रूपांत समजली आहे तो कवि स्वाभाविकंपणें म्हणणार कीं—

मर्तवासीदेर तुमि जा दियेछ प्रभु,  
मर्तेर सकल आशा मिटाअिया तबु  
रिक्त ताहा नाहि हय । तार सर्वशेष  
आपनि खूँजिया फिरे तोमारि उद्देश ।

नदी धाय नित्यकाजे, सर्व कर्म सारि  
अन्तहीन धारा तार चरणे तोमारि  
नित्य जलांजलिरूपे झरे अनिवार ।

कुसुम आपन गंधे समस्त संसार
संपूर्ण करिया तबु संपूर्ण ना हय—
तोमारि पूजाय तार शेष परिचय।
संसारे वंचित करि तव पूजा नहे

कवि आपनार गाने जत कथा कहे
नाना जने लहे तार नाना अर्थ टानि,
तोमा-पाने धाय तार शेष अर्थखानि।

हे प्रभो, मर्त्यलोकच्या आम्हां रहिवाश्यांसाठीं तूं जें दिलें आहेस तें आम्हां मर्त्यांची सर्व आशा परिपूर्ण करूनहि संपून जात नाहीं. तें सर्व आम्हीं वापरल्यानंतर उरलेलें शेष म्हणून तुला शोधत तुझेकडेच जातें.

नदी आपल्या वाटेला आलेले नित्यकार्य करण्यासाठीं अखंड वहात असते. हे सर्व कार्य करून शेवटी ती नदी आपली अंतहीन धारा तुझ्या चरणांकडेच घेऊन येते आणि तुझ्या चरणांचे प्रक्षालन करण्यासाठीं जलांजलि रूपाने वहात असते.

हीं फुलें आपल्या सुगंधानें संपूर्ण विश्वाला सुगंधित करूनही संपत नाहींत, कृतार्थ होत नाहींत. तीं शेवटीं पूजेलाच पोचतात. पण खुबी अशी आहे कीं तुझ्या पूजेला पोचल्यानें जग तितक्या फुलांनीं वंचित होत नाहीं. जगाला उपाशी वाळून तुला नैवेद्य ध्यावयाचा नसतो.

आणि माझ्यासारखा कवि देखील आपल्या गीतांमध्यें जें जें कांहीं म्हणतो, व्यक्त करतो, गुंफतो त्यांतून निरनिराळे लोक निरनिराळे अर्थ काढून घेतात. त्या सर्वांची रसिकता तृप्त केल्यानंतर तीं माझीं सर्व गीतें बाकीचा आपला सर्व अर्थ घेऊन तुझ्या चरणांकडेच धांव घेतात. तूच माझ्या गीतसरितांचा समुद्र आहेस. जगाला अर्पण केलेलीं माझीं गीतें खरोखर शेवटीं तुझेसाठींच आहेत.

४९

# भक्ति म्हणजे उन्माद नव्हे

एकदां आम्ही बंगालमध्यें गंगेच्या कांठाकांठानें बेलूडहून खरडह या गांवीं गेलों होतों. चैतन्य महाप्रभूनें तेथें नेडानेडी लोकांचा उद्धार केला होता. तेथें उत्सव चालू होता. एका मोठ्या ओव्यावर पुष्कळसे भक्तजन नामसंकीर्तन चालवीत होते. गातां गातां भावावेषांत येऊन ते उठून उभे रहात, हातवारे करीत, पुनः बसत, पुनः उठत अगदी बेहोष झाल्यासारखे दिसत. अशा रीतीनें ते आपल्या भक्तीचा आवेश बाहेर काढीत होते–अथवा व्यक्त करीत होते. त्यांचा तो चेहरा, ते हातवारे आणि उन्मत्त कंठ सर्व पाहून कांहीं लोकांना धन्यता वाटलेली दिसली. मी मात्र कंटाळून गेलों. आमच्या लहानपणीं ताबूताच्या पुढें अंगांत येऊन नाचणारे लोक पाहिले होते. 'या हुसेन या हसन' करीत ते धावूं लागले म्हणजे कुठें जाऊन पडतील त्याचा नेम नाहीं म्हणून इतर लोकांना त्यांच्या मागून मागून त्यांचे कपडे धरून किंवा त्यांच्या छातीला उपरण्याचा लगाम लावून त्यांना सांभाळावें लागे. 'हे असे काय करतात' असे तेव्हांहि वाटत होते. याला धार्मिकता म्हणावें कीं उन्माद म्हणावें हेंच समजत नसे. लक्षणें सगळी रोगाचीच वाटत.

पंढरपूरला देखील असाच प्रकार पाहिला. कांहीं लोक मंदिरांत किंवा मंदिरांपुढें एकदम लोटांगण घेत, कांहीं नाचत, कांहीं ढळढळां रडत, कांहीं एकदम मागेंपुढें कसलाच संदर्भ नसतां 'विठ्ठला!' म्हणून मोठ्यानें ओरडत. कांहीं भाविक लोक म्हणत कीं श्रेष्ठ सात्विक

भाव प्रगट झाले आहेत. मला तर नरसोबाच्या वाडींत दत्ताच्या देवळासमोर नाचणाऱ्या भूतांचेंच ते अनुकरण होतें असें म्हणावेसें वाटतें.

भक्ति एक उत्कट वस्तु आहे. क्षणभर तिचा परिणाम मदिरेसारखा होणें स्वाभाविक आहे; पण तो स्थायी परिणाम नव्हे, इष्टहि नव्हे. ही एक अपरिहार्य अवस्था असेल तर तिला सहन करावें. तिचें कौतुक करणें किंवा अनुकरण करणें केव्हांहि योग्य होणार नाहीं.

लिंबाच्या रसांत सोडा घातला म्हणजे फुरफुर होऊन एकदम फेंस येतो, बरा दिसतो. ते पाणी पितांना गळ्याला बरेंहि वाटते, पण तो फेस म्हणजे कांहीं जीवन नव्हे. भक्ति ही स्थाई वस्तु आहे, शान्त असली पाहिजे. आईला आपलें हरवलेलें मूल सांपडलें असतां ती त्याला कवटाळून त्याचे मटामट मुके घेते. काय करूं आणि काय नको करू असें तिला होऊन जातें. ती हसूं लागते, रडूं लागते. मुलाला घेऊन नाचूं लागते, पण केव्हांतरी हा उन्माद ओसरला पाहिजे; नाहींतर त्या आईला हर्षवायू झाला आहे असें ठरवून तिचा इलाज करावा लागतो. आणि बिचाऱ्या मुलांचे हालही वाचवावे लागतात हर्षवायूनें मनुष्य कायमचा वेडा झाल्याचीं अथवा मरून गेल्याचीं उदाहरणें आहेत. भक्तीचेंहि जर असेंच झालें तर तिला उन्माद अथवा रोगच म्हणावें लागेल. लग्नानंतर पतिपत्नींनीं एखाद महिना सर्व कामधाम सोडून, इष्ट मित्र सोडून केवळ चैन करण्यासाठीं वाटल्यास कुठें जाऊन यावें. पण मधुमास म्हणजे कांहीं सबंध जीवन नव्हे. जीवनभर जर कोणी तसा वागूं लागला तर त्याला वेड्यांत काढतील. प्रेमाचा पहिला उद्रेक ओसरला म्हणजे प्रेम शांत गंभीर आणि प्रौढ प्रसन्न असावें लागतें. तोच त्याचा स्थायी स्वभाव आहे. भक्तीचेहि तसेंच आहे. बंगालमध्यें वैष्णव लोकांच्या नामसंकीर्तनामध्यें केव्हां केव्हां भक्तीच्या उन्मादाचें प्रदर्शन होतें तें पाहूनच रविबाबूंना हें गीत लिहिण्याचें सुचलें असलें पाहिजे. त म्हणतात

> जे भक्ति तोमारे लये धैर्य नाहि माने,
> मुहूर्तें विह्वल इय नृत्यगीतगाने
> भावोन्मादमत्तताय, सेअि ज्ञानहारा
> उद्भ्रान्त उच्छल-फेन भक्तिमदधारा
> नाहि चाहि नाथ!

दाओ भक्ति शांतिरस,
स्निग्ध सुधा पूर्ण करि मंगलकलस
संसार भवनद्वारे। जे भक्ति-अमृत
समस्त जीवने मोर हअिबे विस्तृत
निगूढ गभीर, सर्व कर्मे दिबे बल,
व्यर्थ शुभ चेष्टारेओ करिबे सफल
आनन्दे कल्याणे, सर्व प्रेमे दिबे तृप्ति,
सर्व दुःखे दिबे क्षेम, सर्व सुखे दीप्ति
दाहहीन।
संवरिया भाव-अश्रुनीर
चित्त रबे परिपूर्ण अमत्त गंभीर।

भगवंता, तुझें स्मरण होतांच ज्या भक्तीचा धीर सुटतो एका मुहूर्तासाठीं नृत्यगीतगायनानें मनुष्य भावोन्मादाच्या उन्मत्ततेमुळें विह्वल होतो. तसली भक्ति मला नको हे हृदयनाथ, ती खरी भक्ति नव्हे, पण भक्तिरूपी मदिरेच्या प्याल्यावर उपसून येणारा उद्‌भ्रान्त-उच्छल फेस आहे. तो ज्ञान-नाशन आहे. दारूचे सगळे गुण त्यांच्यात आहेत. मला असली भक्तिमदिरा नको आहे.

भगवंता, मला शांतिरसांत व्यक्त होणारी भक्ति दे. या जगाच्या भुवनद्वारीं मंगलघट ठेऊन त्यामध्यें स्निग्ध सुधारूप शान्त भक्ति भरून दे. जे भक्ति-अमृत निगूढ, गंभीरपणें माझ्या समस्त जीवनांत पसरून माझ्या सर्व कर्मांना बलिष्ठ बनवेल आणि निष्फळ झालेल्या माझ्या सर्व शुभ प्रयत्नांना देखील आनंद कल्याणमय करून सफल बनवील ते भक्ति अमृत मला दे. मला अशी भक्ति दे कीं जी सर्व प्रेमांतून तृप्ति देऊं शकेल. सर्व दुःखांतून क्षेम उत्पन्न करूं शकेल आणि सर्व सुखांतून दाहहीन दीप्ति अथवा ज्योति दाखवील.

त्या भक्तीच्या योगानें माझे चित्र भावावेगाचे अश्रू-नीर आवरून घेऊन अमत्त गंभीरपणें परिपूर्ण होऊन राहील.

भक्ति हा ईश्वराचा सर्वोत्कृष्ट वर आहे. त्याच्या योगानें मनुष्याचे जीवन शुद्ध, समृद्ध आणि कृतार्थ झालेच पाहिजे. ज्याच्या हृदयांत भक्तीचा उदय झाला त्याचे हृदय धीरोदात्त आणि प्रसन्न-गंभीर झालेच पाहिजे. त्याचे सर्व जीवन धैर्यशाली, दीर्घदर्शी, आस्तिक्यमय आणि कल्याणकारी झालेच पाहिजे. सुखदुःखानें अभिभूत होणे हे लाजिरवाणें आहे. जयानें हुरळून जाणें आणि पराजयानें विझून जाणें हे जर वीराला शोभत नाहीं तर भक्ताला ते अशक्यच झाले पाहिजे. भक्त भावुक अवश्य असेल पण भावपेलव कधींहि होणार नाहीं. अश्रूंची तो कदर अवश्य करील, पण अश्रू ढाळत बसण्याचा दुर्बळपण तो कधींहि दाखविणार नाहीं. भक्ति जर ईश्वराविषयीची भक्ति असली तर ईश्वरश्रद्धेमुळे येणारे सर्व थोर सद्‌गुण भक्तामध्यें प्रगट झालेच पाहिजेत.

## ४६

# अवस्थान्तराचें स्वागत

लालयेत पंच वर्षाणि। या न्यायाने आईबाप, समाज आणि निसर्ग, सर्वच लहान मुलांचे लाड करतात. कुमारांचेदेखील लाड कमी होत नाहींत. अशा लाडांमुळें बालकांच्या आणि तरुणांच्या सर्व शक्तींचा विकास होतो. त्यांचा आत्मविश्वास वाढतो. सर्व प्रकारच्या मधुर रसांचे पान केल्यामुळें जीवनाविषयीं आत्मीयता उत्पन्न होते. आणि मग सर्व प्रकारचा पुरुषार्थ करण्याची, पराक्रम गाजवण्याची लालसाही उत्पन्न होते.

त्यानंतर तारुण्याबरोबर किशोराचा वास्तविक अशा कठोर जगांत प्रवेश होतो. काव्य संपवून निष्ठुर भरीव सत्याचा अनुभव करावा लागतो. आणि म्हणूनच त्याला ईश्वराकडून, पराक्रम करण्याची महत्वाकांक्षा मिळते. संकटांवर विजय मिळवण्यांतच पुरुषार्थ आहे याची कल्पना आली म्हणजे जीवन-संग्रामांत उडी घेण्याची खुमखुमी उत्पन्न होते. खेड्यातला अबोध तरुण राजनगरांत आला म्हणजे तिकडील नागर जीवनाचे धागेदोरे समजण्याची प्रौढी त्याच्यांत यावी लागते. जीवनाचें कठोर सत्य स्वरूप ओळखून त्यात त्याला पुरुषार्थ करावयाचा असतो. बालपणचें कोमल काव्य आतां उरलें नाहीं याचें कधीं तो दुःख करीत नाहीं. नाजुकपणा जाऊन कणखरपणा त्याच्यांत आलेला असतो.

अशा अवस्था-परिवर्तनाची तयारी म्हणून हे प्रार्थनागीत रचलें गेले आहे.

मातृस्नेहविगलित स्तन्यक्षीररस
पान करि हासे शिशु आनन्दे अलस—
तेमनि विह्वल हर्षे भावरसराशि
कैशोरे करेछि पान; बाजायेछि बाँशि
प्रमत्त पंचम सुरे; प्रकृतिर बुके
लालनललितचित्त शिशुसम सुखे
छिनु शुये; प्रभात-शर्वरी-संध्या-वधू
नाना पात्रे आनि दित नानावर्ण मधु
पुष्पगंधे-माखा ।
आजि सेअि भावावेश
सेअि विह्वलता जदि हये थाके शेष,
प्रकृतिर स्पर्शमोह गिये थाके दूरे—
कोनो दुःख नाहि ।
पल्ली हते राजपुरे
एबार एनेछ मोरे; दाओ चित्ते बल—
देखाओ सत्येर मूर्ति कठिन निर्मल ।

मातृस्नेहांतून सुटणाऱ्या स्तन्य-क्षीर-रसाचें पान करून बालक ज्याप्रमाणें आनंदामुळें आणि आरामामुळें हसत असतो, त्याप्रमाणें किशोरवयांत देखील मीं हर्षभरित होऊन भाव-रस-राशीचें यथेच्छ पान केलें आहे. प्रमत्त पंचम सुरांत मीं वंशी वाजवली आहे. प्रकृतीच्या छातीवर लालन–ललित चित्तानें, लाडावलेल्या मनानें, एका शिशुप्रमाणें मीं निद्रासुख घेतलेलें आहे. प्रभात, रजनी आणि संध्या या सुंदरींनीं निरनिराळ्या रंगीबेरंगी मधुरसांत पुष्पांचा सुगंध कालवून त्यानें भरलेलीं निरनिराळीं पात्रें मला आणून दिलेलीं आहेत.

आज जर तो सर्व भावावेश आणि ती सुखविव्हलता संपणार असेल तर खुशाल संपो. प्रकृतीमातेचा स्पर्शमोह कांही दूर झाला तर होवो. ही कांही दुःखाची गोष्ट नव्हे.

भगवंता! भोळ्या खेडेगांवातून आता मला सर्व प्रकारें तरबेज अशा राजनगरींत आणलें आहेस. त्या अर्थी मला चित्ताचें बल दे. येथील वस्तुस्थिति समजण्याचें आणि खबरदारपणें वागण्याचें सामर्थ्य दे. आणि कठिण-निर्मळ अशा सत्यची मूर्ति मला दाखव. कठोर परंतु कल्याणकारी अशा सत्याचें यथार्थ दर्शन मला घडव.

## पराक्रमी जीवन

यौवनोचित वीरकर्म करण्याची दीक्षा देण्यासाठीं परम पित्याला, ही प्रार्थना आहे. "लहानपणचे शोभेचे दागिने आतां उतरावले आहेत. तेव्हां, देवा ! रणगुरु बनून माझ्या हातांत शस्त्र दे. माझ्या पाठीवर बाणांचा अक्षय भाता बांध. आणि मला अस्त्रांची दीक्षा दे. ज्या पितृस्नेहानें आजवर माझे लाड केले, तोच स्नेह मला आतां रणांगणांत उडी ठोकण्याचा आदेश देवो. वीराचा वेश चढवून आतां माझा सन्मान करा. कर्तव्याचें पालन करीत असतां दुःख सहन करण्याची मला संधि मिळावी. सोन्या-मोत्यांचे अलंकार आतां मला नकोत. पण युद्धांतील जखमा हेच माझे अलंकार व्हावेत. लढत असतां कधी विजय मिळेल, कधीं पराजय वाट्याला येईल. दोन्हीं प्रकारें जीवनाची धन्यताच आहे. आतां मला प्रेमाच्या मांडीवर बसवूं नका. कर्मक्षेत्रांत मला स्वतंत्र आणि समर्थ करा.

आघातसंघात—माझे दाँडाइनु आसि ।
अंगद कुंडल कंठी अलंकारराशि
खुलिया फेलेछि दूरे । दाओ हस्ते तुलि
निजहाते तोमार अमोघ शरगुलि,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. अनुक्रम ........ दि: ........

तोमार अक्षय तूण । अस्त्रे दीक्षा देहो
रणगुरु! तोमार प्रबल पितृस्नेह
ध्वनिया उठुक आजि कठिन आदेशे ।

करो मोरे सम्मानित नव वीरवेशे,
दुरूह कर्तव्यभारे, दुःसह कठोर
वेदनाय । पराइया दाओ अंगे मोर
क्षतचिह्न–अलंकार । धन्य करो दासे
सफल चेष्टाय आर निष्फल प्रयासे ।
भावेर ललित क्रोड़े ना राखि निलीन
कर्मक्षेत्रे करि दाओ सक्षम स्वाधीन ।

अंगद, कुंडल, कंठी वगैरे सर्व अलंकारांचा भार उतरावून दूर फेकून दिला आहे आणि आतां मीं आघात-संघातच्या मध्यें येऊन उभा ठाकलों आहे. पितृदेव ! आतां आपल्या हातांनीं माझ्या हातीं तुमचें अमोघ बाण उचलून द्या. आणि तुमचा अक्षय भाताहि द्या. हे रणगुरो ! मला अस्त्रांची दीक्षा द्या. तुमचा प्रबळ पितृस्नेह आज कठोर आदेशाच्या रूपाने गर्जू द्या.

नव्या वीरवेशाने, कठिणांतील कठिण कर्तव्यभाराने, आणि दुःसह कठोर वेदना सहन करण्याची संधि देऊन मला सन्मानित करा. लहानपणच्या दागिन्यांच्या ठिकाणीं आतां माझ्या अंगावर जखमांच्या घावांचा अलंकार चढवा. आणि आपल्या या दासाला सफल प्रयत्न आणि निष्फळप्रयास यांच्या द्वारा धन्य करा.

यापुढें प्रेमानें लाड करणाऱ्या मांडीवर मला बसवून न ठेवतां, पराक्रमांच्या कर्मक्षेत्रांत मला स्वावलंबी समर्थ आणि स्वतंत्र बनवून द्या.

४८

# एक राष्ट्रीय प्रार्थना

रवीन्द्रांनीं भारताला जी अनेक मधुर तेजस्वी आणि उन्नत राष्ट्रगीतें दिलीं आहेत, त्यांपैकीं हें एक प्रख्यात गीत आहे. सन १८९७ सालीं व्हिक्टोरिया राणीच्या डायमंड ज्युबिलीचा उत्सव झाला होता. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेंत 'बोर' लोकांनीं जें डोकें वर केलें होतें तें तीन वर्षांच्या प्रयत्नांनीं इंग्रजांनीं चेचून काढलें होतें. त्यांचा साम्राज्यसूर्य मध्यान्हीं तळपत होता. अशा वेळीं भारतांत लोकांना दास्याचा अपमान किती सहन करावा लागत होता याची कल्पना आजच्या लोकांना होणें शक्य नाहीं.

या अपमानाविरुद्ध डोकें वर करावें, स्वाभिमान सोडूं नये – अशा तऱ्हेची जी चळवळ १९०१ च्या सुमारास देशांत सुरू झाली होती त्याचाच प्रतिध्वनि या राष्ट्रगीतांत आपल्याला ऐकूं येतो. भारताच्या संस्कृतीविषयीं भव्य कल्पना देऊन, या देशाचें भविष्य आपण उज्ज्वल करूं शकूं' असा विश्वास उत्पन्न करणारी हीं गीतें होतीं.

या वेळीं जी थोडीफार जाग्रति बंगालमध्यें झाली तीही असह्य होऊन लॉर्ड करझननें बंगाळची फाळणी करण्याचें ठरविलें. मुसलमानांना हाताशीं धरून पूर्व बंगालांत त्याचें प्राधान्य केलें. असा हा सारा इतिहास आहे. हा ध्यानांत आणला म्हणजेच या सर्व राष्ट्रगीतांची थोरवी ध्यानांत येते.

ए दुर्भाग्य देश हते हे मंगलमय,
दूर करे दाओ तुमि सर्व तुच्छ भय—
लोकभय, राजभय, मृत्युभय आर।
दीनप्राण दुर्बलेर ए पाषाणभार,
एइ चिरपेषणजंत्रणा, धूलितले
एइ नित्य अवनति, दंडे पले पले
एइ आत्म-अवमान, अन्तरे बाहिरे
एइ दासत्वेर रज्जु, त्रस्त नतशिरे
सहस्रेर पदप्रान्ततले बारंबार
मनुष्य-मर्यादा-गर्व चिर–परिहार–
ए बृहत् लज्जाराशि चरण-आघाते
चूर्ण करि दूर करो। मंगल प्रभाते
मस्तक तुलिते दाओ अनन्त आकाशे,
उदार आलोक-माझे, उन्मुक्त बातासे।

हे मंगमलय प्रभो! या दुर्भागी देशांतून लोकभय, राजभय, मृत्युभय इत्यादि सर्व तुच्छ भयें दूर करून दे. दीन-प्राण दुर्बलांच्या छातीवरील पाषणभार, सतत पिसले जाण्याची पीडा, धुळींत पडून राहण्याची नित्य अवनति, क्षणोक्षणीं, प्रत्येक पळीं होणारा हा आत्म-अवमान, आंतून आणि बाहेरून जखडणारे दास्यत्वाचे हे रज्जू, त्रस्तपणें नतशीर होऊन हजारो अधिकाऱ्यांच्या पायाखालीं मानवीय मर्यादेचा आणि स्वाभिमानाचा नेहमी करावा लागणारा त्याग—या सर्व गोष्टी, प्रभो दूर कर. लज्जेचा हा मोठा ढीग, आपल्या चरणाचा आघात करून, चूर्ण करून दूर कर. आणि मंगल प्रभातसमयीं अनंत आकाशाच्या उदार, प्रेरक प्रकाशामध्यें आणि उन्मुक्त मोकळ्या हवेमध्यें आमचें मस्तक उन्नत करून दे.

४९

# जहाजाचे तुकडे करून

हरिदास पुराणिक एक उदाहरण नेहमीं देतात. सिंहाचा एक बच्चा लहानपणापासून कुतऱ्याच्या पिल्लांबरोबर वाढला होता. आपण कुत्रेंच आहोंत असें मानून तो वागत असे. एकदा सिंहाला पाहून, इतर कुत्र्यांप्रमाणें त्यानें पळ काढला. तेव्हां सिंहानें त्याला पकडून आणून सांगितलें कीं तूं कुत्रा नसून सिंहाचा बच्चा आहेस. खात्री पटवण्यासाठीं त्यानें त्या बच्चाला पाण्यांत आपलें प्रतिबिंब पाहायला लावलें आणि विचारलें. "बोल! कोणासारखा दिसतोस, कुतऱ्यासारखा कीं माझ्यासारखा." तेव्हां त्याला गोष्ट पटली. पुढें सिंह म्हणाला कीं 'आतां माझी गर्जना ऐकून तशीच करायला शीक.' तीहि त्याला साधली. कुत्र्यांना ती साधत नव्हती.

बच्चाची खात्री झाली आणि तो सिंहाप्रमाणें वागूं लागला.

अशीच एक गोष्ट राजाच्या मुलाची सांगतात. भिकाऱ्यांनीं त्याला पळवून आपल्या जमातींत ठेवला होता. त्याला वाटे आपणहि भिकाऱ्याचें पोरच आहोंत. पुढें वस्तुस्थिति कळतां त्याने प्रयत्नपूर्वक आपलें राज्य मिळवलें.

स्वराज्य झाल्याबरोबर बरेच दिवस जवाहरलालजींना प्रत्येक सभेस सांगावें लागत असे कीं "लोकहो! विसरूं नका कीं आपण जगांतील एक महान राष्ट्र आहोंत."

प्रस्तुत गीतांत रवीबाबूंनीं एक आंधळ्या सापाचें उदाहरण दिलें आहे. एक आंधळा

साप एका खोल अंधकूपांत पडला होता. देवांनीं त्याच्या डोक्यावर ठेवलेला मणीहि त्याला दिसत नव्हता आणि विहिरींत त्याला सूर्याचें दर्शनहि होत नव्हतें. मग उष्मा त्याला कोठून मिळणार? रवींबाबू म्हणतात "हे विश्वनियंत्या प्रभो! जगत्पते! या आंधळ्या देशाचें असेंच झालें आहे. जी उज्ज्वल संस्कृति याला मिळाली आहे तें रत्नहि याला ठाऊक नाहीं. आणि तुझ्या प्रकाशाचीहि त्याला कल्पना नाहीं. हा तर आपल्या दुर्भाग्याचीं शोकगीतेंच गातो. आणि तूं दिलेला उच्च आदर्श न झेपल्यामुळें आपल्या हिमतीप्रमाणें त्याचे लहान लहान तुकडे करतो. तुझ्याकडे बघण्यासाठीं त्याला डोकेंहि वर करतां येत नाहीं. लाखो लोकांना वाहून नेणाऱ्या नौकेचे जर तुकडे केले तर तिला समुद्र यात्रा करतां येईल काय?

अंधकार गर्ते थाके अंध सरीसृप--
आपनार ललाटेर रतन प्रदीप
नाहि जाने, नाहि जाने सूर्यालोकलेश।
तेमनि आँधारे आछे एइ अंध देश
हे दंडविधाता राजा--जे दीप्त रतन
पराये दियेछ भाले ताहार जतन
नाहि जाने, नाहि जाने तोमार आलोक।
    नित्य बहे आपनार अस्तित्वेर शोक,
    जनमेर ग्लानि। तव आदर्श महान्
    आपनार परिमापे करि खान खान
    रेखेछे धूलिते। प्रभु, हेरिते तोमाय
    तुलिते हय ना माथा ऊर्ध्व-पाने हाय।
        जे एक तरणी लक्ष लोकेर निर्भर
        खंड खंड करि तारे तरिबे सागर?

एका अंधाऱ्या खोल खड्ड्यांत एक आंधळा साप आहे. त्याला आपल्या कपाळावरील दिव्य मण्याचीहि कल्पना नाहीं. आणि सूर्यप्रकाशाची एक

लकीरदेखील त्याला ठाऊक नाहीं. हे दंडविधात्या राजा ! ईश्वरा ! हा आंधळा देशदेखील अंधारांतच खितपत पडला आहे. जें दिव्य रत्न याच्या भालप्रदेशीं तूं चढवलें आहेस तें सांभाळणें याला साधत नाहीं. आणि तुझ्या प्रकाशाचा देखील याला अनुभव नाहीं. आपण जन्माला आलों याची ग्लानि आणि जगत आहोंत याचा शोक हा वहन करीत आहे. तुझ्या महान आदर्शाचे, आपल्या कुवतीप्रमाणें, तुकडे तुकडे करून त्यानें ते धुळींत ठेवून दिले आहेत. हाय रे प्रभो ! तुला पाहाण्यासाठीं त्याला वरच्या बाजूला आपलें डोकेंहि उचलतां येत नाहीं. जें एक जहाज लक्ष लोकांचा आधार, त्याचे तुकडे केल्यानंतर ते समुद्राला तरून जाईल का ?

## ५०

# देवाचे तुकडे केल्यामुळें

नरसोबाच्या वाडीची गोष्ट आहे. एक मनुष्य फक्त नेसलेल्या धोतरानिशीं जमिनीवर गडबड लोळत दत्ताच्या मंदिराला प्रदक्षिणा घालीत होता. घरून गडबड लोळतच तो मंदिराकडे आला होता. सर्व अंग धुळीनें माखलें होतें. तोंड, डोळे, ओठ, भिवया, गाल सर्व कांहीं धुळीनें भरलेले होते. पायऱ्यावरून गडगडत खालीं येतांना बरोबरचे लोक त्याला सांवरत होते. हाहि एक भक्तीचा उत्कट प्रकार आहे असें मला सांगण्यांत आलें. सांगितलेल्या गोष्टी श्रद्धेनें स्वीकारण्याचें तें वय होतें. केवढा हा भक्तिमान मनुष्य ! धन्य आहे याची, असें ताबडतोब वाटलें. पण मनाला कांहीं बरें वाटेना. आपण याचे अनुकरण करावे काय असा विचार मनांत आला पण बाल अभिरुचीनें देखील त्याला थारा दिला नाहीं. पुढें जेव्हां समजलें कीं या मनुष्यानें देवाला नवस केला होता, कांहींतरी संकट दूर व्हावें म्हणून देवाला मागून घेतलें होतें. तेव्हां तर या सकाम भक्तीची ही क्वायत पाहून त्या इसमाविषयीं वाटलेली धन्यताहि ओसरली. गुन्ह्यांत पकडले गेलें असतां मला सोडा म्हणून पोलिसाची खुशामत करणें, त्याचे पाय धरून गयावया करणें यापेक्षां अशा रीतिनें देवाला शरण जाणें हे कितीतरी चांगलें आहे हें खरें. पण देव अशा लोटांगणांनीं संतुष्ट होत असेल काय ? अशी एक शंका मनांत आल्यावांचून राहिली नाहीं.

माझ्या हातून एकदा घरच्या दिव्याचा ग्लोब फुटला होता. वडील रागे भरणार याची

खात्री होती. मी गुन्हा कबूल करून पोटभर रागें भरून घेतलें आणि मोकळा झालों. पण मी वडिलांच्या समोर गयावया करून त्यांचे पाय धरले असते काय? आणि त्यांना तें आवडलें असतें काय? असाहि विचार मनांत आला. (त्या दिवसांत मी सकाळीं उठतांच वडिलांच्या आणि आईच्या पाया पडत असें. त्याची मला गोडी होती, पण क्षमा मागण्यासाठीं किंवा कांहीं मिळविण्यासाठी मी खात्रीनें लोटांगण घातलें नसतें.)

एखाद्याला थोर करण्यासाठीं स्वतःला तुच्छ करणें किती हीनपणाचें आहे याचा विचार करण्यासाठीं त्याकाळीं समजांत पुरेसा मसाला मिळत असे. देवळांत जाऊन नमस्कार केल्यानंतर स्वतःच्या दोन्ही थोबाडांत चापट्या मारून घेऊन 'देवाबाप्पा मला क्षमा कर' असें म्हणून पुढें आपल्या मुलांना तसेंच करण्याला शिकविणारें आईबाप मी पहात होतों. मला तें सर्व कसेसेंच वाटे. आपल्या गांवाहून काशीपर्यंत दंडवत घालीत यात्रा करणारे साधूहि मी पाहिले होते. एखाद्या साधूपुढें नमस्कार करून त्याच्या पायाकडची जमीन जिभेनें चाटणारे देखील दोन भक्त पाहिल्याचें आठवतें. हें सर्व वाईट आहे असें म्हणण्याची जरी त्यावेळीं हिंमत किंवा बुद्धि नव्हती तरी ते पाहून मन अस्वस्थ अवश्य होई. एखाद्या लहानशा असंस्कारी तुच्छ राजाला खुश करण्याचे जे प्रकार जगांत चालत ते पाहूनच देवाची भक्ति करण्याचे हे प्रकार उत्पन्न झाले असले पाहिजेत. माझ्यासारख्याच माणसांनीं असे प्रकार करावेत यांत माझीच अब्रू जाते असें वाटून मी दुःखी होई.

मनुष्य तरी काय करणार त्याची जीवना विषयींची जशी कल्पना असेल त्याच तोडीची त्याची ईश्वरविषयक कल्पना असणार. त्याला हे दिसत नाहीं कीं वेडीवाकडी भक्ति करूं जातां आपण देवाला देखील आपल्यासारखाच तुच्छ करून सोडतो.

केव्हां केव्हां मनुष्य मातीचा, धोंड्याचा, लांकडाचा, किंवा धातूचा देव करून त्याची पूजा करतो. केवळ जर कलेची दृष्टि त्यांत असली तर गोष्ट निराळी. किंवा सर्वच ईश्वर आहे तर या धोंड्यांत देखील आहे मग या धोंड्याचे देव म्हणून पूजन करावयास काय हरकत आहे, असे म्हणून प्रतीक समजून मूर्तीची पूजा केली तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. पण जेव्हां त्या मूर्तीच्याच गुणाचा देव आहे असें मनुष्याला वाटूं लागतें तेव्हां मनुष्य वर चढण्याच्याऐवजीं खालीं पडतो. आणि हास्यास्पद गोष्ट अशी की त्या मूर्तींत प्राण भरून तिची प्राणप्रतिष्ठा करण्याचाहि मनुष्य प्रयत्न करतो. देशी आणि परदेशी पुराणें सांगतात कीं ईश्वराने मनुष्यांत प्राण फुंकला, हीं माणसें परतभेट म्हणून मूर्तींत प्राण फुंकून तिची प्राणप्रतिष्ठा करूं पाहतात! मूर्तींत प्रथम देव नव्हता. मंत्र बोलल्यानंतर देव

मूर्तीत येऊन प्रतिष्ठित झाला अशी ते आपली समजूत करून घेतात. ही म्हातारी पोरं आपल्या निरनिराळ्या बाहुल्या घेऊन देवदेव खेळत असतात एवढेंच.

पण या पोरकटपणाचा परिणाम काय होतो ? देवाला खाली ओढल्यामुळें लोक स्वतःला ही खालीं ओढतात. मनुष्याच्या दरबारांत आपले स्थान जोड्याजवळ देखील राहात नाहीं, हें त्यांच्या दृष्टीस येत नाहीं. विभूतींच्या नांवानें ईश्वराचे तुकडे केले तर भक्तांच्या जीवनांत एकता कुठून येणार ! त्याचेही तुकडेच होणार. व्हावयाचेच. (आणि ईश्वराचे तुकडे केले म्हणजे जीवनाचे देखील तुकडे करण्याचे सुचतेच. आप पर-भाव वाढतो, परस्पर ईर्ष्या, असूया, संशय हीं वाढतात. वाढतां वाढतां खरी होतात. आणि तीच मग भस्मासुराप्रमाणें आपल्यामागें लागून आपला बळी घेतात. जीवनाचे तुकडे केल्यानंतर देशाचे तुकडे करण्याचे सुचल्यावांचून कसें राहील ?) विपुल-हृदय मनीषींनी म्हणूनच आदेश दिला होता. 'देवो भूत्वा देवं यजेत्' मनुष्यत्व जर क्षुद्र केले, त्यांत जर हीनता आणली तर आपल्या ईशउपासनेंत देखील हीनता येतेच आणि मग जगाच्या दरबारांत आपल्यालाहि हीन स्थितीच प्राप्त होते.

यासाठीं जें संभाळावयाचें असतें तें मनुष्यत्व, व्यक्तित्व आणि आत्मसंमान होय. भारत-वर्षानें या एका बाबतींत गफलत केली त्यामुळेंच सर्व जगांत त्याचे स्थान नष्ट झालें. इतर जग त्याच्या डोक्यावर चढून त्याला पददलित करूं शकले. त्यानंतर मातीच्या ढेकळावर मंत्र बोलून त्याची प्राणप्रतिष्ठा केल्यानें स्थिति थोडीच सुधारणें शक्य आहे.

तोमारे शतधा करि क्षुद्र करि दिया
माटिते लुटाय जारा तृप्त-सुप्त-हिया,
समस्त धरणी आजि अवहेलाभरे
पा रेखेछे ताहदेर माथार उपरे ।
मनुष्यत्व तुच्छ करि जारा सारावेला
तोमारे लइया शुधु करे पूजाखेला
मुग्धभावभोगे, सेइ वृद्ध शिशुदल
समस्त विश्वेर आजि खेलार पुत्तल ।

तोमारे आपन–साथे करिया समान
जे खर्व वामनगण करे अवमान
के तादेर दिबे माना निज मंत्रस्वरे
तोमारेइ प्राण दिते जारा स्पर्धा करे
के तादेर दिबे प्राण तोमारेओ जारा
भाग करे के तादरे दिबे ऐक्यधारा

हे भगवंता, तुझे शेकडो तुकडे करून, तुला क्षुद्र करून सुप्त किंवा तृप्त हृदयानें जे लोक धुळीमध्यें लोळण घेत पडून राहिले त्या लोकांची अवहेलना करून त्यांच्या डोक्यावर जर ही समस्त धरणी पाय ठेऊन उभी राहिली तर त्यांत आश्चर्य कोणाचें ?

मनुष्यत्वाला तुच्छ, हीन करून जे लोक मूढ भावानें सगळा वेळ तुझ्या पूजेचा खेळ खेळत बसतात तीं वृद्ध मुलें आज सगळ्या जगाची खेळणीं होऊन बसलीं आहेत. ज्यांनीं तुला आपल्या बरोबरीचा बनवून तुझा अपमान केला त्या ठेंगण्या बटूंना जगांत कोण मान देणार ? आपल्या मंत्रांनीं तुझ्यांत प्राणप्रतिष्ठा करू पाहणाऱ्या अविनयी लोकांना जगांत प्राण कुठून मिळणार. तुझेच जे लोक भाग पाडतात त्यांच्या जीवनांत ऐक्यधारा कुठून वाहूं लागणार !

विविधतेमध्यें ऐक्य पाहणाऱ्या पूर्वजांचे हे वंशज जेथें परिपूर्ण ऐक्य आहे तेथें नसत्या कल्पना करून आत्मघाती विविधता उत्पन्न करूं लागल्यानंतर हें असेंच व्हावयाचे. ऐक्याची भावना जेथें मजबूत असेल तेथें त्या दृढ पायावरच विविधेतची शोभा उठावदार दिसते आणि सामर्थ्याला संपूर्णता आणते. पण एकतेचा दोरा जर तुटला तर मूल्यवान मोती देखील विखुरले जाणार आणि सांडणारच.

मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
नं. 44408 वि: निबंध
क्रमांक 90494 नों: दि: 24।4।६८

५१

## थोरांचा कठिण मार्ग

गीतांजलींत रवीबाबू एके ठिकाणीं म्हणतात कीं "देवा! हारलेले, निराधार, हीनदीन अशा लोकांत तूं वावरतोस! नम्र होऊन तुझ्या चरणीं डोकें टेकावयास जावें तर तुझे पाय इतक्या खालीं आहेत कीं तेथपर्यंत माझें डोकें लवूंच शकत नाहीं, अहंकार कितीहि काढून टाकला तरी जो कांहीं थोडा उरतो, तो मला त्या दीन हीन लोकांपर्यंत उतरूं देत नाहीं आणि तुझे पाय तर त्या लोकांतच सांपडतात." (इंग्रजी गीतांजलीतील गीत १० वें)

प्रस्तुत काव्यांत कवी याच्या अगदी उलट म्हणतात कीं, "तुझ्या चरणीं डोकें ठेवण्यासाठीं कितीतरी उंच चढावें लागणार, तुझे वरपुत्र ज्या कठिण मार्गानें, दुःख सहन करीत करीत गेले, तेथवर जेव्हां मी जाईन तेव्हांच माझा नमस्कार तुला पोहोंचणार. म्हणून देवा, मला तेथें बोलावून घे; तेथवर चढण्याची शक्ति दे, मीं भयानें म्लान न व्हावें, लोभानें अस्थिर न बनावे; माझ्या कर्मामधून तुझेकडून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा प्रकाश पसरावा. आणि माझा मृत्युदेखील महिमामय व्हावा, असा आशीर्वाद मला तू दे.

हे राजेन्द्र, तोमा–काछे नत हते गेले
जे उर्ध्व उठिते हय सेथा बाहु मेले

लहो डाकि सुदुर्गम बंधुर कठिन
शैलपथे–अग्रसर करो प्रतिदिन,
जे महान पथे तव वरपुत्रगण
गियाछेन पदे पदे करिया अर्जन
मरण–अधिक दुःख ।

ओगो अन्तर्यामी,
अन्तरे जे रहियाछे अनिर्वाण आमि
दुःखे तार लब आर दिब परिचय ।
तारे जेन म्लान नाहि करे कोनो भय,
तारे जेन कोनो लोभ ना करे चंचल
से जेन ज्ञानेर पथे रहे समुज्ज्वल,
जीवनेर कर्मे जेन करे ज्योति दान,
मृत्युर विश्राम जेन करे महीयान ।

हे राजेन्द्रा ! तुझ्यापुढें नम्र, विनत व्हाययाचें तर ज्या उंचाईवर पोहोंचले पाहिजे, त्या दुर्गम, अडचणीच्या, कठिण, खडकाळ, पहाडी रस्त्यावर मला आपले हात फेलावून बोलावून घे. मरणाहूनहि अधिक असें दुःख पदोपदीं प्राप्त करीत, तुझे श्रेष्ठ पुत्र ज्या महान मार्गानें गेले आहेत, त्याच मार्गाकडे रोज मला घेऊन जा.

हे अंतरयामी ! माझ्या हृदयांत हा जो अशान्त, अस्वस्थ 'मी' बसला आहे त्याचा परिचय मी दुःखाच्या द्वारा करून घेईन आणि देईन. (दुःख सहन करणें हीच मोठी साधना आहे. हिच्या द्वारा आपले दोष आपल्या ध्यानांत येतात. आपण कोणच्या भूमिकेवर आहोंत याचा परिचय स्वतः आपल्याला आणि जगाला होतो.)

कोणाच्याहि भयानें त्या ('मी')ला म्लान करू नये. कोणच्याहि लोभानें त्याला अस्थिर–चंचल करू नये. ज्ञानाच्या मार्गावर त्यानें उज्ज्वळपणें असावें. जीवनाच्या प्रत्येक कर्मातून त्यानें जगाला प्रकाश द्यावा आणि मृत्यूच्या विश्रामानें देखील त्याला महीयान बनवावें, असें कर.

५२

# प्रगतिविरोधी रूढिग्रस्त

आपल्या सनातन समाजांत धर्मा-विषयीं, समाजव्यवस्थेविषयीं आणि सर्व क्षेत्रांतील पुरुषार्थाविषयीं "अलंबुद्धि" उत्पन्न झाली आहे [आपण सर्वोच्च शिखर गाठले, ज्यास्ती शोधण्या-मिळवण्याचें कांहीं उरलें नाहीं. आपण पूर्णत्वाला पोहोंचलों आहोंत अशा अभिमानानें जड झालेल्या बुद्धीला अलंबुद्धि म्हणतात. अलम् म्हणजे 'बस पुरे झालें'.] त्यामुळें सर्व प्रगति खुंटली. आपण झोपा काढू लागलों. जागृत जग विजय-शंख वाजवीत प्रगतीच्या शिखरावर चढूं लागलें आहे तिकडे आपलें लक्षच गेलें नाहीं. आपण ईश्वराला देखील एक खेळणें बनवून भातकुलीसारखा एक खेळ चालवला आहे. नित्यनूतन कर्माचा पुरुषार्थ करण्याच्याऐवजीं आपण निरर्थक कर्मकांडांच्या आचारालाच प्रधानपद दिलें. ज्ञानाला देखील मुक्त संचार करू न देतां शास्त्र ग्रंथांच्या तुरुंगांत किंवा कोंडवाड्यांत डांबून त्याला मेल्यागत केलें आहे. आणि विशाल त्रिभुवनाला देखील दारें-खिडक्या बंद केलेल्या आपल्या घरांत अडकवून टाकले आहे. आणि आतां रडूं लागलों आहोंत कीं "अरेरे! रात्र येऊन ठेपली. यात्री लोक कोठें आहेत? रस्ता कुठें आहे? दिशा कोठें आहे?

भारतीयांच्या प्राचीन पुरुषार्थाविषयीं आदर बाळगूनहि रवीबाबूंनीं आपल्या संस्कृतींत रूढीवादी, सनातन वृत्तीची जी जडता पसरली आहे, तिचेवर वेळोवेळीं कोरडे ओढले

आहेत. 'अचलायतन' हें नाटकदेखील अपरिवर्तनवादी समाज कसा जड झाला आहे आणि त्याचें पुढें काय होणार आहे—हें दाखविण्यासाठींच त्यांनीं लिहिलें होतें. प्रगति करावयाची नाहीं. डोळे उघडे ठेवायचें नाहींत. केवळ भावनेच्या आवेशालाच धार्मिकता आणि संस्कृतिनिष्ठा समजून चालवयाचें आणि अलंबुद्धीची मदिरा पिऊन घोरत पडावयाचें —अशा धार्मिकतेची फटफजिती करण्यासाठींच हे गीत लिहिलेलें आहे.

दुर्गम पथेर प्रान्ते पांथशाला-'परे
जाहारा पड़िया छिल भावावेशभरे
रसपाने हतज्ञान, जाहारा नियत
राखे नाअि आपनारे अुद्यत जाग्रत—
मुग्ध मूढ जाने नाअि विश्वयात्री दले
कखन चलिया गेछे सुदूर अचले
बाजाये विजयशंख। शुधू दीर्घ बेला
तोमारे खेलना करि करियाछे खेला—
कर्मेरे करेछे पंगु निरर्थ आचारे,
ज्ञानेरे करेछे हत शास्त्रकारागारे,
आपन कक्षेर माझे बृहत् भुवन
करेछे संकीर्ण रुधि द्वार वातायन—
तारा आज काँदिते छे। आसियाछे निशा—
कोथा जात्री, कोथा पथ, कोथाय रे दिशा।

प्रगतीच्या सुदूर, दुर्गम मार्गाच्या किनाऱ्यावरच असलेल्या धर्मशाळेंत भावनेच्या आवेशांत सापडून, रसपान करून बेहोश झाल्यामुळें जे लोक निश्चेष्ट पडून राहिले होते, आणि ज्यानीं स्वतःला सतत जागृत ठेवले नव्हते, त्या मुग्ध, मूढ वेड्यांना कळलें नाहीं कीं विजययात्रेला निघाल्यांची टोळी विजयशंख वाजवीत पहाडावर केव्हांच दूरवर गेली आहे. आणि भगवंता! हे लोक मात्र तुझ्या बाहुल्या बनवून दीर्घकालपर्यंत खेळ खेळत बसले आहेत. यांनीं पुरुषार्थी

कर्मांचे रूपांतर केलें आहे पंगू आणि निरर्थक आचार धर्मांत आणि रूढींत. ज्ञानाला शास्त्रग्रंथांच्या कारागारांत कोंडून निर्जीव करून टाकलें आहे. आणि विशाल विश्वाला आपल्या खोलीमध्यें, दरवाजे, खिडक्या बंद करून संकीर्ण, संकुचित करून टाकलें आहे.

आणि आतां ते रडूं लागले आहेत–हाय रे ! रात्र येऊन ठेपली. कोठे आहेत आमचे यात्रेचे साथी, कोठे आहे यात्रेचा मार्ग आणि कोठें आहे दिशा ?"

## ५३

# मला भय कसलें ?

ईश्वराचे चिरसान्निध्य, नैकट्य आणि सामर्थ्य यांचा ज्या काळीं साक्षात्कार होत असतो ह्या काळांतील हे उदगार आहेत. साधक संतांना असा साक्षात्कार निरंतर, अखंड, परिपूर्ण होत असेल. कविला जितका वेळ तो त्या भूमिकेंत असतो तितका वेळ तो साक्षात्कार होत असतो. असा साक्षात्कार स्थायी नसला तरी तो मायिकहि नसतो, खराखुरा असतो. कवि (आणि वाचकहि) जोंवर या भूमिकेवर आरूढ असतो तोंवर त्यालाहि खराखुरा साक्षात्कार झालेला असतो. जीवनसिद्धि कमी म्हणून या भूमिकेवर सामान्य लोकांना स्थिरपणें टिकतां येत नाहीं इतकेंच.

या जगांत जर कांहीं खरें असेल तर तो ईश्वर आहे आणि बाकी सर्व ईश्वराच्या मानानें अस्थायी आणि क्षणिक असल्यामुळें मायिक आहे हें ज्याला पटलें तो ईश्वरालाच मानून चालेल. एखाद्या सरकारी अंमलदारानें एखाद्याला धमकी दिली आणि राजाने जर त्याला अभयदान दिलें तर तो मनुष्य निश्चिंत, निर्भय होईलच. पण हाच तो राजा आहे आणि सर्व सत्ता याची आहे हे ज्याला ठाऊक नाहीं असा मनुष्य राजाकडून अभयवचन मिळून देखील भिऊनच चालावयाचा. कारण राजसेवकाची सत्ता त्यानें प्रत्यक्ष अनुभवलेली आहे आणि राजाला तो ओळखत नाहीं.

एखादी लहान मुलगी लग्न होऊन सासरी गेली म्हणजे तिला अनुभवास येतें कीं सर्व सत्ता

सासूची आहे. ती नवऱ्याला फारशी भीत नाहीं. कारण तिच्या जीवनांत त्याकाळीं नवऱ्याचें अस्तित्व तितकें परिणामकारक नसतें जितके सासूचें असतें. पुढें नवऱ्याची ओळख झाली आणि आपला कायमचा संबंध नवऱ्याशीं आहे, तो आपलेवर मनापासून प्रेम करतो याचा तिला साक्षात्कार झाला म्हणजे मग मात्र ती सासूला भीक घालीत नाहीं. सत्तेच्या जोरावर सासूनें छळलें तरी ती म्हणते—पतिप्रेमाचें कवच धारण केल्यानंतर सासूचे वाग्बाण मला पूर्वीसारखे बोचत नाहींत. आपले कांहीं चालत नाहीं असें पाहून सासू अधिकच चिडते, अधिक कठोर शब्दप्रहार करते आणि तेहि अस्त्र फुकट गेलेलें पाहून ती हताश होते. तिचा आत्मविश्वास कमी कमी होऊं लागतो आणि या घरांत आतां आपलें चालत नाहीं असें कळून चुकलें म्हणजे ती मुकाव्यानें निवृत्तीचा आश्रय घेऊन पुराण ऐकावयास जाते.

जो मनुष्य ईश्वरनिष्ठ आणि ईश्वरपरायण झाला त्याच्या मनांतून लोक-भय, राज-भय, आणि मृत्यु-भय अशाच रीतीनें क्षीण होतात. कारण त्याला पटलेलें असतें कीं आपला खरा संबंध ईश्वराशीं आहे, तो सर्वसमर्थ आहे. प्रेमी आहे, 'सर्वसह' आहे. आणि सर्व प्रसंगीं पाखर घालणारा आहे. जगालाहि कळून चुकलें कीं या मनुष्याची निष्ठा ईश्वराला वाहून चुकली आहे. जग त्याला छेडून पाहते आणि शेवटीं त्रासून, वैतागून त्याला जाती-बाहेर टाकून देतें. आपल्याच समाजानें अशा रीतीनें संतांना, वीरांना, थोरांना आणि शेवटी एकलकोंड्या समर्थांना जातिबाह्य करून शेवटी पूज्य ठरविलें आहे: त्यांचेवर आपले चालत नाहीं असें पाहून लोक त्यांना पूज्य बनवितात आणि त्यांची बाधा सामान्य लोकांना होऊं नये म्हणून त्यांची कोटी निराळी करून त्यांना लोकविलक्षण ठरवतात.

(असे झाल्यामुळें या बहिष्कृत लोकांचा उद्धारच झाला आणि ज्यांनीं बहिष्कार शस्त्रानें आपल्या संकुचिततेचें रक्षण केलें तें मात्र यच्चयावत् उद्धारापासून वंचित राहिले. हिन्दुस्थानचा सामाजिक इतिहास या एका गोष्टींत पूर्णपणें येऊंन जातो.)

तुमि सर्वाश्रय, ऐ कि शुधु शून्यकथा?
भय शुधु तोमा-'परे विश्वास-हीनता
हे राजन्।
लोकभय? केन लोकभय
लोकपाल! चिरदिवसेर परिचय

कोन् लोक-साथे ?

राजभय कार तरे

हे राजेन्द्र! तुमि जार विराज अन्तरे
लभे से कारार माझे त्रिभुवनमय
तव क्रोड़, स्वाधीन से बन्दीशाले।

मृत्युभय

की लागिया हे:अमृत! दु दिनेर प्राण
लुप्त हले तखनि कि फुराअिबे दान–
एत प्राणदैन्य प्रभु, भांडारेते तव?
सेइ अविश्वासे प्राण आँकड़िया रब?

कोथा लोक, कोथा राजा कोथा भय कार।
तुमि नित्य आछ, आमि नित्य से तोमार।

भगवंता, तू सर्वांचा शेवटचा आणि सर्वसमर्थ असा आश्रय आहेस. ही गोष्ट काय पोकळ आहे? आणि ही गोष्ट जर पोकळ नव्हे, भरीव तथ्यघन आहे तर मग मनुष्यानें भय कशाचें बाळगावयाचें? हे राजन्, एखाद्यानें भय बाळगावयाचें म्हणजे त्याचा तुझेंवर विश्वास नाहीं हें सिद्ध करण्यासारखें आहे. आम्ही भय काय म्हणून आणि कसचें बाळगावयाचें?

लोकभय? तू स्वतः एवढा थोर लोकपाळ असतांना आम्ही लोकांचें भय काय म्हणून बाळगावयाचें? आणि हे लोक तरी माझ्याबरोबर कोठवर येणार? तुझा जितका अनंत जन्मांचा चिरपरिचय मला आहे तितका माझेशीं परिचय असणारे असे कोण लोक आहेत कीं ज्यांना मी भ्यावे? माझा चिरसाथी तू आहेस. हे लोक तर वाटेवरचे वाटसरू. हे मला थोडेच शेवटपर्यंत पुरणार आहेत, शेवटपर्यंत साथ देणार आहेत, कीं त्यांची आणि त्यांच्या अभिप्रायांची मी किंमत बाळगावी?

आणि राजभय? हे राजेन्द्रा, तुझ्या शेजारीं कोणत्या राजाला मी भ्यावें?

ज्याच्या हृदयीं तू विराजमान आहेस त्या मनुष्याला बंदीखान्यांत देखील तुझ्या मांडीवर बसतां येतें. आणि ती मांडीदेखील केवढी ? या त्रिभुवनाहून मोठी. राजेलोक त्याला बंदीशाळेंत घालतील पण त्याची स्वाधीनता कमी करूं शकणार नाहींत. आजवर कितीतरी राजे लोकांनी अशा ईश्वरनिष्ठांना छळून पाहिलें आणि प्रत्येकवेळीं स्वतःची फजीती झाल्याचाच त्यांना अनुभव आला आहे.

आणि मृत्यूचें भय तरी कशासाठीं बाळगावें ? हे अमृतस्वरूपा ! समजा, दोन दिवसांसाठीं हातीं आलेले हे प्राण लुप्त झाले तर तेवढ्यानें तुझें दान काय संपून जाणार आहे ? हे प्रभो, तुझ्या या विशाल भंडारामध्यें काय इतकें प्राणदैन्य उत्पन्न झालें आहे कीं प्राण एकदां हातचा गेला म्हणजे पुनः हातीं लागणार नाहीं ? काय म्हणून आम्हीं असा अविश्वास करून मृत्यूच्या भयानें जीव मुठींत धरून फिरावे !

तुझा अखंड साक्षात्कार होत असतां तुझ्या सामर्थ्याचा, तुझ्या प्रेमाचा आणि तुझ्या मांगल्याचा एकसारखा अनुभव होत असतांना कुठले लोक, कुठला राजा आणि कुठला मृत्यु ? कुणाचें आणि कुठून भय बाळगावें ? मला एक गोष्ट ठाऊक आहे कीं तू नित्य अखंड आहेस. आणि मी नित्य पूर्णपणे तुझाच आहे. मला भय कुणाचें ? भय कशाचें ? माझ्या अनुभवालाच मी बेवफा कसें व्हावे ?

५४

## दीक्षेचा गौरव

इंग्रजी गीतांजलीच्या चवथ्या गीतांत कवी म्हणतात. "हे माझ्या जीवींच्या जीवना! मी माझ्या शरिराला पवित्र राखेन, कारण कीं माझ्या सर्व गात्रांना तुझा जिवंत स्पर्श होत आहे. मी माझ्या विचारांतून सर्व असत्यांना दूर ठेवीन, कारण माझ्या चित्तांत ज्या सत्यानें बुद्धीचा प्रकाश पडला आहे, तें सत्य तूंच आहेस. मी माझ्या हृदयांतून सर्व पापवासनांना दूर करीन आणि माझें भक्तिकमल उमलतें ठेवीन; कारण माझ्या हृदयमंदिरांत तुझेंच आसन आहे. आणि सर्व कर्मशक्ति तुझ्याचकडून मिळाली असल्या-कारणानें माझ्या सर्व कर्मांतून मी तुलाच प्रगट करीन."

अशाच प्रकारची एक तेजस्वी प्रार्थना कवीनें खालील गीतांत केली आहे.

आमारे सृजन करि जे महासम्मान
दियेछ आपन हस्ते, रहिते परान
तार अपमान जेन सह्य नाहि करि।
जे आलोक ज्वालायेछ, दिवसशर्वरी
तार ऊर्ध्वशिखा जेन सर्व-उच्च राखि,
अनादर हते तारे प्राण दिया ढाकि।

मोर मनुष्यत्व से जे तोमारि प्रतिमा,
आत्मार महत्त्वे मम तोमारि महिमा
महेश्वर!

सेथाय जे पदक्षेप करे,
अवमान बहि आने अवज्ञार भरे,
होक-ना से महाराज विश्वमहीतले
तारे जेन दण्ड दिअि देवद्रोही ब'ले
सर्वशक्ति लये मोर। जाक आर सब,
आपन गौरवे राखि तोमार गौरब।

भगवंता! मला उत्पन्न करून तूं आपल्या हातानें माझा बहुमान केला आहेस. जिवांत जीव असेतोपर्यंत त्याचा मीं कधी अपमान सहन न करावा असें कर. जो प्रकाश रात्रंदिवस तूं प्रगटावला आहेस, त्याची ऊर्ध्व ज्वाला मीं नेहमी उंच राखावी. अनादरापासून त्या दीपशिखेला वाचवण्यासाठीं मी माझे प्राण पाथरावेत. दिव्याची ज्योत वाऱ्याने विझू नये म्हणून ज्याप्रमाणें आपण पदर आड करतों, त्याप्रमाणें माझ्या प्राणानें ती दीपशिखा झांकावी; एवढें वरदान मला दे. हे महेश्वर! माझें मनुष्यत्व तर तुझीच प्रतिमा आहे. माझ्या आत्म्याच्या महत्त्वांत तुझाच महिमा आहे, हें मी कधीही न विसरावें.

जो कोणी माझ्या आत्म्याच्या महत्त्वावर पाय ठेवूं पाहतो, जो कोणी अवज्ञापूर्वक त्याचा अपमान करूं पाहातो तो या अलम् दुनियेचा राजाधिराज का असेना, त्याला देवद्रोही म्हणून माझ्या सर्वशक्तीनें त्याला मी दंड द्यावा, असें वरदान मला दे. बाकी सर्व भले जावो, मीं माझ्या स्वतःच्या गौरवाच्या द्वारा तुझ्या गौरवाचें जतन करीन.

# तूं दिलेला अधिकार

संत कबीरानें मोठया अभिमानानें म्हटलें आहे कीं देवानें आपल्याला दिलेली चादर आपण न मळवितां जशीच्या तशीच शेवटीं परत दिली. चादर म्हणजे हें मनुष्य शरीर. ही चादर ईश्वरानें नव महिन्यांच्या मेहनतीनें तयार करून वापरण्याला दिली. सुरनरमुनि आदि मोठ्या मोठ्यांनीं त्यांना मिळालेली चादर कधीं ना कधीं गफलत करून मळविली आणि शेवटीं जेव्हां हें जग सोडून जाण्याची पाळी आली तेव्हां परत देतांना त्यांना लाजिरवाणा चेहरा करून परत द्यावी लागली. दास कबीरानें अशा कांहीं यत्नपूर्वक संभाळून ती चादर वापरली – पांघरली कीं जन्मभर वापरून देखील शेवटीं "ज्यों की त्यों धर दिन्ही" जशी होती तशी परत ठेऊन दिली.

ही झाली शरीराविषयींची गोष्ट. मनुष्य रसनेचा अंकित होऊन, निद्रेला विकला जाऊन, किंवा विलासितेला बळी पडून शरीराचा दुरुपयोग करतो जीवनकार्य न ओळखल्यामुळें दिवस क्षुद्र कामांत खर्च करून शरीराचा अपमान करतो आणि शेवटीं पस्तावतो.

रविबाबूंनीं असेंच म्हटलें आहे; मात्र केवळ शरीर ध्यानांत न घेतां त्या शरीराकडून जें कांहीं कार्य ईश्वराला करून घ्यावयाचें होतें त्याच्या दृष्टीनें म्हटलें आहे कीं भगवंता, तूं जें कांहीं कार्य मला सोंपवून देशील ते न बिघडतां उत्तम रीतिनें पार पाडून जसेच्या तसें तुझ्या हातीं परत सोंपवणें हें माझें काम आहे. मालकानें जर शेतकऱ्याचे हातीं शेत सोंपविलें

तर त्यानें शेतांतून उत्तम पीक काढून दाखविलें पाहिजे आणि शेताची सुपीकता यत्किंचितहि कमी न होऊं देतां मुदत संपतांच मालकाला परत सोंपवून दिले पाहिजे. जर एखादी संस्था चालविण्याचा भार आपल्या डोक्यावर आला तर ती उत्तम रीतीनें चालवून भरभराटलेल्या स्थितींत सोडून दिली तर शोभा आहे.

ज्ञान प्राप्त करण्यासाठीं जर संशोधन कार्य आपल्या हातीं आलें तर ज्ञानाचा नव्या नव्या क्षेत्रांत उत्तम शोध लावून ज्ञानाचा विस्तार सर्वत्र होईल असे केलें पाहिजे. ज्ञान-दानांत कृपणता करूं नये. ते चोरून ठेऊं नये. अधिकारवादाची सबब पुढें करून कोणालाहि ज्ञान प्राप्तीपासून वंचित ठेऊं नये. हें आपलें कर्तव्य होतें.

राजानें जर एखादा प्रान्त आपल्या ताब्यांत दिला तर त्या प्रान्तांत दुसऱ्या कोणाच्याहि सत्तेचा जम बसूं न देणें हें त्या प्रान्ताच्या प्रान्ताधीशाचे प्रथम कर्तव्य आहे. ईश्वराची भक्ति स्वीकारली म्हणजे मग इतर कुणापुढें देखील मान वांकवावयाची नाहीं हें ब्रीद मनुष्यानें बाळगलेंच पाहिजे. कोणत्याहि पार्थिव शक्तिच्या पायीं पडून ईश्वराचा अपमान करणें आपल्या हातून होतां कामां नये. सत्कार्य करीत असतां कांहींहि जर आड आलें तर त्या संकटांपुढें दबले जातां कामा नये. आपलें प्रत्येक कार्य आपल्याला ईश्वराकडेच घेऊन जाईल, सर्व बंधनें तोडून त्याला जवळ करील असेंच आपलें वागणें असलें पाहिजे. आणि तसें करण्यास नेहमीं एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं देवानें दिलेलें काम पार पाडणें हेंच ईश्वराला मान्य आहे.

तुमि मोरे अर्पियाछ जत अधिकार
क्षुण्ण ना करिया कभु कणामात्र तार
संपूर्ण सँपिया दिब तोमार चरणे
अकुंठित राखि तारे विपदे मरणे।
जीवन सार्थक हबे तबे।

चिरदिन
ज्ञान जेन थाके मुक्त शृंखलविहीन।
भक्ति जेन भये नाहि हय पदानत

पृथिवीर कारो काछे। शुभ चेष्टा जत
कोनो बाधा नाहि माने कोनो शक्ति हते।
आत्मा जेन दिवारात्रि अवारित स्रोते
सकल अुद्‌यम लये धाय तोमा-पाने
सर्व बंध टुटि। सदा लेखा थाके प्राणे,
'तुमि जा दियेछ मोरे अधिकार भार
ताहा केड़े निते दिले अमान्य तोमार।'

# ५६

## भ्याडांचा सत्यद्रोह

जगांत आणि आपल्या आयुष्यांत भयस्थानें, शंकास्थानें असणार, येणार. लज्जा आणि अपमान सहन करण्याचे प्रसंगहि कधीं कधी ओढवणार. हें सर्व कोणाला चुकलें आहे ?

पण त्यांना आपण शरण काय म्हणून जावें ? त्यांचा स्वीकार काय म्हणून करावा ? आपल्याला म्हणतां आलें पाहिजे : "भया ! तू कितीहि भीषण रूप धारण केलेंस तरीहि तुला मी भिणार नाहीं, भीक घालणार नाहीं. भयाचें कारण असले तरी भिण्याला माझा नकार आहे. मी भीरू काय म्हणून बनावें ?

जो भीरु असतो तोच भयाचा स्वीकार करतो, भयापुढें डोके नमवतो. आणि आपल्या आंतरिक सत्याचा द्रोह करून मिथ्याचा स्वीकार करतो. आणि विशेष म्हणजे सत्याचें तुझें सिंहासन संभाळण्याची जबाबदारी सोडून देऊन तें सिंहासन मिथ्याला देऊन टाकतो. जो भीरू झाला त्याला मिथ्या ग्रासून टाकते. त्याच्या वाणींत मिथ्या, त्याच्या व्यवहारांत मिथ्या, त्याच्या चित्तांत मिथ्या. मिथ्या त्याच्या मस्तकाला पायाखालीं तुडवून टाकते. म्हणून कशीहि परिस्थिति असो, कोणतेंहि संकट येऊन पडो, आपण भयाने, लज्जेनें, अपमानानें अभिभूत होतां कामा नये. त्यांचेपुढे डोकें वाकवतां कामा नये. तरच ईश्वराचा आदेश पार पाडण्याची शक्ति आपल्याला प्राप्त होईल. केवळ आवेशांत आपले दिवस व्यर्थ जाणार नाहींत.

भारत दास्यशृंखलेत सांपडून जेव्हां पराधीन झाला होता तेव्हां स्वदेशवासी आत्मविश्वास घालवून बसले होते. आत्मसामर्थ्यावरचा लोकांचा विश्वासच उडून गेला होता. अशा वेळीं आत्मजागृतीचा, आत्मविश्वासाचा जो बोध राष्ट्राला हवा होता, तो बोध रवीनीं अनेक गीतांतून परोपरीने दिलेला आहे. आज देखील संकटांना तोंड देण्याची पाळी आली असता जर आपण हिंमत हारणार असलों तर रवीबाबूंची ही गंभीर वाणी आपल्याला खबरदार करण्याला समर्थ आहे.

त्रासे लाजे नतशिरे नित्य निरवधि
अपमान अविचार सह्य करे जदि
तबे सेई दीन प्राणे तव सत्य हाय
दण्डे दण्डे म्लान हय दुर्बल आत्माय
तोमारे धरिते नारे दृढनिष्ठा भरे।
क्षीणप्राण तोमारेओ क्षुद्रक्षीण करे
आपनार मतो — जत आदेश तोमार
पड़े थाके, आवेशे दिवस काटे तार।
पुंज पुंज मिथ्या आसि ग्रास करे तारे
चतुर्दिके; मिथ्या मुखे, मिथ्या व्यवहारे
मिथ्या चित्ते, मिथ्या तार मस्तक माड़ाये—
ना पारे ताड़ाते तारे उठिया दाँडाये।

अपमाने–नतशिर भये–भीत जन
मिथ्यारे छाड़िया देय तव सिंहासन।

भयानें आणि लज्जेनें त्रस्त होऊन जर कोणी नित्य निरवधि मान खालीं घालून अपमान, अविचार आणि अन्याय सहन करू लागले, तर हाय! त्यांच्या त्या दीन प्राणांमुळेंच भगवंता! तुझें सत्य क्षणोक्षणीं म्लान होत जाईल. दुर्बळ आत्म्याला दृढनिष्ठापूर्वक तुला चिकटून राहणें साधणार नाहीं. त्यांचे क्षीण

प्राण तुलादेखील आपल्याप्रमाणेच क्षुद्र–क्षीण करून टाकतील. तुझे सर्व आदेश सिद्ध न होतां पडून रहातील. आणि केवळ आवेशांत त्यांचे दिवस निघून जातील. असत्याचे, मिथ्याचे ढीगचे ढीग येऊन त्यांना चारी बाजूनें ग्रासून टाकतील. तोंडीं मिथ्या, व्यवहारांत मिथ्या, चित्तांत मिथ्या. मिथ्याच त्यांचें मस्तक पायाखाली तुडवून टाकील. उठून उभें राहून मिथ्याला हाकून काढणें त्यांना झेपणार नाहीं.

अपमानाने मान खाली घालणारे भयभीत लोक तुझ्या सिंहासनाचें रक्षण करण्याच्याऐवजीं मिथ्यालाच तें बळकाऊं देतात.

# एकेश्वरी विश्वांत
# अनिरुद्ध संचार

'आमच्या देशांत परकीय लोकांना येऊं देणार नाहीं.' असा चंग बांधला होता जपाननें. "ही तुमची गोष्ट आम्हीं चालू देणार नाहीं." असें जाहीर करून अमेरिकेनें कॉमोडोर पेरीच्या आधिपत्याखालीं एक नौका सैन्य सन १८५३ मध्यें जपानच्या बंदरांत पाठवून दिलें आणि त्यांनीं तोफांचा भडिमार करून जपानचा बंद दरवाजा उघडला.

या पराजयानें ज्यांचे डोळे उघडले अशा जपानी तरुणांनीं आपल्या राज्यकर्त्यांच्या धमकीला आणि निषेधाला न जुमानतां, युरोपकडे जाऊन तिकडील पश्चिमी विद्या स्वदेशीं आणली. राजकारण, युद्धकला आणि अर्थकारण—यांत जपान तरबेज झालें. विज्ञानाच्या मदतीने व्यापार-हुन्नरही वाढविला. पश्चिमच्या लोकांनीं जापानची योग्यता आदरपूर्वक स्वीकारली आणि विश्वाच्या दरबारांत जापानला मानाचें स्थान मिळाले.

आपल्या इकडे आपल्या सामाजिक नेत्यानीं ठरवलें कीं "कोणीहि समुद्रयात्रा करू नये, अटकेच्या पलीकडेहि जाऊं नये. आपण धर्मभ्रष्ट होऊं."

"या घरकोंबड्यांना घरांत खुशाल राहूं द्या. आपणच त्यांच्या भेटीला जाऊं असें म्हणून, भारताच्या असंघटित विरोधाला न जुमानतां आपल्या येथें पठाण आले, मुग़ल आले, युरोपचे तऱ्हेतऱ्हेचे टोपीवाले आले आणि आपण आपल्या स्वांतत्र्याला मुकलो.

इतिहासाकडून असे टक्केटोणपे खाल्ल्यानंतरच आपल्या ध्यानांत आलें कीं आपले पूर्वज असे नव्हते.

अनेक देवदेवींची आणि भूता-प्रेतांची उपासना करणाऱ्या जगांत, भारतांतील दर्शन-वीरांनीं शोध लावला कीं अग्नीमध्यें, जलामध्यें, ओषधी आणि वनस्पतींमध्यें जो एकच परमात्मा विराजमान आहे, तोच या अशेष विश्वांत शिरलेला आहे. अखंड विश्वांत वसलेल्या त्याला ओळखून त्याचीच उपासना केली पाहिजे. त्या विश्वेश्वरालाच शरण गेले पाहिजे. एकतेचा हा महान शोध ज्यानां या जगांत सर्वप्रथम लागला त्यांनीं सर्व जगांत अनिरुद्ध संचार केला होता. "आत्मा जसा सर्वत्र पसरलेला आहे, तसेंच आम्ही देखील सर्वत्र पसरूं आणि सर्वांची सेवा करू. आमच्यांत जर संकुचितता, लाभ आणि कुटिलता नसली, केवळ आत्म्यालाच आपण ओळखत असलों तर आपला निषेध कोठेंहि होणार नाहीं. जेथें जाऊं तेथें स्वागतच होईल." या विश्वासानें ते जगांत सर्वत्र पसरले आणि वावरले.

जगांतील असंख्य देवदेवींवर राज्य करणाऱ्या परम ईश्वरा! जगांत एकच ईश्वर आहे असें ओळखून मेघमंद्र आवाजाने आपल्या तपोवनाच्या छायेंत, इतर सर्व वाणींना गौण करणारी जी घोषणा केली गेली होती कीं

**यो देवोऽग्नौ, योऽप्सु, यो विश्वं भुवनम् आविवेश ।**
**य ओषधिषु, यो वनस्पतिषु, तस्मै देवाय नमो नमः ॥** (श्वेत. २·१७)

ती उदार वाणी भारताचीच होती. ही घोषणा करणारे मुक्त पुरुष सबळ, स्वाधीन, निर्भय, सरळप्राण, बंधनविहीन आणि वीर्यज्योतिष्मान होते. ते पुरुष कसलीच अटक न स्वीकारता, आत्मविश्वासपूर्वक अरण्य, नदी, पर्वत आणि पाषाण ओलांडून अकुतोभयपणें या जगांत सर्वत्र फिरत होते. आणि विशाळ अशा, सत्यमार्गावरच त्यांना तुझी प्राप्ति झाली होती. आत्म्याचा निषेध कोठेंहि नाहीं, असें ओळखून त्यांनीं स्वसामर्थ्यानें समस्त विश्वाचा वेध केला होता. 'हें विश्वचि माझें घर,' अशी त्यांची मति स्थिर होती. म्हणूनच त्यांना आत्मोपम्य साधलें होतें, अद्वैतसिद्धि प्राप्त झाली होती. आपण त्यांची वाणी स्वीकारूं कीं 'नायमात्मा बल-हीनेन लभ्यः' आपण समर्थपणें सर्वत्र पसरूं. सर्व ठिकाणीं जाऊं. आत्मीयतेनें सर्वांची सेवा करूं. आणि आपल्या उदार हृदयाच्या परिचयानें जगाला पटवून देऊं कीं जगांत ईश्वर एकच आहे. आणि म्हणून समस्त मानवजात एक विशाल कुटुंब आहे. हें विश्व एक घरटेंच आहे जेथें कोणीच परका नाहीं.

यस्तु सर्वाणि भूतानि आत्मनि एव अनुपश्यति ।
सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते ॥ (ईश.६)

हे सकल ईश्वरेर परम-ईश्वर,
तपोवनतरुच्छाये मेघमन्द्रस्वर
घोषणा करियाछिल सबार उपरे
अग्निते, जलेते, एइ विश्वचराचरे,
वनस्पति-ओषधिते एक देवतार
अखण्ड अक्षय ऐक्य से वाक्य उदार
एइ भारतेरइ.

जाँरा सबल स्वाधीन
निर्भय सरल-प्राण, बंधनविहीन,
सदर्पे फिरियाछेन वीर्यज्योतिष्मान
लंघिया अरण्य नदी पर्वत पाषाण
ताँरा एक महान विपुल सत्यपथे
तोमारे लभियाछेन निखिल जगते
कोनोखाने ना मानिया आत्मार निषेध
सबले समस्त विश्व करेछेन वेध

# आनंद-शासनाचा प्रभाव

उपनिषदकालीन आपल्या ऋषि-मुनींनी ध्यानचिंतन करतां करतां पाहिलें: आनन्दात् हि एव खलु इमानि भूतानि जायन्ते। आनन्देन जातानि जीवन्ति। आनन्दं प्रयान्ति अभिसंविशन्ति। आनंदांतूनच विश्वचराचररूपी आनंदनिर्झर वाहत आहे.

त्या परमेश्वराच्या योगसामर्थ्याचा विचार करतां त्यांनीं खात्री करून घेतली कीं या विश्वांत जो प्राण संचार करीत आहे, त्याच्या वज्रनियमाच्या भयानेच हीं पंचमहाभूतें आपापलें काम करतात. आणि मृत्यूहि सर्वांचें नियमन करण्यास प्रवृत्त होतो.—

**भयादस्याग्निस्तपति, भयात्तपति सूर्यः।**
**भयादिन्द्रश्च वायुश्च, मृत्युर्धावति पंचमः॥** (कठो. ६·३)

याच ऋषीवाणीचा, आपल्या मधुर संस्कारी वाणीनें, कवी अनुवाद करतात.

ताँहारा देखियाछेन--विश्वचराचर
झरिछे आनन्द हते आनन्द निर्झर।
अग्निर प्रत्येक शिखा भये तव काँपे,
वायूर प्रत्येक श्वास तोमारि प्रतापे,

तोमारि आदेश बहि मृत्यु दिवारात
चराचर मर्मरिया करे यातायात।
गिरि उठियाछे ऊर्ध्वे तोमारि इंगिते,
नदी धाय दिके दिके तोमारि संगीते।
शून्ये शून्ये चंद्रसूर्य ग्रहतारा जत
अनन्त प्राणेर माझे काँपिछे नियत।

ताँहारा छिलेन नित्य ए विश्व-आलये
केवल तोमारि भये, तोमारि निर्भये,
तोमारि शासनगर्वे दीप्ततृप्तमुखे
विश्वभुवनेश्वरेर चक्षुर सम्मुखे।

त्यांनीं पाहिलें कीं (तुझ्या) आनंदांतूनच विश्वचराचराचा आनंदनिर्झर झरत असतो. अग्नीची प्रत्येक ज्वाळा तुझ्याच भयाने थरथरत असते. वायूचा प्रत्येक श्वास तुझ्याच प्रतापाने चालतो. आणि मृत्यूदेखील तुझाच आदेश वहन करून या चराचरांत, आपल्या मर्मरध्वनिसहित दिवसरात्र येरझाऱ्या करीत असतो. तुझ्याच इंगितानें—तुझ्याच इशाऱ्यानें—पर्वत वर उठतात. आणि नद्यादेखील तुझ्याच संगीतानें अनेक दिशांनीं वाहूं लागतात आणि आकाशाच्या प्रत्येक पोकळींत हे जितके कांहीं चंद्र, सूर्य आणि ग्रह-तारा आहेत ते सर्व तुझ्याच अनंत प्राणांमध्यें अविरत अखंड स्फुरत राहतात.

त्यांना असा साक्षात्कार झाल्यामुळेंच ते सगळे ऋषिमुनी फक्त तुझ्या एकट्याचेंच भय मनांत बाळगून, तुझ्याकडून मिळालेल्या निर्भयतेच्या जोरावर हे विश्वभुवनेश्वर! तुझ्या नजरेसमोर, तुझ्या सार्वभौम नियमरूपी शासनाच्या विश्वासानें आणि अभिमानानें उजळ माथ्यानें (दीप्त, तृप्त मुखे) या विश्वालयांत राहत असत.

आपला सम्राट न्यायनिष्ठ आहे. त्याला कायद्याचेंच राज्य चालवावयाचें आहे. न्यायानें राज्य चालवतांना तो कोणाचीच गय करणार नाहीं, अशी खात्री असली म्हणजे त्याचे प्रजाजन आणि त्याचे कर्मचारी एका बाजूनें त्याला

भिऊन असतात कीं आपल्या हातून यत्किंचित् देखील आगळीक होता कामा नये. एवढी एक गोष्ट संभाळली म्हणजे मात्र इतर सर्व बाजूनें ते निर्भय असतात. आपण जर न्यायानें वागलों तर सम्राट केव्हांहि आपलें समर्थनच करील, असा विश्वास असल्यानें कर्मचारी आणि प्रजाजन सर्वच प्रसन्न असतात, संतुष्ट असतात. विश्वासानें चालू शकतात. म्हणूनच त्यांचा चेहरा नेहमी दीप्त, उजळ आणि तृप्त—विश्वासाने संतुष्ट असतो. सम्राटाला सर्व भिऊन वागत असले तरी त्याची नजर चुकवावी असें कुणालाहि वाटत नाहीं. त्याच्या देखता सर्व अधिकारांचा उपयोग सर्व कोणी करू शकतात.

## काय ही आमची दुर्दशा !!

या कवितेचे कवीने स्वतां केलेलें इंग्रजी वाचतांना वाटतें की मानवजातीचे सुख-दुःख ओळखून ही लिहिली असावी. पण मूळ बंगाली मध्यें ही हिन्दुस्थानालाच उद्देशून लिहिली आहे याविषयीं मनांत शंका रहात नाहीं. इंग्रजींत फेरफार करण्यांत कवीनें उत्तम अभिरुचि दाखविली आहे आणि स्वाभिमानहि संभाळला आहे. एक सबंध राष्ट्र एखाद्या परदेशी बादशहाच्या हुकमतींत जाणें हें दुःखाचें खरेंच पण अशा प्रसंगीं तो बादशहा जिंकिलेल्या देशांत येऊन राहतो आणि हळूहळू जित लोकांशीं, एकजीव जरी न झाला तरी, समरस होऊन जातो, पण जेव्हां एक सबंध राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करतें तेव्हां हजारों जेत्यांची मनधरणी करूनहि जित लोकांना मधलें अंतर कमी करता येत नाहीं. आणि म्हणून असलें पारतंत्र्य जित लोकांना विशेष झोंबतें. या प्रकारच्या वेदनेनेंच मूळ कविता लिहिली आहे. तो सर्व भाव इंग्रजींत आणण्यापासून फायदा नव्हता. म्हणूनच कवीनें सहस्र सहस्र या शब्दांचे भाषान्तर सोडून दिले आहे.

ज्या लोकांचें सामाजिक जीवन क्षीण झालें आहे, ज्यांचें राष्ट्रीय जीवन अस्तव्यस्त झालें आहे आणि ज्यांचा स्वाभिमान पदोपदीं खंडित झाल्यामुळें ज्यांच्यामध्यें आत्मनिष्ठाहि उरली नाहीं असे लोक परावलंबी आणि म्हणूनच अपमानास्पद जिणें जगून देवाचाच अपमान करीत असतात. आपण देवाचीं लेंकरें आहोंत हें जर त्यांच्या ध्यानांत राहील तर अनाथ

पोरक्यांप्रमाणें ते वागणार नाहींत. देव आपल्याला सोडून गेला आहे आतां आपले या जगांत कोणी नाहीं, किंबहुना या जगांत देव नाहींच असे वाटत असल्यावांचून मनुष्य हीन होण्यास कबूल होणार नाहीं. हीनस्थिति येणें दैवाधीन आहे; पण हीनपणें न वागणें हें मनुष्याच्या हातांत आहे. मनुष्याला जर स्वतःच्या प्रतिष्ठेची कल्पना असली तर तो कधींहि हीनपणें वागण्यास तयार होणार नाहीं. पण ही प्रतिष्ठेची कल्पना याला ईश्वर-निष्ठेवाचून अर्थात् मांगल्यावरील अमर निष्ठेवांचून येऊं शकत नाहीं म्हणूनच कवीनें ही प्रार्थना ईश्वराच्या चरणीं रुजू केली आहे कीं आमच्या हीनतेच्या मुळाशीं तुजविषयींची आमची नास्तिकताच आहे. ही नास्तिकता दूर होईल असा कांहींतरी अनुभव आम्हास करून दे. तुझेशीं आमचें नातें जुळलें म्हणजे आमच्यांत स्वाभिमान आणि तेजस्विता आपोआप येतील.

स्वाभिमान नुसत्या अहंकारानें टिकत नसतो. त्याला आत्मनिष्ठाच लागते. आणि खरीखुरी आत्मनिष्ठा म्हणजेच ईश्वरनिष्ठा अशी स्थिति आहे.

हें गीत अथवा सुनीत आज वाचावेसें देखील वाटत नाहीं. आमच्या लहानपणीं परकी शासनाखालीं आम्ही जे दिवस कंठले त्याचें भयानक आणि लज्जास्पद असें हें चित्र आहे. एवढ्या मोठ्या देशाची इतकी संस्कारी आणि एवढी मोठी प्रजा कशी दबून राहिली होती याची कल्पना आजच्या पिढीला—स्वातंत्र्याच्या प्रसन्न वातावरणांत वावरणाऱ्या तरुण-तरुणींना—कोठून येणार? आणि असेंहि वाटतें कीं त्यांना कल्पनेंत देखील असा अनुभव न मिळो. जी विटंबना दूर करण्यासाठीं आयुष्यभर आम्ही खपलों, त्या विटंबनेचें चित्रदेखील आपल्या वंशजांच्या डोळ्यांपुढे येऊं नये असें मनापासून वाटतें.

पण आपल्याच हृदयाच्या प्रतिनिधीनें, एका आर्य कवीनें, हें चित्र रेखाटून हृदयाची वेदना व्यक्त केली आहे आणि "बापा परमेश्वरा! तुझ्याच घरीं आम्हीं अनाथ पोरकी होऊन राहावें काय?" अशी आर्त प्रार्थना केली आहे. हें गीतदेखील आपला राष्ट्रीय ठेवा आहे. स्वतंत्र झाल्यानंतर उजळ माथ्यानें या गीताचें आपण आतां जतन करूं शकतों.

आमरा कोथाय आछि, कोथाय सुदूरे
दीपहीन जीर्णभित्ति अवसादपुरे
भग्नगृहे, सहस्रेर भृकुटिर नीचे
कुब्जपृष्ठे नतशिरे। सहस्रेर पिछे

चलियाछि प्रभुत्वेर तर्जनी-संकेते
कटाक्षे काँपिया। लईयाछि शिर पेते
सहस्रशासनशास्त्र।

संकुचितकाया
काँपितेछे रचि निज कल्पनार छाया।
संध्यार आँधारे बसि निरानन्द घरे
दीन-आत्मा मरितेछे शत लक्ष डरे।
पदे पदे त्रस्तचित्ते हये लुंठ्यमान
धूलितले, तोमारे जे करि अप्रमाण।
जेन मोरा पितृहारा धाई पथे पथे
अनीश्वर अराजक भयार्त जगते।

प्रभु, आम्ही हे असे कोठे येऊन पडलों आहोंत. कुठें दूर दूर, जिथें प्रकाश नाहीं, जिथल्या भिंती मोडकळल्या आहेत अशा निराशानगरींत, भग्नगृहामध्यें आम्हांला रहावें लागत आहे. आम्हांला दटावणारे हजारों लोक आहेत. कुणीहि आपली नामर्जी दाखविण्यासाठीं भृकुटिभंग केला कीं कमर वाकवून कुबड्यासारखी पाठ करून डोकें खालीं घालून आम्हीं हांजी हांजी करूं लागतों. हजारों लोकापैकीं कुणीहि बोट वर करून दटावले आणि खूण केली म्हणजे त्यांचा शासन अधिकार स्वीकारून त्यांचे मागे मागे चालूं लागतों. त्यांच्या एका कटाक्षानें आमचा थरकांप होतो. आणि सहस्रावधि लोकांच्या राज्य कारभाराचा भार आम्ही मुकाट्यानें शिरावर धारण करतों.

आपल्या मनांतच निरनिराळीं भुतें उत्पन्न करून आम्हीं कांपूं लागतों. जीव मुठींत धरून शरीराचा संकोच करतो. संध्याकाळच्या अंधारांत बसून आनंद-रहित खोलीमध्यें शेंकडो आणि लाखो भयांनी दीन व्याकुळ होऊन आम्ही अखंड मरत रहातों. आणि जो दिसेल त्याच्या पायीं घाबरून धुळींत लोटांगण घेतों. आम्ही म्हणजे तुझी मुलें. आम्ही जर अशी नीचता स्वीकारली तर

त्यांत आम्ही तुझा अपमानच करतो आहोंत. कारण आमचें वागणें पोरक्या मुलांच्या सारखे असतें. आम्हांला पाहिलें म्हणजे कोणीहि म्हणावें कीं यांना आईबाप नाहींत, यांच्या जगांत नाहीं कोणी राजा, नाहीं कोणी ईश्वर म्हणूनच भयार्त होऊन हे सैरावैरा धांवत सुटले आहेत.

यासाठीं देवा, आमची ही लज्जा दूर करण्यासाठीं, आम्हीं नास्तिकता सोडून द्यावी यासाठीं, आम्हांला तुझी ओळख पटवून दे आणि आम्हांला ज्या अंधारानें घेरलें आहे तो दूर करण्यासाठीं उज्ज्वल प्रदीप होऊन दीप-ग्रहासारखा आमच्यामध्यें उभा रहा.

# पुनरुद्धारक अमृतवर्षा

आपल्या धर्मकारांनीं मनुष्याचा जन्म गर्भाधानाच्या क्षणापासून मानला आहे. त्या महत्त्वाच्या क्षणीं जे संस्कार जीवाला मिळतात ते त्याला अखेरपर्यंत पोहोचतात. गर्भामध्यें बालकानें मूठ घट्ट मिटून ठेविलेली असते. त्यावेळीं ज्या रेखा त्याच्या तळहातावर उमटतात तेंच त्याचें सामुद्रिक. साधा कागद कां घ्या ना–त्याला पहिली जी घडी पडते–ती कायम रहाते. याच दृष्टीनें प्रत्येक महाजातीनें स्वतःसाठीं जें कांहीं मिशन पसंत केलें असेल ते युगानुयुगें त्या जातीच्या हाडींमासीं खिळलेलें असतें. प्राणांत आणि बुद्धींत, संकल्पांत, आणि प्रवृत्तींत तेंच मुरलेलें असतें. प्रत्येक महाजाती आपल्या युग-जीवनामध्यें एकांगिता दूर करून सर्वांग परिपूर्ण होण्याचा प्रयत्न करीत असते, यामुळें भिन्न भिन्न काळीं पुरुषार्थाचें प्रस्थानहि ती बदलत असते. आज ज्या विचाराला प्रधान मानलें त्याला उद्यां ती गौण करील, परवां त्याज्य ठरवील, पुनः त्या विचाराशीं नवें मिश्रण करून त्याचा स्वीकार करील. असें सर्व चालत राहील पण इतकें करूनहि ही महाजाती पुनः पुनः आपल्या मूळ प्रेरणेकडेच येईल. तिचा महापुरुषार्थ तोच असेल. सर्वांग परिपूर्ण होऊन देखील ती आपलें वैशिष्टय सोडू शकत नाही. या वैशिष्ट्यामुळेंच तिला अखिल विश्वाची विशिष्ट सेवा करण्याची योग्यता प्राप्त होते. हाच तिचा स्वधर्म होतो आणि यामुळेंच विश्वव्यवस्थेमध्यें तिला तिचें अनन्यसाधारण स्थान मिळतें. भारताचें वैशिष्ट्य

आणि भारताचें चिरंतन मिशन या गीतामध्यें ग्रंथित केलें आहे. दरेक राष्ट्रानें स्वतःसाठीं असें निराळे मिशन पसंत केलेलें असतें. जीवनसिद्धीचा एकेक प्रश्न स्वतःच्या हातीं घेतलेला असतो. या प्रश्नांपैकीं सर्वांत व्यापक आणि सर्वांत महत्त्वाचा प्रश्न भारतानें आपलासा केला आहे. आणि यामुळेंच या जगांतील भिन्न भिन्न संस्कृतीचा पुनः पुनः समन्वय करण्याचें काम भारताकडे आलेलें आहे आणि यापुढेंहि येणार. एकत्व म्हणजे काय? हें भारतानें शोधून काढलें आहे. एकनिष्ठेमध्यें एकांगिता येतांकामा नये. एकत्व म्हणजे पूर्णत्व. एकत्व म्हणजे सर्व-समन्वय. एकत्व म्हणजे अविरोध, अद्रोह. एकत्व म्हणजे विश्वकुटुम्बकम्; अथवा उनिषदाचा आवडता आणि गोड शब्द वापरावयाचा असेल तर "एकनीडम्" (एक घरटें). येथें सर्वांना स्थान आहे. सर्वांचा स्वीकार आहे, सर्वांची सोय आहे. याचेंच दुसरें नांव अहिंसा. यांतूनच बंधुतेचा आत्मीयतेचा उदय होतो.

हें सर्व साधण्यासाठींच भारतीय ऋषींनीं आत्मनिष्ठ संस्कृति विस्तारली. स्वतःचें व जगाचें रहस्य शोधतां शोधतां त्यांना आत्मा सांपडला. जो आपल्या हृदयांतहि वास करतो आणि या सर्व विश्वांतहि. या आत्म्याची प्राप्ति होतांच एका आत्मवीरानें आनंदानें गर्जना केली आणि जगाला सुनावलें कीं 'लोकहो, तुम्ही सर्व अमृताचे पुत्र आहांत. आणि दिव्य धामामध्यें रहाणारे देवलोकहो, तुम्हीहि सर्व अमृताचे पुत्र आहांत. तुम्हांला कसलेंच भय नाहीं.' यापुढें ऋषि म्हणतो 'शोध करतां करतां मला त्या पुरुषाचा शोध लागला आहे कीं जो अंधकाराच्या पलीकडे आहे. आदित्यासारखा तेजस्वी आहे. अंधकाराचें भयानक आणि विशाल क्षेत्र ओलांडल्यानंतरच मला त्याची प्राप्ति झाली. त्याला ओळखलें म्हणजे मनुष्य मृत्यूला ओलांडून जातो. मानवजात जेव्हां त्याला ओळखूं शकेल तेव्हांच तिला अमरत्व प्राप्त होईल. विनाशापासून ती वांचेल. जीवनरहस्य समजून येऊन ती कृतार्थ होईल. मला हेंहि कळून चुकलें आहे कीं, या आत्मप्राप्तीखेरीज उद्धाराचा दुसरा मार्ग नाहीं, भारतीयांनी या आत्मऋषीची, अमृताचार्याची वाणी ऐकिली. सर्वांनी मिळून आत्मप्राप्तीची साधना शोधून काढली आणि ते भराभर पुढे गेले. भारतवर्षाचा उत्कर्ष झाला. देश-देशान्तराहून येणाऱ्या ज्ञानार्थी, आत्मार्थी आणि सुखार्थी विद्यार्थी लोकांची तहान भारतानें भागवली. पण पुढें भारत शिथिल झाला. त्याच्या डोळ्यांवर झांपड आली आणि तो 'अंधंतमः' असेंच ज्याचें वर्णन केलें जातें अशा मोहनिद्रेमध्यें सांपडला.

आतां जागृतीचा काळ आला आहे. लोक अनेक मार्गांनीं मुक्तीची वाट शोधीत आहेत. अशा वेळीं कवि हा जुना इतिहास शोधून काढून म्हणतो कीं, प्राचीन काळीं तपोभूमीमध्यें

ऋषींची ही अमृतवाणी-दिव्यवाणी ऐकिली गेली होती. आज भारतामध्यें पुनः तीच वाणी मुखरित होवो, तोच आत्मविश्वास जागृत होवो. भारताला ती संजीवनी आत्मविद्या पुनः प्राप्त होवो आणि स्वर्गांतील आणि मृत्युलोकांतील सर्व जीवांच्या कानीं ती मृत्युंजय घोषणा पडो. मृत्यूवर विजय मिळवून देणारी, सर्व भय दूर करणारी आणि सर्व मर्यादा तोडून अनंतत्वाला पोचविणारी अमृतवर्षा पुन एकदां वर्षू दे. आणि भारता, तू निश्चय बाळग कीं हाच एक मार्ग आहे, दुसरा मार्ग नाहीं,–खचितच नाहीं.

एकदा ए भारतेर कोन् वनतले
के तुमि महान् प्राण, की आनन्दबले
उच्चारि उठिले उच्चे, 'शोनो विश्वजन,
शोनो अमृतेर पुत्र जत देवगण
दिव्यधामवासी, आमि जेनेछि ताँहारे
महान्त पुरुष जिनि आँधारेरे पारे
ज्योतिर्मय। ताँरे जेने, ताँर पाने चाहि
मृत्युरे लंघिते पारो, अन्य पथ नाहि।'

आरबार ए भारते के दिबे गो आनि
से महा-आनन्दमंत्र, से उदात्तवाणी
संजीवनी, स्वर्गे मर्ते सेइ मृत्युंजय
परम घोषणा, सेइ एकान्त निर्भय
अनन्त अमृतवार्ता।
रे मृत भारत,
शुधु सेइ एक आछे, नाहि अन्य पथ।

# ६१

## दूर करा सर्व बाधा !

एकुणसाठ, साठ आणि एकसष्ट–ही तीन सुनीतें मिळून एक वातावरण होतें. त्यांतल्यात्यांत ५९ वें सुनीत प्रस्तावना म्हणून अलग करतां येईल. पण ६० आणि ६१ हीं मात्र एकाच काव्यमय विचाराचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध आहेत.

उपनिषदांतील ऋषि आनंदगर्जना करून म्हणतो : 'हे विश्वजन ऐका ! अमृताच्या पुत्रांनो आणि दिव्यधामवासी सर्व देवतागण ऐका ! अंधकाराच्या पार प्रकाशमान अशा महान्त परमपुरुषाला मीं जाणूं शकलों आहे. त्याला जाणल्यानेंच, त्याचें दर्शन केल्यानेंच तुम्हीं मृत्यूला ओलांडू शकाल. दुसरा मार्ग नाहीं.' ऋषीची ही गर्जना उपनिषदांत साठवून ठेवलेली आहे. भयभीत आणि निराश अशा भारताला ही अमृतवाणी पुन्हां कोण ऐकवील ? अशी पृच्छा करून, ऋषिप्रमाणे कवीहि म्हणतात कीं, भारतासाठी–मरून पडलेल्या भारतासाठी अमृत-संजीवनीचा हा एकच मार्ग आहे. दुसरा नाहीं.

साठाव्या सुनीतांत एवढें जाहीर केल्यानंतर पुढील सुनीतांत कवी म्हणतात कीं, आतां आपल्याला आस्तिक बनलेंच पाहिजे. स्वतःच्या भाराखालीं भारताला पुरून टाकणारे कचऱ्याचे ढीग दूर केले पाहिजेत. त्यांना उद्ध्वस्त केले पाहिजे. भारतामध्यें प्रभात सुरू झाली. आतां आपण आंधळेपणा सोडून ज्ञान आणि कर्माची सांगड बांधून पुरुषार्थाला प्रवृत्त झालें पाहिजे आणि त्या ज्योतिर्मय पुरुषाचें दर्शन करून आत्मविश्वासानें म्हटलें पाहिजे

की "हे दिव्यधामवासी देव हो. आम्ही पण तुमच्या सारखेच अमृताचे पुत्र आहोंत. सूर्यबिंबामध्यें जो दिव्य पुरुष दिसतो आहे तोहि मीच आहे.

**"यो असौ असौ पुरुषः सोऽहमस्मि !"**

ए मृत्यु छेदिते हबे, एइ भयजाल,
एइ पुंजपुंजीभूत जड़ेर जंजाल,
मृत आवर्जना । ओरे, जागितेइ हबे
ए दीप्त प्रभातकाले, ए जाग्रत भवे,
एइ कर्मधामे । दुइ नेत्र करि आँधा
ज्ञाने बाधा, कर्मे बाधा, गतिपथे बाधा,
आचारे विचारे बाधा, करि दिया दूर
धरिते हइबे मुक्त विहंगेर सुर
आनन्दे उदार उच्च ।

समस्त तिमिर
भेद करि देखिते हअिबे ऊर्ध्वशिर
एक पूर्ण ज्योतिर्मये अनन्त भुवने ।
घोषणा करिते हबे असंशयमने,
'ओगो दिव्यधामवासी देवगण जत,
मोरा अमृतेर पुत्र तोमादेर मतो ।'

या मृत्यूचा छेद केलाच पाहिजे. या मृत्यूला, या भयजाळाला, या ढीग होऊन पडलेल्या जड जंजाळाला आणि मरून पडलेल्या कचऱ्याला छिन्नभिन्न केलेंच पाहिजे. अरे गड्या! या पुंजाळणाऱ्या प्रभातकाळीं या जाग्रत जगामध्ये, या कर्मधामामध्यें जागे झालेच पाहिजे. दोन्ही डोळे आंधळे केल्यामुळें ज्ञानामध्यें, कर्मांमध्यें, येण्याजाण्याच्या मार्गांत आणि आचाराविचारांत जी बाधा

उत्पन्न झाली आहे, ती सर्व दूर करून मुक्त विहंगाचे उदार आणि उच्च गायन आनंदानें सुरू केल्यावाचून गत्यंतर नाहीं.

समस्त अंधाराला भेदून, डोकें उंच करून, अनंत भुवनांमध्यें वसणाऱ्या अद्वितीय, पूर्ण ज्योतिर्मय पुरुषांचें दर्शन केलेंच पाहिजे. आणि निःशंक चित्तानें घोषणा केली पाहिजे कीं 'हे दिव्यधामवासी सर्व देव हो! आम्ही देखील तुमच्या-सारखेच अमृताचे पुत्र आहोत.'

वि: ......
अनुक्र ...... नों: दि: ......

६२

# आशा सोडली नाहीं

निराशेच्या अंधकाराच्या वेळीं ज्याचा विश्वास ढळत नाहीं, उलट दृढतर होतो तोच खरा आस्तिक होय. रुद्रानें तांडव नृत्य सुरू केलें असले आणि एकेक पावलाखालीं तो एकेक विश्व चूर करीत असला तरी त्यावेळीं त्याला शिव म्हणून जो ओळखतो तोच ईश्वरनिष्ठ होय. भारतवर्ष जेव्हां उन्नतीच्या शिखराला जाऊन पोचला होता त्यावेळीं ज्यांनीं भारत-भाग्य-विधात्या विष्णूची स्तोत्रें गायिलीं असतील त्यांच्या आस्तिकतेचें कसलेंच आश्चर्य करावयास नको. भारतीय तपोवीर जेव्हां आत्म्याची साधना करीत होते आणि इन्द्रियजय, वासनाजय करून स्वानंद–साम्राज्याचे अधिकारी होत होते त्यावेळीं जर कोणी ईश्वराच्या अस्तित्वाची ग्वाही दिली तर त्याचें कौतुक करण्याचे कारण नव्हते. पण आज जेव्हां भारत विपत्तींत पडला आहे एवढेंच नव्हे तर भारतीय आत्मा क्षीणप्राण झाला आहे, भारतीय समाज हीनतेचे प्रदर्शन करून राहिला आहे, जगाच्या दरबारांत भारताला लज्जेचे स्थान ग्रहण करावें लागत आहे; अशा वेळीं देखील भगवंतांनीं या भारताचा त्याग केला नाहीं, तो येथें आहे आणि त्याच्या वरदहस्ताचा स्पर्श भारताच्या मस्तकाला होणार आहे, असा विश्वास बाळगणें हीच खरी आस्तिकता होय.

ईश्वराची योजना मनुष्य समजू शकत नाहीं. त्याची माया अघटित-घटना-पटीयसी आहे. जो रस्ता आपल्याला चक्रव्यूहाच्या बाहेर घेऊन जात आहे अशी भीती वाटते तोच

एकाएकीं अगदीं चक्रव्यूहाच्या केन्द्रभागीं जाऊन पोचतो. कवि म्हणतो—

तव चरणेर आशा ओगो महाराज,
छाड़ि नाइ। एत जे हीनता, एत लाज,
तबु छाड़ि नाइ आशा। तोमार विधान
केमने की इन्द्रजाल करे जे निर्माण
संगोपने, सबार नयन अन्तराले,
केह नाहि जाने। तोमार निर्दिष्ट काले
मुहूर्तेअि असंभव आसे कोथा हते
आपनारे व्यक्त करि आपन आलोते
चिर प्रतीक्षित चिर-संभवेर वेशे।

आछ तुमि अन्तर्यामी, अे लज्जित देशे;
सबार अज्ञातसारे हृदये हृदये
गृहे गृहे, रात्रिदिन जागरूक हये
तोमार निगूढ शक्ति करितेछे काज।
आमि छाड़ि नाअि आशा ओगो महाराज!

हे महाराज, तरीहि तुझ्या चरणाची मी आशा सोडली नाहीं. इतकी हीनता पदरीं असूनहि, इतकी लाज डोक्यावर असूनहि तुझी आशा सोडली नाहीं. तुझे रचना-कौशल्य अतर्क्य आहे. तुझी व्यवस्था कशा रीतीनें कसले इन्द्रजाल उत्पन्न करील आणि लोकांच्या दृष्टिआड गुप्तपणें काय काय घटना घडतील तें कुणालाच कळत नसतें. तूं ठरविलेल्यावेळीं मुहूर्त असो नसो, शक्यता असो नसो, कुठूनतरी एकाएकीं तू स्वतःला व्यक्त करतोस. आणि चिरसंभवाच्या वेषानें दीर्घकालाची आमची प्रतीक्षा तृप्त करून स्वतःच्याच प्रकाशानें प्रकाशित होतोस.

हे करुणासागरा, या लजित देशांत देखील अंतर्यामीं रूपानें तूं वसत आहेस. लोकांना नकळत प्रत्येक हृदयांत आणि प्रत्येक गृहांत रात्रंदिवस जागरूक राहून

तुझी निगूढ शक्ती आपले कार्य करीत असते म्हणूनच हे महाराज, मी तुझी कधींहि आशा सोडली नाहीं. आजहि ती आशा उराशीं बाळगून आहे.

घडी भरतांच, तुझा निश्चित काल येतांच भारताचा उदय निश्चित होणार याचा मला विश्वास आहे.

हा उदय होणार म्हणजे पूर्वीचे दिवस पुनः येणार असें नव्हे, मोडून पडलेल्या घराची डागडुजी होणार आहे असेहि नव्हे. तर भगवंता, या पुरातन देशांत तुझ्या हांतून नवसृष्टि होणार आहे. सोन्याच्या खतांतून नवीन पीक येणार आहे. आणि ही श्यामल धरित्री सुगंधी फुलांनीं, रसाळ फळांनीं आणि अपूर्व वनश्रीनें भरभटणार आहे.

६३

# कशी असेल ती प्रभात!

सकाळीं तांबडें फुटलें म्हणजे सूर्योदय आता होणार हें सांगण्याची गरज नसते. सूर्योदय कोठें होणार, केव्हां होणार, कसा होणार याची कल्पना सर्वच करूं शकतात. पण रात्रभर जागून डोळे थकून गेलेले असतात, मध्यरात्र उलटली तरी अंधकार वाढतच असतो, एक वाजला, दोन वाजले, अडीच झाले, तीन वाजले: तरीहि जेव्हां प्रभातकाळची अस्पष्ट कल्पनाहि डोकावू शकत नाहीं, तेव्हां आस्तिकता टिकणें कठिण होतें. आणि वाटूं लागतें: "आजवर सूर्योदय झाले ते होऊन गेले. काल जो सूर्यास्त झाला तो कायमचाच. आता सूर्योदयाची आशाच नको. आतां हा अंधकार आपल्या कपाळीं कायमचा ठेवलेला आहे. आतां या अंधकाराशींच कायमची तडजोड करून दिवस कंठले पाहिजेत. याचें साम्राज्य स्वीकारूनच आतां चालावें लागणार. आता कसची तक्रार आणि कसची आशा! अशा निराशेनें घेरलें असता ज्याला, चंडोल पक्ष्याप्रमाणें, कल्पनेनेंच सूर्योदय दिसूं लागतो, त्याची श्रद्धा खरी. त्यालाच क्रान्तदर्शी म्हणतां येईल.

असें जें थोडें श्रद्धाधन क्रान्तदर्शी महापुरुष या देशांत निर्माण झाले आणि घोर अंधाऱ्या युगांतदेखील ज्यांना उषःकालाचीं स्वप्नें पडूं लागलीं आणि 'सूर्योदय होणार' म्हणून जे खात्रीने बोलूं लागले त्यांच्यापैकीच रवी नामधारी आपले कवी होते.

विसरता कामा नये कीं १९ वें शतक उलटून विसाव्याला प्रारंभहि झाला नव्हता, अशा वेळीं लिहिलेलीं हीं प्रभातगीतें आहेत.

प्रभात होणार एवढीच श्रद्धा उराशीं बाळगली असली तरी ती सकाळ कशी होणार याची कांहींच कल्पना होत नसल्याकाळीं रचलेलें कवीचें हें सुनीत आहे.

राणी विक्टोरियाला विजयावती म्हणून, तिच्या राज्याला साठ वर्षें झालीं, आतां आपल्याला तिच्या साम्राज्यांत राहून सुखाचे दिवस लाभणार. आणि सर्व बाजूनें प्रगति होणार अशा तऱ्हेचे, राजनिष्ठेचें गोडवे गाणारी गीतें ऐकून कान किटल्यामुळें कवीनें हें गीत गायिलें असलें पाहिजे.

पतित भारते तुमि कोन् जागरणे
जागाइबे हे महेश, कोन् महाक्षणे,
से मोर कल्पनातीत। की ताहार काज,
की ताहार शक्ति देव, की ताहार साज,
कोन् पथ तार पथ, कोन् महिमाय
दाँड़ाबे से संपदेर शिखरसीमाय
तोमार महिमज्योति करिते प्रकाश
नवीन प्रभाते।

अजि निशार आकाश
जे आदर्शे रचियाछे आलोकेर माला,
साजायेछे आपनार अंधकार थाला,
धरियाछे धरित्रीर माथार उपर,
से आदर्श प्रभातेर नहे महेश्वर!
जागिया उठिबे प्राची जे अरुणालोके
से किरण नाहि आजि निशीथेर चोखे।

हे महेश! पतित भारताला तुम्हीं कोणच्या जागरणपर्वीं, कोणच्या महाक्षणीं जागवणार आहात तें माझ्या कल्पनेतही येऊं शकत नाहीं. हे देव! त्या

भारताचें काज काय असेल ? त्याची शक्ति कोणची ? त्याचा साज कसा असेल ? कोणचा मार्ग त्याचा मार्ग असेल ? संपदेच्या शिखराच्या टोकावर नवप्रभातकाळीं, तुझी महिमाज्योति प्रगट करण्यासाठीं तो कोणच्या महिम्यानें, कोणच्या गौरवानें उभा राहील ? हे सर्व माझ्या कल्पनेच्या पलिकडे आहे ! मला एवढेंच ठाऊक आहे, आणि म्हणून मी निश्चयानें म्हणतों कीं आजचें रात्रीचें आकाश ज्या आदर्शाला अनुसरून प्रकाशाची माळा रचीत आहे; स्वतःच्या अंधकाराची थाळी ज्या दिव्यांनीं त्यानें सजवलेली आहे, आणि धरित्रीच्या डोक्यावर जी आरती त्यानें उंचावली आहे, तो आदर्श कांहीं पहाटेचा आदर्श खात्रीने नव्हें, हे महेश्वर !

ज्या अरुण प्रकाशानें प्राची दिशेला जाग येणार आहे. त्या प्रकाशाचा किरण आजच्या या रात्रीच्या डोळ्यांत खात्रीनें चमकत नाहीं.

६४

# शताब्दीचा भयानक आढावा

एकोणिसावें शतक मावळलें आणि विसावें सुरू झालें तेव्हां जगाची कशी काय प्रगती झाली आहे याचा आढावा कविनें या गीतांत घेतला आहे. आकडे-शास्त्री निरनिराळ्या क्षेत्रांत किती आणि कशी प्रगति झाली आहे याचें मोजमाप घेण्यासाठीं आकडे गोळा करतात. प्रतिशत्तींचेंही प्रमाण काढतात. आणि त्यावर बुद्धीला पटणारे निबंध लिहितात. कवीला तसें करावें लागत नाहीं.

पाऊस पडणार आहे किंवा नाहीं हें हवामानशास्त्र्याला आकड्यावरून शोधून काढावें लागतें. यंत्रें वापरावीं लागतात पण पशुपक्ष्यांच्या चामडीला आणि फुफ्फुसाला तें आपोआप समजतें. अचूक समजतें. हवामानशास्त्रयाच्या अनुमानांत चूक होईल पण या प्राण्याच्या स्वयंभू आकलनांत ती होत नाहीं. कवीची वेदनाशक्ति अत्यंत नाजूक असते. त्याला पुष्कळशा गोष्टी हवेंतून समजतात. तो प्रमाणें देऊं शकणार नाहीं. वादविवाद करूं शकणार नाहीं. पण त्याला जें समजलेलें असतें त्याविषयीं त्याला आंतून पूर्ण प्रत्यय असतो.

पांच सहा दशकांपूर्वीं कवीच्या दृष्टीनें पश्चिमेकडे जें पाहिलें तें सर्व जगाची दृष्टि आज अत्यंत कडू आणि जळजळीत अनुभवानें साक्षात पहात आहे. जगाच्या चढाओढींत शिरल्यानें जे लोक आंधळे झाले असतात, त्यांना दूरवरचे दिसत नाहीं. पण जे भागमहा

सर्वलोकहितेरत आहेत, तटस्थ आहेत, कारुणिक आहेत, त्यांची दृष्टि सहजच दूरवर पोहोंचते. मग ते कवि असतील तर कंठरवानें जगाला जागें करण्याचा प्रयत्न करतील. कर्मवीर असतील तर ओढून येणारा भयानक प्रसंग टाळण्यासाठीं, किंवा कमी करण्यासाठीं पूर्वप्रयत्नांची पराकाष्ठा करतील. जे ध्यानी, योगी, भक्त असतील ते संकल्पसिद्धि प्राप्त करून मूकपणें ईश्वराची प्रार्थना करतील. यांपैकीं कोणीहि स्वस्थ मात्र बसणार नाहींत.

रविबाबूंनीं पाहिलें कीं पश्चिमेची प्रवृत्ति जर अशीच चालली (आणि ती तशीच चालणार याविषयीं कसलीच शंका उरलेली नाहीं हे त्यांना दिसत होतेंच)—तर पश्चिमेकडे युरोप-अमेरिकेचे निरनिराळे देश आपापसांत भांडून स्वतःचा आणि स्वतःच्या संस्कृतीचा नाश करण्यासाठीं एका भयानक खड्याकडे धांवत आहेत. आणि तिकडचे कवि आपलें कर्तव्य न ओळखतां लोकांच्या, राष्ट्रांच्या भांडाभांडीला मदतच करीत आहेत. स्वतः कवि असल्यामुळें त्यांना तिकडच्या कवींची कर्तव्यच्युति सर्वांत अधिक असह्य झाली असल्यास आश्चर्य नाहीं.

रविबाबूंना जर विशेष कशाची चीड असेल तर ती दंभाची. आणि पश्चिमी सभ्यतेनें जर एखादी गोष्ट विशेष कमावली असेल तर ती दंभच होय. हीन मनोवृत्तीला देखील गोंडस नांव देऊन प्रथम तिचा बचाव करावयाचा आणि पुढें तेवढें पचलें म्हणजे तिचा प्रचारहि करावयाचा, हें पश्चिमी राष्ट्रांच्या चांगलेंच अंगवळणीं पडलें आहे. रविबाबूंनीं आपला हा आदावा जपान, आणि अमेरिका या दोन्ही राष्ट्रांपुढें मुद्दाम व्याख्यानें देऊन मांडला होता. तीं व्याख्यानें 'नॅशनॅलिझम' अर्थात् 'राष्ट्रपूजा' या नांवानें छापलीं आहेत. आणि त्यांच्या शेवटीं या गीताचा इंग्रजी अनुवादही दिला आहे.

शताब्दीर सूर्य आजि रक्तमेघ-माझे
अस्त गेल; हिंसार अुत्सवे आजि बाजे
अस्त्रे अस्त्रे मरणेर अुन्माद रागिणी
भयंकरी। दयाहीन सभ्यतानागिनी
तुलेछे कुटिल फणा चक्षेर निमिषे
गुप्त विषदन्त तार भरि तीव्र विषे।

स्वार्थे स्वार्थे बेधेछे संघात; लोभे लोभे
घटेछे संग्राम; प्रलय-मंथन-क्षोभे
भद्रवेशी बर्बरता अुठियाछे जागि
पंकशय्या हते। लज्जा शरम तेयागि
जातिप्रेम नाम धरि प्रचण्ड अन्याय
धर्मेरे भासाते चाहे बलेर वन्याय।

कविदल चीत्कारिछे जागाइया भीति
श्मशान-कुक्कुरदेर काड़ाकाड़ि-गीति।

शताब्दीचा सूर्य आज रक्तमेघांच्या मागें अस्तास गेला. हिंसेच्या उत्सवांत आज प्रत्येक अस्त्र हातीं घेऊन मृत्यूची भयंकरी उन्मादरागिणी वाजत आहे. पश्चिमेची निर्दय सभ्यता-नागिणी आपल्या गुप्त विषदंतामध्यें तीव्र जहर भरगच्च भरून आणि आपली कुटिल फणा पसरून टक लावून पहात आहे. दंश करण्याची अगदीं संधिच पहात आहे.

जिकडे पहावे तिकडे तात्पुरते आणि नागडे स्वार्थ आपापले संघटन करीत आहेत. (संघ आणि लीग एकामागून एक तयार होतात आणि मोडतात) प्रत्येक लोभामागून एकेक युद्ध तयार होऊं लागलें आहे. आणि मागचा पुढचा कसलाही विचार न करणारी भयंकर बर्बरता सुंदर सभ्यतेचा वेश धारण करून प्रलयमंथनासाठीं प्रक्षुब्ध होऊन आपल्या चिखलाच्या शय्येवरून खडबडून जागी झाली आहे. कमर बांधून तयार होत आहे आणि प्रचंड अन्याय लाजलज्जा सर्व सोडून देऊन राष्ट्रप्रेमाचें, राष्ट्रपूजेचें गोड नांव धारण करून पाशवी बलाचा लोंढा चालवून धर्माला त्या प्रवाहांत बुडवून टाकूं पहात आहे.

आणि तिकडचें कवि? तेहि पिसाळले आहेत. राष्ट्राराष्ट्राच्यामध्यें परस्पर अविश्वास, द्वेष आणि भीति उत्पन्न करूं लागले आहेत. आणि स्मशानांतील कुत्रीं हाडकांसाठीं आणि आतड्यांच्या तुकड्यासाठीं खेंचताण करतात त्याप्रमाणें हे लोक खेचाताणीचीं गजग्राह-गीतें गाऊ लागले आहेत?

देवा, आतां यांचे कसे होणार आणि यांच्या हातून मनुष्यजात कशी वाचणार!!

६५

# विश्वाचें विराट विधान

ईश्वराची, मानवतेची, धर्माची, मांगल्याची, किंवा सदाचाराची पूजा करण्याच्या ऐवजी मनुष्यानें आंधळ्या अभिमानाला पेटून आपापल्या राष्ट्राचीच पूजा सुरु केली. "राष्ट्र हेंच माझें उपास्य दैवत आहे. राष्ट्राच्या स्वार्थासाठीं मी वाटेल तें पाप करावयास तयार आहे. राष्ट्रासाठी नरकाला जाणेंदेखील मी पसंत करीन" असें मोठ्या अभिमानानें मानव म्हणू लागला.

गेल्या शतकाच्या शेवटीं शेवटीं हा आंधळा राष्ट्र-पूजा धर्म इतका बोकाळला कीं, याचा निषेध करण्यासाठीं रवीन्द्रनाथांनीं जगांत निरनिराळ्या देशीं चार-पांच कळकळीची व्याख्यानें दिलीं.

या विषयावर जेव्हां ते जपानांत बोलले तेव्हां रशियावर लोकोत्तर विजय मिळवून शेफारुन गेलेल्या तिकडील लोकांना कवीन्द्रांचा राग आला. 'पराजित राष्ट्राचा प्रतिनिधि आम्हांला शिकवायला आला आहे!' अशी त्यांनीं कवीन्द्रांची त्यावेळी हेटाळणी देखील केली. (Nationalism ह्या नांवाखालीं त्यांचीं तीं व्याख्यानें प्रकाशित झालीं आहेत. आणि जगभर आजहि तीं वाचली जातात.) राष्ट्राभिमान हा एक ज्वर आहे. सन्निपात आहे. याने ज्या राष्ट्राला पछाडलें त्याची धर्मबुद्धि, न्यायबुद्धि नष्ट होते. आणि थोडा वेळ मोठी भरभराट होऊन शेवटी त्याचा नाशच होतो असे भाकित त्या

ग्रंथांत केलें आहे. म्हणूनच नॅशनेलिझमसाठीं मीं शब्द वापरला आहे राष्ट्र-पूजाधर्म, खरोखर तो अधर्मच आहे.

या सर्व विचारानें जेव्हां कवी भारले गेले होते त्याकाळीं लिहिलेलें हें सुनीत आहे. व्यक्तीला आपल्या स्वार्थांचा लाज वाटते म्हणून तो त्या स्वार्थाला आळा घालण्याचा, निष्फळ कां होईना, प्रयत्न करीत असतो. व्यक्तीच्या मानानें राष्ट्र ही प्रचंड, गौरवपूर्ण वस्तु आहे. 'राष्ट्रपुरुषाच्या स्वार्थासाठीं कांहींहि केलें तरी तें क्षम्य आहे–नव्हे तें प्रशंसनीय आहे–पुरस्करणीय आहे'; असें म्हणण्यापर्यंत मदांध मानवाची मजल जाते. अशा वेळीं अध्यात्माच्या नियमावर विश्वास असलेल्या क्रान्तदर्शी कवीचा पुण्यप्रकोप जाग्रत होणारच. कवी निक्षून सांगतो.

स्वार्थेर समाप्ति अपघाते। अकस्मात्
परिपूर्ण-स्फीति-माझे दारुण आघात
विदीर्ण विकीर्ण करि चूर्ण करे तारे
काल झंझा-झंकारित दुर्योग आंधारे।
एकेर स्पर्धारे कभु नाहि देय स्थान
दीर्घकाल निखिलेर विराट विधान।

स्वार्थ जत पूर्ण हय लोभक्षुधानल
तत तार बेड़े ओठे—विश्वधरातल
आपनार खाद्य बलि ना करि विचार
जठरे पुरिते चाय। बीभत्स आहार
बीभत्स क्षुधारे करे निर्दय निलाज,
तखन गर्जिया नामे तव रुद्र बाज।

छुटियाछे जातिप्रेम मृत्युर संधाने
बाहि स्वार्थतरी, गुप्त पर्वतेर पाने।

स्वार्थांची समाप्ति अपघातांतच व्हायची. आंधळा स्वार्थ बेताल झाला म्हणजे

अपमृत्यु ठेवलेलाच. स्वार्थ जेव्हां परिपूर्ण माजलेला असतो, तेव्हांच काळ प्रतिकूल होऊन अचानक, दारुण आघाताच्या द्वारा—झंझावाताची गर्जना करणाऱ्या दुर्दिनाच्या अंधकारांत त्याला विदीर्ण, विकीर्ण करून चूर्ण करून टाकतो. या समस्त विश्वाची विराट रचना—अर्थात् देवाच्या घरचा नियम—एकाच्या अभिमानाला, बढाईला दीर्घकालपर्यंत टिकूं देत नाहीं.

स्वार्थ जसजसा यशस्वी होत जातो, पूर्ण होत जातो, तसतसा लोभाचा जठरानल वाढतच जातो. आणि मग या विश्वधरातलाला, समस्त पृथ्वीला आपलें खाद्य समजून, कसलाच विचार न करतां तिला पोटांत उतरवूं इच्छितो. अशा रीतीनें त्याचा बीभत्स आहार प्रथम बीभत्स क्षुधेला—ओंगळवाण्या भुकेला क्रूर आणि निलाजरी करतो. मग तुझें भीषण वज्र प्रबळ गर्जना करून त्याच्या डोक्यावर उतरते. स्वार्थांध राष्ट्राभिमान स्वार्थाच्या नौकेंत बसून जणू मृत्यूला शोधत, विनाशरूपी गुप्त खडकाकडे प्रयाण करीत असतो.

याचकाळीं रवीबाबूंनीं महाभारतातील श्लोक जगापुढें मांडला होता :

वर्धति अधर्मेण नरः
ततो भद्राणि पश्यति ।
ततः सपत्नान् जयति;
समूलस्तु विनश्यति

# प्रलयदीप्ति × अरुणप्रतीक्षा

ज्याप्रमाणें कवींनीं त्रेसष्टाव्या सुनीतांत स्पष्टपणें म्हटलें कीं राज्यकर्त्यांच्या साम्राज्याचें वैभव ही कांहीं मानव्याच्या उत्कर्षाची निशाणी नव्हे, त्याचप्रमाणें सहासष्टाव्या या सुनीतांत ते म्हणतात कीं आज पश्चिमेकडे जें युद्धसामर्थ्य भडकलेलें दिसतें तो कांहीं मानवी उत्कर्षाचा अरुणोदय नव्हे ! पश्चिमेकडील डोळे दिपवून टाकणारा सन्ध्याप्रकाश लोभांध आणि मदांध अशा पाश्चात्य संस्कृतीच्या मशालीने पेटलेला चिताग्नी आहे. पश्चिमेकडील आजचे शाक्त नेते स्मशानांत बसून जी शक्तीची आराधना करीत आहेत ती कांहीं मांगल्याची आराधना नव्हे.

मांगल्याचा अरुणोदय, हे भारता ! ब्राह्ममुहूर्ताच्या तुझ्या प्रतीक्षेतूनच होणार असेल कदाचित्. कारण तू दैन्याची दीक्षा घेऊन श्रद्धापूर्वक सूर्योदयाची वाट पाहत आहेस.

एई पश्चिमेर कोणे रक्तरागरेखा  
नहे कभु सौम्यरश्मि अरुणेर लेखा  
तव नव प्रभातेर। ए शुधु दारुण  
संध्यार प्रलयदीप्ति। चितार आगुन

पश्चिमससुद्रतटे करिछे उद्‌गार
विस्फुलिंग, स्वार्थदीप्त लुब्ध सभ्यतार
मशाल हइते लये शेष अग्निकणा ।

एई श्मशानेर माझे शक्तिर साधना
तव आराधना नहे हे विश्वपालक ।
तोमार निखिलप्लावी आनन्द-आलोक
हयतो लुकाये आछे पूर्वसिंधुतीरे
बहु धैर्ये नम्र स्तब्ध दुःखेर तिमिरे
सर्वरिक्त अश्रुसिक्त दैन्येर दीक्षाय
दीर्घकाल–ब्राह्ममुहूर्तेर प्रतीक्षाय ।

भगवंता ! पश्चिमेच्या बाजूला ही जी रक्तरंगाची रेषा दिसत आहे, ती तुझ्या नव-प्रभात समयीच्या कोमल-रश्मि अरुणोदयाची लकीर मुळींच नव्हे. ती तर दारुण संध्यसमयीची केवळ प्रलयदीप्ति आहे. स्वार्थाने जगमगणाऱ्या लोभीं संस्कृतीच्या मशालीमधून शेवटचे अग्निकण घेऊन, पश्चिमसमुद्राच्या कांठीं पेटलेल्या चितेचा अग्नि आपले स्फुलिंग ओकीत आहे. पश्चिमेकडील शाक्तांची ही जी स्मशानांतील शक्तिसाधना चालली आहे, ती, हे विश्वपालका ! तुझी कल्याणमयी आराधना नव्हे.

या विश्वाला उजळून काढणारा तुझा आनंदप्रकाश कदाचित् पूर्व सिंधूच्या किनारी दुःखाच्या अंधारांत, अकिंचनपणें सर्वरिक्त, अश्रुसिक्त दैन्याची दीक्षा घेऊन, मोठ्या धैर्याने केव्हांचा ब्राह्ममुहूर्ताची प्रतीक्षा करीत आहे.

६७

# आत्मनिष्ठेचा प्रसाद

"धरातळीं इंग्रजासारिखा प्रभु नाहीं दूसरा" अशा धन्यतेनें दिवस काढण्याचा काळ, त्या प्रभूनें फारसा टिकूच दिला नाहीं. अर्ज, विनंत्या आपण कितीहि चेंगटपणानें केल्या तरी त्या हातीं धरण्यास किंवा ऐकण्यासदेखील राज्यकर्ते तयार होईनात आणि या देशाचे भाग्यविधाता आपणच आहोंत अशा गुर्मीनें त्यांनीं राज्य चालवलें. इंग्रजांशी विशेष परिचय बंगालचाच झाला होता. थोडी सलगीहि उत्पन्न झाली होती. इंग्रजी राज्य चालविण्यांत बंगाली लोकांची मदतहि बरीच असे. अशा बंगालचे थोडे फार महत्त्वहि टिकू न देण्यासाठीं इंग्रजांनीं सन १९०५ च्या सुमारास बंगालची फाळणी केली. वंग-बंगाच्या या आघातानें देश दुःखित झाला. लोकांनीं प्रचंड चळवळ केली. बहिष्काराचें शस्त्र उपसलें. चिडलेल्या लोकांनीं अत्याचारी मार्गाचा अवलंब केला. सरकारला तेंच हवें होतें. सरकारनें ती चळवळ दाबून टाकली.

अशा निराशेच्या काळीं कवींनीं भारताला सांगितलें कीं, आपण आपलें दैन्य मुकाट्यानें स्वीकारूं या. पण पराभूत न होता, स्वावलंबनाने आपण आपलें चारित्र्य-तेज वाढवूं या. लोकसेवा करून, राष्ट्राचा आत्मविश्वास वाढवून आणि आपल्या राष्ट्राचें खरें तेज जें अध्यात्मशक्ति ती प्रगट करून आपण मोठे होऊं या. निराश आणि नास्तिक होण्याचें कारण नाहीं. आत्मनिष्ठेच्या जोरावर आपण आपली शक्ति वाढवूं शकूं. या

शक्तीच्या आधारावर ईश्वराची कृपा मिळवूं शकूं. आत्मशुद्धि हीच एक मोठी शक्ति आहे. भारतभाग्यविधात्याचा आशीर्वाद आपल्याला खात्रीनें मिळेल.

स्वामी विवेकानंद, अरविंद घोष आणि रवीन्द्रनाथ या तिघांनीं भारताला आत्मपरिचय करून देऊन याचें आत्मतेज वाढवलें. हेंच आत्मतेज कमावून गांधीजींनीं राष्ट्राला आत्मशक्तीच्या-सत्याग्रहाच्या जोरावर स्वराज्य मिळवून देऊन भारताला जगाच्या दरबारांत मानाचें स्थान मिळवून दिलें.

या सर्व साधनेच्या काळीं रवीन्द्रांना जीं प्रेरणागीतें स्चलीं, त्यापैकींच प्रस्तुत गीत आहे. अगदी निराशेच्या काळीं भरीव आशेची प्रेरणा देणारें हें गीत आहे.

से परम परिपूर्ण प्रभातेर लागि
हे भारत, सर्वदु:खे रहो तुमि जागि
सरल निर्मलचित्त—सकल बंधने
आत्मारे स्वाधीन राखि, पुष्प ओ चन्दने
आपनार अन्तरेर माहात्म्य-मन्दिर
सज्जित सुगंधि करि, दु:खनम्रशिर
ताँर पदतले नित्य राखिया नीरवे।

ताँ,' हते वंचित करे तोमारे ए भवे
एमन केहई नाइ, सेइ गर्वभरे
सर्वभये थाको तुमि निर्भय-अन्तरे
ताँर हस्त हते लये अक्षय सन्मान।
धराय होक-ना तव जत निम्न स्थान
ताँर पादपीठ करो से आसन तव
जाँर पादरेणुकणा ए निखिल भव।

त्या परमपरिपूर्ण प्रभातकाळच्या स्वागतासाठीं, हे भारता ! सर्व दु:खांमध्यें, सरळ, निर्मळ चित्तानें तूं जाग्रत रहा. बंधनें कितीहि असोत, आपल्या

अंतरात्म्याला पराधीन होऊं न देतां, स्वतंत्र राखून, आपल्या अंतराच्या माहात्म्य-मंदिराला पुष्प आणि चंदनाच्या योगें सुसज्जित आणि सुगंधित करून, मौनपणें आपलें दुःख-नम्र शिर सदासर्वदा त्याच्या चरणीं ठेवून, निर्मल चित्तानें तूं जागत रहा. या जगांत त्या चरणापासून तुला वंचित करेल, दूर करेल असें कोणीहि नाहीं. सर्व भयामध्यें, हे भारता! तूं निर्भयचित्त रहा. या पृथ्वीवर तुझें स्थान कितीहि नीच असेना का, हें समस्त विश्व ज्याच्या चरणधुळीच्या एका कणा-समान आहे त्या भगवंताच्या पादपीठालाच तूं आपलें आसन बनव.

६८

# ब्राह्मणी सात्त्विक तेज

ज्याप्रमाणें सत्त्व, रज, तम या तीन गुणांचा विस्तार आपण सचराचर सृष्टीशीं लावून दिला त्याचप्रमाणें चार वर्णांची देखील तशीच व्यवस्था सार्वभौम केली आहे. कबूतर ब्राह्मण, पोपट वैश्य...वगैरे. बैल ब्राह्मण, रेडा हरिजन. हे सर्वांना मान्य आहेच. सापांत देखील नाग ब्राह्मण (कां कोणास ठाऊक). आपल्या उत्सवांतदेखील चातुर्वर्ण्य शिरलें आहे. श्रावणी ब्राह्मण, दसरा क्षत्रिय. दिवाळी वैश्य आणि शिमगा शूद्र. ही व्यवस्था कुणालाहि पटण्यासारखी आहे. नगररचनेंतदेखील चार प्रकारांना चार वर्णांचीं नांवें दिलेलीं जुन्या ग्रंथांत मीं पाहिलीं आहेत.

तर मग देशांना आणि राष्ट्रांना वर्णव्यवस्था लागू कां करूं नये? जर्मन लोक स्वतःला क्षात्रवर्णी मानतातच. इंग्लंडला नेपोलियन तुच्छतेनें "बनियाचें राष्ट्र" म्हणत असे. युरोपने सगळ्या आफ्रिका खंडाला शूद्रवर्णी बनवलाच आहे. मग भारताला जर रवीबाबूंनीं ब्राह्मण व्हावयाला सांगितलें तर आश्चर्य वाटायला नको. गांधींना प्रत्येक मनुष्यांत चार वर्णांचा विकास झालेला हवा होता. तरीहि त्यांचा क्षात्रधर्मी सत्याग्रह तपःपूत ब्राह्मणी वर्णाचाच म्हटला पाहिजे.

पुराणें तर म्हणतातच कीं हें सारें जगच मुळांत ब्राह्मणधर्मी होतें. 'सर्वं ब्राह्मं इदं जगत्।' रवीबाबू म्हणतात कीं आतां जेव्हां या देशांत पहाट होईल तेव्हां हे माझ्या

दुःखी, जाग्रत देशा ! तुझ्या कंठानतूच प्रभात काळचा घोषणाध्वनि निघाला पाहिजे. न्हाऊन धुऊन, चंदन चर्चित होऊन, ब्राह्मणाप्रमाणें तूं सूर्योपस्थान केलें पाहिजेस कीं 'हे विधात्याची कन्या ललाटिका, विश्वशान्ति ! निशाचर पिशाचांच्या रक्तदीपाशिखांना परास्त करून तूं ये.' तुझाच उदय होवो. तुझा परम संतोष हीच ईश्वराची संपत्ति आहे. तुझें सहनशील धैर्य हेंच दैवी वीर्य आहे. तुझी नम्रता हाच गौरवशाली मुकुट आहे. आणि तोच ईश्वरी पुरस्कार होय.

से उदार प्रत्युषेर प्रथम अरुण
जखनि मेलिबे नेत्र, प्रशान्त करुण,
शुभ्रशिर अभ्रभेदी उदय-शिखरे,
हे दुःखी जाग्रत देश, तव कण्ठस्वरे
प्रथम संगीत तार जेन उठे बाजि—
प्रथम घोषणाध्वनि ।

तुमि थेको साजि,
चन्दनचर्चित स्नात निर्मल ब्राह्मण—
उच्च शिरऊर्ध्वे तुलि गाहियो वन्दन,
'एसो शांति विधातार कन्या ललाटिका,
निशाचर पिशाचेर रक्तदीपशिखा
करिया लज्जित ।'

तव विशाल संतोष
विश्वलोक-ईश्वरेर रत्नराजकोष ।
तव धैर्य दैववीर्य । नम्रता तोमार
समुच्च मुकुटश्रेष्ठ, ताँरि पुरस्कार ।

त्या उदार प्रभातसमयीं जेव्हां येथील सुधाधवल, अभ्रभेदी उदयशिखरावर प्रथम बालसूर्य स्वतःचे प्रशान्तकरुण नेत्र उघडील; तेव्हां हे माझ्या दुःखी, जाग्रत

देशा ! त्या बालसूर्याचें प्रथम संगीत, त्याचा प्रथम घोषणाध्वनि तुझ्याच कंठातून गाजला पाहिजे ।

हे माझ्या देशा ! स्नान करून निर्मळ झालेल्या, चंन्दन-चर्चित ब्राह्मणाप्रमाणें तूं तयार रहा आणि आपलें स्वाभिमानी मस्तक वर करून वंदनगीत गा. विधात्याची ललाटभूषण कन्या, शान्तिरूपिणी उषा ! निशाचर पिशाचांच्या लालदीपशिखांना पराजित, लज्जित करून तू ये. हे ब्राह्मण वृत्तीच्या माझ्या देशा ! तुझा विशाल सार्वभौम संतोष हाच जगदीश्वराचा रत्नपरिपूर्ण राजकोश आहे. सहनशील तुझें धैर्यच दैवीवीर्य आहे. तुझी नम्रता हाच तुझा उत्तम उन्नत मुकुट आहे. आणि तोच तुझ्यासाठीं ईश्वरदत्त पुरस्कारहि आहे.

# ६९

## केवळ त्याच्याच हातून

भर्तृहरि म्हणतो "ज्याला ज्याला पाहिले त्याच्यात्याच्यासमोर दीन वचने बोलूं नकोस. कित्येक ढग दानाची केवळ गर्जनाच करतात. आणि कित्येक पावसाची वृष्टि करून पृथ्वीला गार गार करून सोडतात. शब्द खर्चावयाचा तर तो योग्य माणसापुढेंच खर्च केला पाहिजे."

कालिदास म्हणतो : "थोर पुरुषाकडे याचना केली आणि ती फुकट गेली तरी तें पत्करलें. पण सफळ होत असली तरी हीन अधम पुरुषासमोर याचना केलेली बरी नव्हे."

रवीबाबू म्हणतात : 'हे दुःखी पुरुषा ! हे हीनदीन माणसा ! दुःखभार ग्रहण करायचा असला तरी तो त्या सर्वसमर्थाच्या हातूनच ग्रहण कर. दुःख वहन करण्यांत देखील गौरव आहे. भगवंताच्या हातून दुःखभार स्वीकारत असतांना त्याच्या हाताचा स्पर्श होईल तें भाग्य काय लहानसहान आहे ? भगवंतापुढें नम्र झाले असता आपली दीनतादेखील ऐश्वर्याच्या दीप्तीनें झळाळू लागेल. तो परमपिता आहे. स्वतःच्या वडिलांत आपण त्याचेंच दर्शन केलें पाहिजे. त्यालाच नमस्कार केला पाहिजे. भगवान न्यायाधीशहि आहे. त्याची आज्ञा नम्र होऊन शिरसावंद्य मानली पाहिजे. जगांतील सर्व महत्ता त्याच्या चरणीं लोळण घेत असते. यासाठीं आपण त्याचीच पूजा केली पाहिजे. या त्रिलोकांमध्ये पूजनीय, वंदनीय दुसरा कोणीच नाहीं किं ज्याच्यापुढें दीन-आवनत होऊन नमस्कार करावा.

हें गीत कवीनें जगांतील प्रत्येक हीन-दीन दुःखी व्यक्तीशीं एकरूप होऊन सहानुभूति-पूर्वक त्याला बोध करण्यासाठीं रचलें आहे.

तॉंरि हस्त हते नियो तव दुःखभार
हे दुःखी, हे दीनहीन। दीनता तोमार
धरिबे ऐश्वर्यदीप्ति जदि नत रहे
तॉंरि द्वारे। आर केह नहे नहे नहे—
तिनि छाड़ा आर केह नाइ त्रिसंसारे
जार काछे तव शिर लुटाइते पारे।

पितृरूपे रयेछेन तिनि, पितृ-माझे
नमि तॉंरे। तॉंहारि दक्षिण हस्त राजे
न्यायदण्ड–' परे, नतशिरे लइ तुलि
ताहार शासन। तॉंरि चरण–अंगुलि
आछे महत्त्वेर' परे, महतेर द्वारे
आपनारे नम्र क'रे पूजा करि तॉंरे

तॉंरि हस्तस्पर्शरूपे करि' अनुभव
मस्तके तुलिया लइ दुखे:र गौरव।

तुझा दुःखभारदेखील त्या भगवंताच्या हातूनच ग्रहण कर, हे हीन-दीन-दुःखी प्राण्या !

जर तू नम्र होऊन त्याच्याद्वारी उभा राहिलास तर तुझी दीनतादेखील ऐश्वर्यांची दीप्ति धारण करील. ज्याच्यापुढें तुझें शिर झुकावें, नम्र व्हावें, असा या त्रिभुवनांत, त्याला सोडून दुसरा कोणीहि नाहीं—नाहीं—नाहीं !

पित्याच्या रूपानें तो आपल्यासमोर विराजमान आहे. आपण आपल्या वडिलांमध्येंच त्याचें दर्शन करून त्याला नमस्कार करू. त्या भगवंताचा उजवा

हात त्याच्या न्यायदंडावर विराजमान आहे. त्याच्यापुढें डोकें वांकवून त्याचीच आज्ञा आपण स्वीकारूं. त्याचा अधिकार उचलून धरूं.

जगांत जी कांहीं महत्ता असेल, तिचेवर भगवंताची चरण अंगुली प्रतिष्ठित आहे. त्या परम महत् तत्त्वाच्या द्वारीं स्वतःला नम्र करून त्याची पूजा करूं या.

त्याच्या हस्तस्पर्शरूपी प्रसादाचा अनुभव करून, त्यानें दिलेल्या दुःखरूपी गौरवाला आपण आपल्या डोक्यावर उचलून धरूं या.

त्याचे हातून दुःखरूपी प्रसाद जरी मिळाला तरी आपलें जीवन कृतार्थ आणि धन्य धन्य होईल.

७०

# हवी प्रखर न्यायनिष्ठा

बायबलांत म्हटलें आहे कीं आपण नेहमींचे दोषांत सांपडतों आणि प्रभूकडे क्षमा मागतों. म्हणून आपण इतर सर्वांना क्षमाच केली पाहिजे. बायबलमध्यें असेंहि म्हटलें आहे कीं कोणाचाहि न्याय करायला बसूं नका. कारण तुम्ही क्षमेचे याचक असता. आपला न्याय व्हावा हें तुम्हांला जड जातें.

वेदांतदेखील ऋषि वरुणदेवाला म्हणतो : हे वरुणा ! तूं न्यायाधीश आहेस. तूं घालून दिलेले नियम आम्हीं दुर्बळ माणसें वारंवार मोडतों. आम्हांला शिक्षा करणाऱ्याच्या हातीं–शत्रूच्या हातीं सोंपवून देऊं नकोस. वैऱ्या हातीं वर्म नका देऊं देवा !

असें असलें तरी आपल्याला अनेक वेळां न्याय करावा लागतो. खरा कोण, खोटा कोण हें ठरवावें लागतें. एखाद्याचें करणें बरोबर आहे किंवा नाहीं हें तपासून जाहिर करावें लागतें. ही जबाबदारी, हें कर्तव्य, हा कार्यभार अथवा शासनभार आपल्यावर कुणी सोंपवला आहे ? सर्वांचें नियमन करणारा, न्याय करणारा राजाधिराज स्वतः परमेश्वरच आहे. पण त्यांनें आपला न्यायदंड आपण होऊन, प्रत्येकाच्या हातीं अर्पण केलेला असतो. प्रत्येकाला केव्हां ना केव्हां तटस्थपणें, कोणाचा तरी न्याय करावाच लागतो. ईश्वरानेंच हें कठिण कार्य सोपवलें आहे, असें समजून नम्रपणें तें शिरोधार्य केलें पाहिजे. आणि मग कुणालाहि न घाबरतां, कुणाचाहि मुलाहिजा न बाळगतां आपण पक्षपातरहित हें कर्तव्य पार पाडलें पाहिजे.

क्षमा करणें केव्हांहि चांगलें. ज्याला पश्चात्ताप झाला असेल त्याला क्षमा करणेंच उचित

पण पुष्कळदा आपण आपल्या दुर्बळतेमुळें, आपल्याच मऊपणानें क्षमा करण्यास तयार होतों. हें ओळखून कवी म्हणतो : "क्षमा जेथें क्षीण दुर्बळताच सिद्ध होण्याचा संभव असतो तेथें, हे प्रतापी रुद्रा ! तुझ्या आदेशाप्रमाणें मला निष्ठुरदेखील होतां आलें पाहिजे. तुझा इशारा होतांच माझ्या तोंडचें वाक्य तीक्ष्ण तलवारीसारखें व्हावें. तूं नेमलेल्या न्यायपीठावर जेव्हां मी आपलें स्थान ग्रहण करीन, तेव्हां तुझ्या प्रतिष्ठेची रक्षा मला करतां आली पाहिज."

जे लोक अन्याय करतात आणि जे लोक अन्याय सहन करतात, या दोघांना तुझ्या तिरस्कारानें, घृणेनें, तृणाप्रमाणे जाळून टाकावें.

परराज्यांत न्यायाधीशदेखील राज्यकर्त्यांच्या इशाऱ्यावर नाचत असतात आणि न्यायदानांत भेसळ करतात. असेच अनेक प्रसंग पाहून कवीनें या गीतांत आपला पुण्य-प्रकोप व्यक्त केला आहे. अन्याय करणें हें जितकें अयोग्य आणि घृणास्पद आहे; तितकेंच, दुबळेपणानें अन्याय सहन करणेंहि घृणास्पद आहे. न्याय करण्याचा अधिकार मनुष्याला ईश्वराकडून मिळालेला असतो. मनुष्याला न्यायनिष्ठुर होतां आलेंच पाहिजे.

तोमार न्यायेर दण्ड प्रत्येकेर करे
अर्पण करेछ निजे। प्रत्येकेर' परे
दिये छ शासनभार हे राजाधिराज।
से गुरु सन्मान तव, से दुरूह काज,
नमिया तोमारे जेन शिरोधार्य करि
सविनये। तव कार्ये जेन नाहि डरि कभूकारे कभूकारे।

क्षमा जेथा क्षीण दुर्बलता,
हे रुद्र, निष्ठुर जेन हते पारि तथा
तोमार आदेशे। जेन रसनाय मम
सत्यवाक्य झलि उठे खरखड्गसम
तोमार इंगिते। जेन राखि तव मान
तोमार विचारासने लये निज स्थान।
अन्याय जे करे आर अन्याय जे सहे
तव घृणा जेन तारे तृणसम दहे।

७१

# तुझाच प्राण कां बोलत नाहीं हे शास्त्रजडा ?

एखादी संस्कृति जेव्हा यौवनपूर्ण आणि प्राणवान असते तेव्हां तिनें पूर्वीच्या पिढीचा सर्व पुरुषार्थ पचविलेला असतो. पूर्वजांच्या थोरवीचें तिला स्मरणहि करावें लागत नाहीं. कारण ती सर्व थोरवी रक्तांत मुसमुसूनच स्वतःचा पुरेसा परिचय देत असते. तिचें वेगळें गान करावे लागत नाहीं· तिचे माहात्म्य रोज पुनः पुनः सिद्ध करावें लागत नाही.

प्राण क्षीण झाला म्हणजे मात्र जुनीं सर्व शास्त्रें आणि पुराणें पुढें करावीं लागतात. भूतकाळाचा इतिहास आणि वडिलांची कीर्ति यांची उजळणी करावी लागते. आणि हा व्यवसाय वाढला म्हणजे त्याच्या भाराखालीं नवप्राणाच्या अंकुराला डोकें वर काढणेंहि कठिण होऊन जातें. मनुष्य जेव्हां आपल्या पूर्वजांच्या विचारराशींतून सुंदर सुंदर रत्नें जगापुढें मांडतो तेव्हां, जगाला प्रथम प्रथम मोठेंच कौतुक वाटतें. पण पुढें जग विचारूं लागतें, तुमचे पूर्वज काय म्हणाले ते आम्हांला समजलें पण तुमच्याजवळ जगाला सांगण्याजोगें असें स्वतःचें कांहींच नाहीं काय ? तुम्ही तुमच्या पूर्वजांच्या संस्कृतीचे जिवंत वारस आहांत, का पुरातत्त्व सग्रहालयाचे क्युरेटर–संरक्षक आहांत ?

हे पहा, हें सर्व जग पुरुषार्थाच्या यात्रेला निघालें आहे. वाटेंत प्रत्येकाला कांहींना

कांहीं नवीन रत्न सापडतें गर्जना करून तो इतरांचें त्या रत्नाच्या तेजाकडे ध्यान खेचतो. सर्व आपआपल्या पुरुषार्थाचा आनंद गातात. सर्वांनाच देवानें वाणी दिली आहे. मग तुम्हीच असे मुखदुर्बल कां ? तुम्हांला आनंद देणारें असें कांहींच सांपडलें नाहीं कां ? जीवनाला कृतार्थ करणारे, अर्थपूर्ण करणारे एकहि सत्य तुमच्या हातीं लागलें नाहीं कां ? अरे, तुमच्या अगदीं घरच्या अंगणाला लागून हा महान समुद्र पहा कशी आपली अनंत गाथा पश्चिमेकडे आणि पूर्वेकडे रात्रंदिवस गर्जित असतो. आणि या कितीतरी पर्वतकन्या वहात वहात जीवनानंदाचे संगीत हवेमध्यें भरून टाकीत आहेत. त्यांनीं अवश्य जीवनाचें सत्य डोळाभर पाहिलेलें आहे. तुम्हींच काय ते दुर्दैवी ! तुमच्या डोळ्यांनीं जीवनाच्या अनुभूतींची तेजस्वी ज्योति पाहिलेली दिसत नाहीं. तुमचें सत्य आणि तुमचें गीत रात्रंदिवस तुम्हीं वाचत असलेल्या तुमच्या जुन्यापुराण्या शास्त्रांच्या पोथी–पत्रांमध्यें आटून गेलें आहे. फार वाचलीं तुम्ही ही शास्त्रें. आता तीं सर्व गुंडाळून फडताळांत ठेऊन द्या. आणि जरासे प्रयोगवीर व्हा–जीवनवीर व्हा ! तुमची शास्त्रें आयुष्यांत कशी उपयोगांत आणावयाचीं तेंहि जरा शिका. म्हणजे ती तुमच्या डोक्यावरचा भार न होतां तुमच्या अंगी लागतील आणि मग तुमच्या जीवनांतून संगीताच्या रूपानें जिवंतपणा प्रगट होईल.

ओरे मौनमूक, केन आछिस नीरबे
अन्तर करिया रुद्ध। ए मुखर भवे
तोर कोनो कथा नाइ, रे आनन्दहीन?
कोनो सत्य पड़े नाइ चोखे? ओरे दीन,
कंठे नाइ कोनो संगीतेर नवतान?

तोरगृहप्रान्त चुंवि समुद्र महान
गाहिछे अनन्त गाथा—पश्चिमे पुरबे।
कत नदी निरवधि धाय कलरवे
तरल संगीतधारा हये मूर्तिमती।
शुधु तुमि देख नाइ से प्रत्यक्ष ज्योति
जाहा सत्ये, जाहा गीते, आनन्दे आशाय
फुटे उठे नव नव विचित्र भाषाय!

तव सत्य, तव गान, रुद्ध हये राजे
रात्रिदिन जीर्ण शास्त्रे शुष्कपत्र—माझे!

अरे मौन मुक्या, आपल्या हृदयाचीं कपाटे बंद करून असा निःशब्द कां आहेस? या बोलक्या जगांत हे आनंदहीना, तुला कांहींच सांगावयाचें नाहीं का? एकही सत्य तुझ्या नजरेला पडलें नाहीं का? अरे दीना, तुझ्या कंठांतून नव संगीताची एकही तान फुटत नाही का?

पहा तुझ्या घरच्या आंगणाला लागूनच हा महान विशाल समुद्र पश्चिमेला आणि पूर्वेला आपली अनंत गाथा अखंड गात आहे. या कितीतरी नद्या एकसारख्या कलरव करीत धावत आहेत. आणि त्यांच्या तरल संगीत धारा मूर्तीचे रूप धारण करीत आहेत. फक्त तूंच ती प्रत्यक्ष ज्योति पाहिली नाहींस असें दिसतें, जी आपल्या प्रकाशानें सत्यांतून, गीतांतून, आनंदांतून आणि आशेंतून नवीन नवीन अद्भुत भाषेच्या द्वारें प्रगट होत आहे.

तुझ्यांतील सत्य आणि तुझ्यांतील गान मात्र जीर्णशास्त्रांच्या कोरड्या पानांमधून गुदमरल्यामुळें दिवसरात्र कुंथत असतें.

७२

# सर्वोच्च प्रार्थना

'वरहि वरायासि पाहिजे समज'
अशा शब्दांत आपला महाराष्ट्र

कत्री समजावतो कीं देव द्यावयास तयार झाला तरी त्याचेकडे काय मागावे आणि काय मागू नये हेंहि समजलें पाहिजे. मनुष्य काय मागतो त्याचेवरूनच पुष्कळदां त्याची परीक्षा होते. 'कोल्हा काकडीला राजी' या न्यायानें कांहीं लोकांचे मागणेंच इतके क्षुद्र असते कीं त्यांना आपलें हित कसें करून घ्यावें हें समजत नाहीं. ब्रिटिशांनीं आपल्या राष्ट्रगीतांत देवाजवळ मागून घेतले आहे कीं 'आमच्या राजाच्या शत्रूंची नीति भ्रष्ट होवो. त्यांच्या लबाडीच्या सर्व युक्त्या निष्फळ होवोत. एवढे करण्याच्या बाबतींत देवा आमचा तुझ्यावर भरिभार आहे.'

जेव्हां हें वांचले तेव्हां लहानपणच्या चार ओळी आठवल्या—

'भवानी आई, रोडगा वाहीन तुला, खरूज येऊं द्या या सवतीच्या कार्ट्याला' मागायला देव सांपडला, पण मागावयाचे सुचलें काय? तर सवतीच्या पोराला खरूज होवो! असल्या मागण्यांतच मनुष्याची खरी पारख होत असते. रवींद्रनाथांनींही आपल्या राष्ट्रासाठीं देवाजवळ मागणें मागितलें., किती भव्य! मूळ बंगालीचें इंग्रजी करून त्यांनीं तें गीतांजलींत छापलें. सर्व देशांच्या सर्व लोकांनीं आपापल्या भाषेंत त्याचा अनुवाद केला. या मागणींतील थोरपणा पाहून सर्व देश चकित आणि मोहित झाले. सर्वांच्या हृदयांत तें मागणें बिंबलें. सर्वांनाच वाटलें कीं आपापल्या राष्ट्रासाठीं असेंच मागणें मागितलें पाहिजे.

चवदा ओळींचें हें मागणें आज विश्वसाहित्यामध्यें मानाचें स्थान स्थायीकपणानें पटकावून बसलें आहे. आणि सर्व जगांतील तरुण हें मागणें अगदीं हृदयापासून ललकारीत आहेत. या मागण्यांपुढें इतर मागणीं फिकी झाली–मागे पडली. आणि हळूहळू विसरून गेली. चांगुलपणाचा नमुना इतका कांहीं समर्थ असतो कीं कोणाचेंहि वाकडें न धरतां, कोणाचाहि विरोध न करतां तो आपलें राज्य सर्वांकडून प्रेमादरानें कबूल करवतो.

रविबाबू म्हणतातः–कीं कोणाहि मनानें आंधळ्या सत्तेपुढें–स्वार्थी जुलमापुढें मान वाकवूं नये. सर्व मनें निर्भय आणि मोकळी असावी. स्वतंत्र असावी. ज्ञानाची उपासना सर्वत्र अनिरुद्ध चालावी. नवीननवीन ज्ञान शोधून काढण्यांत, शोधलेलें ज्ञान देण्यांत आणि घेण्यांत, पटलेल्या ज्ञानाप्रमाणें वागण्यांत कोणालाहि कसलीच आडकाठी नसावी. नदीचें पाणी जसें सर्वांना मिळतें, फुकट आणि मुबलक मिळतें. नदीकाठीं पोंचायची आणि हवें तेवढें पाणी भरून घेण्याची कोणालाच कसलीच मनाई नसते. त्याचप्रमाणें ज्ञानाचें असलें पाहिजे.

आपपर भाव वाढला म्हणजे एका घराचीं दोन घरें होतात. घरामध्येंच आरपार भिंत बांधली जाते. एका घराचीं अनेक लहान लहान घरकुलें होतात. मोकळी हवा खेळेनाशी होते. हळूहळू हवेंत दुर्गंधी येऊं लागते. घरांत बसून दूरवर पहातांहि येत नाहीं. दृष्टि संकुचित होते. कोठेहि येणें जाणें कठिण होऊन बसतें–आणि मग मनुष्य जगाच्याच नव्हे, तर स्वतःच्या नजरेंत देखील तुच्छ प्राणी बनतो. रविबाबू म्हणतात कीं घरकुलें करणाऱ्या अशा या भिंतींमुळें जगाचीं शकलें पडूं नयेत.

शेतकी खात्यांतील तज्ञ लोक म्हणतात कीं शेताचे जर लहान लहान तुकडे केले आणि प्रत्येकाची मालकी जर निराळी झाली तर असा एक दिवस येतो कीं जेव्हां इतकी लहान शेती करणें कुणालाच फायदेशीर रहात नसते. तो आंतबट्ट्याचा व्यापार होतो. शेतकऱ्याच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे ज्या गाईचें दूध आंचळाला लावायला देखील पुरत नाहीं तिची धार कोण काढील? आणि अशी गाय बाळगील पण कोण? आज जगांत माणसानें पृथ्वीचे लहान लहान तुकडे केले आहेत आणि समाजाची देखील लहान लहान शकलें केलीं आहेत. माणुसकीच्या–मनुष्य कल्याणाच्या दृष्टीनें विचार करतां मनुष्याला याची लाजच वाटली पाहिजे. आपल्या शेतींमध्यें जसें आज uneconomic fragmentation झाले आहे. तसें जगताचे unsocial, immoral आणि inhuman फ्रॅगमेन्टेशन झालें आहे. जगाचे जे तुकडे पाडले गेले आहेत ते सामाजिक कल्याणाला आणि मानवी सदाचाराला घातक झाले आहेत. यामुळें प्रेम

दिवसेदिवस अधिकाधिक संकुचित होऊं लागलें आहे. सेवेचें क्षेत्र संपुष्टांत येऊं लागलें आहे. दैवी आपत्ति स्थायी नसतात आणि त्यांतूनहि कांहीं फायदाहि होत असतो. पण मानवी आपत्ति सर्व प्रकारें भयानक आणि विनाशक असतात. म्हणूनच रविबाबू म्हणतात–कीं अश्या घरकुलाच्या भिंती आमच्या या देशांत नसाव्यात. प्रेमाची आणि सेवेची हवा मोकळी खेळत असावी.

जगांत दंभ इतका वाढला आहे कीं सत्याला उभें राहायला टीचभर जागा देखील उरली नाहीं. आणि वाणीसुद्धा हृदयांतील विचार आणि भावना व्यक्त करण्याचें साधन म्हणण्यापेक्षां खरे विचार आणि खऱ्या भावना लपवून ठेवण्याचा मोठी सोय आहे असेंच वाटूं लागलें आहे. म्हणून कवि म्हणतात कीं तोंडावाटें निघणारा प्रत्येक शब्द हृदयाचा प्रामाणिक प्रतिध्वनि असावा. गूढ अनुभूतीच्या चिंतनांतूनच प्रत्येक वाक्य निघावें.

आणि मनुष्याचीं कर्मे एकमेकांचा नाश करण्यासाठीं नव्हे, तर अनेक दिशांनीं पूर्णता प्राप्त करण्याच्या सहस्रावधि आणि निरवधि प्रयत्नांसाठींच केलीं जावींत. मनुष्याची बुद्धि आणि त्याचे विचार निर्मल पाण्याप्रमाणें स्फटिक-शुद्ध वहात असावेत आणि या प्रवाहाच्या वाटेंत जरठरूढीचें आणि दुर्बल अबुद्धीचें रण कोठेंहि लागूं नये. आणि मनुष्यें जो जो पुरुषार्थ करतील तो तो स्वार्थानें, लोभानें, भीतीनें किंवा मत्सरानें प्रेरित न न होतां तुझ्याच प्रेरणेनें आनंद, पूर्णता आणि व्यापकता यांच्या क्षितिजापर्यंत पोंचण्यासाठीं केला जावा.

आज भारताची ही स्थिति नाहीं. हें ओळखून रविबाबू म्हणतात : कीं हे परमपिता, स्वतःच्या हातानें कठोर आघात करून माझ्या निजलेल्या देशाला जागें कर आणि त्यानें डोळे उघडतांच भारताला वर वर्णन केल्याप्रमाणें स्वर्ग दिसो.

चित्त जेथा भयशून्य, उच्च जेथा शिर,  
ज्ञान जेथा मुक्त , जेथा गृहेर प्राचीर  
आपन प्रांगणतले दिवस-शर्वरी  
वसुधारे राखे नाइ खण्ड क्षुद्र करि,  
जेथा वाक्य हृदयेर उत्समुख हते  
उच्छ्वसिया उठे, जेथा निर्वारित स्रोते

देशे देशे दिशे दिशे कर्मधारा धाय
अजस्र सहस्रविध चरितार्थताय—

जेथा तुच्छ आचारेर मरुबालुराशि
विचारेर स्रोतःपथ फेले नाइ ग्रासि,
पौरुषेरे करे नि शतधा—नित्य जेथा
तुमि सर्व कर्म चिन्ता आनन्देर नेता—
निज हस्ते निर्दय आघात करि, पितः,
भारतेरे सेइ स्वर्गे करो जागरित ।

" जिथें चित्त भयशून्य आहे, जेथें डोकें स्वाभिमानानें वर ठेवून मनुष्याला चालतां येतें. ज्ञान जेथें बंधनांत पडलें नाहीं, जेथें घराच्या भिंती दिवसरात्र आपापलीं आंगणें निरनिराळीं करण्यासाठीं या वसुधेचे लहान लहान क्षुद्र तुकडे पाडीत नाहींत. जेथें तोंडांतून निघणारें वाक्य हृदयाच्या अगदीं खोलींतून प्रामाणिकपणें बाहेर पडतें. जेथें लोकांच्या पुरुषार्थाची कर्मधारा प्रत्येक देशांत प्रत्येक दिशेनें अकुंठित वेगानें सहस्रावधि चरितार्थता आणि कल्याणप्राप्तीकडे जोरानें धावत आहे.

जिथें तुच्छ संकुचित अबुद्धीची रूढी रणाच्या रेतीप्रमाणें पसरून विचाराच्या प्रवाहाला ग्रासून टाकीत नाहीं आणि पौरुषाच्या पराक्रमाच्या शतधा चिंध्या उडवीत नाहीं.

आणि जिथें तूं स्वतः सर्व लोकांच्या विचाराचा, कर्मांचा आणि त्यांतून फुटणाऱ्या आनंदाचा नेता आहेस.

अशा स्वर्गामध्यें हे परमपिता, या भारताला स्वहस्तानें कठोर आघात करून जागे कर आणि त्याच्या नजरेला हा देश भूस्वर्गासारखा दिसूं लागो."

इंग्रजी गीतांजलींत हें गीत ३५ वें आहे.

७३

# सर्व सोडून देतां यावें

त्यागशक्ति देण्यासाठीं दुःख आणि मरण प्रसन्नतेनें स्वीकार करता यावें म्हणून ईश्वराची नम्रपणें प्रार्थना करींत असताना कवीला स्वतःची प्रिय वंगभूमि, तेथील प्रकृति सौन्दर्य आणि जीवनमाधुरी–सर्व कांहीं आठवते. तो म्हणतोः "मी कंटाळलों नाहीं. येथील सर्व जीवन मला अत्यंत प्रिय आहे. येथें राहण्यांत मला संतोष आहे. धन्यता आहे. पण जेव्हां देशकार्यासाठीं किंवा ईशकार्यासाठीं हें सर्व सोडून देण्याचा आदेश घेऊन तुझा दूत येईल तेव्हां हें सर्व आनंदानें सोडतां यावें असा आशीर्वाद तूं मला दे. दुःख आणि मरण दोघांचें मला स्वागत करतां यावें असा आशीर्वाद मला हवा आहे.

आमि भालोबासि देव, एई बांगालार
दिगन्तप्रसार क्षेत्रे जे शांति उदार
बिराज करि छे नित्य—मुक्त नीलांबरे
अच्छाय आलोक गाहे वैराग्येर स्वरे
जे भैरवीगान, जे माधुरी एकाकिनी
नदीर निर्जन तटे बाजाय किंकिनी

तरल कल्लोलरोले, जे सरल स्नेह
तरुच्छाया-साथे मिशि स्निग्धपल्लीगेह
अंचले आवरि आछे, जे मोर भवन
आकाशे बातासे आर आलोके मगन
संतोषे कल्याणे प्रेमे—
करो आशीर्वाद,
जखनि तोमार दूत आनिबे संवाद
तखनि तोमार कार्ये आनंदित मने
सब छाडि जेते पारि दुःखे ओ मरणे ।

हे देवा! मला सर्व कांहीं प्रिय आहे—या वंगभूमीच्या दिगंतापर्यन्त पसरलेल्या शेतांमध्यें जी उदार शान्ति नेहमीं विराजलेली आहे; येथील मोकळ्या निळ्या आकाशांतील छायाहीन प्रकाश वैराग्याच्या सुरांत जें भैरवी गीत गात असतो; नदीच्या निर्जन तटांवर जी माधुरी एकटी एकटी तरल कल्लोलरोलानें किंकिणी वाजवत असते; जो सरळ स्नेह झाडांच्या छायांत मिसळून खेडेगांवांतील शीतल घरांना आपल्या पदरानें झांकत असतो; आणि जें माझें घर संतोष, कल्याण आणि प्रेमानें आकाशांत, वाऱ्यांत आणि प्रकाशांत मग्न आहे, तें सर्व —या सर्व गोष्टी, मला प्रिय वाटतात. तरीहि भगवंता! जेव्हां तुझा दूत माझ्यासाठीं संदेश घेऊन येईल तेव्हां तुझ्या कार्यासाठीं, दुःखाचें आणि मरणाचें स्वागत करण्यासाठीं हें सर्व आनंदित मनानें सोडतां यावें असा आशीर्वाद मला दे.

७४

# हृदयलक्ष्मीच्या पोषणार्थ

जेथें आत्मीयतेचें वातावरण नाहीं,
स्वदेशीपणाला वाव नाहीं,
स्वभाषेंतून विचार करण्याला आणि हृदयांतील कल्पनाभावनांचें आदानप्रदान करण्याला अवकाश नाहीं; जेथें सर्व कांहीं परकीय, परदेशी, आणि अपरिचित असल्यामुळें परिचय होऊं शकत नाहीं अशा ठिकाणीं दुर्दैवानें जाण्याचा किंवा राहाण्याचा जर प्रसंग आला, तर भगवंता! कृपा करून जेथून सांपडेल तिकडून, तऱ्हेतऱ्हेच्या अनंत प्रवाहांतून तुझ्या नित्य आनंदमयी धारेला माझ्या मनानें सहजभावें खेंचून आणावें आणे तींतून पोषण मिळवावें असें कर.

आपल्या राहाणीकरणीशीं आणि विचारसरणीशीं जेथें कसलीच सहानुभूति नाहीं, स्वाभिमानाला आणि आत्मीयतेला पोषक असें वातावरण जेथें नाहीं तेथें अर्थात सहानुभूतिहीन परदेशांत राहावें लागणें, म्हणजे दुर्दैवच म्हटलें पाहिजे. तेथें आपला आत्मविश्वास जतन करून ठेवायचा असला तर त्यासाठीं आपल्या हृदयांत जिवंत आणि प्रसन्न ईश्वरनिष्ठाच असली पाहिजे. ही ईश्वरनिष्ठा ओढूनताणून आणलेली, कसेंबसें समजावून टिकवलेली, जुल्माची किंवा सुतकी निष्ठा असून चालणार नाहीं. आपली भक्ति आणि ईश्वराचें वात्सल्य यांच्या संयोगानें जेथें प्रेमाचा उमाळा येतो आणि त्यामुळें जीवन भरलेलें आणि समृद्ध वाटूं लागतें, ती ईश्वरनिष्ठा खरी.

तरल कल्लोलरोले, जे सरल स्नेह
तरुच्छाया-साथे मिशि स्निग्धपल्लीगेह
अंचले आवरि आछे, जे मोर भवन
आकाशे बातासे आर आलोके मगन
संतोषे कल्याणे प्रेमे—
करो आशीर्वाद,
जखनि तोमार दूत आनिबे संवाद
तखनि तोमार कार्ये आनंदित मने
सब छाडि जेते पारि दुःखे ओ मरणे।

हे देवा! मला सर्व कांहीं प्रिय आहे—या वंगभूमीच्या दिगंतापर्यन्त पसरलेल्या शेतांमध्यें जी उदार शान्ति नेहमीं विराजलेली आहे; येथील मोकळ्या निळ्या आकाशांतील छायाहीन प्रकाश वैराग्याच्या सुरांत जें भैरवी गीत गात असतो; नदीच्या निर्जन तटांवर जी माधुरी एकटी एकटी तरल कल्लोलरोलानें किंकिणी वाजवत असते; जो सरळ स्नेह झाडांच्या छायांत मिसळून खेडेगांवांतील शीतल घरांना आपल्या पदरानें झांकत असतो; आणि जें माझें घर संतोष, कल्याण आणि प्रेमानें आकाशांत, वाऱ्यांत आणि प्रकाशांत मग्न आहे, तें सर्व —या सर्व गोष्टी, मला प्रिय वाटतात. तरीहि भगवंता! जेव्हां तुझा दूत माझ्यासाठीं संदेश घेऊन येईल तेव्हां तुझ्या कार्यासाठीं, दुःखाचें आणि मरणाचें स्वागत करण्यासाठीं हें सर्व आनंदित मनानें सोडतां यावें असा आशीर्वाद मला दे.

७४

# हृदयलक्ष्मीच्या पोषणार्थ

जेथें आत्मीयतेचें वातावरण नाहीं, स्वदेशीपणाला वाव नाहीं, स्वभाषेंतून विचार करण्याला आणि हृदयांतील कल्पनाभावनांचें आदानप्रदान करण्याला अवकाश नाहीं; जेथें सर्व कांहीं परकीय, परदेशी, आणि अपरिचित असल्यामुळें परिचय होऊं शकत नाहीं अशा ठिकाणीं दुर्दैवानें जाण्याचा किंवा राहाण्याचा जर प्रसंग आला, तर भगवंता! कृपा करून जेथून सांपडेल तिकडून, तऱ्हेतऱ्हेच्या अनंत प्रवाहांतून तुझ्या नित्य आनंदमयी धारेला माझ्या मनानें सहजभावें खेंचून आणावें आणे तींतून पोषण मिळवावें असें कर.

आपल्या राहाणीकरणीशीं आणि विचारसरणीशीं जेथें कसलीच सहानुभूति नाहीं, स्वाभिमानाला आणि आत्मीयतेला पोषक असें वातावरण जेथें नाहीं तेथें अर्थात सहानुभूतिहीन परदेशांत राहावें लागणें, म्हणजे दुर्दैवच म्हटलें पाहिजे. तेथें आपला आत्मविश्वास जतन करून ठेवायचा असला तर त्यासाठीं आपल्या हृदयांत जिवंत आणि प्रसन्न ईश्वरनिष्ठाच असली पाहिजे. ही ईश्वरनिष्ठा ओढूनताणून आणलेली, कसेंबसें समजावून टिकवलेली, जुल्माची किंवा सुतकी निष्ठा असून चालणार नाहीं. आपली भक्ति आणि ईश्वराचें वात्सल्य यांच्या संयोगानें जेथें प्रेमाचा उमाळा येतो आणि त्यामुळें जीवन भरलेलें आणि समृद्ध वाटूं लागतें, ती ईश्वरनिष्ठा खरी.

आपल्याच देशांत परक्यानें स्थापलेल्या आणि परदेशी भाषांत चालणाऱ्या विश्वविद्यालयांत शिकावें लागणें, हाहि वरील दुर्भाग्यासारखाच एक प्रकार आहे. ज्ञान, माहिती, विचार आणि भावना यांचें आदान–प्रदान जेथें हृदयाच्या भाषेंत–स्वभाषेंत, जन्मभाषेंत होऊं शकत नाहीं, तेथें चिंतनाची, अनुभूतीची आणि साहित्याची भरती कशी यावी? सर्वोच्च कविकल्पनादेखील परक्यांच्या द्वारी संमतीसाठीं, स्वीकारासाठीं, कदर व्हावी यासाठीं जर जाऊन उभी राहिली आणि तेथें कोणी विचारलें नाहीं म्हणून परत रस्त्यावर यावें लागलें, तर यासारखी विटंबना दुसरी कोणची?

परदेशांतील नद्यांची, पर्वतांची, सरोवरांची आणि क्रमानें येणाऱ्या ऋतूंची, तेथल्या कवींनीं लिहिलेलीं स्तोत्रें आपण उत्साहानें गावींत आणि त्यांच्या भावनेनें भारून जाऊन त्या त्या स्थळांची यात्रा करून येण्यांत धन्यता मानावी आणि आपल्याच देशांतील पुण्यपावन, उदात्त आणि प्रेरक अशा पवित्र स्थळांची माहिती आपल्याला नसावी आणि माहिती मिळाली तरी त्याविषयीं उत्साह वाटूं नये, याहून अधिक शापरूप जीवन तें कोणचें?

या प्रकारच्या परिस्थितीच्या विषादानें भारून जाऊन कवीनें हें गीत लिहिलेलें आहे.

ए नदीर कलध्वनि जेथाय बाजे ना
मातृकलकण्ठसम, जेथाय साजे ना
कोमला उर्वरा भूमि नव-नवोत्सवे
नवीनवरन वस्त्रे यौवनगौरवे
वसंते शरते वरषाय, रुद्धाकाश
दिवसरात्रिरे जेथा करे ना प्रकाश
पूर्ण प्रस्फुटितरूपे, जेथा मातृभाषा
चित्त–अन्तःपुरे नाहि करे जावा-आसा
कल्याणी हृदयलक्ष्मी, जेथा निशिदिन
कल्पना फिरिया आसे परिचयहीन
परगृहद्वार हते पथेर माझारे—

सेखानेओ जाइ जदि, मन जेन पारे
सहजे टानिया निते अंतहीन स्रोते
तव सदानन्दधारा सर्व ठाँइ हते.

आपल्याच देशांत परराज्य झालें असतां, अथवा परकीयांनीं स्थापन केलेल्या युनिवर्सिटींत शिकावें लागलें असतां जी स्थिति होते तिची आठवण करून कवी म्हणतो.

जेथें या नदीचा कलकलध्वनि मातेच्या कलकंठासमान गुंजत नाहीं. आईच्या प्रेमळ गाण्यासारखा वाटत नाहीं; जेथें कोमला उर्वरा भूमि वसंतऋतूंत, शरद-ऋतूंत आणि वर्षाकाळाच्या नित्यनूतन उत्सवामध्यें यौवनगर्वाच्या मस्तींत नित्यनूतन रंगाचीं वस्त्रें धारण करीत नाहीं; जेथें हे अवरुद्ध आकाश दिवसरात्र परिपूर्ण प्रफुल्लितरूपानें प्रकाशित होत नाहीं; जिथें हृदयलक्ष्मीसमान कल्याणी मातृभाषा चित्ताच्या अंतःपुरांत मुक्तपणें ये-जा करीत नाहीं; आणि जेथें कवी कल्पना परिचयविहीन अशा परगृहाचें दार व्यर्थ ठोठावून रस्त्यावर परत येते—

अशा ठिकाणीं जर मला जावेंच लागले तर प्रभो! माझ्या मनाला सर्व ठिकाणांहून तुझी सदानंद-धारा अनंत प्रवाहानें नेहमीं सहजासहजीं खेंचून आणतां यावी, असें कर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

७५

# चतुर्विध उपासना

केव्हां केव्हां मनुष्य ईश्वराचें ध्यान करतो आणि ईश्वर कसा आहे याचें चिंतन करून त्याप्रमाणें स्तोत्रें गाऊं लागतो. देवाचें रूप, त्याचीं आयुधें, त्याचा स्वभाव, त्याचें सामर्थ्य आणि त्याची कृपा यांचें परोपरीनें गायन करणें भक्तांना आवडतें. हा झाला उपासनेचा एक प्रकार.

दुसऱ्या प्रकारामध्यें ईश्वराची पूजा करून त्याचेजवळ धनधान्य, घरदार, मुलेंबाळें, इष्टमित्र, सगेसोयरे, नोकरचाकर, गायघोडे वगैरे जें कांहीं सुचेल तें मागावें. हें सर्व येतें जीवनामध्यें. या सर्व गोष्टी जरुरीच्या आहेत. ज्याचें दारिद्र्य सामान्य मनुष्याला सहन होत नाहीं. त्याचें हृदय या दैन्यामुळें तळमळूं लागतें आणि म्हणून तो या सर्व गोष्टी मागूं लागतो. आणि देवानें त्या दिल्या म्हणजे त्याची भक्ति कृतज्ञतेनें वाढीस लागते. देवानें या गोष्टी न दिल्या तर तो अंतर्मुख होऊन आपले दोष शोधून ते दूर करण्याचा प्रयत्न करतो किंवा आपल्याजवळील निरनिराळ्या पदार्थांतून चांगल्या चांगल्या गोष्टी भगवंताला अर्पण करून त्याला प्रसन्न करूं पाहतो.

तिसऱ्यामध्यें मनुष्य देवाजवळ बाह्य साधनसंपत्ति न मागतां संतोषपूर्वक हरि ठेवील तसें राहण्याचा निश्चय करतो आणि देवाजवळ श्रद्धा, हृदयशुद्धी, निष्काम भक्ति, त्यांची अखंड स्मृति, निष्ठा आणि अशाच प्रकारची आंतरिक संपत्ति तो मागून घेतो. देवा, तुझी

आठवण रहावी. बाह्य वस्तूंत मी गुरफटला जाऊं नये. संकटकाळीं तुझ्या कृपेविषयीं मी नास्तिक होऊं नये इ० इ० अनंत हार्दिक-संपदा तो मागून घेतो.

रविबाबूंच्या धर्मसंगीतांत निराकार पण सगुण ईश्वराचें स्वभाववर्णन येतें. (उपासनेचा हा पहिला प्रकार झाला) आणि हृदयाचें दैन्य दूर करून हृदयसिद्धि द्यावी असें मागणें देखील अनंतप्रकारें मागितलेलें आपल्याला सांपडते. (उपासनेचा हा तिसरा प्रकार झाला.) 'अंतर मम विकसित करो' इ० गीतें याच कोटीची होत.

दुसऱ्या प्रकारची गीतें वैदिक काळापासून भक्तांनीं गायिलीं आहेत आणि तऱ्हतऱ्हेच्या वस्तु त्या विश्वंभराजवळ मागितल्या आहेत. त्यांत वरील दोन गीतें विशेष प्रकारानें शोभून निघतात. उपनिषदांतील संतोषधन निस्पृह आचार्य जेव्हां देवाजवळ शिष्यांच्या योग-क्षेमासाठीं 'देवा, मला गाई दे. धन–धान्य दे' म्हणून मागतात आणि समर्थ रामदास धर्मप्रचारासाठीं सुस्वरकंठ आणि आलाप गोडीपर्यंत तऱ्हतऱ्हेच्या वस्तु श्रीरामाजवळ मागतात तेव्हां असली याञ्चा (मागणी) ही फारच शोभून निघते.

उपासनेचा एक चवथा प्रकार आहे. याचेमध्यें ईश्वराची कृपा ध्यानांत आणून भक्त स्वतःला सुधारण्याचा, शुद्ध करण्याचा आणि उत्फुल्ल ठेवण्याचा संकल्प करीत असतो. भगवंता, तू 'सब लायक' आहेस पण मी तुझ्या लायक नाहीं. यापुढें ही उणीव कमी करून स्वतःला तुइया लायक करण्याचा सर्वप्रकारे प्रयत्न करीन असा संकल्प करून तो ईश्वराच्या कानीं घालावयाचा हाहि एक उपासनेचा विशेष प्रकार आहे. या प्रकारची गीतें जगाच्या धर्मगीतांत कदाचित् बेताचीच असतील. पण यांची स्वतःची खुबी आणि गोडी निराळीच असते. प्रस्तुत गीत या चवथ्या कोटीचें आहे.

मनुष्य जेव्हां संकल्प करतो तेव्हां 'मनो-वाक्-काय-कर्मभिः' आपण अमुक करूं किंवा अमुक करणार नाहीं असा संकल्प करीत असतो. केव्हां केव्हां मनसा-वाया-कर्मणा असें म्हणतो तर केव्हां केव्हां तन-मन-धन लावून मी ही गोष्ट पार पाडीन असें म्हणतो. ज्ञानेश्वरानें तनुमनप्राणे अशी शब्द-योजना केली आहे. रविबाबूंनीं या गीतांत जो चतुर्विध संकल्प केला आहे त्यांत शरीरशुद्धि, मनःशुद्धि, हृदयशुद्धि आणि कर्मशुद्धि असें चार प्रकार मांडलेलें आहेत. मनो-वाक्-काय-कर्म यासूत्रांत हृदयाचा अंतर्भाव मनांतच करावा लागतो. तनु-मन-प्राण यामध्यें हृदय आणि कर्म ही दोन्ही प्राणांत बसवावी लागतात. कसेंहि असो मी माझें सर्वस्व अर्पण करीन. माझ्या जीवनाच्या सर्व पैलूंनीं शुद्ध होईन असेंच म्हणण्याचा भाव असणार हें उघड आहे. ईश्वर अंतरतर आहे. अंतर्यामी आहे. यामुळेंच

अंतःकरण शुद्धीचें, सत्वशुद्धीचें महत्त्व विशेष आहे, ही गोष्ट या गीतांत भक्तिभावानें व्यक्त केलेली आहे. हा या गीताचा विशेष आहे.

आमार सकल अंगे तोमार परश
लग्न हये रहियाछे रजनी दिवस
प्राणेश्वर, एई कथा नित्य मने आनि
राखिब पवित्र करि मोर तनुखानि।

मने तुमि बिराजिछ हे परमज्ञान,
एई कथा सदा स्मरि मोर सर्वध्यान
सर्वचिन्ता हते आमि सर्वचेष्टा करि
सर्वमिथ्या राखि दिब दूरे परिहरि।
हृदये रयेछे तव अचल आसन
एई कथा मने करिब शासन
सकल कुटिल द्वेष, अमंगल--
प्रेमेरे राखिब करि प्रस्फुट निर्मल
सर्व कर्मे तव शक्ति एई जेने सार
करिब सकल कर्मे तोमारे प्रचार।

हे प्राणेश्वरा, हे जीवीच्या जीवना, माझ्या सर्व गात्रांना, संपूर्ण अंगाला दिवस रात्र तुझा स्पर्श होऊन राहिलेला असतो. ही गोष्ट अखंड ध्यानांत ठेवून तेवढ्याचसाठीं मी माझे हे शरीर पवित्र करून ठेवीन. ज्या अंगांना तुझा स्पर्श होत आहे, ती अंगें अपवित्र होऊं दिलीं तर त्यांत तुझा अपमान केल्यासारखें होईल. ती अपवित्र पूजा होईल आणि लाजेनें मी मरून जाईन.

हे ज्ञानेश्वरा, माझ्या मनांत तूंच विराजमान आहेस ही गोष्ट कधींहि न विसरतां मी माझ्या सर्व विचारांतून, सर्व चिंतन-ध्यानांतून सर्व प्रकारच्या प्रयत्नानें असत्याला, मिथ्या गोष्टींना टाळत जाईन-दूर ठेवीन.

माझ्या हृदयांत तुझें स्थिर अचल आसन आहे याचें स्मरण ठेवून तेथील सर्व कुटिलता, द्वेष आणि अमंगळ यांचे शासन करून माझ्या हृदयकमलाला प्रफुल्ल, निर्मळ आणि प्रस्फुट करून ठेवीन. मर्जीला येईल तेव्हां कोणत्याहि क्षणीं तेथें येऊन त्वां विराजमान व्हावेस.

आणि हे कर्माधीशा, माझ्या सर्व कर्मांत खरी शक्ति तुझीच असते. हें तथ्य ओळखून माझ्या सर्व कर्मांच्या द्वारा मी तुझाच प्रचार करीन. मी जें कांहीं करीन तें सर्व ईश्वरीकार्य आहे, असें समजून मनांत मंगळ हेतु धरूनच सर्वांचें कल्याण होईल असें करीन.

[ इंग्रजी गीतांजलींत हें गीत चवथें आहे. ]

७६

# त्याचा गौरव, माझी नम्रता

जो विश्वेश्वर आहे तोच माझ्या हृदयाचा नाथ आहे. या सकल ब्रह्मांडाची जो चालना करतो तोच माझ्यांत वसत असलेल्या चैतन्याचा अधिष्ठाता आहे. जो माझ्यांत विराजमान आहे तोच हा जगाचा अध्यक्ष आहे. अंतरबाह्य जग एकरूपच आहे.

हे ओळखल्यानंतर सहजासहजी खात्री पटते कीं माझ्या सर्व क्रियांमध्यें आणि माझ्या प्रत्येक श्वासांत त्याचीच शक्ति काम करीत असते. याचा मला विसर न पडावा. माझे सर्व कांहीं तूंच आहेस., तुझ्या द्वाराच सर्व कांहीं घडत आहे; ही गोष्ट पटली आणि ती स्मृति स्थिर झाली म्हणजे एका बाजूनें मला मोठा गौरव वाटतो आणि दुसऱ्या बाजूनें माझी नम्रता उत्कट होते.

अद्वैतवादी शंकराचार्य आपल्या एका स्तोत्रांत म्हणतातः—यद् यत् कर्म करोमि तत् तद् अखिलं शंभो ! तवाराधनम्। हे सर्व कल्याणकारी शंभो ! अद्वैत वृत्ति बाणल्यानंतर वाटूं लागतें आणि पटतें कीं मीं जें जें कांहीं काम करतों तें तें सर्व तुझी पूजा-आराधनाच आहे. येथें 'आराधना' शब्द वापरून शंकराचार्यांनीं सर्व प्रकारची नम्रता आपल्याकडे घेतली आहे.

रवीबाबूंनीं हीच गोष्ट प्रार्थनेच्या रूपानें मागितली आहे कीं माझ्या सर्व कृतींत तूंच

काम करीत आहेस या गोष्टीचें स्मरण होऊन मला गौरव वाटावा आणि माझ्यांतील नम्रता ही दृढ व्हावी.

अचिन्त्य ए ब्रह्माण्डेर लोक-लोकान्तरे
अनन्त शासन जाँर चिरकालतरे
प्रत्येक अणुर माझे हतेछे प्रकाश,
जुगे जुगे मानवेर महा-इतिहास
बहिया चलेछे सदा धरणीर,'पर
जाँर तर्जनीर छाया, सेइ महेश्वर
आमार चैतन्य-माझे प्रत्येक पलके
करिछेन अधिष्ठान—ताँहारि आलोके
चक्षु मोर दृष्टिदीप्त, ताँहारि परशे
अंग मोर स्पर्शमय प्राणेर हरषे ।

जेथा चलि, जेथा रहि, जेंथा वास करि,
प्रत्येक निश्वासे मोर एई कथा स्मरि
आपन मस्तक-'परे सर्वदा सर्वथा
बहिब ताँहार गर्व, निजेर नम्रता ।

या अचिंत्य ब्रह्मांडाच्या लोकलोकान्तरांत ज्याचें शासन प्रत्येक अणूमध्यें अनंतकाल, प्रकाशित होत असते; प्रत्येक युगांतील मानवजातीचा महान इतिहास ज्याच्या तर्जनीच्या छायेच्या बळावर सर्वकाळ या पृथिवीवर वाहत असतो, तोच महेश्वर माझ्या हृदयांत, माझ्या चैतन्याच्या प्रत्येक पळांत अधिष्ठान करून आहे. त्याच्याच प्रकाशानें माझे लोचन दृष्टिदीप्त (डोळस) झाले आहेत. आणि त्याच्याच स्पर्शानें माझीं सर्व गात्रें, स्पर्शमय प्राणानें हर्षोत्फुल्ल झालीं आहेत.

मी जिथें जाईन, जिथें उभा असेन अथवा जिथें वास करीन, तिथें तिथें माझ्या प्रत्येक निःश्वासांत याच गोष्टीचें स्मरण करून, त्याचा गौरव आणि स्वतःची नम्रता मी सर्वथा आपल्या मस्तकावर वहन करावी.

# ७७

## बाह्यमत्तेची किंमत किती ?

आमच्या एका मोठ्या प्रवासांत एका सोबत्याची एक पेटी हरवली. मंडळी पुष्कळ, सामान पुष्कळ आणि संभाळणारे नोकरहि पुष्कळ. तेव्हां अशी गफलत व्हायचीच. ज्यांची पेटी हरवली ते रागावले, चिडले आणि तावातावानें बोलत माझ्याकडे आले. मीं त्यांना शांतपणें म्हणालों. 'तुमची पेटी गमावली याचें मला दुःख आहे. आपण तिचा शोध करूं. पण पेटीबरोबर तुम्हीं आपलें मनःस्वास्थ्यहि कां गमवावें ? पेटी गेल्याच्या नुकसानापेक्षां मिजाज गेल्याचें नुकसान मोठें नव्हे का ?' माझ्या सोबत्यांचा पारा तत्काळ उतरला आणि ते हसू लागले.

'धनाची क्षति झाल्यास मी ती मनाची क्षति मानूं नये,' एवढें वरदान, हे वरेण्य ! माझ्या चित्ताला द्या.

एवढ्या विशाळ परिपूर्ण जगांत सर्वांसाठीं सर्व कांहीं आहे. याचा संतोष मनांत नेहमीं असावा. आपल्या एकट्याचें थोडेसें नुकसान झाल्याबरोबर, 'सर्वनाश झाला' अशी हाकाटी आपण करूं नये. हातून एखादा कांचेचा प्याला फुटला तर ताबडतोब 'माझें नशीबच फुटकें' अशा अनुमानावर आपण येऊं नये. थोडीशी हानि होतांच या जगाविषयीं आणि त्यांतील आपल्या जीवनाविषयीं आपण विरस होतां कामा नये. धनीलोकांच्या समाजांत आपल्याला स्थान न मिळालें म्हणून काय झालें ? समस्त मानवजगांत

आपलें आसन स्थिर आहे एवढा संतोष आपल्याला पुरेसा कां नसावा ?

सांडलेली वस्तु जगांत कोठेंतरी आहे. कोणाच्या तरी उपयोगी पडत आहे. कदाचित आपल्याहून त्याला त्या वस्तूचा अधिक उपयोग असेल आणि आपल्यापेक्षां त्यालाच त्या वस्तूचें अधिक चांगलें चीज करतां येत नसेल कशावरून. आपण स्वतःचा विचार करतों तेव्हां आपलें मन लहान होतें, संकुचित होतें. सर्व जगाचा विचार केला म्हणजे आपला स्वार्थ किती तुच्छ होता हे ध्यानांत येऊन आपलें मन शांत होतें. मग मन विरस होण्याचें कांहीं कारण उरत नाहीं.

ना गणि मनेर क्षति धनेर क्षतिते
हे वरेण्य, एई वर देहो मोर चिते।
जे ऐश्वर्ये परिपूर्ण तोमार भुवन
एई तृणभूमि हते सुदूर गगन—
जे आलोके, जे संगीते, जे सौंदर्यधने,
तार मूल्य नित्य जेन थाके मोर मने
स्वाधीन सबल शान्त सरल संतोष।

अदृष्टेरे कभु जेन नाहि दिई दोष।
कोनो दुःख कोनो क्षति-अभावेर तरे
विस्वाद ना जन्मे जेन विश्वचराचरे
क्षुद्रखण्ड हाराअिया। धनीर समाजे
ना हय ना होक स्थान, जगतेर माझे
आमार आसन जेन रहे सर्व ठाँइ,
हे देव, एकान्तचित्ते एइ वर चाइ।

माझ्या चित्ताला, हे वरेण्य! असा वर द्या कीं धनाच्या क्षतीला मी मनाची क्षति गणूं नये. या तृणभूमिपासून सुदूर गगनापर्यंत विस्तारलेले आणि ऐश्वर्यानें परिपूर्ण अशा या तुझ्या भवनांत जो प्रकाश, जें संगीत आणि जें सौन्दर्यधन

७७

# बाह्यसत्तेची किंमत किती?

आमच्या एका मोठ्या प्रवासांत एका सोबत्याची एक पेटी हरवली. मंडळी पुष्कळ, सामान पुष्कळ आणि संभाळणारे नोकरहि पुष्कळ. तेव्हां अशी गफलत व्हायचीच. ज्यांची पेटी हरवली ते रागावले, चिडले आणि तावातावानें बोलत माझ्याकडे आले. मीं त्यांना शांतपणें म्हणालों. 'तुमची पेटी गमावली याचें मला दुःख आहे. आपण तिचा शोध करूं. पण पेटीबरोबर तुम्हीं आपलें मनःस्वास्थ्यहि कां गमवावें? पेटी गेल्याच्या नुकसानापेक्षां मिजाज गेल्याचें नुकसान मोठें नव्हे का?' माझ्या सोबत्यांचा पारा तत्काळ उतरला आणि ते हसू लागले.

'धनाची क्षति झाल्यास मी ती मनाची क्षति मानूं नये,' एवढें वरदान, हे वरेण्य! माझ्या चित्ताला द्या.

एवढ्या विशाळ परिपूर्ण जगांत सर्वांसाठीं सर्व कांहीं आहे. याचा संतोष मनांत नेहमीं असावा. आपल्या एकट्याचें थोडेसें नुकसान झाल्याबरोबर, 'सर्वनाश झाला' अशी हाकाटी आपण करूं नये. हातून एखादा कांचेचा प्याला फुटला तर ताबडतोब 'माझें नशीबच फुटकें' अशा अनुमानावर आपण येऊं नये. थोडीशी हानि होतांच या जगाविषयीं आणि त्यांतील आपल्या जीवनाविषयीं आपण विरस होतां कामा नये. धनीलोकांच्या समाजांत आपल्याला स्थान न मिळालें म्हणून काय झालें? समस्त मानवजगांत

आपलें आसन स्थिर आहे एवढा संतोष आपल्याला पुरेसा कां नसावा ?

सांडलेली वस्तु जगांत कोठेंतरी आहे. कोणाच्या तरी उपयोगी पडत आहे. कदाचित आपल्याहून त्याला त्या वस्तूचा अधिक उपयोग असेल आणि आपल्यापेक्षां त्यालाच त्या वस्तूचें अधिक चांगलें चीज करतां येत नसेल कशावरून. आपण स्वतःचा विचार करतों तेव्हां आपलें मन लहान होतें, संकुचित होतें. सर्व जगाचा विचार केला म्हणजे आपला स्वार्थ किती तुच्छ होता हे ध्यानांत येऊन आपलें मन शांत होतें. मग मन विरस होण्याचें कांहीं कारण उरत नाहीं.

ना गणि मनेर क्षति धनेर क्षतिते
हे वरेण्य, एई वर देहो मोर चिते।
जे ऐश्वर्ये परिपूर्ण तोमार भुवन
एई तृणभूमि हते सुदूर गगन—
जे आलोके, जे संगीते, जे सौंदर्यधने,
तार मूल्य नित्य जेन थाके मोर मने
स्वाधीन सबल शान्त सरल संतोष।

अदृष्टेरे कभु जेन नाहि दिई दोष।
कोनो दुःख कोनो क्षति-अभावेर तरे
विस्वाद ना जन्मे जेन विश्वचराचरे
क्षुद्रखण्ड हाराअिया। धनीर समाजे
ना हय ना होक स्थान, जगतेर माझे
आमार आसन जेन रहे सर्व ठाँइ,
हे देव, एकान्तचित्ते एइ वर चाइ।

माझ्या चित्ताला, हे वरेण्य ! असा वर द्या कीं धनाच्या क्षतीला मी मनाची क्षति गणूं नये. या तृणभूमिपासून सुदूर गगनापर्यंत विस्तारलेले आणि ऐश्वर्यानें परिपूर्ण अशा या तुझ्या भवनांत जो प्रकाश, जें संगीत आणि जें सौन्दर्यधन

भरलेलें आहे त्याचेंच मूल्य माझ्या मनांत भरलेलें असावें. त्याचें जें स्वतंत्र, सबल, शान्त, सरल आणि संतोषयुक्त मूल्य आहे, तें माझ्या मनांत नेहमी ठसलेलें असावें. एखादें दुःख, एखादी क्षति किंवा अभाव जर येऊन पडलीं तर त्याचा आघात मला न व्हावा मी दैवाला दोष न द्यावा. एखादा क्षुद्र तुकडा हारवल्यानें या चराचर विश्वाविषयीं मी विरस न व्हावें...मनामध्यें जीवन बेस्वाद न लागावें.

श्रीमंत लोकांच्या समाजांत मला स्थान न मिळे ना का. या विशाळ जगांत माझें आसन स्थिर असावें. हे देव! अगदी एकाग्र मनानें हेच वरदान मी मागतों.

## ७८

# मनुष्या आड ईश्वर

दिवसा सूर्याचा प्रकाश पृथ्वीवर आणि आकाशांत इतका कांहीं पसरलेला असतो कीं अनंत नक्षत्रांनीं विनटलेलें आकाश आणि त्यांच्यायोगे सूचित होणारें अमर्याद विविध विश्व आपल्या नजरेस पडत नाहीं— आणि ध्यानांतहि येत नाहीं. एक सूर्य आणि दृश्यमान आपली पृथ्वी, या खेरीज या जगांत काहीं असावें अशी शंकाहि मनांत उठत नाहीं.

अहंकारी मनुष्य स्वतःच्या रागद्वेषांत आणि निंदास्तुतींत इतका गुरफटलेला असतो कीं या जगाला धारण करणारा कोणी आहे याचें त्याला स्मरणहि राहत नाहीं. मनुष्याच्या मुगुटावरचा हिरा चमकूं लागला म्हणजे त्याचे डोळे इतके दिपून जातात कीं भूलोक आणि द्युलोक इत्यादींचा प्रकाश त्याला दिसेनासा होतो. मनुष्याच्या डोळ्यांत मनुष्य भरला म्हणजे समोर असलेल्या ईश्वरालादेखील तो विसरून जातो.

ए कथा स्मरणे राखा केन गो कठिन
तुमि आछ सब चेये, आछ निशिदिन,
आछ प्रति क्षणे—आछ दूरे, आछ काछे,
जाहा-किछु आछे तुमि आछ ब 'ले आछे ।

जेमनि प्रवेश आमि करि लोकालये,
ज़खनि मानुष आसे स्तुतिनिन्दा लये—
लये राग, लये द्वेष, लये गर्व तार,
अमनि संसार धरे पर्वत-आकार
आवरिया ऊर्ध्वलोक; तरंगिया ऊठे
लाजभय लोभक्षोभ। नरेर मुकुटे
जे हीरक ज्वले तारि आलोक झलके
अन्य आलो नाहि हेरि द्युलोके भूलोके।

मानुष संमुखे एले केन सेई क्षणे
तोमार संमुखे आछि नाहि पड़े मने।

सर्वांपेक्षां तूंच खरोखर आहेस. दिवसरात्र आहेस. प्रत्येक क्षणी आहेस. दूर आहेस आणि नजिकहि आहेस. जगांत जें कांहीं आहे तें सर्व, तूं आहेस म्हणून आहे. ही गोष्ट ध्यानांत ठेवणें इतकें कठिण कां असावें ?

जेव्हां मी लोकालयांत—या जगांत आणि समाजांत प्रवेश करतो, जेव्हां मनुष्य आपला राग, द्वेष आणि गर्व घेऊन स्तुतिनिंदासहित येतो तेव्हां हा संसार महान पर्वताचा आकार धारण करून ऊर्ध्वलोकाला (आध्यात्मिक जगाला) झांकून टाकतो. लाज आणि भय, लोभ आणि क्षोभ यांचे तरंग उठू लागतात. मनुष्याच्या मुकुटावर जो मुकुटमणि हीरा चकाकत असतो. त्याच्या चकचकाटापुढें द्यूलोकाचे आणि भूलोकाचे इतर प्रकाश दिसेनासे होतात.

भगवंता ! कशामुळें कोण जाणे मनुष्य माझ्यासमोर येतांक्षणीच मी विसरून जातों की मी खरोखर तुझ्यासमोर उभा आहे.

७९

## त्याच्या चरणीं हृदय पाथरावें !

बृहदारण्यक उपनिषदांत[१] (१-४-८) आत्म्याचें वर्णन करतांना ऋषी म्हणतातः "तो अन्तरतर अन्तरात्मा पुत्राहून देखील अधिक प्रिय आहे. वित्ताहूनदेखील तो प्रिय आहे. इतर या साऱ्या जगताहून देखील प्रिय आहे. कारण तो अन्तराचा अन्तर आहे. म्हणून इतर सर्व वस्तूंची आराधना सोडून, आत्म्याचीच-प्रियतर म्हणून उपासना करावी."

वरील वचनाचें चिंतन करीत असतां कवी गद्गद होऊन म्हणतात : ज्या ऋषीने आत्म्याचें असें वर्णन केलें, त्याच्या पायाखालीं मी माझें हृदय पाथरूं इच्छितों. खरोखर आतमा प्रेममय आहे. त्यालाच माझ्या जीवनाच्या अणूअणूमध्यें व्यापक असलेला मी केव्हां पाहूं शकेन ? माझ्या सर्व कर्मांत त्याच्या स्वाभाविक संचरणाचा साक्षात्कार मला कसा होईल ? हे अंतर्यामी. प्रत्येक क्षणीं आणि माझ्या प्रत्येक पावलांत तुझा प्रेमप्रवाह मीं कसा खेंचू शकेन ?

जेव्हां याज्ञवल्क्याने जनक राजाच्या सर्व आध्यात्मिक शंकांची निवृत्ति केली, तेव्हां राजा

---

१. तद् एतत् प्रेय पुत्रात्, प्रेयः वित्तात्, प्रेयः अन्यस्मात् सर्वस्मात्, अन्तरतरम् यत् अयम् आत्मा ।

कृतकृत्य होऊन जनकाला कृतज्ञतेनें म्हणतो, 'भो गुरो! मीं धन्य झालों. माझें सगळें राज्य तुझ्या चरणीं मीं अर्पण करतों.' सर्वस्व दान केल्यानंतरदेखील संतोष न झाल्यामुळें राजा पुन्हां म्हणतो : "माम् चैव दास्याय, सेवा करण्यासाठीं मीं स्वतःलाहि अर्पण करतों."

राजा जनकाप्रमाणेंच स्फूर्ति होऊन कवीनें म्हटलें आहे. "त्याच्या चरणीं माझें हृदय मीं पसरून ठेऊं इच्छितों."

तोमारे बलेछे जारा, 'पुत्र हते प्रिय,
वित्त हते प्रियतर, जा–किछु आत्मीय
सब हते प्रियतम निखिल भुवने,
आत्मार अन्तरतर'—ताँदेर चरणे
पातिया राखिते चाहि हृदय आमार।

से सरल शान्त प्रेम गभीर उदार,
से निश्चित निःसंशय, सेई सुनिबिड
सहज मिलनावेग, सेई चिरस्थिर
आत्मार एकाग्र लक्ष्य, सेई सर्व काजे
सहजेइ संचरण सदा तोमा-माझे
गभीर प्रशान्त चित्ते, हे अन्तरयामी,
केमने करिब लाभ। पदेपदे आमि
प्रेमेर प्रवाह तव सहज विश्वासे
अन्तरे टानिया लब निश्वासे निश्वासे।

तुझ्याविषयीं ज्यांनीं म्हटलें कीं 'तो अन्तर्यामी पुत्रापेक्षां प्रिय, वित्तापेक्षा प्रिय तर आहे. जें कांहीं आत्मीय आहे त्या सगळ्यांहून, या सर्व विश्वांत, आत्म्याचा अंतर्यामी असा प्रियतर आहे—त्याच्या चरणीं माझें हृदय पसरून ठेवावेसें वाटतें.

ते सरल शांत, गभीर आणि उदार प्रेम; ती संशयरहित निश्चित वस्तु; सहज मीलनाचा तो उत्कट आवेग; चिरस्थिर आत्म्याच्या प्राप्तीसाठी केलेले तें एकाग्र ध्यान; सर्व कामांमध्ये गंभीर. प्रशांत चित्तानें तुझ्यामध्यें सहजभावानें केलेलें संचरण. या सर्व गोष्टींचा लाभ, हे अन्तर्यामी, मला कसा प्राप्त होईल?

पदोपदीं, माझ्या प्रत्येक निःश्वासांत, स्वाभाविक श्रद्धेच्या जोरावर, तुझ्या प्रेमाचा प्रभाव माझ्या हृदयांत मी कसा खेंचून घेऊं शकेन?

८०

# चित्ताच्या खिडक्या

अदृश्य, अगम्य अशा हिमाद्रि-शिखराच्या प्रदेशांतून अर्थात् गोमुख गंगोत्रीपासून ज्याप्रमाणें जान्हवी गंगेचा प्रवाह वाहतो, त्याचप्रमाणें, हे अनंत! धारणेच्याहि पलिकडील भूमिकेंतून तुझ्या आनंदाचें अव्यक्त संगीत झरत झरत उतरत आहे."

असें म्हणून कवी आपल्या ध्यानांत पहाटे, संध्याकाळीं आणि रात्रीं काय काय दिसलें याचें वर्णन करीत म्हणतो : "आदि अंधकारामध्यें जगताच्या प्रातःकालीं जेथें प्रकाशाची स्वर्णरेखा प्रथम दिसली होती, त्या ध्यानाभ्रभेदी शृंगाकडे माझ्या चित्ताची खिडकी मीं उघडून ठेवीत आहें; परिभ्रमण करून परिश्रांत झालेला संध्याकाळचा सूर्य आपल्या ताम्रवर्णी शोभेसह जेथें अस्तास जाईल, तिकडेदेखील मी माझ्या चित्ताची खिडकी उघडून ठेवीन.

कवीनें आधुनिक खगोलशास्त्र (ज्योतिषविद्या) समजून घेतली असल्यामुळें आकाशांतील असंख्य ताऱ्यांखेरीज आणि आकाशगंगेखेरीज त्याला अनेकानेक नेब्युला तेजोमेघांचीहि माहिती आहे. त्यांना आतां आपण नीहारिका म्हणतों. (ज्या मूळ पदार्थांतून सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्र, तारे आदि हें सारें विश्व तयार होतें, त्या पदार्थांचे कल्पनातीत ढग आकाशांत स्वतःभोवतीं भोवऱ्याप्रमाणें फिरत असतात. त्यांतूनच पुढें, गोफणींतून धोंडे

सुटावे त्याप्रमाणें अनेक सूर्य बाहेर फेंकले जातात. सूर्यांतून त्यांचे ग्रह, ग्रहांतून त्यांचे उपग्रह—असे खेंचले जाऊन बाहेर फेंकले जातात. आणि ते सर्व आपापल्या मूळ मालकाच्या आसपास पिंगा घालूं लागतात. आणि हा विशाल, विराट रास अनंतकाळ चालू राहतो.) या सर्व माहितीच्या मदतीनें ध्यान करीत असतां कवी म्हणतो :

"नवीन नवीन विश्वांना जन्म देणारा ज्योतिर्बाष्पराशी, नीहारिकांचे मोठ मोठे ढग घेऊन युगानुयुगीं ज्याच्या छातीवर मेघाच्या खंडाप्रमाणें सृजनवेगानें फिरत आहे, अशा तुझ्या अगम्य, अचिंत्य तत्त्वाकडे, हे अंतविहीन अंतर्यामी! माझ्या चित्ताची खिडकी रात्रंदिवस उघडून ठेवीन.

हे अनंत, जेथा तुमि धारणा–अतीत
सेथा हते आनन्देर अव्यक्त संगीत
झरिया पडिछे नामि, अदृश्य अगम
हिमाद्रिशिखर हते जाह्नवीर सम।

से ध्यानाभ्रभेदी शृंग जेथा स्वर्णलेखा
जगतेर प्रातःकाले दियेछिल देखा
आदि अन्धकार–माझे, जेथा रक्तच्छवि
अस्त जाबे जगतेर श्रान्त संध्यारवि,
नव नव भुवनेर ज्योतिर्बाष्पराशि
पुंज पुंज नीहारिका जार वक्षे आसि
फिरिछे सृजनवेगे मेघखंड सम
जुगे जुगान्तरे–चित्त वातायान मम
से अगम्य अचिन्त्येर पाने रात्रिदिन
राखिब उन्मुक्त करि हे अन्तविहीन।

८१

# घरटें आणि आकाश

पक्षी लहान असतात तेव्हां लहानशा घरट्यांत राहतात. पंख फुटले म्हणजे अपरिमित अशा आकाशांत भराऱ्या मारूं लागतात. लहानपणचें जग कसें अगदीं चिमुकलें होतें. मोठेपणचें जग कल्पनातीत विशाल झालें. पण खरें पाहतां दोन्ही जगें एकच आहेत. लहानपणीं जें प्रेम पिलांवर पाखर घालून त्यांना उबवीत होतें तेंच प्रेम पंख फुटतांच अनंत दिशांनीं कधींहि न संपणाऱ्या भराऱ्या मारण्यासाठीं आमंत्रण आणि उमेद देतें. लहानपणीं ज्या भगवंतांनीं घरट्याचें रूप धारण करून दर्शन दिलें तोच भगवान मोठेपणीं आकाशाच्या रूपानें स्वतःचा परिचय करून देतो.

परिमित जगामध्यें दिवस आणि रात्र, प्रकाश आणि अंधकार दोन्ही असतात आणि म्हणूनच पहाट आणि संध्याकाळ या दोन्ही संध्यासमयींचे बादशाही रंग पसरलेले असतात. या परिमित जगांत रूप, रंग आणि संगीत यांची रेलचल असते. उषा येते ती सौंदर्याची माळ घेऊन येते. आणि संध्या येते ती शांतीची झारी घेऊन येते. उषेमुळें तकवा येतो. संध्येमुळें थकवा उतरतो.

पण जेथें या पृथ्वीलाहि मागें टाकून आत्मा आकाशात भरारी मारतो तेथें प्रकाश आणि अंधकार हें द्वैत उरत नाहीं. आणि जेथें पृथ्वीच नाहीं आणि तिचें वातावरणहि नाहीं, तेथें प्रकाशाला मुरड घालून त्यांतून तऱ्हतऱ्हेच्या रंगांची रोषणाई कोण करणार?

तेथें फक्त उज्ज्वल तेजस्वी चकाकणारा पांढरा एकरूप प्रकाशच असणार. तेथें रूपवैभव नाहीं. तेथें आकाशाची सृष्टी नाहीं. तेथवर गंधहि पोहोंचत नाहीं—आणि आकाश शब्दगुण असले तरी—कसलीच वाणी पोंहचूं शक्त नाहीं.

हेंहि ईश्वराचेंच दर्शन आणि तोहि त्याचाच परिचय; दोन्ही एकच असूनहि किती भिन्न ! एकाची दीक्षा घेतल्यानंतरच दुसऱ्याचा अधिकार मिळत असतो. एकाची गोडी चाखल्यानंतरच दुसऱ्याची खुबी ध्यानांत येते. पहिल्या दर्शनाचा कृपाप्रसाद मिळवयाचा असतो. दुसऱ्यामध्यें मिसळून एकरूप व्हावयाचें असतें. आणि मग जे येथें दिसलें तेंच तेथें मिळालें असा आनंदोद्गार अखंडपणें गावयाचा असतो.

एकधारे तुमिअि आकाश, तुमि नीड ।
हे सुन्दर, नीडे तव प्रेम सुनिविड
प्रति क्षणे नाना वर्णे नाना गंधे गीते
मुग्ध प्राण वेष्टन करे छे चारि भिते ।
सेथा अुषा डान हाते धरि स्वर्णथाला
निये आसे अेकखानि माधुर्येर माला
नीरबे पराये दिते धराब ललाटे;
संध्या आसे नम्रमुखे धेनुशून्य माठे
चिह्नहीन पथ दिये लये स्वर्णझारि
पश्चिम समुद्र हते भरि शांतिवारि ।

तुमि जेथा आमादेर आत्मार आकाश
अपार संचारक्षेत्र, सेथा शुभ्र भास;
दिन नाअि, रात्रि नाअि, नाअि जन-प्राणी
वर्ण नाअि, गंध नाअि—नाअि नाअि वाणी ।

खरें पाहतां तूंच आकाश आहेस आणि तूंच घरटें आहेस. हे सुंदरा, या लहानशा घरट्यामध्यें तुझें संपूर्ण प्रेम भरगच्च भरलेलें अनुभवास येतें. या

घरट्याच्या उबेंत राहात असतां माझ्या मुग्ध प्राणाला नाना वर्णांनीं, नाना गंधांनीं आणि नित्यनूतन गीतांनीं चारी बाजूनें तूं घेरून टाकतोस आणि या विचित्र उबेनें मला उबवतोस.

या घरट्यामध्यें असतांना तुझी उषा उजव्या हातांत सोन्याची परडी धारण करून त्यांतून सौंदर्य माधुर्याची पुष्पमाला घेऊन येते. आणि गुपचूपपणें पृथ्वीच्या ललाटावर ती माला मुकुटाप्रमाणें ठेवून देते.

दिवस मावळतांच जेथून गायी परतल्या आहेत अशा रिकाम्या कुरणामध्यें जेथें कुणाचींहि पावलें उमटलीं नाहींत अशा मार्गानें तुझी संध्या नम्र भाव धारण करून येते आणि हातांत सुवर्णाची झारी घेऊन पश्चिम समुद्रांतून शांतिजल भरून आणते.

यापुढें जेव्हां माझा आत्मा परिपुष्ट होतो, समर्थ होतो आणि आकाशांत भरारी मारतो त्यावेळीं तूं माझ्या आत्म्याचें अमर्याद संचारक्षेत्र असें आकाश बनून दर्शन देतोस, त्या विश्वरूप दर्शनांत प्रकाश कसा पुंजाळलेल्या धवल तेजानें झळझळीत असतो. तेथें नाहीं दिवस, नाहीं रात्र, नाहीं वर्ण, नाहीं गंध. जेथें जनप्राणीहि नाहींत आणि वाणी तर मुळींच नाहीं. तेथें फक्त अद्वैत, प्रकाश आणि आनंद एकलेपणानें आपल्या महिम्यांत नांदत असतो.

८२

# माधुर्य आणि ऐश्वर्य

बाल नामदेवाची भोळी भक्ति इतकी उत्कट होती कीं पहिल्या पूजेलाच त्याला दर्शन देणें भगवंतांना भाग पडलें. नामदेवाच्या इच्छेप्रमाणें पुढें ठेवलेला नैवेद्य भगवंताला खावा लागला. पण दर्शन म्हणजे कांहीं पूर्णप्राप्ति नव्हे. नामदेवाशीं देव नित्य बोलतो. त्याच्या हातचें खातो. त्याचे लाड करतो हें जेव्हां इतर संतांना समजलें तेव्हां त्यांनीं त्याचें अभिनंदन केलें. नामदेवालाहि कृतार्थतेचा थोडा अभिमान झाला. गोऱ्या कुंभाराचा धंदा मडकीं भाजण्याचा. कोणतेंहि भांडें कच्चें आहे कीं पक्कें आहे हें तपासण्याची त्याला संवय. त्यानें नामदेवाला तपासून कच्चा ठरविला. हा अपमान सहन न होऊन नामदेव तडक विठोबाकडे गेला आणि त्याला म्हणाला–देवा, तुझें प्रत्यक्ष दर्शन घडूनहि काय मी कच्चाच म्हटला जावा? विठोबांनीं म्हटलें 'माझें दर्शन झालें म्हणजे काय तूं मला पूर्णपणें ओळखलेंस? तूं कच्चा आहेस यांत शंका नाहीं.' नामदेवाला शेवटीं सद्गुरूला शरण जाऊन ईश्वर सर्वाभूतीं आहे, सर्वत्र आहे, हें समजून पटवून घ्यावें लागलें. मग मात्र तो पक्का झाला.

पहाडामध्यें केव्हां केव्हां बर्फाच्या नद्या तयार होतात. इंग्रजींत त्याला ग्लेशियर म्हणतात. आपण त्याला हिमनदी म्हणूं. सामान्य जलनदीपेक्षां हिमनदीचें स्वरूप उलटें असतें. जलनदी उगमाला अगदीं बारीक, पातळ असते. वेगानें धांवते आणि पुढें मोठी

होते आणखी शेवटीं अनंत सागराला मिळते.

हिमनदी म्हणजे आकाशांतून अनंत विस्तारानें पडणाऱ्या आणि घट्ट होणाऱ्या बर्फाचा समूह. हा उगमाकडे खूब विस्तृत असतो. अगदीं हळूहळू तो खालच्या बाजूला सरकत असतो. खिंडींतून सरकतां सरकतां प्रवाह अरुंद होतो. आणि शेवटीं बर्फ वितळून पाण्याचा लहानसा प्रवाह टपकूं लागतो.

जीवात्मा जेव्हां व्यक्तित्व धारण करून जन्म घेतो तेव्हां त्याची स्थिति हिमनदींतून टपकणाऱ्या जलरेखेसारखी असते. या प्रवाहाला जर उलट वळून आपलें मूळ पाहतां येईल तर त्याला वाटेल केवढ्या विशाल उगमांतून मी निघालों होतों ! मी खालीं सरकलों आणि संकुचित झालों. पुन्हां वाफेच्या रूपानें मी आकाशांत जाईन, धुकें होऊन पहाडाच्या शिखरावर जाऊन पोहोचेन. तेव्हांच विशाल हिमनदीच्या उगमाकडील बर्फाच्या विस्ताराशीं मी एकरूप होईन. जीवात्म्याची स्थिति ही अशीच आहे. परमात्म्याशी स्वतःचा अभेद आहे. हें ओळखणें निराळें आणि स्वतःचें व्यक्तित्व लय पावून त्याचेशीं एकरूप होणें निराळें. साधकाला या दोन्ही अवस्थांतून जावें लागतें. तेव्हांच त्याला पूर्णत्व येतें.

मनुष्य प्रथम आत्मरूपानें शुद्ध, बुद्ध, नित्य आणि मुक्त होता. तेथून तो घसरला. मूळ पद विसरला आणि संकुचित झाला. त्याला प्रयत्नपूर्वक मूळपद प्राप्त करून घ्यावयाचें असतें. ही गोष्ट व्यक्त करण्यासाठीं संतलोक भगवंताला आपलें माहेरघर म्हणतात. जेथून आलों तेथें परत जावयाचें आहे. माहेरचें प्रेम परत मिळवावयाचें आहे अशा शब्दांत ते आपली साधना स्पष्ट करीत असतात. आणि शेवटीं मिळणारा आनंदहि तशाच भाषेंत व्यक्त करीत असतात.

तव प्रेमे धन्य तुमि करेछ आमारे
प्रियतम, तबु शुधु माधुर्य-माझारे
चाहि ना निमग्न करे राखिते हृदय ।
आपनि जेथाय धरा दिले, स्नेहमय,
विचित्र सौन्दर्यडोरे, कत स्नेहे प्रेमे,
कत रूपे, सेथा आमि रहिब ना थेमे
तोमार प्रणय-अभिमाने । चित्ते मोर
जडाये बाँधिब नाको सन्तोषेर डोर ।

आमार अतीत तुमि जेथा सेइखाने
अन्तरात्मा धाय नित्य अनन्तेर टाने
सकल बंधन-माझे—सेथाय उदार
अन्तहीन शान्ति आर मुक्तिर विस्तार।

तोमार माधुर्य जेन बेंधे नाहि राखे
तव ऐश्वर्येर पाने टाने से आमाके।

हे प्रियतम, तुझ्या प्रेमानें तूं मला धन्य केलें आहेस. तरीही नुसत्या माधुर्यामध्यें माझें हृदय निमग्न करून ठेवण्याची माझी इच्छा नाहीं. तूं स्वतःचें दर्शन दिलेंस. मी तुला माझा म्हणू शकलों आणि स्नेहमय ईश्वरा! कितीतरी स्नेहानें, कितीतरी प्रेमानें, किती सुन्दररूपें धारण करून मला आपल्या सौंदर्य-रज्जूनें बांधून घेतलें आहेस. मी तुझ्या इतक्या प्रगाढ प्रेमाचा अधिकारी झालों. पण या प्रणय अभिमानांत चूर होऊन त्याच स्थितींत थांबण्याची माझी इच्छा नाहीं. हे प्रियकरा, माझ्या चित्ताला संतोषाच्या–समाधानाच्या रज्जूनें बांधून जखडून टाकूं नकोस. मला रज्जू हवा आहे. पण तो बांधून ठेवणारा नको. खेचून नेणारा पाहिजे. तुझ्या माधुर्यांत मला जी गोडी आहे, ती मला या परिमित वातावरणांतून बाहेर काढून तुझ्या ऐश्वर्याकडे खेचून नेईल.

तुझ्या ऐश्वर्याचें जें मूळस्थान आहे तेंच माझें मूळस्थान होतें. तूंच माझें जुनें आदिपीठ आहेस. जिथें उदार अंतहीन शांति नांदत आहे. आणि जेथें मुक्तीचा विस्तार पसरलेला आहे. तिथें मला सर्व बंधनांतून सोडवून माझ्या आंतरिक ओढीनें आणि तुझ्या आनंत्याच्या खेचावानें माझा अंतरात्मा अखंड धांवत रहावा. तिथें पोचण्याचा त्याचा प्रयास अखंड चालू रहावा हें मला हवें आहे.

तुझें प्रेम तर मला मिळालें आहेच. तें माधुर्य आतां माझ्यापासून कोण हिरावून नेणार? पण त्या माधुर्याबरोबरोबर मला तुझें—जें प्रथम माझेंही होतें तें—ऐश्वर्य पुनः हवें आहे. कारण तेथेंच मला विशाल अमर्याद शांति आणि मुक्ति मिळणार आहे.

# कसेंही मान!

आई आणि मुलगा डाव खेळूं लागले. मुलगा म्हणतो : आई, आई ! मी हरलों तर मी तुझा आणि तूं हरलीस तर तूं माझी, कबूल आहे तुला? आईनें मुलाला पोटाशीं कवटाळून म्हटलें–नेहमीं कबूल. हा करारमदार झाल्यानंतर मगच मुलगा आईशीं खेळूं लागला.

अद्वैताचार्य शंकराचार्यांनीं भक्तियुक्त अंतःकरणानें म्हटलें आहे–

**सत्यपि भेदापगमे नाथ ! तवाहं न मामकीनस् त्वम्**
**सामुद्रो हि तरंगः क्वचन समुद्रो न तारंगः ॥**

तत्त्वज्ञानाच्या शोधांत खोल खोल शिरलों असतांना खात्री झाली कीं आत्मा आणि परमात्मा एकच आहे. त्यांत किंचितहि भेद नाहीं. म्हणून काय मनुष्य स्वतःला ईश्वर मानूं शकेल? मीच ईश्वर आहे हें जरी पटलें असलें, तरी तसें म्हणणें शोभत नाहीं. आणि जरी म्हटलें असलें तरी ऐश्वर्य अंगीं बाणलें नसल्यामुळें त्या म्हणण्याचा आवाज पोकळच ठरतो.

म्हणूनच हनुमंतानें श्रीरामाला म्हटलें कीं अद्वैतबुद्धि कायम टिकत नसते. आत्मबुद्धीनें जरी मी तूंच असलों (आत्मबुद्ध्या त्वमेवाहं) तरी माझी देहबुद्धि सुटली नाहीं तोंवर देहबुद्ध्या तु दासोऽहम् । हेंहि मला म्हटलें पाहिजे.

वैदिक ऋषीनें ईश्वराचें ध्यान करतां करतां म्हटलें 'तद्दूरे तदु अंतिके।' तें दूरहि आहे आणि तें जवळहि आहे. आणि पुढें ध्यानांतील एक मौज म्हणून ऋषी म्हणतो, 'तत् धावतो अन्यान् अत्येति तिष्ठत्।' धावणाऱ्या इतर सर्वांच्या पुढें तें जातें. पण त्याला आपलें स्थान सोडावें लागत नाहीं. आपल्या स्थानीं उभे राहूनच सर्व धावणाऱ्यांना तें मागें टाकतें. रविबाबूंनीं भक्त आणि भगवान यांच्या संबंधाविषयीं हीच गोष्ट निराळ्या रीतीनें मांडून बहार केली आहे. ते म्हणतात—

हे दूर हइते दूर, हे निकटतम,
जेथाय निकटे तुमि सेथा तुमि मम;
जेथाय सुदूरे तुमि सेथा आमि तव।

काछे तुमि नाना भावे नित्य नव नव
सुखे दुःखे जनमे मरणे। तव गान
जलस्थल शून्य हते करिछे आव्हान
मोरे सर्व कर्म-माझे—बाजे गूढस्वरे
प्रहरे प्रहरे चित्तकुहरे-कुहरे
तोमार मंगलमंत्र।

जेथा दूर तुमि
सेथा आत्मा हाराइया सर्व तटभूमि
तोमार निःसीम-माझे पूर्णानन्दभरे
आपनारे निःशेषिया समर्पण करे।
काछे तुमि कर्मतट आत्मातटिनीर,
दूरे तुमि शान्तिसिंधु अनन्त गभीर

भगवंता, तूं दुराहून दूर आहेस आणि तूं निकटतमही आहेस. अंतरीचें अंतर आहेस. जेव्हां तूं निकट असतोस तेव्हां तूं माझा होतोस. आणि जेव्हां तूं दूर असतोस तेव्हां मी तुझा होतों. असा आपला हा गोड संबंध आहे.

८४

# अहंकारशून्य भक्तिबळानें

जगांत कसें जगलें असतां जीवनकार्य सफळ होईल आणि जीवनहि कृतार्थ होईल, याचे असंख्य प्रयोग आणि अखंड चिंतन करून, जीवनऋषींनीं मार्ग शोधून काढला—ध्यानसमृद्ध, अनासक्त कर्मयोगाचा.

जीवनकार्य करीत असतां कधीं कधीं व्याप वाढतो आणि जगाचें ओझें डोक्यावर घ्यावें लागतें. हा एवढा भारहि सहज उचलतां येईल, जर एक लहानसें अडचणीचें पण आवडतें ओझें डोक्यावरून फेंकून देतां येईल तर. आपल्याला हें साधत नाहीं म्हणून देवाची करुणा भाकावयाची कीं, देवा ! एवढा भार दूर कर.

हा भार कोणचा ? आपल्या अहंपणानें आपण जगाच्या कल्याणापेक्षांदेखील स्वतःच्या कारकीर्दीची अधिक काळजी वाहतों. आणि म्हणूनच आपलें सगळें लक्ष निंदा–प्रशंसेकडे लागलेलें असतें. 'कार्यांत मला सफळता मिळावी, मला श्रेय मिळावें, माझा जयजयकार व्हावा.'— या एका कल्पनेनें पछाडलें म्हणजे देवाचें कार्य कसें सिद्ध होईल, याची एकाग्र तळमळ राहून जाते आणि देवाचें कार्य बिघडतें.

आपण केवळ सद्बुद्धि बाळगून काम करीत राहावें. चूक झाली तर मालक दंड करील, काम बरोबर झालें तर मालक पुरस्कार देईल. दोन्हींचा स्वीकार मुकाट्यानें करतां आला पाहिजे.

जेव्हां तूं जवळ असतोस तेव्हां सुखामध्यें आणि दुःखामध्यें जीवनामध्यें आणि मरणामध्यें नानाभावांनीं नित्यनव्या प्रकारांनीं तूं अगदी जवळ अनुभवास येतोस. तूं जवळ असतोस तेव्हां माझ्या सर्व कर्मामध्यें तुझें गान जलस्थळ सर्व कांहीं विसरायला लावून आमंत्रण करीत असतें. तुझा मंगल मंत्र माझ्या चित्ताच्या प्रत्येक पोकळींत, प्रत्येक कोनाकोपऱ्यांत कुहराकुहरामध्यें हर प्रहरीं आणि हर क्षणीं गूढ स्वरांनीं गुंजत असतो. आणि जिथें तूं दूर आहेस तेथें माझा आत्मा आपली किनारारूपी भूमि गमावून बसतो आणि पूर्णानंदाच्या भरांत येऊन स्वतःला निःशेष करून तुझ्या निःसीम समुद्रामध्यें स्वतःला अर्पण करतो. आत्मा स्वतःची सर्व मर्यादा तोडून मोकळा होऊन आनंदाच्या भरांत तुझ्या अनंतामध्यें एकरूप होऊन जातो.

जेव्हां तूं जवळ असतोस तेव्हां आत्मरूपी नदीचा तूं कर्मरूपी किनारा बनवतोस. आणि जेव्हां तूं दूर जातोस तेव्हां तूं अनंत गंभीर शांतिसागर असा बनतोस.

८४

# अहंकारशून्य भक्तिबळानें

जगांत कसें जगलें असतां जीवनकार्य सगळ होईल आणि जीवनहि कृतार्थ होईल, याचे असंख्य प्रयोग आणि अखंड चिंतन करून, जीवनऋषींनीं मार्ग शोधून काढला—ध्यानसमृद्ध, अनासक्त कर्मयोगाचा.

जीवनकार्य करीत असतां कधीं कधीं व्याप वाढतो आणि जगाचें ओझें डोक्यावर घ्यावें लागतें. हा एवढा भारहि सहज उचलतां येईल, जर एक लहानसें अडचणीचें पण आवडतें ओझें डोक्यावरून फेंकून देतां येईल तर. आपल्याला हें साधत नाहीं म्हणून देवाची करुणा भाकावयाची कीं, देवा ! एवढा भार दूर कर.

हा भार कोणचा ? आपल्या अहंपणानें आपण जगाच्या कल्याणापेक्षांदेखील स्वतःच्या कारकीर्दीची अधिक काळजी वाहतों. आणि म्हणूनच आपलें सगळें लक्ष निंदा–प्रशंसेकडे लागलेलें असतें. 'कार्यांत मला सफळता मिळावी, मला श्रेय मिळावें, माझा जयजयकार व्हावा.'— या एका कल्पनेनें पछाडलें म्हणजे देवाचें कार्य कसें सिद्ध होईल, याची एकाग्र तळमळ राहून जाते आणि देवाचें कार्य बिघडतें.

आपण केवळ सद्‌बुद्धि बाळगून काम करीत राहावें. चूक झाली तर मालक दंड करील, काम बरोबर झालें तर मालक पुरस्कार देईल. दोन्हींचा स्वीकार मुकाट्यानें करतां आला पाहिजे.

जगाची सेवा आणि ईश्वराची भक्ति—यांचा मेळ कसा बसवावयाचा? या कामीं नदीकडून बोध घेणें शक्य आहे. नदी पर्वतशिखरावरून, पहाडांतून निघून वाहते. कशासाठीं? समुद्राला मिळण्यासाठीं. पण ती नदी अशी अखंड, एकाग्र समुद्रयात्रा करीत असतांना वाटेंत असंख्य शेतांना आणि बगीचांना, पहाडांना आणि कुरणांना, रणांना आणि दलदलींना पोषण देत देत पुढें जाते. पशु-पक्षी, कृमि-कीट, भूचर, जलचर, खेचर सर्वांना स्तन्यपान करवीत ती समुद्राला जाऊन मिळते. नदी म्हणजे मूर्तिमंत अपत्यवात्सल्य; आणि नदी म्हणजे समुद्रनिष्ठा. ती वाहते म्हणून तिला दोन्ही गोष्टी साधतात. दरेक नदी एका समृद्ध संस्कृतीची माता असते. तिला आपलें नांव व्हावें असा आग्रह नसतो. मिळालेलें सर्व पाणी देऊन टाकण्यासाठीं आहे याविषयीं तिच्या मनांत कसलीच शंका नसते. आपल्या जीवनप्रवाहाचें आपणाला जर सार्थक करावयाचें असेल तर नदीलाच जीवनगुरु बनवलें पाहिजे.

मुक्त करो, मुक्त करो निन्दाप्रशंसार
दुश्छेद्य शृंखल हते । से कठिन भार
जदि खसे जाय तबे मानुषेर माझे
सहजे फिरिब आमि संसारेर काजे—
तोमारि आदेश शुधु जयी हबे नाथ!
तोमार चरण प्रान्ते करि प्रणिपात
तव दंड पुरस्कार अंतरे गोपने
लइब नीरबे तुलि—

निःशब्दगमने

चले जाब कर्मक्षेत्र-माझखान दिया
बहिया असंख्य काजे एकनिष्ठ हिया,
सँपिया अव्यर्थ गति सहस्र चेष्टाय
एक नित्य भक्तिबले—नदी जथा धाय
लक्ष लोकालय-माझे नाना कर्म सारि
समुद्रेर पाने लये बंधहीन वारि ।

मुक्तिदात्या भगवंता! निंदास्तुतीच्या असह्य शृंखलांपासून मला मुक्त कर, मुक्त कर! हा एक कठिण भार जर दूर झाला तर मानवसमाजांत मी सहज-भावानें वावरूं शकेन! आणि मग माझ्या सर्व कार्यांमध्ये, हे नाथ! फक्त तुझ्याच आदेशाचा विजय होईल! तुझ्या चरणीं प्रणिपात करून तुझा जो कांहीं दंड किंवा पुरस्कार असेल त्याचा मी मुकाट्यानें स्वीकार करीन! मनांत विकल्प उठूं देणार नाहीं आणि कसलीच तक्रारहि करणार नाहीं!

नदी ज्याप्रमाणें लक्षावधि लोकवस्तींमधून तऱ्हेतऱ्हेचीं कर्मे सारून आपल्या पाण्याला बंधनांत गुरफटूं न देतां, समुद्राकडे घेऊन जाते, त्याप्रमाणे मुकाट्यानें एकनिष्ठ हृदयानें, असंख्य कामाचें वहन करीत केवळ नित्य-भक्ति-बलाच्या जोरावर, हजारो प्रयत्नांना अव्यर्थ गति देत, मी माझी जीवनयात्रा चालवीन!

८५

# मिलनाची खुमारी, दुर्दिन एकांती

रंगमहालांतील मृदु शय्येवर अनुकूल वल्लभाशीं रममाण होण्याचें सुख आनंदाची परमावधि मानली जाते. पण प्रेमिकेला त्याची तितकी गोडी वाटत नाहीं. घनघोर अंधार पसरला आहे, पावसाच्या मुसळधारांनीं आसपासचा प्रदेश तर काय, सर्व दिशाच वाहून जात आहेत; आकाशांत विजा चमकून जणु अट्टहास्य करीत आहेत आणि घोर वन-उपवन-काननांत झाडें जणुं उन्मळून पडण्याच्या बेतांत आहेत; अशा वेळीं, सर्व भय बाजूला सारून प्रेमिका आपल्या प्राणेश, जीवनस्वामी मोहनाकडे जाण्याच्या अभिसाराला तयार होते. दुसरें कोणचेंहि कर्तव्यकर्म तिला रोकूं शकत नाहीं. वाटेंत पाय निसरून पडूं नये, मार्ग दाखवणारा दीप विझून जाऊं नये, आणि गारठून टाकणाऱ्या वाऱ्यांतूनहि प्राणेशाची हाक मधूनमधून ऐकूं यावी, एवढें साहाय्य असलें म्हणजे बस !

पावसाची झड उठलेली पाहून आणि त्यामुळें सगळा प्रदेश निर्जन झालेला पाहून कवि जीवनस्वामीची प्रार्थना करतो : "आज या एकान्तसमयीं आपलें मिलन होवो."

दुर्दिन घनाये एल घन अंधकारे
हे प्राणेश ! दिग्विदिक वृष्टिवारिधारे
भेसे जाय, कुटिल कटाक्षे हेसे जाय

निष्ठुर विद्युत्शिखा——उतरोल वाय
तुलिल उतला करि अरण्यकानन !

आजि तुमि डाको अभिसारे हे मोहन,
हे जीवनस्वामी। अश्रुसिक्त विश्व-माझे
कोनो दुःखे, कोनो भये, कोनो वृथा काजे
रहिब ना रुद्ध हये। ए दीप आमार
पिच्छिल तिमिरपथे जेन बारम्बार
निबे नाहि जाय——जेन आर्द्र समीरणे
तोमार आह्वान बाजे।

दुःखेर वेष्टने
दुर्दिन रचिल आजि निबिड निर्जन;
होक आजि तोमा–साथे एकान्त मिलन।

हे प्राणेशा ! घन अंधकाराच्या वेळीं मेघानें आकाश व्याप्त झाल्यामुळें रात्र कशी गडद झाली आहे. पावसाच्या धारांमुळें दिशाविदिशा वाहून जात आहेत. निष्ठुर विद्युत्शिखा कुटिल कटाक्ष करून अट्टहास्य करीत आहेत. आणि झंझावात अरण्यकाननांना हालवून सोडत आहे. हे मोहना ! हे जीवनस्वामी ! आज मला तूं अभिसारासाठीं बोलव. या अश्रुसिक्त विश्वामध्यें कोणच्याहि दुःखामुळें, कोणच्याहि भयामुळें कोणच्याहि वृथा कामासाठीं मी अडकून राहणार नाहीं. रात्रीच्या निसरड्या रस्त्यानें जात असतांना माझा हा पथप्रदर्शक दीप वारंवार विझला न जावो आणि भिजून टाकणाऱ्या वाऱ्यांतून ही तुझी हाक माझ्या कानांत गुंजत राहो.

दुःखाच्या वेष्टनानें आजचा दुर्दिन-वर्षाकाल निबिड निर्जन झाला आहे. आज तुझ्याबरोबर माझें एकान्त मीलन होवो.


अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक ............ ग्रो. दि: ............

८६

## झंझावात[1] पत्करला पण ही कोरड नको !

ज्याच्याशीं नेहमीं एकत्र राहावयाचें असतें त्याच्याशीं कितीहि प्रेमाचा संबंध असला तरी कधीं कधीं भांडण हें व्हावयाचेंच. भांडणानंतर जो समेट होतो तो त्या भांडणामुळेंच पुष्कळदा अधिक गोड वाटूं लागतो. परत येणारें प्रेम मूळच्या प्रेमाहून अधिक सुखमय असते. हा अनुभव कुणाला नाहीं. प्रेमाचा सहवास गोड असतोच. प्रेमाच्या कडव्या भांडणांत देखील एकप्रकारची गोडी असते. पण जर प्रेमच क्षीण झालें आणि त्यामुळें अबोला सुरू झाला तर मात्र तो दाह असह्य होतो. कोंवळ्या मनाचीं मुलें पुष्कळदां आईला म्हणतात : आई वाटल्यास मला मार, झोडप पण माझ्याशीं असा अबोला धरूं नकोस. मला तो असह्य होतो.

भक्तालाहि कधीं हृदयांत देवाविषयीं भक्ति वाटेल, कधीं देवाचा रागहि येईल. त्याचेशीं यथेच्छ भांडावेंसें वाटेल तर भांडूनहि घेईल. पण हृदयांत जर नास्तिकता आणि अश्रद्धा शिरली तर मात्र घातच झाला. मेघगर्जना होवो, अशनिपात वीज पडो, विजा कडाडून आकाशाच्या चिंधड्या करोत, पण एकदांचा पाऊस पडो. पण एकाकार, क्रूर, निःशब्द

१. ज्या वावटळीच्या मागोमाग पावसाची झड येते तिला झंझावात म्हणतात. (झंझावातः स-वृष्टिकः)

कोरड असह्य आहे. देवा, ही परत घे आणि विजा चमकावून का होईना, पाऊस पाड.

[सहकार किंवा सहयोग हें जीवनतत्त्व आहे. विरोध किंवा विग्रह ही त्याचीच एक विकृति आहे. पण कांहींहि न बोलतां, न करतां फक्त बसून राहणारा असहयोग खरोखर भयानक दाहक शक्ति आहे. तिच्या योगानें नको नकोसें होतें. बरी तर बरी नाहींतर ही शक्ति जगाला जाळून काढील. हिला पोचट कुणी म्हणावें !]

दीर्घकाल अनावृष्टि, अति दीर्घकाल,
हे इन्द्र, हृदये मम। दिक्चक्रवाल
भयंकर शून्य हेरि, नाइ कोनोखाने
सरस सजल रेखा—केह नाहि आने
नववारि-वर्षणेर श्यामल संवाद।

जदि अिच्छा हय देव, आनो वज्रनाद
प्रलयमुखर हिंस्र झटिकार साथे।
पले पले विद्युतेर वक्र कषाघाते
सचकित करो मोर दिग् दिगन्तर।
संहरो संहरो प्रभो, निःस्तब्ध प्रखर
एइ रुद्र, एइ व्याप्त, ए निःशब्द दाह,
नि:सह नैराश्यताप। चाहो नाथ, चाहो,
जननी जेमन चाहे सजल-नयाने
पितार क्रोधेर दिने सन्तानेर पाने।

हे प्रभो, जनार्दना, कितीतरी काळ लोटला. तुझी वृष्टि झाली नाहीं. हे इंद्रा, अतिदीर्घकाल झाला आहे. माझ्या हृदयांत तुझ्या अनावृष्टीची कोरड पडली आहे. कोठेहि पहा हे सारे दिक् चक्रवाल क्षितिज भयंकर शून्य झालें आहे. कोठेहि ढगाची एक सजल शीतल रेषाहि दिसून येत नाहीं. कोणीहि नव-वारि-वर्षणाचा समाचार आणत नाहीं. चार थेंब पडतील असे अस्पष्ट सूचनहि कुठून मिळत नाहीं.

हे रुद्रा, तुझी जर तशीच इच्छा असेल तर प्रलयकालाच्या भयंकर आवाज करणाऱ्या हिंस्र कडाक्यासकट वज्रनाद पाठव. विजांचा कडकडाट होऊं द्या. माझे हे दिग् दिगंतर प्रलयकाळाच्या विजांच्या चकमकांनीं सचकित कर. पण हे प्रभो, तुझे हे निःस्तब्ध, प्रखर ऊन सर्वव्यापी, निःशब्द दाह, आणि निस्सह —असह्य नैराश्याचा ताप परत घे—मागे घे. आवरून घे. आणि हे कृपानाथ, पिता ज्या दिवशीं रागावतो त्या दिवशीं माता ज्याप्रमाणे आपल्या संतानाकडे सजल नयनांनीं पाहते त्याप्रमाणें एकदां ओल्या डोळ्यानें माझ्याकडे पाहा. तरच मी वांचेन.

[ हें गीत इंग्रजी गीतांजलींत ४० वें आहे. ]

८७

# केव्हां ? हे नाथ, केव्हां ?

आपल्या देशांतील उन्हाळ्यामागोमाग येणारा पावसाळा मोठा क्रान्तिकारी असतो. सगळी जमीन तापून दुभंग झाली आहे. आकाशाला कोरड पडली आहे. पानें गळून पडलेलीं जंगलांतील झाडें आपले हात रागावलेल्या आकाशाकडे उंच करीत आहेत. पशुपक्षी त्रस्त होऊन 'कोठे छाया मिळेल काय' म्हणून शोधत आहेत. अशा वेळीं एकाएकीं मंद पवन कोठून तरी धावत येऊन झाडांच्या शाखांप्रशाखांमधून मर्मरध्वनि करून सर्वांच्या चित्तांत आशा उत्पन्न करतो. मागोमाग "भिऊं नका. दुःख दूर झालेंच समजा" असें आश्वासन देणारी मेघगर्जना आकाशांत होते. बघतां बघतां आकाश मेघांनीं भरून जाते. जिकडे तिकडे पावसाची झड उठते. जिकडे कोरड होती तिथें पाण्याचीं डबकीं दिसूं लागतात. चारी बाजूंनीं गवताचे हिरवे अंकुर फुटूं लागतात. वाळून उज्जड झालेल्या फुलबाड्या[१] तरारतात. आणि तेथें पूजेचीं फुलें हंसूं लागतात.

कवींना ही ऋतुक्रान्ति मोहक आणि प्रेरक वाटणारच. ईश्वरप्राप्तीसाठीं तळमळणाऱ्या जिवाला घेरणारी निराशा एका क्षणांत दूर करणारें कृपावचन कानीं पडतांच त्याचें हृदय जेव्हां हर्षोत्फुल्ल होतें तेव्हां त्याला प्रखर ग्रीष्मामागून येणाऱ्या वर्षाकालाचें चित्र आठवणारच.

---

१. बंगालींत फुलवाडीला मालंच म्हणतात.

आमार ए मानसेर कानन कांगाल
शीर्ण शुष्क बाहु मेली बहु दीर्घकाल
आछे क्रुद्ध ऊर्ध्व–पाने चाहि। ओहे नाथ,
ए रुद्र मध्यान्ह–माझे कबे अकस्मात्
पथिक पवन कोन् दूर हते एसे
व्यग्र शाखाप्रशाखाय चक्षेर निमेषे
काने काने रटाइबे आनन्दमर्मर,
प्रतीक्षाय पुलकिया वन वनान्तर।

गंभीर 'माभैः' मन्द्र कोथा हते ब'हे
तोमार प्रसादपुंज घन समारोहे
फेलिबे आच्छन्न करि निबिड़च्छायाय।
तार परे विपुल वर्षण, तार परे
पर दिन प्रभातेर सौम्यरविकरे
रिक्त मालंचेर माझे पूजापुष्पराशि
नाहि जानि कोथा हते उठिबे विकाशि।

८८

# मला एवढेंच समजतें

मी कबूल करतों कीं, तुमचे दार्शनिक प्रश्न मला सुटले नाहींत. जें एक होतें तें अनेक कसे झाले, तें मला ठाऊक नाहीं. कांहींहि कसे बनले, काय कसे झाले, कांहींहि कोणचें रूप धारण करते; देह कशाला म्हणतात; आत्मा आणि मन कशाला म्हणतात, हेंहि मला ठाऊक नाहीं. मी आपला या विश्वजगताला निःस्तब्ध निर्वाक् चित्तानें चिरकाल पाहतच राहीन.

मला समजत नाहीं कीं, ज्या जगाच्या बाहेर मला कोणच्याहि प्रकारें जातां येत नाहीं, त्याचा आदि, त्याचा अंत आणि त्याचें तत्त्व, एक क्षणभरदेखील मला कसें समजूं शकेल. आणि त्याचेवांचून माझें बिघडतें तरी कोठें. मनांत मला एवढेंच समजतें कीं, हें जें सुंदर आहे, महान आहे, महाभयंकर, विचित्र आणि अज्ञेय आहे तें सर्व माझा मनोहर जीवन-स्वामीच आहे.

मला एवढें ठाऊक आहे कीं, या विश्वाचा चित्तस्रोत, कांहींहि समजल्यावांचून, अज्ञातांतून तुझ्याकडेच धावत आहे. अज्ञातपणे त्यांची सगळी धडपड तुझ्या साक्षात्कारासाठींच आहे.

ए कथा मानिब आमि, एक हते दुइ
केमने जे हते पारे जानि ना किछुइ ।

केमने जे किछु हय, केह हय केह,
किछु थाके कोनोरूपे, कारे बले देह,
कारे बले आत्मा मन, बुझिते ना पेरे
चिरकाल निरखिब विश्वजगतेरे
निःस्तब्ध निर्वाक् चित्ते।

बाहिरे जाहार
किछुते नारिब जेते, आदि अन्त तार,
अर्थ तार, तत्त्व तार बुझिब केमने
निमेषेर तरे। एइ शुधु जानि मने
सुन्दर से, महान् से, महाभयंकर,
बिचित्र से, अज्ञेय से, मम मनोहर।
इहा जानि, किछुइ ना जानिया अज्ञाते
निखिलेर चित्तस्रोत धाइछे तोमाते।

८९-९०

# जीवन मरण सारखेंच मंगल

हें एक खरोखर आश्चर्यच आहे. ज्याप्रमाणें माती, पाणी, क्षार हवा इ. जडवस्तूंमध्ये कुठूनतरी जीवाचा संचार होतो आणि वनस्पति, सृष्टि आपोआप वाढूं लागते किंवा या वनस्पतिसृष्टीवर आपला चरितार्थ चालविणारी–चलनवलन करणारी, सैरावैरा धांवून सर्व प्रदेशाला अस्वस्थ करणारी प्राणीसृष्टि निर्माण होते, त्याचप्रमाणें सर्व प्राण्यांमध्यें दुर्बळ, असहाय्य अशा मनुष्यप्राण्याच्या गर्भामध्यें अकल्पित रीतीनें जीवाचा आणि प्राणाचाच नव्हे तर मनाचाहि संचार होतो; त्याला बरेंवाईट करूं लागतें; त्याच्या डोक्यांत योजना उत्पन्न होऊं लागतात आणि जडसृष्टीचे नियम ओळखून वनस्पतिसृष्टीचे प्राणतत्त्व ओळखून आणि प्राणीसृष्टीचे स्वभाव ओळखून तो या सर्वांवर प्रभुत्व मिळवितो.

जडामध्यें चैतन्याचा प्रादुर्भाव असा अकल्पित रीतीनें आश्चर्यकारक क्रमानें होतो. त्याचप्रमाणें या अपरिचित जगांत आल्याबरोबर एकाएकीं त्याला सर्व कांहीं परिचितसें वाटूं लागते. प्राणी जन्माला येतो तो मातेच्या उदरांतून बाहेर निघतो तेव्हां देखील मातेच्या शरीराशीं त्याची ग्रंथी तुटलेली नसते. (ती मुद्दाम तोडावी लागते) या ग्रंथीमध्यें अशी कोणाची गूढ प्रेमशक्ति आहे कीं, मुलाला जन्मतांच आई आपली आहे असें वाटूं लागतें, आणि आईच्या प्रेमाला आपल्या स्मित हास्यानें तें परिचयाचें उत्तर देतें. शरीरामध्यें प्राण शिरतो असें म्हणण्यापेक्षां प्राणच आपल्या संकल्पाप्रमाणें शरीर धारण करतो असें

म्हटलें पाहिजे आणि म्हणूनच या जगांत प्रवेश करतांच या सनातन प्राणाला सर्व कांहीं परिचितसें वाटूं लागतें. ज्याप्रमाणें खिडकींतून आपण सारें जग पाहतों त्याप्रमाणें या नवजात अर्भकाला मातेच्याद्वारा जगाकडे पाहण्याची सोय मिळालेली असते एवढेंच.

आतां जर अज्ञानांतून अकल्पितपणें मी या जगांत आलों आणि ताबडतोब येथचा झालों आणि येथील जीवनावर दृढतर प्रेम करूं शकलों आणि जगानेंहि प्रेम देऊन माझा स्वीकार केला तर मरणाच्याद्वारें जेव्हां मी दुसऱ्या लोकामध्यें प्रवेश करीन तेव्हां खात्रीनें तोहि लोक मला अगदीं परिचित असाच वाटेल. मरणोत्तर जीवन मला अपरिचित आणि भयानक असें कां वाटावें? मरतांना माझें सर्वस्व गेलें, मी लुटला गेलों; सर्वनाश होत आहे असें आपल्याला वाटतें. पण ती बालिशता आहे. मुलाला देखील स्तनपान करीत असतांना आणि दुग्धामृताचा आनंद घेत असतांना आई जेव्हां सोडवते तेव्हां त्याला कितीतरी दुःख होतें. रागहि येत असेल. तें मोठ्यानें किंकाळण्याची तयारी करतें. तोंडावाटे हुंदका निघतो. इतक्यांत एक स्तन रिकामा झाला म्हणून आपल्या बालकाला तेथून सोडविणारी आई प्रेमभरानें परिपूर्ण भरलेल्या दुसऱ्या स्तनाला नेऊन लावते. मग तेथील तो तुडुंब भरलेला दुग्धानंद अनुभवीत असतां बालक ही गोष्ट विसरून जातो कीं, यापूर्वी पहिलें स्तन आपण पीत होतों. आणि तेथून आपल्याला तोडण्यांत आलें होतें. मरतांना आपल्याला जें दुःख होतें ते या बालकासारखेंच असलें पाहिजे.

नकळत या दुनियेंत मी आलों. ही दुनिया मला परिचित आणि प्रेमळ दिसली, मी तिचेवर प्रेम करूं शकलों. हा जीवनव्यापी अखंड आनंद झाल्यानंतर त्याच न्यायानें मरण आणि मरणोत्तर स्थिति ही मला तितकीच स्वकीय, इष्ट आणि प्रिय अशी कां भासूं नये? माझा तर विश्वास आहे, दृढश्रद्धा आहे कीं, मरणहि मला तितकेंच प्रिय, इष्टतम आणि मंगलमय आहे, असा अनुभव होणार आहे. मग मरतांना मीं काय म्हणून भ्यावें, रडावें आणि हातून निसटणाऱ्या जीवनाला पकडून ठेवण्याचा अट्टाहास करावा. येथेंहि जगन्माताच आहे आणि तेथेंहि जगन्माताच असणार. जीवन आणि मृत्यु दोन्हा तिच्याच छाया आहेत. तिच्या मांडीवर मी नेहमी सुरक्षित आहें. प्रेमासक्त आहें आणि म्हणूनच कृतार्थ आहें.

[आपण जर मरण येणें असा शब्दप्रयोग करतों तर या जगांत येण्याला 'जन्म घेणें' असें काय म्हणून म्हणावें? 'जन्म येणें' असेंच कां म्हणूं नये. दोन्ही गोष्टी आपल्याला विचारून आपल्या संमतीनें होत नसतात, एकाविषयीं आपण संकल्प केला होता आणि दुसऱ्याविषयीं

नाहीं असेंहि म्हणतां येत नाहीं. आपलें आदिहि अव्यक्त आहे आणि निधनहि अव्यक्त आहे. दोन्ही बाबतींत आपली वृत्ति आणि आपली भाषा एकच प्रकारची राहिली पाहिजे.]

जीवनेर सिंहद्वारे पशिनु जे क्षणे
ए आश्चर्य संसारेर महानिकेतने
से क्षण अज्ञात मोर। कोन् शक्ति मोरे
फुटाइल ए विपुल रहस्येर क्रोड़े
अर्धरात्रे महारण्ये मुकुलेर मतो।

तबु तो प्रभाते शिर करिया उन्नत
जखनि नयन मेलि निरखिनु धरा
कनककिरण-गाँथा नीलाम्बर-परा
निरखिनु सुखे-दुःखे-खचित संसार,
तखनि अज्ञात एइ रहस्य अपार
निमेषेइ मने हल मातृवक्षसम
नितान्तइ परिचित, एकान्तइ मम।

रूपहीन ज्ञानातीत भीषण शकति
धरेछे आमार काछे जननीमुरति।

या आश्चर्यमय जगाच्या महाप्रासादामध्यें–जीवनाच्या सिंहद्वारीं–ज्या क्षणीं मीं प्रवेश केला तो क्षण माझ्या वांट्याला अज्ञातच आहे. एखाद्या महालामध्यें मध्यरात्रीं एखादी कळी फुटावी त्याप्रमाणें कोणची शक्ति या विपुल रहस्याच्य उदरीं माझ्या रूपानें प्रस्फुटित झाली असेल?

जेव्हां पहांट झाली आणि डोकें वर करून डोळे उघडून जेव्हां मीं हें नीलांबर परिधान केलेली कनक किरणांनीं वेष्टित श्यामल धरा पाहिली तेव्हां तेंच अज्ञात अपार रहस्य एका क्षणांत माझ्या मातेच्या हृदयाचें रूप धारण करून माझ्या वांट्याला चिरपरिचित झालें—नितान्त परिचित झालें—एवढेंच नव्हे, तर हें माझेंच आहे, इतर कोणाचेंहि नव्हे इतकी आत्मीयता माझ्या मनांत उत्पन्न झाली.

एका अज्ञात, रूपहीन आणि म्हणूनच भयंकर अशा शक्तीनें माझेसमोर प्रेमळ चिरपरिचित वात्सल्यमयी जननीची मूर्ति धारण केली. हें केवढं आश्चर्य आहे! किती अद्भुत घटना आहे ही!! एवढें हें चकित करून सोडणारें रहस्य मला अगदीं सहजपणें पचलें तरी कसें? कांहीं कळत नाहीं.

ही झाली जीवनाची स्थिति. तेव्हांपासून आजपर्यंत या जगाशीं माझा परिचय वाढतच आहे. जें घ्यावें, ध्यावें, पाहावें, धरावें, जिथें म्हणून जावें आणि राहावें तेथें सर्वत्र सर्व प्रकारें माझा स्वीकारच होत आला आहे. ज्यांना परकी मानावें तें खरोखरच स्वकीय असल्याचा अनुभव येतो. जे दूर आहेत ते जवळच होते असें अनुभवास येतें. ही देखील आश्चर्यपरंपराच होय.

मृत्युओ अज्ञात मोर। आजि तार तरे
क्षणे क्षणे शिहरिया काँपितेछि डरे।
संसारे विदाय दिते, आँखि छलछलि
जीवन आँकड़ि धरि अपनार बलि'
दुइ भुजे।

ओरे मूढ़, जीवन संसार
के करिया रेखेछिल एत आपनार
जनम-मुहूर्त हते तोमार अज्ञाते,
तोमार इच्छार पूर्वे। मृत्युर प्रभाते
सेइ अचेनार मुख हेरिबि आबार
मुहुर्ते चेनार मतो। जीवन आमार
एत भालोबासि बले हयेछे प्रत्यय—
मृत्युरे एमनि भालो बासिब निश्चय।

स्तन हते तुले निले काँदे शिशु डरे
मुहूर्ते आश्वास पाय गिये स्तनान्तरे।

जीवनाचा असा अनुभव आल्यानंतर मरणाचा जेव्हां विचार करतों तेव्हां काय दिसून येतें ?

मृत्युहि माझ्या वांट्याला जीवनारंभाइतका अज्ञात आहे. आज त्याची कल्पना करूनच वारंवार अंगावर शहारे येतात. भयानें थरकांप होतो. प्रत्येक क्षणाला हा संसार कसा सोडावा, याला विदाय कशी द्यावी अशा भयानें अंगावर शहारे उठून अगदी थरकांप होतो आणि डोळे डबडबून हें जीवनच माझें आहे असें म्हणून दोन्ही हातांनीं आपण त्याला कवटाळून घेऊं पाहतों. तें सोडण्याची हिंमतच होत नाहीं, त्याला सोडलें कीं आपला सत्यानाश होईल असें वाटून जिवाची कालवाकालव होते.

अरे वेड्या, जीवनाचा हा संसार तुला नकळत तुझेमध्यें इच्छेचा उदय झाला त्याचेहि पूर्वी तुझ्या जन्ममुहूर्तापासूनच ज्यानें इतका तुझा करून ठेविला होता त्याचें स्मरण कर. येथून जातांच–मृत्यूचा प्रभात होतांच–एका क्षणांत त्याच अपरिचिताचें मुख तूं अगदी परिचित म्हणून पाहूं लागशील. ज्या अज्ञात अपरिचित शक्तीनें तुला या जगांत आणलें तीच अपरिचित शक्ति मृत्यूच्या पैलतीरीं तुला दर्शन देईल आणि तेथेंहि तुला ती मातेप्रमाणें चिरपरिचित सनातन स्वकीय अशी वाटेल.

हें माझें जीवन मला इतकें आवडतें, स्वतःचें वाटतें या अनुभवामुळेंच माझ्या मनाचा निश्चय होतो की, मृत्यूला देखील त्याचें दर्शन होतांच मी आपला म्हणेन आणि त्याचेवरहि प्रेम करेन. कारण मीं पाहिलें आहे कीं, आईनें एका स्तनापासून सोडवतांच जें बालक एकदम रडावयाला लागतें त्याला दुसऱ्या स्तनाकडे पोचतांच एका क्षणांत आश्वासन मिळतें आणि तें शांत होतें. माझेंहि तसेंच होणार आहे. जीवनच काय तें सुखमय आणि मरण मात्र दुःखमय, असें या मंगल विश्वांत कसें होणें शक्य आहे ? एकच प्रेम, एकच स्नेह, एकच मांगल्य आणि एकच आत्मीयता सर्वत्र भरलेली आहे. येथें आंत आणि बाहेर असें कांहींच नाहीं. सर्वच आंत आहे. सर्वच अखंड एकाकार आहे.

अत्र भवति विश्वं एक-नीडम् ।

[ गीत ८९ व ९० हीं दोन गीतें मिळून इंग्रजी गीतांजलीचें ९५ वें गीत बनलें आहे. ]

# ९१

## वासना जळो आणि सर्वलभ्य सुख मिळो

"आम्ही गगनविहारी नाहीं. आम्ही व्यवहार जाणतों. आमची दृष्टि लाभहानीकडे असते. आम्हांला केवळ तात्त्विक विजय नको आहेत. प्रत्यक्ष लाभ पदरांत काय पडतो हें बघूनच आम्ही जयपराजयाची कसोटी करीत असतों" असें व्यवहारचतुर लोक म्हणत असतात. या व्यवहारानें आजवर काय मिळविलें आहे याचा जर आढावा घेतला तर प्रत्येक सौदांत नफा मिळवून देखील सरतेशेवटीं याच्या पदरांत कांहींच पडलें नाहीं असें दिसून येईल. श्रम खूब करावे, आदर्श बाजूला ठेवावा, पैपैचा नफा मिळवावा आणि शेवटीं भांडवलच गमावून बसावें हीच या व्यवहाराची दक्षता असते. कांहीं फुटकळ मालाचे व्यापारी प्रत्येक व्यवहारांत नफा मिळवून देखील शेवटपर्यंत फुटकळ व्यापारीच राहतात. घाऊक व्यापार त्यांच्या हातीं येतच नाहीं. यासारखीच या व्यवहारिक दृष्टीची कथा आहे.

ईश्वरप्राप्तीसारखा 'भ्रामक' आदर्श आपल्या समोर न ठेवतां वासनातृप्तीसारखा 'भरीव' आदर्श बाळगणारे लोकच जगांत पुष्कळ आहेत. हे लोक जन्मभर धडपड करून देखील खरे सुख मिळवूंच शकत नाहींत. यांच्या वांट्याला परिग्रहाचें ओझें आणि नित्य वाढणाऱ्या वासनांची भगभग एवढेंच येत असतें. डोळसपणाचा कितीहि आव आणला तरीहि ही वासना सरते शेवटीं आंधळीच ठरते. आणि तिला गणित कितीहि उत्तम येत

असलें तरीहि मूल्यवान वस्तु घालवून क्षुद्र वस्तुच ती गोळा करीत असते. 'अल्पस्य हेतोः बहु हातुं अिच्छन्।' हें वर्णन या व्यवहारी दृष्टीलाच बरोबर लागू पडते. म्हणून कवि भगवंताला प्रार्थना करतो कीं, माझ्या वासनांचें 'शहाणपण' मला समजून आलें आहे. या वासनेला आतां क्षीण कर. या विश्वाकडूनच थोडीशी शक्ति मिळवून तिच्या जोरावर ही वासना निखिल विश्वाशी युद्ध मांडते आणि निखिलावर विजय मिळविण्याचा आव आणून शेवटीं एखादा तिळच पदरांत पाडून घेते. म्हणून हे भगवंता, या वासनेचें क्षुद्र राज्य जमीनदोस्त करून टाक आणि मला संतोषाचा अधिकारी कर.

ज्यांत माझें खरें हित आहे, खरें सुख आहे अशा वस्तु न मागतांच तूं मला मुबलक दिल्या आहेस. पहांटेच्या वर्धमान प्रकाशापासून रात्रीच्या ताराविलासी विशाल अंधःकारापर्यंत जळीं स्थळीं मला अनंत वैभव दिलें आहेस. जें सुख सर्वसुलभ आहे, सर्वसाधारण आहे तेंच खरोखर मूल्यवान आहे, तेंच देवदुर्लभ आहे. सर्वांत श्रेष्ठ तेंच आहे. राजा जर माझ्यावर संतुष्ट झाला तर मला रोज दुधांत आंघोळ घालील. पण माझ्याबरोबरच्या सर्व भावंडांना एकेक घोट दूध दे म्हटलें तर तेवढें त्याच्यानें होणें शक्य नाहीं. म्हणून म्हणतों कीं, सर्वसुलभ सुख खरोखरच देवदुर्लभ आहे.

मनुष्य जेव्हां स्वतः सर्वसाधारण जनतेच्या प्रवाहांत मिसळून जाईल आणि सर्वांबरोबर वाहूं लागेल तेव्हांच तें महासहजसुख शतदल पद्माप्रमाणें पूर्ण विकसित होऊन त्याच्या हातीं येऊन पडेल, आणि मगच तो खराखुरा कृतार्थ होईल.

वासनारे खर्व करि दाओ हे प्राणेश,—
से शुधु संग्राम करे लये एक लेश
बृहतेर साथे। पण राखिया निखिल
जिनिया निते से चाहे शुधु एक तिल
वासनार क्षुद्र राज्य करि एकाकार
दाओ मोरे संतोषेर महा अधिकार।

अयाचित जे सम्पद अजस्र आकारे
उषार आलोक हते निशार आँधारे
जले स्थले रचियाछे अनन्त विभव—

सेइ सर्वलभ्य सुख अमूल्य दुर्लभ
सब चेये। से महा-सहज सुखखानि
पूर्णशतदलसम के दिबे गो आनि
जलस्थल-आकाशेर माझखान हते
भासाइया आपनारे सहजेर स्रोते।

हे प्राणेशा, माझ्या वासनेला क्षीण करून टाक. ही वासना विश्वशक्ति एक लेश घेऊन त्याच्या जोरावर या बृहत् विश्वाशीं संग्राम करू पाहत आहे. आणि प्रतिज्ञापूर्वक या विश्वाचा विजय करून ती फक्त एक तीळ जिंकून घेऊं पहात आहे. किती तुच्छ आहे तिची ही महत्त्वाकांक्षा! म्हणून हे प्रभो, वासनचें हें क्षुद्र राज्य धुळीस मिळवून टाक आणि मला संतोषाचा महा अधिकार दे.

न मागतांच जी अजस्र संपत्ति विपुलपणें तूं दिली आहेस. उषेच्या प्रकाशापासून निशेच्या अंधकारापर्यंत जळीं स्थळीं अनंत वैभव तूं रचलें आहेस. त्याचें सर्व-सुलभ सर्वसाधारण सुखच सगळ्यांत अधिक मूल्यवान आणि देवदुर्लभ आहे. जलस्थल आणि आकाशामध्यें स्वतःला विश्वाच्या सहज प्रवाहांत प्रवाहित करून तें महा-सहज सुख पूर्ण शतदलपद्माप्रमाणें मला कोण आणून देईल? मला तेंच सुख हवें आहे. त्यांतच मला खरी तृप्ति मिळणार आहे. वासनांची तृप्ति कधींच होत नाहीं आणि झाली तरी तिनें मिळविलेलें सर्व कांहीं अति तुच्छ असतें. याचा अनुभव आला आहे. आतां पुनः तिच्या भुलावणीला मी फसणार नाहीं.

# १२

## संस्कृति नाश

गांधीजी नेहमी म्हणत : “ पाश्चात्य सभ्यता—पश्चिमेकडील संस्कृति आणि आपली पूर्वेकडील संस्कृति असा भेद करूं नका. उलट, प्राचीन संतोषप्रधान, मानवतामूलक संस्कृति आणि आधुनिक द्रव्यपरायण, संघर्षमूलक आणि गरिबांचें शोषण करणारी निधर्मी संस्कृति—असा भेद केला पाहिजे. मध्यकालीन सामाजिक जीवनांत दोष कितीहि असोत, पश्चिमेकडेदेखील धर्मप्रधान आध्यात्मिक संस्कृतीच होती. त्या काळीं समाजांत द्रव्याची विपुलता नसे, लोक खेडेगांवांत शांतीनें राहत असत. देशांत थोडीबहुत समृद्धि असे. ऋषि लोक तपोवनांत राहून आत्मचिंतन करीत आणि समाजाला स्वास्थ्याचा आणि सौख्याचा रस्ता दाखवीत. आज तें सर्व नष्ट झालें आहे. जेथें परोपकारासाठीं कारुण्यपरायण चित्त रमावलें जात असे, तेथें आज लोक द्रव्यराशीच्या मागें लागले आहेत (जेथें साधेपणा आणि तृप्ति नांदत होतीं तेथें आतां भगभग आणि आडंबर माजले आहेत). जेथें संतोष आणि शान्तीचें वातावरण होतें तेथें आतां स्वार्थाचा संघर्ष आणि महायुद्धें सुरू झालीं आहेत. ” हीच गोष्ट कितीतरी पूर्वीं, त्याच शब्दांत रवीबाबूंनीं या गीतांत सांगितली आहे—

शक्तिदंभ स्वार्थलोभ मारीर मतन
देखिते देखिते आजि घिरिछे भुवन।
देश हते देशान्तरे स्पर्शविष तार
शान्तिमय पल्ली जत करे छारखार।
जे प्रशान्त सरलता ज्ञाने समुज्ज्वल,
स्नेहे जाहा रससिक्त, सन्तोषे शीतल,
छिल ताहा भारतेर तपोवनतले।
वस्तुभारहीन मन सर्व जले स्थले
परिव्याप्त करि दित उदार कल्याण,
जड़े जीवे सर्वभूते अवारित ध्यान
पशित आत्मीयरूपे।

आजि ताहा नाशि
चित्त जेथा छिल सेथा एल द्रव्यराशि,
तृप्ति जेथा छिल सेथा एल आडम्बर,
शान्ति जेथा छिल सेथा स्वार्थेर समर।

१३

# निष्पाप साधेपणांतील गौरव

तसें पाहिलें तर गरिबी मनुष्याला खालीं पाडत नाहीं. पण जेव्हां मनुष्याला आपल्या गरिबीची लाज वाटूं लागते तेव्हांच तो हीन बनतो. जो मनुष्य दारूला कधीं शिवतच नाहीं, त्याच्या घरीं दारूचें एकहि पीप नाहीं, कोणी मागायला आला तर कोठारांत दारूचा एक थेंबहि सांपडणार नाहीं याची त्याला लाज वाटावी काय? तो उलट म्हणेल माझ्या घरीं जर दारू सांपडली तर त्याची मला इतकी कांहीं लाज वाटेल कीं, त्यापेक्षां पाण्यांत बुडून मेलेलें पत्करलें. माझ्या घरीं दारू नाहीं याचा मी थोडाथोडका अभिमान बाळगत नाहीं. त्याचें कारण एवढेंच कीं, आसपास पट्टीचे दारूबाज राहत असूनहि मी माझें घर दारूपासून अलिप्त ठेवलें आहे.

याचप्रमाणें जो मनुष्य घरांत एकहि नोकर न ठेवतां सगळीं कामें स्वतःच करतो त्याला लाजण्याचें कांहींच कारण नाहीं. एक हुकूम सोडतांच दहा नोकर धांवताहेत असें वैभव (?) नसल्याचें त्यानें वाईट काय म्हणून वाटून घ्यावें? स्वतःचीं कामें स्वतःला करतां येतात तर नोकर काय म्हणून ठेवावे? स्वतःच्या पायानें चालतां येत असून काखेंत कुबड्या धरून चालणाऱ्या मनुष्याला तुम्ही वैभवशाली म्हणाल का? आणि त्याच्या कुबड्या चंदनाच्या आहेत, हस्तीदंताच्या आहेत, नागवेताच्या आहेत किंवा

अबनीच्या (अबनूसाच्या) आहेत याचें वर्णन ऐकून आपल्या घरीं कुबड्यांचे भारे पडलेले नाहींत याचें तुम्हांला वैषम्य वाटेल काय ?

कोरो ना कोरो ना लज्जा हे भारतवासी,
शक्तिमदमत्त ओइ वणिक विलासी
धनदृप्त पश्चिमेर कटाक्षसंमुखे
शुभ्र उत्तरीय परि शान्तसौम्यमुखे
सरल जीवनखानि करिते वहन ।

शुनो ना की बले तारा; तव श्रेष्ठ धन
थाकुक हृदये तव, थाक् ताहा घरे,
थाक् ताहा सुप्रसन्न ललाटेर' परे
अदृश्य मुकुट तव । देखिते जा बड़ो,
चक्षे जाहा स्तूपाकार हअियाछे जड़ो
तारि काछे अभिभूत हये बारे बारे
लुटायो ना आपनाय । स्वाधीन आत्मारे
दारिद्र्येर सिंहासने करो प्रतिष्ठित
रिक्ततार अवकाशे, पूर्ण करि चित ।

आज जगांत जी राज्यें वैभवाच्या शिखरावर पोचलीं आहेत, त्यांच्याशीं तुलना करून आपण मागासलेले आहोंत असें मानून आम्हीं वाईट वाटून काय म्हणून घ्यावें ? आम्हीं इतर देशांना लुटलें नाहीं. इतरांचे स्वातंत्र्य हिरावून घेतलें नाहीं. इतरांना गुलाम करून त्यांच्या बायकापोरांचा तळतळाट घेतला नाहीं. एवढ्यासाठीं आम्हीं काय म्हणून लाजावें आणि डोकें खालीं घालावें ? पाश्चात्य देश आपलें चारित्र्य गमावून वाणिज्य–विलासी झाले आहेत. जगाला लुटून धनोन्मत्त झाले आहेत. म्हणून त्यांचेपुढे आपण साधें धोतर नेसून आणि कुडता व उपरणें पांघरून सरळ जीवनाच्या आत्मविश्वासानें, गर्वहीन संस्कारी चेहऱ्यानें उभे राहायला काय म्हणून लाजावें ?

ते वाटेल तें म्हणोत, आढ्यतेनें कसलीहि शेखी मिरवोत, तिकडे कान देऊं नका. निष्पाप जीवनाचें श्रेष्ठ धन आपल्या हृदयांत असल्यानंतर आपल्याला अन्य गौरव कशाला हवा ? तें श्रेष्ठ धन तुझ्या घरीं सुरक्षित असो. आणि निष्पाप परोपकारी जीवनाच्या तुझ्या सुप्रसन्न ललाटावर नम्रतेचा अदृश्य मुगुट विराजमान होवो.

जे दिसायला मोठे आहेत, ज्यांनीं डोळ्यांना पर्वतासारखी दिसणारी संपत्ति गोळा केली आहे त्यांचेसमोर स्वतःला तुच्छ समजून मनानें पराभूत होऊन तूं त्यांचे पायीं लोळण घेऊं नकोस.

तुझ्या घरीं कांहींच नाहीं एवढंच ना ? त्या रिक्ततेच्या पोकळींतच स्वतःच्या मनाला परिपूर्ण कर. आणि तुझ्या या दारिद्राच्या विशाल स्थिर भूमीवर तुझ्या स्वाधीन आत्म्यांचें सिंहासन प्रतिष्ठित कर. म्हणजे परमात्मा स्वतःच अति आदरानें तेथें येऊन बसेल.

जें मोठें धूड झालें तें खरोखर योग्यतेनें थोर असतेंच असें नाहीं. आणि ऐश्वर्यांचा दर्प चिरकाल टिकतो असेंहि नाहीं. जे लोक आपल्या वैभवाची ऐट मिरवतात त्यांना 'हें वैभव कसें मिळवलें' हें सांगण्याची पाळी आली तर मान खालींच घालावी लागते. याच्या उलट जे लोक निष्पाप परोपकारी जीवनानेंच कृतार्थ झालेले असतात, ते गर्वानें छाती काढून चालत नसले तरी, त्यांचें तोंड कधीं लज्जेनें उतरतहि नसतें.

१४

# भारतीय संस्कृतीची मानवता

आजकाल जगांतील सगळेच देश 'आम्ही श्रेष्ठ आम्ही श्रेष्ठ' असें म्हणून स्वतःचे नगारे वाजवीत आहेत. आमची संस्कृति श्रेष्ठ, आमचा धर्म श्रेष्ठ, आमचें साहित्य श्रेष्ठ, आमची राज्यपद्धति श्रेष्ठ, आमचें रक्त श्रेष्ठ, आमचा इतिहास उज्ज्वल इत्यादि अनेक प्रकारें स्वतःच्या संस्कृतीचें श्रेष्ठत्व जाहीर करीत असतात. आणि त्याच्यासाठीं खरेखोटे पुरावे गोळा करतात. प्रत्येक राष्ट्राचा इतिहास निराळा. यामुळें त्यांना स्वतःची लाज झांकण्यासाठीं आणि स्वतःची खुबी पुढें आणण्यासाठीं संस्कृतीची नवी नवी व्याख्याहि करावी लागते. थोरपणा कशांत आहे याचे सिद्धांतहि स्वतःला अनुकूल असे करून घ्यावे लागतात.

अशा प्रकारचा पोकळ अभिमान सोडून आजच्या अभिमानी संस्कृतीहून भारतीय संस्कृति कशी भिन्न होती आणि तिचें वैशिष्ट्य काय होतें हें या गीतांत रवीबाबूंनीं थोडक्यांत मांडलें आहे. प्रत्येक राष्ट्राची थोरवी जर त्याच्या मानवतेवरून ठरवावयाची असली तर भारतानें कोणत्या प्रकारची मानवता आजवर विकसित केली होती तेंहि या गीतांत त्यांनीं दाखवून दिलें आहे. अशा प्रकारच्या मानवतेची जर लाज वाटून घेणें योग्य असेल तर भारतानें लाज वाटून घ्यावी, आणि जर यांत आत्मविश्वासाला पुरेसें पोषण असेल तर त्यानें स्वतःचा आत्मविश्वास वाढीस लावावा. सर्व जगामध्यें निंदा, अपमान

आणि हेटाळणी ज्यावेळीं सहन करावी लागते अशा वेळीं भारताला आपल्या वैशिष्ट्याचें असें स्मरण करून देणें ही कांहीं लहानसहान सेवा किंवा कामगिरी नव्हती.

हे भारत, नृपतिरे शिखायेछ तुमि
त्यजिते मुकुटदण्ड सिंहासनभूमि,
धरिते दरिद्रवेश; शिखायेछ वीरे
धर्मयुद्धे पदे पदे क्षमिते अरिरे,
भुलि जयपराजय शर संहरिते।
कर्मीरे शिखाले तुमि योगयुक्त चिते
सर्वफलस्पृहा ब्रह्मे दिते अुपहार।
गृहीरे शिखाले गृह करिते विस्तार
प्रतिवेशी आत्मबन्धु अतिथि अनाथे।

भोगेरे बेंधेछ तुमि संयमेर साथे,
निर्मल वैराग्ये दैन्य करेछ अुज्ज्वल,
संपदेरे पुण्य कर्मे करेछ मंगल,
शिखायेछ स्वार्थ त्यजि सर्व दुःखे सुखे
संसार राखिते नित्य ब्रह्मेर संमुखे।

हे भारता, प्राचीनकाळीं तूं आपल्या नृपतींना स्वतःचा मुगुट आणि राजदंड, सिंहासन आणि राज्य यांचा त्याग करून दरिद्रवेश धारण करायला शिकविलें आहेस. आपल्या वीरांनीं धर्मयुद्ध लढत असतांना पावलोपावलीं शत्रूवर क्षमा करायला आणि जयपराजय विसरून धनुष्याला लावलेला बाण परत खेचून घ्यायला शिकविलें आहेस. तसेंच हे भारता, तूं प्रत्येक कर्मवीराला योगयुक्त चित्तानें सर्व फलांची स्पृहा ब्रह्मार्पण करायला शिकविलें आहेस. आणि गृहस्थाश्रमी मनुष्याला आपल्या गृहाचा विस्तार करून आपल्या शेजाऱ्याला आपला भाऊ समजण्यास आणि अनाथाला अतिथि समजण्यास शिकविलें आहेस.

संस्कृति म्हणजे भोगाला संयमाच्या रज्जूनें बांधून घालणें असेंहि तूं शिकविलें आहेस. दैन्याला देखील तूं निर्मल वैराग्य भावनेनें उज्वल केलें आहेस. अभद्र संपत्ति देखील पुण्यकर्मांकडे लावायला लावून तिला तूं मंगल बनविलें आहेस. आणि स्वार्थाचा त्याग करून सुख येवो वा दुःख येवो, ईश्वराला भिऊन कसें राहावें हें तूं या जगाला शिकविलें आहेस.

अशा या परममंगल सर्व कल्याणकारी संस्कृतीबद्दल आज तुला लाज वाटणार काय? मानवता याहून अन्यत्र कोठेंहि अधिक उच्च कोटीला पोचली आहे काय? मग तुला स्वतःसंबंधानें वैषम्य वाटण्याचें कारण काय?

१५

# आज असा कोण आहे ?

सर्वांत मोठें संकट कोणचें ? मोठी हानि कोणची ? या प्रश्नाला निरनिराळे लोक निरनिराळीं उत्तरें देतील. पण एका उत्तराला गौण किंवा दुसरें स्थान कोणीच देणार नाहीं. आत्मविश्वास गमावून बसणें; स्वतःच्या आंतरिक, सांस्कृतिक वैभवाविषयीं अश्रद्धाळू होणें आणि परक्यांच्या अवडंबरानें दिपून जाऊन स्वतःचें सगळें हीन, तुच्छ आणि निःसार आहे असें वाटून घेणें—यासारखी विपत्ति दुसरी नाहीं.

आपल्या आंतरिक संपत्तीची बाजारांतील किंमत कमी असली किंवा झाली म्हणून काय झालें ? चारित्र्याच्या दृष्टीनें, सांस्कृतिक सभ्यतेच्या दृष्टीनें आपलें जीवनदर्शन जर उच्च, उन्नत व सुवासिक असलें तर आपल्याला लाजेनें मान खालीं घालण्याचें कारण नाहीं.

ही गोष्टदेखील आपल्या राष्ट्राला समजावून सांगण्याची पाळी आली होती याचें आज आश्चर्यच वाटेल. पण त्या काळीं रवीबाबूसारख्या थोर पुरुषांनीं राष्ट्राचा, स्वतःविषयींचा अविश्वास दूर केला ही खरोखरच मोठी कामगिरी केली. या बाबतींत स्वामी विवेकानंद कविवर रवींद्रनाथ आणि गांधीजी–या तिघांची सेवा निःसंशय अलौलिक होती.

हे भारत, तव शिक्षा दियेछे जे धन  
बाहिरे ताहार अति अल्प आयोजन,  
देखिते दीनेर मतो, अन्तरे विस्तार  
ताहार ऐश्वर्य जत ।

आजि सभ्यतार
अन्तहीन आडम्बरे, उच्च आस्फालने,
दरिद्र-रुधिर-पुष्ट विलासलालने,
अगण्य चक्रेर गर्जे मुखरघर्घर,
लौहबाहु दानवेर भीषण बर्बर
रुद्ररक्त–अग्निदीप्त परम स्पर्धाय,
निःसंकोचे शान्तचित्ते के धरिबे, हाय,
नीरवगौरव सेअि सौम्य दीनवेश
सुविरल, नाहि जाहे चिन्ता चेष्टालेश।
के राखिबे भरि निज अन्तर-आगार
आत्मार संपदराशि मंगल उदार।

हे भारता ! तुझ्या थोर पूर्वजांच्या शिक्षणानें तुला जें संस्कारधन मिळवून दिलें आहे त्याचा बाह्य उपयोग अति अल्प आहे ! पुढें येण्याच्या चढाओढींत तें धन इतकें कांहीं कुचकामाचें आहे कीं, बाहेरून पाहतां तूं दीनासारखा दिसतोस. त्या शिक्षणाचें जें कांहीं एश्वर्य आहे त्याचा विस्तार आंतरिक आहे.

आज सर्वत्र मिरवणाऱ्या संस्कृतीच्या अंतहीन आडंबरांत, उंच उंच उड्या मारण्यांत, गरिबांच्या रक्तावर स्वतःला परिपुष्ट करणाऱ्या भोगविलासांत म्हणजे अशा वातावरणांत,

आपल्या यंत्राच्या चक्रांच्या द्वारा घरघर आवाज करणाऱ्या लोखंडी हाताच्या भयंकर राक्षसाच्या बर्बर आणि उष्ण रक्तानें अग्नीप्रमाणें परितप्त होऊन चाललेली विशाळ स्पर्धा पाहून देखील ज्याच्या चित्तात लेशमात्र चिंता उत्पन्न होत नाहीं असे कितीसे लोक असतील ? कसलाच संकोच न बाळगतां, शान्तचित्तानें साध्या वेशांत राहून स्वतःचा गौरव संभाळेल असा कोण आहे ? आत्म्याच्या मंगल, उदार अशा दैवी संपत्तीचा ढीग आपल्या हृदयागारांत भरून कोण ठेवील ?

१६

# दैन्य आणि लाज

आजच्या लज्जास्पद स्थितीचें वर्णन करतांना कवि म्हणतात,

"आपली आंतरिक संपदा आपण घालवून बसलों आहोंत; म्हणूनच आपण लज्जावनत झालों आहोंत. आणि त्यामुळेंच क्षुधार्त, दुर्भर दैन्य सगळ्या शरीराला डसूं लागलें आहे. या दैन्याची भूक तृप्त करणें सोपें नाहीं. आणि म्हणूनच ब्राह्मणाचा साधा स्वच्छ वेश आज या देशांत सन्मान पावूं शकत नाहीं. आज ध्यानबल उरलें नाहीं. त्याच्या ऐवजीं फक्त जपजाप्य उरलें आहे. जेथें शुचित्व म्हणजे पवित्रता असावयास हवी होती, तिच्या ठिकाणीं विचारशून्य, अर्थशून्य अंगवळणीं पडलेला आचारच उरला आहे. संतोषाच्या पोटांत जी तेजस्विता असली पाहिजे ती उरली नाहीं. केवळ पुरुषार्थहीन जडताच सांचली आहे. धर्म प्राणहीन होऊन, एखाद्या विषम दुःस्वप्नाप्रमाणें छातीला दाबून टाकत आहे. आणि म्हणूनच पश्चिमेनें टाकून दिलेलीं वस्त्रें लुटून आणून त्यांच्यामागेंच आपलें प्राचीन दैन्य लपवण्यासाठीं आज आपण टोळ्या टोळ्या करून धावूं लागलों आहोंत. परंतु, हे भाई! हा सर्व प्रयत्न व्यर्थ आहे. कारण ज्या लज्जेमध्यें-वेशभूषा आणि साजसजावट—यांच्यामध्यें आपलें चित्त नाहीं, आपुलकी नाहीं, ती लज्जा लज्जापूर्णच असते. जो साज आपला नव्हे, त्याची लाज मापतां कशी येणार?

अन्तरेर से सम्पद फेलेछि हाराये।
ताअि मोरा लज्जानत; ताअि सर्व गाये
क्षुधार्त दुर्भर दैन्य करिछे दंशन;
ताअि आजि ब्राह्मणेर विरल वसन
संमान बहे ना आर; नाहि ध्यानबल,
शुधु जपमात्र आछे; शुचित्व केवल
चित्तहीन अर्थहीन अभ्यस्त आचार;
संतोषेर अन्तरेते वीर्य नाहि आर,
केवल जडत्वपुंज; धर्म प्राणहीन
भार–सम चेपे आछे आड़ष्ट कठिन।

ताअि आजि दले दले चाअि छुटिबारे
पश्चिमेर परित्यक्त वस्त्र लुटिबारे
लुकाते प्राचीन दैन्य। वृथा चेष्टा भाअि,
सब सज्जा लज्जा–भरा चित्त जेथा नाअि।

१७

## हाच उपाय बरा

आपल्या डोक्यावर पाण्याचा घडा भरून नेत असतांना त्याचा भार कितीतरी असह्य होतो. पण जर तो घडा फोडून जलाच्या सागरांतच बुडी मारली तर सगळ्या सागराचेंदेखील ओझें वाटत नाहीं. स्वतःचें ओझें डोक्यावर घेऊन चालूं लागलों तर पावलोपावली आपल्याला थकवा वाटतो. पण जर, याच्याऐवजी देवाच्या घरच्या सगळ्याच स्वजनांना आपलेसें करून आपलें थकलेलें हृदय त्यांच्यांत वांटून दिलें तर कसलाच भार उरणार नाहीं. क्षुद्र अहंकारच सोडला पाहिजे.

शक्ति मोर अति अल्प हे दीनवत्सल,
आशा मोर अल्प नहे। तव जलस्थल–
तव जीवलोक–माझे जेथा आमि जाअि,
जेथाय दाँड़ाअि आमि, सर्वत्रअि चाअि
आमार आपन स्थान। दानपत्रे तव
तोमार निखिल खानि आमि लिखि लब।

आपनारे निशिदिन आपनि बहिया
प्रति क्षणे क्लान्त आमि। श्रान्त सेअि हिया
तोमार सबार माझे करिब स्थापन
तोमार सबारे करि आमार आपन।
निज क्षुद्र दुःख सुख जलघट सम
चापिछे दुर्भर भार मस्तकेते मम।
भांगि ताहा डुब दिब विश्वसिंधुनीरे,
सहजे विपुल जल बहि जाबे शिरे।

हे दीनवत्सला ! माझी शक्ति अति अल्प असली तरी माझी आशा कांहीं अल्प नाहीं. तुझ्या या जलस्थलामध्यें अर्थात् तुझ्या जीवलोकांमध्यें मी कोठेंहि गेलों तरी जेथें जाऊन उभा राहतों त्या सर्व ठिकाणीं माझें स्वतःचें स्थान असावें असें मला वाटतें.

तुझ्या दानपत्रामध्यें तुझें हें निखिल विश्वच मी लिहून घेऊं इच्छितों.

दिवसरात्र स्वतःचा भार स्वतःच वाहून प्रतिक्षणीं मी थकून जातों. यासाठीं तुझ्या सर्व लोकांमध्यें माझें श्रांत हृदय मी स्थापन करूं इच्छितों. तुझ्या सर्व लोकांना मी स्वजन करूं इच्छितों. स्वतःचें क्षुद्र दुःख सुखाचा असह्य भार पाण्याच्या घड्याप्रमाणें मी स्वतःच्या डोक्यावर लादला आहे. त्या घड्याला तोडून तुझ्या विश्व-सिंधू-नीरामध्यें मी बुडी मारीन. मग सागराचें सर्वच पाणी मी माझ्या डोक्यावर सहजच वहन करूं शकेन.

१८

# मिळमिळीत पूजा नको

पंढरपूरच्या एका संताला भूक आवरत नसे. सकाळीं उठून भजनचिंतनाला बसावें तर अर्धे ध्यान देवाकडे आणि अर्धे ध्यान भुकेमुळें खाण्याकडे. असें नेहमीं होत असलेलें पाहून त्यानें ठरविलें कीं, भुकेशीं भांडण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आणि भुकेनें व्याकुळ झाल्यामुळें देवाचें जें मिळमिळीत ध्यान होतें तेंहि कामाचें नव्हे. त्यानें आपला कार्यक्रम बदलला. 'आधीं पोटोबा, मग विठोबा.' असें ठरवून त्यानें सकाळीं खाऊन घ्यायचें आणि मग निश्चिंतपणें ध्यानभजनांत एकाग्र व्हायचें.

रवीबाबूहि म्हणतात कीं, रात्रीं थकून-भागून गेल्यावर झोपेशीं झगडत कशीबशी प्रार्थना करण्यापेक्षां, तुझ्यावर विश्वास ठेवून मी निश्चिंतपणें झोपून जाईन. थकवा दूर व्हावा आणि दुसरे दिवशीं ताजातवाना होतां यावें आणि पहाटेची प्रसन्नता मिळावी, म्हणूनच तर, भगवंता ! माझ्या थकलेल्या डोळ्यांवर रात्रीची झापड तूं घालतोस.

माझे माझे कभु जबे अवसाद आसि
अन्तरेर आलोक पलके फेले ग्रासि,
मन्दपदे जबे श्रान्ति आसे तिल तिल,

तोमार पूजार वृन्त करे से शिथिल
म्रियमाण—तखनो ना जेन करि भय,
तखनो अटल आशा जेन जेगे रय
तोमा—पाने।
तोमा—'परे करिया निर्भर
से श्रान्तिर रात्रे जेन सकल अन्तर
निर्भये अर्पण करि पथधूलितले
निद्रारे आह्वान करि, प्राणपण बले
क्लान्तचित्ते नाहि तुलि क्षीण कलरव
तोमार पूजार अति दरिद्र अुत्सव।
रात्रि अेने दाओ तुमि दिवसेर चोखे
आबार जागाते तारे नवीन आलोके।

मधून मधून जेव्हां थकवा येऊन अंतरींच्या प्रकाशाला एका क्षणांत ग्रासून टाकतो; जेव्हां जेव्हां थकवा मंद पावलानें तिळतिळ येऊन तुझ्या पूजेच्या सामग्रीला शिथिल आणि मेल्यासारखी करेल, तेव्हां मला कसलेंच भय वाटूं नये. तेव्हां देखील माझी अटल आशा तुझ्याकडे जाग्रत असावी.

तुझेवर निर्भर राहून त्या श्रान्तीच्या रात्रीं माझें हृदयसर्वस्व निर्भयपणें अर्पण करून, रस्त्याच्या धुळीवर झोपेचें मीं आव्हान करावें. थकलेल्या चित्तानें ओढूनताणून तुझ्या पूजेचा अति दरिद्र उत्सव मीं न करावा. आणि मीं क्षीण आवाज न उठवावा.

दिवसाच्या डोळ्यांवर तूं रात्र आणून दे कीं, जेणेंकरून दुसऱ्या दिवशीं, तुझ्या नवीन प्रकाशांत आम्ही पुन्हां जागावें.

११

# ही शक्ति हवी

बलप्राप्तीसाठींची ही एक प्रार्थना आहे. हीच प्रार्थना इंग्रजी गीतांजलीमध्यें क्रमांक ३७ मध्यें आली आहे. पण तेथें ती आटोपशीर शब्दांत जोमदार झाली आहे. म्हणून तिचेंहि भाषांतर यासोबत दिलें जात आहे.

प्रभो! माझी हीच प्रार्थना कीं, माझ्या हृदयांतील क्षीणता आणि दैन्य यांचें त्वां समूल छेदन करावें.

आयुष्यांत सुख आणि दुःख दोन्ही मला प्रसन्नपणें सहन करतां यावीं, अशी शक्ति दे.

माझें प्रेम, माझी भक्ति सेवेंत परिणत होईल अशी शक्ति मला दे.

माझे हातून गरिबांचा परित्याग न व्हावा आणि उन्मत्त बलिष्ठांच्या चरणीं मीं न नमावें अशी शक्ति मला दे.

रोजच्या तुच्छ वस्तूंच्या वर उठण्याचें मनोधैर्य मला दे.

आणि माझी सर्व शक्ति, भक्ति नम्रपणें तुझ्या हवालीं करण्याची शक्तिहि मला दे.

तव काछे अेअि मोर शेष निवेदन—
सकल क्षीणता मम करह छेदन
दृढबले, अन्तरेर अन्तर हअिते,

प्रभु मोर ! वीर्य देहो सुखेर सहिते
सुखेरे कठिन करि। वीर्य देहो दुखे,
जाहे दुःख आपनारे शान्तस्मितमुखे
पारे उपेक्षिते। भकतिरे वीर्य देहो,
कर्मे जाहे हय से सफल, प्रीति स्नेह
पुण्ये ओठे फुटि। वीर्य देहो क्षुद्रजने
ना करिते हीनज्ञान, बलेर चरणे
ना लुटिते। वीर्य देहो चित्तेरे एकाकी
प्रत्यहेर तुच्छतार ऊर्ध्वे दिते राखि।
वीर्य देहो तोमार चरणे पाति शिर
अहर्निशि आपनारे राखिबारे स्थिर।

तुझ्याकडे माझें शेवटचें निवेदन, अंतिम प्रार्थना हीच कीं, हे मत्प्रभो ! माझ्या हृदयाच्या अंतरभागांतून माझ्या सर्व क्षीणतेला छेदून टाक. सुखाबरोबर मला अशी शक्ति दे, वीर्य दे कीं, सुखाला मजबूत बनवावें. दुःखासहित मला असें वीर्य दे कीं, जेणेंकरून दुःख स्वतःची शांतस्मित मुखानें उपेक्षा करूं शकेल. माझ्या भक्तींतदेखील असें वीर्य दे कीं, जेणेंकरून प्रीति, स्नेह आणि पुण्यांत ती शक्ति प्रस्फुटित होऊन माझीं सर्व कर्में सफळ व्हावींत. मला असें वीर्य दे कीं, जेणेंकरून गरीब लोकांना मीं तुच्छ न समजावें आणि बलिष्ठांच्या चरणीं मीं लोटांगण न घालावें. मला असें वीर्य दे कीं, माझ्या चित्ताला रोजरोजच्या तुच्छतेच्या वर ठेवूं शकेन.

आणि मला असेंहि वीर्य दे, शक्ति दे कीं, तुझ्या चरणीं माझें मस्तक ठेवून मी दिवसरात्र स्वतःला मजबूत स्थिर ठेवूं शकेन.

१००

# एक द्वार, एक सुख, एक विश्वास

विसाव्या शतकाच्या प्रारंभीं वडिलांच्या प्रवचनांचें स्मरण करून रवीन्द्रांनीं हीं जीं शंभर गीतें नैवेद्य म्हणून त्यांनाच अर्पण केलीं आहेत त्यांतील शेवटच्या गीताला प्रास्ताविक असें कांहींहि लिहिण्याची जरूर नसावी.

अच्युतम् केशवम् राम नारायणम्

संसारे मोरे राखियाछ जेअि घरे
सेअि घरे रब सकल दुःख भुलिया।
करुणा करिया निशिदिन निज करे
रेखे दियो तार अेकटि दुयार खुलिया।
मोर सब काजे मोर सब अवसरे
से दुयार रबे तोमारि प्रवेश-तरे,
सेथा हते वायु बहिबे हृदय-'परे
चरण हअिते तव पदरज तुलिया।
से दुयार खुलि आसिबे तुमि अे घरे,
आमि बाहिरिब से दुयारखानि खुलिया

आर जत सुख पाअि बा ना पाअि तबु
एक सुख शुधु मोर तरे तुमि राखियो।

से सुख केवल तोमार आमार, प्रभु—
से सुखेर 'परे तुमि जाग्रत थाकियो।

ताहारे ना ढाके आर जत सुखगुलि,
संसार जेन ताहाते ना देय धूलि,
सब कोलाहल हते तारे तुमि तुलि
जतन करिया आपन अंके ढाकियो।

आर जत सुखे भरुक भिक्षा झुलि
सेअि एक सुख मोर तरे तुमि राखियो।

जत विश्वास भेंगे भेंगे जाय, स्वामी,
एक विश्वास रहे जेन चिते लागिया।

जे अनलताप जखनि सहिब आमि
देय जेन ताहे तव नाम बुके दागिया।

दुख पशे जबे मर्मेर माझखाने
तोमार लिखन-स्वाक्षर जेन आने,
रुक्ष बचन जतई आघात हाने
सकल आघाते तब सूर उठे जागिया।

शत विश्वास भेंगे जदि जाय प्राणे
एक विश्वासे रहे जेन मन लागिया।

या जगांत तूं मला ज्या घरांत ठेवलें आहेस, त्या ठिकाणीं, सर्व दुःख विसरून मी राहीन. मात्र कृपाकरून, हे प्रभो! त्या घराचा एक दरवाजा तूं

आपल्या हातानें दिवसरात्र उघडा ठेवावा. माझ्या सर्व कार्यांत आणि माझ्या सर्व रिकामपणांत तुझ्या प्रवेशासाठीं तो दरवाजा असावा. तुझ्या चरणींचा पदरज घेऊन वायु त्या दरवाजानें माझ्या हृदयाकडे वाहूं लागेल. तो दरवाजा उघडून तूं त्या घरांत येशील आणि तोच दरवाजा उघडून मी बाहेर येईन.

इतर सर्व सुखें मला मिळोत किंवा न मिळोत, पण फक्त एक सुख माझेसाठीं तूं राखून ठेवलें पाहिजेस. प्रभो! ते सुख केवळ तुझें आणि माझेंच असावें. आणि त्या सुखावर तुझी राखण असावी.

इतर सर्व सुखांनीं तें सुख झाकून टाकूं नये. आणि जगानें त्या सुखावर धूळ पडूं देऊं नये. यासाठीं त्या सुखाला सर्व कोलाहलाच्या वर उचलून आपल्या मांडीवर त्याला तूं झांकून ठेवावेंस. इतर कितीहि सुखें माझ्या भिक्षाझोळीला भरून टाकेनात का, एवढें एक सुख तुझ्याकडून माझ्यासाठीं राखीव असलें पाहिजे.

हे स्वामी! इतर कितीहि विश्वास भले भंगून जावोत, मात्र एक विश्वास माझ्या हृदयाला चिकटून राहावा. जेव्हां एखादा अग्निताप मला सहन करावा लागेल तेव्हां त्या तापानें माझ्या हृदयावर तुझें नाम अंकित करावें. (प्रत्येक तापाबरोबर तुझ्या नामाची तप्तमुद्रा मला मिळावी.)

जेव्हां जेव्हां दुःख माझ्या मर्मस्थानीं प्रवेश करील तेव्हां तेव्हां त्यानें तुझी स्वाक्षरी आणून द्यावी. कठोर वचनें कितीहि आघात करेनात का, परंतु त्या सर्व आघातांमध्यें तुझा स्वर जागून उठावा—ऐकूं यावा. प्राणाचे शेंकडों विश्वास जरी भंगून गेले तरी एका विश्वासावर माझें मन दृढपणें चिकटून राहावें.

□ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६६०५

REFBK-0016605

४९५०८
१५५८ वि: निबंध
नोंद दि: २५/६/८८

# परिशिष्ट

नैवेद्यांतील जीं गीतें इंग्रजी गीतांजलींत घेतलीं आहेत त्यांची यादी—

| *नैवेद्यांतील क्रमांक* | *इंग्रजी गीतांजलींतील क्रमांक* |
|---|---|
| १ | 76 |
| २४ | 81 |
| २६ | 69 |
| ३० | 73 |
| ३३ | 43 |
| ३५ | 57<br>crossing |
| ४४ | 75 |
| ७२ | 35 |
| ७५ | 4 |
| ८१ | 67 |
| ८६ | 40 |
| ८९/९० | 95 |
| ९८ | 25 |